इतिहास ॲ सन १८४५

ले. कॅ. ग्रांटडफ

मु. बरवर मराठ्यांची

(श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे)

5.24.3

HISTORY

of the

MARATHAS

Translated from the English Original

OF

CAPTAIN GRANT DUFF

BY

CAPTAIN DAVID CAPON.


VOL. II.

Second Edition.

Lithographed at the

Poona College Press.

1847.



बरवर

मराठ्यांची

क्यापटन ग्रांट डफ साहेब यांणीं

इंग्रेजीभाषेंत केलेली तिचें

भाषांतर

क्यापटन डेविड केपन साहेब यांणीं

महाराष्ट्र भाषेंत केलें,

त्याची दुसरी आवृत्ति.

उत्तरार्द्ध

पाठशाळा वाडा विश्रामबाग एथील छापखान्यांत

छापिलें.

छापणार परशुराम बल्लाळ गोडबोले.

मुकाम पुणें.

संनइसवी १८४७

शाके १७६९

ग्रंथ संग्रहालय
१९८०
मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. इ. ३

उत्तरार्द्धाची अनुक्रमणिका.

भाग अठरावा

सनसत्राशें छप्पन्नांपासून साठांपर्यंत.

१ रघुनाथराव लश्कर सुद्धां हिंदुस्थानांत स्वारीस गेला, व पेशवा करनाटकांत जाऊन श्रीरंगपट्टणचा खंड घेता झाला. २ खडा पाजवण्चे लढाईचा प्रकार. ३ हैदर अल्ली याचा उत्कर्ष, व हैदराबादचे दरबारीं कांहीं अभ्यंतरीं कृत्रिम झालें तें, व त्याचा शेवट. ४ इंग्रेज लोकांनीं सुरत घेतली तें प्रकरण. ५ पुनः मराठे यांणीं करनाटकांत संचार केला तो प्रकार, व हैदराबादचें कांहीं विशेष वर्तमान. ६ सदाशिवरावाच्या स्वभावाचें वर्णन. ७ त्यास दाशिवरावास मारेकरी घातला असतां तो वांचला तें प्रकरण. ८ सदाशिवराव सेनेचें मुख्यत्व पावून रघुनाथराव कारभार करूं लागला. व आमेदनगर मराठ्यांनीं कृत्रिमें करून घेतलें तो प्रकार. व दक्षिणेंत मराठे व मोंगल यांशीं युद्ध होऊन मराठ्यांस कायला भ झाला तो प्रकार.

भाग एकुणिसावा

सनसत्राशें साठां पासून एकसष्टांपर्यंत.

१ आफगाणांचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हिंदुस्थानांत येऊन दिल्लीशहर व मथुराशहर लुटलें. २ रघुनाथराव याणें मुलतान व लाहोर पेशव्याचे सत्तेंत आणिलें तें प्र-

करण. ३ राणोजी शिंदा याच्या पुत्राचे कांहीं वर्तमान. ४ दिल्लीचा बादशाह अलमगीर यास शाबूदिन वजीर याणें मारून टाकिलें. ५ अबदाली बादशाह याणें सुलतान नला होर यांतून मराठ्यांस घालविलें, आणि आपण दिल्लीकडे चालिला. ६ त्याणें मराठे सरदार यांचा पराभव केला, त्याव रून सदाशिवराव त्याच्या पारिपत्यास दक्षिणेहून निघाला. ७ नांपुढें जात असतां त्यास कितीएक सरदार येऊन मिळा ले, त्या योगें त्याचें सैन्य फार वाढलें. ८ मग त्याणें दिल्लीकडे जाऊन दिल्ली हस्तगत केली, आणि नवा बादशाह स्थापिला. ९ पानपताजवळची लढाई. १० त्यांत मराठ्यांचा बहुत नाश झाला. ११ आफगाण लोकांच्या क्रूरतेचें निरूपण. १२ बाळाजी बाजीराव पेशवा याचा मृत्यु. १३ त्याच्या स्वभावाचें कथन.

भागविसावा.

संनसत्राशें एकसष्टं पासून सासष्ट पर्यंत.

१ माधवराव बल्लाळ पेशवा झाला तें प्रकरण. २ नाराबाईचा मृत्यु. ३ निजाम अल्ली मराठी लोकांत वैमनस्यें पडून अल्लीसंधी पाहून त्यांस जिंकावयाकरितां निघाला. ४ टोंक्याच्या देवस्थानांचा भंग निजाम अल्लीनें केला तें प्रकरण. ५ तो निजाम अल्ली पुण्याजवळ येऊन त्याशीं व पेशव्याशीं लढ झाला. ६ रघुनाथराव व माधवराव पेशवे यांचा विघाड झाल्यामुळें रघुनाथराव औरंगाबादेस गेला, तेथें त्यास मोंगलांची कुमक मिळून तो माघारा पुण्यावर येत असतां

माधवराव पेशवा आपल्या मुशपणानें त्याच्या स्वाधीन झाला. ७ रघुनाथराव मुख्यत्व पावला असतां त्याच्या अनुचित आचरणेंकरून मोठमोठ्या लोकांची मनें विटलीं, तेणें करून ते किती एक जाऊन मोंगलास मिळाले. ८ त्यावर मोंगल ब्राह्मणाचें राज्य बुडवावयास उद्युक्त झाला. ९ मोंगल पुण्यास येऊन नें शहर लुटून नेथच्या कितीएका घरांचा खंड घेऊन कितीएक घरें जाळिलीं. १० शेवटीं रघुनाथराव चांगला समय पाहून मोंगलाच्या लश्कराचा अगदीं पराभव करिता झाला. ११ नंतर औरंगाबादेस पेशवे आणि मोंगल यांचा तह झाला. १२ हैदर अल्लीचा उत्कर्ष. १३ माधवराव फारयुक्तीनें त्या हैदराचा पराभव करिता झाला. १४ पेशवा व निजाम अल्ली मिळून जानोजी भोंसला याशीं युद्ध करून दिलेला मुलूख त्यापासून बळकटेक माघारा घेते झाले.

भाग एकविसावा.

सन सत्राशें सातसष्टांपासून बाराशेंपर्यंत.

१ इंग्लीश सरकार कंपनी बहादुर यांनामाचें अर्थसूचन, व त्या इंग्लिश लोकांहीं हिंदूच्या मुलखीं कोणें निमित्तें प्रथम प्रवेश केला तें प्रकरण. २ पुढें त्यांहीं आपल्या रक्षणाची गजमंडी घेतली. ३ मग त्यांचीं आणि निजाम अल्लीशीं झगडे पडला ती गोष्ट. ४ माधवराव पेशवा कर्नाटकीं जाऊन तेथच्या खंडणीचें बळकट द्रव्य घेऊन माघारा पुण्यास आला. ५ रघुनाथरावानें हिंदुस्थानांत स्वारी केली तें व मल्हारराव होळकर याचा मृत्यु. रघुनाथराव गोहदच्या राण्याचे स्थान घ्या

वयास गेला तो तेथें सिद्धि न पावतां माघारा पुण्यास आला.
६ रघुनाथराव चा पुतण्या माधवराव पेशवा या विषयीं त्याच्या मनांत कांहीं अविश्वास उत्पन्न होऊन तो होळकर व दमाजीगा इकवाड व जानोजी भोंसला यांच्या साहाय्यानें युद्धें करून स्व राज्य आपणास इच्छिता झाला. ७ मग मोठा युद्धप्रसंग होऊन रघुनाथराव माधवरावाचे केदेंत सांपडला तो प्रकार.
८ माधवराव व निजामअल्ली एकचित्त होऊन जानोजी भोंसल्याचे मुलखीं गेले. तो त्यांस शरण आल्यावर पेशव्यांस हि तावह असाजानोजीशीं तह झाला तो विस्तार. ९ माधवराव यांणें करनाटकांत जाऊन हैदर अल्लीचा बडुन मुलूख घेतला. १० मनवगळचा किल्ला घेते समयीं घाड्गे कुळाच्या दो हों लक्षिमांचा पुरातन वाद पुनःउत्पन्न झाला ती कथा. ११ करनाटकांत माधराव आपलें लश्कर चिंबकराव मामाच्या स्वाधीन करून आपण माघारा पुण्यास आला. १२ त्या चिंबकराव मामानें हैदरास जिंकून त्याशीं तह केला. १३ पानपतचे लढाई नंतर हिंदुस्थानांत कायकाय वर्तमानें झालीं त्यांचा विस्तार. १४ दिल्लीच्या बादशाहानें इंग्लिशांचा आश्रय धरिला. १५ जाटांचा राजा सुरजमल्ल याचा मृत्यु. १६ विसाजीकृष्ण सेन्यासहित हिंदुस्थानांत गेला. १७ नजीबखद वला याणें मराठ्यांशीं तह केला. १८ दिल्लीचा बादशाह इंग्लीश लोकांचा आश्रय सोडून मराठी लोकांकडे गेला. १९ सुजाउद्दवला व रोहिले मिळून ते मराठे लोकांस मुलखांतून बाहेर घालवावयास सिद्ध झाले. २० दिल्लीचा बादशाह द क्षणी ब्राह्मणांच्या अनृतस्वभावास कंटाळून त्याणें आपल्या

सरदारांला सर्व मराठे हांकून द्यावयास सांगितलें. २१ माधवराव पेशवा याचा मृत्यु, व त्याचे गुणाचें कथन. २२ रामशास्त्री याची गोष्ट.

भागबेविसावा

संनसत्राशें बाहत्तरां पासून पंचेहत्तरां पर्यंत.

१ रघुनाथराव बंदींतून सुटला परंतु नारायणराव पेशव्याच्या कांहीं तंट्यामुळें पुनः बंदींत पडला. २ नागपुरच्या भोंसल्याची हकीकत. ३ नारायणराव मारेकरी यांणीं मारिला. ४ मराठ्यांचें सैन्य हिंदुस्थानांतून माघारें फिरलें. ५ रघूजी भोंसला यास सेनासाहेब सुभा ह्मणामें पदवी प्राप्त झाली. ६ निजाम अल्लीवर रघुनाथराव यानें युद्ध होऊन निजामपरा भव पावून त्याणें रघुनाथरावास दिलेला मुलूख याणें त्यास माघारा दिला. ७ रघुनाथराव करनाटकांत गेला असतां कारभारीलोकांहीं त्यास अहित अशी कांहीं मसलत केली. ८ त्रिंबकराव मामा रघुनाथरावाशीं युद्ध करून पराभव पावला. मग रघुनाथरावानें हिंदुस्थानांत जाऊन इंग्लीश व होळकर व शिंदे यांशीं आपल्या साहाय्यार्थ कांहीं बोलणें लाविलें. ९ नारायणरावाचा पुत्र माधवराव नारायण तो पेशवा झाला. १० पुण्यांत कारभारी लोकांमध्यें वैमनस्यें पडून त्यांच्या दोन फळ्या झाल्या. ११ हैदर अल्लीनें करनाटकांतील मुलूख मराठ्यांचा घेतला. १२ विलायतेंतून कंपनी सरकारचे आज्ञेनें मुंबईहून कोणी वकील साहेब लोक पुण्यांत रहावयास गेला. १३ इंग्लिशांहीं भडोंच किल्ला घेतला. १४ठा

णें नामें साष्टीचा किल्ला इंग्लिशांहीं घेतला. १५ शिंदा व होळकर यांहीं राघोबाचा पक्ष सोडिला, यास्तव राघोबा बडोद्यास गेला. १६ गाइकवाडाचे कुमकेचें कांहीं वृत्त. १७ राघोबा व इंग्लीश यांचें बोलणें होऊन तह झाला. १८ त्या मध्यें त्याचे कुमकेस इंग्लिशांचें लश्कर आलें. १९ नें व रघुनाथराव यांचें लश्कर मिळून कसेंकसें वर्तलें तो विस्तार. २० आरासा जवळचे लढाईचा प्रकार. २१ जहाजांची लढाई. २२ फत्तेसिंग गाइकवाड याचा इंग्लीश व राघोबा यांशीं तह झाला. २३ रघुनाथराव याचा उत्कर्ष व माधवरावना रायण पेशवा याचा ह्रास लोकांमध्यें दिसूं लागला.

भागतेविसावा.

संनसत्राशें पंचाहात्तरां पासून एकुणेऐंशीपर्यंत.

१ रघुनाथरावं मुंबई सरकारा पासून आपलें कार्य करून घेत होता, तें कलकत्त्याचे मुख्य साहेब आणि त्यांचे मंत्री हे मध्यें पडल्या मुळें सिद्धीस गेलें नाहीं. २ कलकत्त्याहून कोणी वकील साहेब पुरंदरास आला, त्याचें व पुरंदरचे कारभारीलोक यांचें वागणें व त्या वकीलाशीं त्या कारभारी मंडळीनें तह केला तो विस्तार. ३ सदाशिवराव भाऊचें सोंग घेणारा सदोबा याचा उत्कर्ष व पराभव आणि मृत्यु. ४ राजाराम राजा याचा मृत्यु व त्याचे जागीं चिंबकजी भोंसला याचा पुत्र रागू महाराज नामें करून स्थापिला. ५ कोल्हापूरकर वसुधोजी भोंसला यांचें कांहीं मागील वर्तमान. ६ पुण्यांत कारभारीलोकांमध्यें वैमनस्य पडून दुफळी झाली. ७ मोरोबा फडनवीस याची

मंडळी मुख्यला पावून राघोबास आणवून तो मुख्य करावा अशी मसलत ठरली, मग नानाफडनविसानें आपला अर्थ साधावाया साठीं सकपठ युक्ती केल्या त्यावरून राघोबा विषयीं मोरोबाचें मन फिरून त्यास रघुनाथराव विषयीं इंग्लिश बोलत असतांही त्याणें राघोबाचें अगत्य ठाकिलें. ८ नाना फडनवीस व त्याची मंडळी श्रेष्ठता पावून त्यांणीं तो मोरोबा फडनवीस व त्याची मंडळी कैद केली. ९ फ्रेंचांचा वकील पुण्यांत येऊन प्रतिष्ठेनें वागला तो प्रकार. १० त्या निमित्तें कलकत्याहून सहा पलटणें मुंबईस येऊं लागलीं. ११ त्याव रून नानाफडनवीस याची तयारी झाली. १२ नंतर मुंबई सरकारांत मसलत ठरली कीं, राघोबास बळेंच पुण्यामध्यें स्थापावें परंतु इकडे मुंबईसरकारचे मंडळींत वैमनस्य पडल्यानें राघोबाच्या कार्यास इंग्लिशांचें लश्कर विलंबें करून बोरघाटावर जमा झालें. १३ मग तेथून पुढें तळेगांवा जवळ मराठी लश्कराची गांठ पडली असतां त्या मुख्य साहेबांस कांहीं भय वाटून ते पुढें न जातां त्यांहीं मागें हटावें असा नेम केला. १४ त्या संबंधें वडगांवा जवळ त्या इंग्लीश लोकांवर कांहीं अनर्थ गुदरला तो प्रकार. १५ बंगाल्याहून इंग्लिशांचें लश्कर मुंबईस येत होतें तो विस्तार. १६ महादजी शिंद्यानें रघुनाथराव विषयीं काय काय वर्तणूक केली त्याचें कथन. १७ त्या शिंद्यानें सरवाराम बापू व चिंतो विठ्ठल हे दोघे नानाफडनविसाच्या स्वाधीन केले. ते त्यास अनिष्टकारक त्यणून त्याणें त्यांस बंदींत ठेविलें असतां त्या प्रतिबंधांतच ते उभयतां मृत्यु पावले.

भागचो विसावा

संनसत्राशें एकूण ऐंशीं पासून पंचायशीं पर्यंत.

१ जनराल गाडुड साहेब व नाना फडनवीस यांचें नव्हादि पर्यंत कांहीं बोलणें झालें. २ इंग्लीश दुसऱ्याचा पक्ष न धरितां स्वयेंच मराठे लोकांशीं युद्ध करूं लागले. ३ मग वडोद्याजवळ दुभायशहर आहे तेथें इंग्लिशांचें लश्कर जाऊन तें ठिकाण घेतलें. ४ फत्तेशिंग गाइकवाड याशीं तह केल्याचा प्रकार. ५ पेशव्याच्या लोकांपासून अमदाबाद कोट इंग्लिशांहीं लढून घेतला. ६ मग गाडुड साहेब यास जिंकावया करितां शिंदे व होळकर गुजराथेंत गेले. ते कोण कोणत्या प्रकारें वागले नें प्रकरण. ७ बंगाल्याहून लश्कर येऊन ग्वाल्हेर व लाहोर हे दोन्ही किले घेतले. ८ कोंकणांत इंग्लीश व मराठे युद्ध करिते झाले तो प्रकार. ९ दुधारा अबस्ची लढाई. व वसई किल्ला इंग्लिशांहीं हस्तगत केला. १० जनराल गाडुड-साहेब कच्चे मसलतीनें बोरघाटास ठाणें धरून राहिला. मग मुंबईकडे त्यास हटून जाणें भाग झालें, त्यांत त्याचा कांहीं सा नाश झाला. ११ बंगाल्याचें लश्कर शिंद्याच्या मुलखांत शिरलें तो प्रकार. १२ मद्रासचे कुमकेस्व कलकत्त्याहून लश्कर पायवाटेनें पाठविलें तेसमयीं मुधोजी भोंसल्याचें लश्कर कलकत्त्यास होतें तत्संबंधें आपल्या लश्करास अडथळा नव्हावा म्हणून कलकत्त्याच्या साहेबानें तो मुधोजी स्वपक्षानुसारी केला. १३ सर्व मराठे व इंग्लीश यांचा महादजी शिंद्याच्या हारें तह झाला. १४ इंग्लिशांहीं भडोंच किल्ला शिंद्यास दिला.

१५ हैदर अली मरण पावल्यावर त्याचा पुत्र टिपू याचें वा गणें. मद्रासेच्या इंग्लिशांहीं सालप्याच्या तहाचा बेंत ध्यानांत न आणितां टिपूशीं वेगळा तह केला. १६ नानाफडनवीस व निजाम यांची टिपूवर कांहीं मसलत झाली. १७ रघुनाथ रावाचा मृत्यु व त्याच्या पुत्रांची कांहीं गोष्ट. १८ संनसवाशेंच्या हत्तरां पासून दिल्लीकडे कायकाय वर्तमान झालें तें प्रकरण. व सुजा-अदवल्याचा मृत्यु. १९ नजीफखानाचा दत्तपुत्र याणें शिंद्याची कुमक मागितली, तेणेंकरून तो शिंदा दिल्लीमध्यें फार योग्यता पावला. २० त्यायोगें शिंदा उन्मत्त होऊन त्याणें इंग्लिशांस कांहीं अमर्याद मागणें केलें, त्यावरून तेरुष्ट होऊन त्यांहीं शिंद्याची मध्यस्थी दूर करून आपला कोणी साहेब नेहेमी पुण्यास असावा असा नेम केला.

भागपंचविसावा

संनसवाशें पंचांयशीं पासून नव्वद पर्यंत.


१ टिपूनरगुंदच्या देसाया बरोबर कसकसा वागला तें प्रकरण. २ त्या टिपूनें हिंदूवर जुल्म करून त्यांस मुसलमान केलें. ३ नानाफडनवीस याणें टिपूला जिंकावया करितां इंग्लिशांचे कुमके विषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. ४ पुण्याहून मराठ्यांचें लश्कर निघालें तें निजाम अलीवर मुधोजी भोंसले यांस मिळून टिपूवर चालिलें. ५ बदामी किल्ला युद्ध करून मराठ्यांहीं घेतला. ६ तुकोजी होळकर कितुरास जाऊन काय काय करिता झाला तो प्रकार. ७ मावनूरच्या नवाबाची कांहीं गोष्ट. ८ टिपूनें एका

एकीं मराठ्यांशीं तहाचें बोलणें लाविलें तो विस्तार. ९ महाद जी शिंदा दिल्लीमध्यें योग्यतेस चढूं लागला असतां त्याणें अन्या यकर्मे केलीं त्यामुळें मुसलमानलोक त्याचा द्वेष करूं लागले. १० त्या शिंद्यानें रजपुतांकडे खंडणी मागितली असतां तेसा रे एकत्र मिळून त्याशीं युद्ध करिते झाले. त्या युद्धाचा प्रकार व त्याचा शेवट कसा झाला तें प्रकरण. ११ त्या शिंद्यास संकटप्राप्त झालें असतां तो कसकसा वागला तें प्रकरण. १२ त्याणें पुण्याहून कुमक आणविली. १३ आग्र्याजवळची लढाई. १४ इस्मायलबेगाचा पराभव आणि शिंद्याचा जय. १५ कोणी गुलामकादर मामा याचें आचरण व त्याचा मृत्यु. १६ शिंदा दिल्लीमध्यें पुनः मोठी योग्यता पावला. १७ त्याणें आपल्या लश्करचा कायकाय बंदोबस्त केला तो विस्तार.

भागसविसावा

संनसवाशें नवदां पासून ब्याण्णव पर्यंत.

१ टिपूनें गेशाब्यांशीं तह केलेला मोडून फौजेची तयारी केली. २ नंतर टिपूनें इंग्लिशांचा गिवचावन कोरवाला याशीं युद्ध केलें असतां त्याच्या पारिपत्याविषयीं इंग्लीश व मराठे व मोंगल यांचें ऐक्य झालें. ३ इंग्लिशांची टोळी परशुरामभाऊस मिळून टिपूशीं युद्धाचा उपक्रम केला. ४ धारवाड किल्ल्याच्या युद्धाचा प्रकार. ५ मद्रासेकडून इंग्लिशांचें लश्कर आलें त्याचें वागणें. ६ मोंगलांची वर्तणूक. ७ हरीपंत फडके व परशुराम भाऊ यांचें लश्कर इंग्लिशांस मिळालें तो



विस्तार. लाटकानवालिसाने श्रीरंगपट्टणास घेरा घालावयाची तयारी केली असतां अन्नधा-
णादिकाचे तोटयामुळें त्यास तो उद्योग सोडावा लागला.
९ यानंतर इंग्लीश व मराठे व मोंगल यांचा टिपूच्या मुलखीं
कसकसा संचार झाला तो प्रकार. १० लाटकानवालिसानें
पुनः श्रीरंगपट्टणास घेरा घातला. ११ मगसला झाल्यावर
इंग्लीश व मराठे व मोंगल यांस कायकाय लाभ झाला तीक
था. १२ परशुरामभाऊ श्रीरंगपट्टणास विलंबें करून
आला तो विस्तार. १३ त्यास तेथून माघारा पुण्यास जातां
ना वाटेनें बहूत उपद्रव सोसावा लागला.

भागसत्तावीसावा

संनसत्राशेंब्याण्णवां पासून पंचाण्णव पर्यंत.

१ महादजी शिंदा पुण्यांतील कारभारी मंडळी पेक्षां वरचढ होण्याविषयीं पुण्यास गेला. २ पेशव्यास वश करून घ्याव
याविषयीं त्याणें उद्योग कसकसा केला तो प्रकार. ३ पेश्व्या-
स वकील मुतलक नामें पदवी प्राप्त होऊन पेश्व्यानेंही महाद
जी शिंद्यास आपला हस्तक करून तो दिल्लीच्या कामावर स्था-
पिला तो विस्तार. ४ रजपूतांच्या मुलखांत शिंदे होळकर
यांच्या सरदारां सरदारांची लखेरी जवळ लढाई झाली तें प्रक
रण. ५ त्यामुळें पुण्यांतील वहिवाटींत कांहीं अंतर पडलें.
६ नानाफडनवीस याणें पेश्व्यादीं एकांत करून आपली मु
ख्यता बळकट केली. ७ महादजी शिंद्याचा मृत्यु. ८ त्या
च्या स्वभावाचें व बुद्धीचें वर्णन. ९ त्याचे जागीं त्याचा भा

वाचा नातू दबलतराव शिंदा यांची स्थापना. १० नागपूरच्या भोंस
ल्याची गोष्ट. ११ बडोद्याचें वर्तमान. व गोविंदराव गाइकवा
ड यास बडोद्यांत अधिकार प्राप्त झाला तें १२ महाराष्ट्र मुल-
खाचा पश्चिम भाग समुद्रतीर तेथचे मंडळाधिपति त्यांचीं व
र्तमानें. १३ त्यांहीं चांचेपणा केला तो व त्यांचें निवारण.
१४ मराठी लोक पहिल्या लढाईची चाल टाकून पलटणांच्या भ
रंवशावर लटूं लागल्यानें कायकाय परिणाम झाला तो प्रका
र. १५ होळकरानें पलटणें चाकरीस ठेविली. १६ मराठी
समुदाय पिळून निजामाजीं बाकी ऐवज मागावयाचे निमित्तें
युद्धास सिद्ध झाले. व खरडयाची लढाई. १७ निजामाचा पु
त्र जो अलीजहां तो मृत्यु पावला. १८ नानाफडनवीस यांची
कांहीं गोष्ट.

भाग अठ्ठाविसावा

संनसबाशें पंचाण्णवां पासून नव्याण्णवपर्यंत.

१ नानाफडनवीस माधवराव नारायण पेशवा यांस को-
णत्या प्रकारच्या बंदोबस्तानें बागवीत होता तें. व साताऱ्याचा
राजा व रघुनाथरावाचें कुटुंब यांस कशा बंदोबस्तांत रक्षि-
लें तें प्रकरण. २ रघुनाथरावाच्या औरस पुत्रांत बाजीराव
वडील त्याचे गुण व स्वरूप यांचें वर्णन. व त्या बाजीरावा विष
यीं नानानें फार मत्सर केला तो प्रकार. माधवराव नारायण
पेशवा व बाजीराव रघुनाथ हे दोघ नानाच्या बंदोबस्तांत होने
यास्तव ते समदुःखी होऊन त्या उभयतांची मैत्री झाली. व तें
नानास विदित होऊन त्यांणें त्या उभयतांचा विशेष बंदोबस्त

केला. २ तें माधवरावास सहन न होतां त्याणें माडी वरून उडी टाकिली, आणि मृत्यु पावला. ४ नानानें बाजीराव गादीचा अधिकारी नव्हावा म्हणून यत्न केला तो प्रकार. ५ बाजीरावानें बाळोबा तात्या व शिंदा यांस आपल्या पक्षाचे करून नानाची मसलत मोडावी असें केलें तें समजून नाना आपणच बाजीरावाला गादीवर बसवावयास उद्युक्त झाला. ६ तेव्हां बाळोबा तात्यानें बाजीरावाला शिंद्याच्या बंदींत ठेवून त्रिमणाजी आपास गादीवर बसवून परशुरामभाऊ पटवर्धन तो मुख्य कारभारी केला. ७ नव्या कारभारी मंडळीनें नानास मुख्य कारभारी करितों असें मिष करून त्यास दगा करावयाची मसलत केली. तें हत्य नानास विदित होऊन तो सावध झाला, त्यांतच नाना आणि बाजीराव यांचें एकच कार्य पडलें. ८ सरजेराव घाडगा व बाळोजी कुंजर हे नानाच्या उपयोगीं कसे पडले तें प्रकरण. ९ नंतर बाजीरावास गादीचा धणी करावया करितां त्या नानानें शिंदा अनुकूळ केला. १० ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं तोंच बाळोबा तात्यास विदित होऊन त्याणें बाजीरावास हिंदुस्थानांत पाठवावयाचें योजिलें. तिकडे जाणें न होण्यासाठीं बाजीरावानें कांहीं युक्ति केली तो प्रकार. ११ नानानें शिंद्याचे द्वारें बाळोबा तात्यास कैद केलें. व परशुरामभाऊ पुण्याहून पळाला तेसमयीं त्याचे पाठीस लोक लागले होते त्यांहीं त्यास धरिलें. १२ बाजीरावास पेशवे पदवी प्राप्त झाली, आणि त्रिमणाजीआपायास कांहीं प्रायश्चित्त देऊन तो गुजराथचा अधिकारी केला तो प्रकार. १३ नानानें करार केल्या प्रमाणें शिंदा वरपोजी भोंसला यांस तेंनें प्राप्त केलें. परंतु निजामास कबूल केल्या प्रमाणें बाजी

राव देईना ह्मणून मझीरउल्मुल्कराव फार रुष्ट होऊन तेथून निघून गेला. १४ तुकोजी होळकर याच्या मृत्युनंतर त्याच्या पुत्रांत गादीविषयीं वाद पडला तेव्हां मल्हारराव होळकर युद्ध करून मृत्यु पावला. व काशीराव होळकर यास शिंद्याचें द्वारें बापाचा सर्व अधिकार प्राप्त झाला. १५ नाना व शिंदा या दोघांस दूर करावया विषयीं बाजीराव यत्न करूं लागला. त्यांत शिंद्याच्या हातून नानास केद करून तो नाना व त्याचे पक्षपाती लोक यांचीं घरें लुटावयाची आज्ञा दिली त्यायोगें सर्व शहरांत दंगा झाला. १६ त्या नंतर बाजीराव पेशवा याचा मुख्य कारभारी अमृतराव झाला. १७ सरवाराम घाडगा याणें आपली कन्या शिंद्यास दिली आणि त्या चा मुख्य खें कारभार आपण करूं लागला. आणि तो सर्जेराव घाटगा व बाळोजी कुंजर हे दोघे बाजीरावाच्या अनुकूलतेनें पुण्यांतील कितीएकां मोठमोठ्या गृहस्थांस अत्यंत पीडा करून त्यांपासून पैका घेते झाले. १८ अमृतरावानें शिंद्यास धराव याची मसलत केली त्यास बाजीरावाची अनुकूलता होऊन शेवटीं त्या बाजीरावाच्या भित्रेपणामुळें सिद्धीस गेली नाहीं.

१९ साताऱ्यांचें काम परशुराम भाऊ पटवर्धनास सांगितलें त्या योगें तो बंदींतून मुक्त झाला.

भागएकुणतिसावा

संनसबाशें अठ्याण्णवां पासून अठराशें पर्यंत.

१ शिंद्याच्या बायांचें वर्तमान. २ त्या बायांहीं दंगा उत्पन्न केला आणि अमृतरावाच्या लश्करांत आश्रय पावल्या. ३ पेशवे व शिंदे यांचें वैमनस्य पडलें व शिंद्यानें नानास मुक्त केलें

४ नंतर शिंदा आणि पेशवा यांचें पुनः ऐक्य झालें दसरजेराव घाडगा यास शिंद्याच्या आज्ञेनें प्रतिबंध झाला. ५ इंग्लिशां हीं निजाम अल्ली व पेशवे यांशीं तह केला. ६ नाना फडनवीस व बाजीराव यांच्या कांहीं गोष्टी. व बाजीरावाचें कुटिल वृत्त. ७ इंग्लिशांहीं श्रीरंगपट्टण घेतल्याचें वर्तमान. ८ त्या मुलखाची वांटणी केली तें प्रकरण. ९ इंग्लीश आणि निजाम अल्ली यांमध्यें नवा तह झाला. १० बायांचे फारवाढलेलें बंड तें मोडावयास शिंद्यानें बाळोबा नायास बंदींतून मुक्त केलें.

११ कोल्हापुरचें कांहीं वर्तमान. चतुरशिंग राजा याणें युद्ध केलें नो प्रकार. १२ परशुराम भाऊ पटवर्धन युद्धांत पराजय पावून मृत्यु पावला.

भागनिसावा

सन अठराशें पासून अठराशें तीन पर्यंत.

१ नाना फडनविसाचा मृत्यु व त्याच्या स्वभावाचें वर्णन. २ बाळोबा तात्या याचा मृत्यु व धोंडीबा नाघ व नारायणराव बक्षी यांस निर्दयपणें पेशव्यानें मारिलें तें प्रकरण. ३ दक्षिणेंत धामधूम झाली तो प्रकार. ४ धोंडीबाघाचें बंड व त्याचें पारिपत्य इंग्लिशांहीं केलें तें. (पुण्यांतील कांहीं वर्तमानें). ५ शिंद्याची माळव्यांतील कांहीं गोष्ट व यशवंतराव होळकराचा प्रादुर्भाव. ६ शिंदा पुणें सोडून हिंदुस्थानांत चालिला. ७ नंतर त्याशीं व होळकरा शीं युद्ध झालें तो विस्तार. ८ सर्जेराव घाडगा पुणें सोडून शिंद्यास मिळून इंदुरावर जाऊन तेथें यशवंतराव होळकराचा पराभव करूं झाला. ९ यशवंतराव होळकर याणें दक्षिणेंत संचार केला.

१० नंतर तो पुण्याजवळचे लढाईंत जय पावला. ११ बाजीराव पेशवा सिंहगडाहून निघून कोंकणांत जाऊन तेथें इंग्लिशां-च्या जहाजांत बसून वसईस गेला. १२ संनसत्राशें त्र्याण्णवां पासून अठराशें दोहों पर्यंत बडोद्यांत कायकाय वर्तमानें झालीं तो प्रकार.

भागएकतिसावा

संनअठराशें दोहों पासून अठराशेंआठ पर्यंत.

१ होळकर पुणें मुकामीं जय पावल्या नंतर तेथच्या लोकां स उपद्रव न देतां नम्रतेनें वागल्याचें कारण. २ त्याणें बाजीरा व पेशवा याच्या गादीवर अमृतरावाचा पुत्र विनायकराव बस-विला. व पुणे शहरचे लोकां पासून खंडणी घेतली. ३ वसईतपे शवा व इंग्लीश यांचा तह झाला तो प्रकार. ४ त्या तहास विघ्न करावया विषयीं शिंदे व रघूजी भोंसले एकमत होऊन त्यांणीं गु प्तपणें सैन्य जमा केलें. ५ इंग्लिशांच्या बळानें बाजीराव पेशवा आपल्या गादीवर पुनः बसला. ६ रघूजी भोंसला वं शिंदा यां शीं तहाचें बोलणें लाविलें तें सिद्धीस नजातां उभय पक्षीं मैत्री तुट ली ७ आहमदनगर किल्ला इंग्लिशांहीं घेतला. ८ असायी जवळची मोठी लढाई. ९ अशीरगड व भडोंज व पवनगड हे किल्ले इंग्लिशांहीं घेतले. १० हिंदुस्थानांतील युद्ध प्रकार. ११ दिल्ली व आग्रें व लासबारी याजवळच्या लढाईची गोष्ट. १२ दक्षिणेंत आरगांवा जवळ लढाई झाली तें प्रकरण. १३ देव गांवचा व सर्जी अंजिण गांवचा तह. १४ होळकर व इंग्लीश यांचें वैमनस्य पडून जनरल लेक् साहेबानें सैन्या सुद्धां त्याचे

पाठीस लागून त्यास त्याचे मुलखीं घालविलें. १५ त्यानंतर तो होळकर पुनः येऊन त्याणें कार्णेल मानसन साहेब याच्या हाताखाल चे एके टोळीचा पराभव केला. १६ मग तो होळकर मोठ्या सैन्या सहित हिंदुस्थानांत शिरला. व त्या होळकराचें लष्कर दिल्लीजवळ पराभव पावलें. व दिगाजवळची लढाई व तो किल्ला इंग्लिशांहीं घेतला. १७ होळकराचे दक्षिणेंतील किल्ले व त्याची राजधानी इंदूर इंग्लिशांचे हातीं लागलें. १८ जनरल लेक साहेबानें भरतपूर किल्ला घ्यावयाचा उद्योग केला तो शेवटास न गेला तथापि त्या राजानें वकील पाठवून इंग्लिशांशीं तह केला. १९ शिंद्यानें होळकराचा पक्ष स्वीकारिला यास्तव त्याशीं व इंग्लिशांशीं वैमनस्य पडलें. २० होळकर पंजाबाकडे पळाला. त्याचे पाठीस लेक साहेब लागल्या मुळें त्या उभयतांचा तह झाला. २१ तेविसमयीं शिंद्यानें ही इंग्लिशांशीं तह केला. २२ होळकर पंजाबांतून आल्यावर त्यास वेड लागून तो मृत्यु पावला. २३ त्याच्या स्वभावादिकांचें वर्णन.

भागवत्तिसावा

सन अठराशेंतिहींपासून अठराशेंसत्रांपर्यंत.

१ यशवंतराव होळकर मेल्यानंतर त्याचा कारभार अमीरखानानें मुख्यत्वें केला तें प्रकरण. २ शिंदे व नागपूरकर भोंसले यांचें वर्तमान. ३ पेंढारी लोकांची कांहीं गोष्ट. ४ बाजीराव पेशवा पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वागला तें. ५ प्रतिनिधीचें बंड. ६ बाजीराव पेशवा याणें माधवराव रास्त्याशीं व दरकड जहागीरदार यांशीं कोणें प्रकारें कृत्रिम ठेवलें

तो विस्तार. ७ सदाशिव माणकेश्वर व कुसुरुजी मोदी यांच्या वह्िवाटींचा प्रकार. ८ विंचूरकजी ठेंगड्या योग्यतेस चढल्या त्याप्रकार. ९ बाजीरावानें आपल्या जवळ द्रव्य जमा केलें तें. १० त्याणें इंग्लिशांस बुडवावया विषयीं कशी मसलत केली तें प्रकरण. ११ त्या बाजीरावाशीं व बडोदेकराशीं वह्िवाट झाली तें. १२ गंगाधरशास्त्री पटवर्धन याचा वध. १३ त्या पुढें विंचूरकजी ठेंगळा इंग्लिशांच्या बंदींत पडलेला असतां पळून गेला. त्यास बाजीराव पेशव्यानें गुप्तपणें आश्रय दिला. १४ त्यावर इंग्लिशांही काय काय केलें तें प्रकरण.

भाग तेहेतिसावा

सन अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्तीपर्यंत.

१ बाजीराव पेशवा व बापू गोखला यांणीं एकमतें इंग्लिशांच्या नाशा विषयीं मसलत केली. २ इंग्लीश व पेशवे यांचा स्नेह तुटून पुण्या जवळ युद्ध झालें. ३ बाजीराव पेशवा युद्ध टाकून पळाला. ४ कोरेगांवची लढाई. ५ बापू गोखला अष्टा जवळ इंग्लिशांवर हल्ला करून मृत्यु पावला. ६ नागपूरकराचें कृत्य. ७ सीताबळदी जवळची लढाई. ८ नागपूरकर आपासाहेब तो इंग्लिशांशीं स्नेह करून आपल्या गादीवर बसला. ९ चितू पेंढारी यास होळकरानें आश्रय दिला यास्तव मेहेदपुराप्रांतीं होळकराची व इंग्लिशांची लढाई झाली. १० भगा तो होळकर शरण येऊन त्याचा व इंग्लिशांचा तह झाला. ११ पेंढारी यांचे मुख्य सरदार इंग्लिशांहीं धरिले. १२ आपासाहेब पुनः गादीवर बसल्यानंतर कसकसा वर्तला तें. १३ से-

वनी पाशीं बाजीरावाची व इंग्लिशांची गांठ पडली. १४ बाजीराव पेशवा इंग्लिशांचे हस्तगत होऊन त्यांहीं त्यास ब्रह्मावर्ती ठेविलें. १५ मराठी राज्य इंग्लिशांहीं घेतल्यानंतर कसकसा बंदोबस्त केला तें प्रकरण.

ठाणे.
परा. ग्रंथ संग्रहालय
क्रमांक.....
नं.....

मराठ्यांचीबखर

उत्तरार्ध

भागअठरावा

संनसत्राशें छप्पन्नापासून संनसत्राशेंसाठ पर्यंत झालेलींवर्तमानें

१ संनसत्राशें छप्पन्नाचा पर्जन्यकाळ गेल्यावर पेशव्यानें आपला भाऊ रघुनाथराव याजबरोबर फौज देऊन त्याची दिवाणगिरी सखारामबापूला सांगून त्यास हिंदुस्थानांत पाठविलें, आणि आपण मोठें सैन्य जमा करून कर्नाटकाकडे चालिला. तो संनसत्राशें सत्तावन्नांत अकस्मात् श्रीरंगपट्टणचे किल्ल्याजवळ प्रकट होऊन आमचा बाकी खंडयेणें राहिला आहे असें निमित्त करून तेथच्याअधिकाऱ्याजवळ अमर्याद पैका मागूं लागला. तो निकडेजात असतां खर्चाचा नवाब खेरीज करून कृष्णेच्या दक्षिण कांठचे जे नबाब होते ते त्याला सर्व अनुकूळ झाले, आणि घोरपडाही सहा हजार स्वारांनिशीं येऊन त्यास मिळाला. नंदजीराजनामें म्हैसुरच्या राजाचा दिवाण तो बऱ्हेंच श्रीरंगपट्टणाचा अधिकार आपणा चालवीत होता, त्याणें तें पेशव्याचें मागणें पहिल्यानें मान्य केलें नाहीं, परंतु तोफांच्या माराघुटें निरुपाय होऊन आर्जवानें त्याचीं

बोलून तेंदेणें फार हलकें ठरवून त्यापेकीं तत्काळ नगद पांच लक्ष रुपये दिले, बाकीचा ऐवज जमा होई तोंपर्यंत त्यांहीं कांहीं मुलूख बाहिवाटावा असें केलें. त्यानंतर पेशव्याच्या मनांत आलें कीं, पूर्वी मराठ्यांच्या स्वाधीन जितका करना टकचा मुलूख होता तितका आपल्या सत्तेंत आणावा, म ग त्याणें शेरापरगणा घेतला, आणि पांऊसकाळ पुढें समी प आला त्मणून बऊनेक लश्कर बरोबर घेऊन माघारा पु ण्यास येऊं लागला. तेव्हां बाकी फौज बळवंतराव मेहेंद-व्याचे स्वाधीन करून उसकटा व बंगलोर व बाळापूर व कोल्हार इतके परगणे घ्यावयासाठीं तेथें ठेविली. त्यानं तर खर्पाच्या नवाबापासून बळवंतरावानें उसकटा घेत-ला, आणि अर्कोटच्या नवाबापाशीं चौथ व सरदेशमुखी या बद्दल बऊन वाद प्रतिवाद करून दोन लक्ष रुपये नगद व अडीच लक्ष मुलखांतून वसूल करून घ्यावे असा ठराव ठरविला. त्या अर्कोटच्या नवाबास मद्दासचे इंग्रेज लोक अनुकूल होते, त्यांहीं त्यास खंडणी न पडावी त्मणून बळवंत राव यास सांगितलें कीं, तुम्हाला फ्रेंचांशिमांच्या मुलखीं स्वारी करावयास हा उत्तम समय आहे. असें त्या इंग्रेजांचें मांगणें बळवंतरावानें नमानिल्यामुळें त्याणें जोठराव केला होता तो पैका त्या नवाबास द्यावा लागला.

२ यानंतर खडापापाशीं खर्पाचा व करनाळचा यांशी हों नवाबांनीं मिळून त्या मेहेंदळ्याशीं युद्धप्रसंग केला, परंतु

+ फ्रांशीस व इंग्रेज यांशीं त्यासमयीं युद्ध लागलें होतें.

ते जय नपावतां खर्पाचा नवाब मृत्यु पावला, आणि मराठ्यां हीं त्याची राजधानी लुटली, तथापि तत्पक्षी जे लोक होते त्यांणीं युद्धें करून तो मुलूख मराठ्यांचे हातीं लागूं दिला ना हीं.

३ इतक्यांत म्हैसूरचे दरबारी हैदरअल्ली जो पुढें मो ठया योग्यतेस येणारा त्याचे मसलतीनें त्यालोकांहीं पूर्वी- च्या खंडणीपैकीं कांहीं नगद पैका देऊन बाकी ऐवजास मुलूख लावून दिला होता तो माघारा घेतला. त्यावरून पु- ण्यामध्यें पेशव्यानें सैन्य तयार करून गोपाळहरीस त्याबरो बर देऊन तें मेहंदळ्याचे कुमकेस पाठविलें, परंतु औरंगाबा देंत मुख्य प्रधान शानवाजखान होता त्याणें कांहीं मसलत करून बादशाहास कैदेंत ठेवून त्याचे जागीं त्याचा भाऊ स्था पावा व त्याचें साहाय्य करणारे फ्रांशी सलोक दक्षिणेंतून काढून द्यावे अशी योजना केली. त्या मसलतीस पेशवे मुळापासून अनुकूळ असतील म्हणून गोपाळहरी श्रीरंग पट्टणास हैदरअल्लीवर जात होता तो माघारा फिरवून औ रंगाबादेकडे पाठविला. नंतर त्या नवाजखानानें योजिले- लें कृत्रिम शेवटास नजातां तो फ्रांशीसलोकांचे हातूनच मे ला गेला. त्याचे जागीं बादशाहाचा भाऊ मुळाबनजंग प्रधा न केला, दुसरा भाऊ निजामअल्ली तोपळून गेला, आणि फ्रांशीसलोक यांचें बळ वाढलें. इतक्यांत ते फ्रांशीसयांचा कोणी नवा मुखत्यार आला त्याणें इंग्रेजांचें युद्ध संभाळावया स त्या फ्रांशिसांस बोलाविलें, तेव्हां तो बसी फौज सद्दिन स्वसंतोषें दौलताबाद किल्ला सोडून दक्षिणेंतून निघाला.

तेसमयीं त्याशीं स्पर्धा करणारे हिंदू व इतर कोणी होते त्यांस मोठा चमत्कार व आनंद वाटला; आणि सलाबतजंग यास त्यांपासून उपयोग होई तो त्याचा आश्रय गेल्यामुळें तो फार श्रमी झाला.

४ तेवेळेस मराठे लोक पुण्यास चालिले असें औरंगाबादेकडचें वर्तमान असतां मुंबईच्या इंग्रेजांनीं सुरत घ्यावयाची मसलत करून त्याप्रमाणें तयारी केली. त्यावेळेस पेशवा औरंगाबादेच्या कामांत गुंतल्यामुळें त्याला त्या इंग्रेजांचें निवारण करावयास अवकाश सांपडला नाहीं, परंतु त्यांणें चातुर्यें करून तें काम सिद्धीस जाऊं नदिलें. तो प्रकार असा, कल्याणचा सुभेदार शंकराजीपंत यास आज्ञा केली कीं, हा लीं आम्हाला रिकामपणा नाहीं, आम्हीं याकामांतून मोकळे होऊं तोंपर्यंत तुम्ही इंग्रेजांस भुलथापी देऊन तसेंच राखावें. त्यावर त्यांणें विनंती केलीकीं, तें चालावयाचें नाहीं, कांकीं, ते लोक आपला अर्थ शोधतील. त्यावरून बाळाजीबा जिरावानें आपलें लश्कर कितीएक मजला पश्चिमकडे चालविलें, आणि पुण्यामध्यें इंग्रेजांचा वकील कोणी हिंदू होता त्याकडून इंग्रेजास असें कळविलें कीं, पेशवा लश्कर सुद्धां मुंबईवर येतो. त्यावेळेस इंग्रेजांनीं दक्षिणीकारभार किंमपि नजाणल्यामुळें तें वर्तमान खरें मानून मुंबईच्या बंदोबस्ता सलदाऊ गलबतें सिद्ध करून व कांहीं सुरतेस होतीं तींही आणवून मोठ्या तयारीनें पेशाव्याची मार्गप्रतीक्षा करीत तेथें च राहिले. अशा कारणानें त्यावेळेस तें काम नझालें, परंतु पुढें थोडकेसे महिने गेल्यावर त्यांहीं सुरत घेतली, त्याकामां

न इंग्रेजांचे शिपाई व सरदार बऊत मेले गेले. याप्रमाणें सं
नमत्राशें एकुणसाठांच्या चौथ्या महिन्याचे चवथे तारिखेस
इंग्रेजांचे हातीं सुरत लागली.

५ पेशवा माधारा पुण्यास आल्यावर पर्जन्यकाळ गेल्या
नंतर म्हैसूरकरानें खंडणी पैकीं ऐवजास लावून दिलेला मु
लूरव त्याणें माधारा घेतला होता तो घ्यावयाकरितां गोपाळ
हरीस पाठविलें, त्याणें तें कार्यकरून बंगलोरास घेरा घा
तला. तेसमयीं म्हैसूरच्या लश्कराचा मुख्य हैदर अली
झाला होता त्याणें पहिल्या करारा प्रमाणें सोळालक्षरुपयां
चें सोनें तोलून दिलें आणि सोळालक्षांच्या हुंडी चिठ्या दि
ल्या. तेव्हां बाकी वसुला विषयीं बहिवाटीस लावून दिलेला
मुलूरव सोडून मराठ्यांहीं त्याशीं सल्ला केला.

यानंतर गोपाळहरी तेथून निघाला तो मद्रासेस गेला,
तेथें इंग्रेज होते त्यांस भोंवता वेढा घालून फ्रांशीस त्यांशीं
युद्ध करीत होते. त्यादोघांपासून खंडणी घ्यावयाचा तो उद्यो
ग करूं लागला, परंतु त्याउभयतांहीं त्याचा धिक्कार करून
त्यास लावून दिलें. तो सूड उगवावयाकरितां फ्रांशिसांचे
स्वाधीन त्रिचुटीचें देवस्थान, होतें तें त्याणें घेतलें. तेथचे या
त्रेंत पैका बऊत वसूल होन असे तो जमा करणार होता, प
रंतु त्याला पुण्याहून माधारें बोलावणें गेलें तेव्हां तेथें थोडके
से लोक ठेवून तो तेथून निघाला. नंतर अर्कटिच्या नवाबा
नें तेलोक तेथून काढून दिले.

फ्रांशीस लोक दक्षिणेंतून गेल्यावर सलाबतजंगाचा भाऊ
निजामअली तो पदवीस चढूं लागला. त्यास पेशवा अनुकूळ

होता. याशिवाय निजामउल्मुलुखाशीं आणि फ्रांशिसांशीं पहिल्याच द्वेष असे, त्यानिजामाचा हा पुत्र म्हणून इंग्रेज लोकही त्याची कृपा संपादन करावयास इच्छीत होते. नंतर त्यानि जाम अल्लीला समजलें कीं, सलाबतजंग हैदराबाद सोडूनं इंग्रेज व फ्रांशीस हे दोघे लढतात तिकडे आपण फ्रांशिसां चे कुमकेस चालिला, तेव्हां तो निजामअल्ली आधीं औरंगा बाद घेऊन पुढें हैदराबादेस जाऊं लागला, तेव्हां सलाबतजं ग माघारा आपल्या ठिकाणीं आला. नंतर निजामअल्ली स प्रधानकी त्रासझाली, आणि सलाबतजंग आपलें पहिलें ठिकाण आंदोणी नेथें गेला.

६ पुण्यामध्यें मुख्यत्वें कारभार सदाशिवराव भाऊक रीत होता त्याचा कारभारी रामचंद्रबाबा शेणवी तो पूर्वीचा र पांच वर्षें मेला होता, त्याचें द्रव्य पुष्कळ होतें तें त्याणें आप ल्या भावाजवळ दिलें असे. त्यांतलें तिसरा वांटा त्या भावानें धर्मकृत्यास लाविलें, आणि उरलेले दोन वांटे त्यांतून एक रा मचंद्रबाबाच्या पुत्रास दिला आणि एक आपण घेतला.

सदाशिवराव मोठा लोभी आणि उतावळा होता, परंतु सावधचतुर असे, व स्वभावें करून अहंकारी आणि कांहींसा नि र्दय असे; तथापि तो सुबुद्धीचा आणि स्वकीयांविषयीं सुशी ल होता. तो लोकांपासून पैका खाऊन कामें करी हा एक त्या स मोठा दोष होता. कांकीं, सरकारचा जो चाकर त्याणें चांगलें ही काम करून मध्यें कांहीं खाऊं नये; परंतु मराठ्यांमध्यें का रभाऱ्यानें चांगल्या कामांत पैका खाल्ला असतां तो दोष मानी त नाहींत, ही चाल सर्वथा अनुचित होय. असें आहे कीं, लोउत

म कामें करून द्रव्य खाईल तो समय विशेषीं लोभेंकरून वाई
ट कामही करील.

७ रघुनाथराव हिंदुस्थानांतून आल्यावर तो व सदा
शिवराव यांमध्यें युद्धाचें साहित्य कसेन्याचा खर्च या संबंधें
कांहीं भांडण लागलें. कांकीं, तो सरकार खजिन्यास कांहीं
द्रव्य न आणितां कर्ज घेऊन माघारा आला. त्या कलहांत
रघुनाथराव कोपेंकरून बोलिला कीं, एवढें चातुर्य तुला
मध्यें असेल तर दुसरे स्वारीस तुलींच जा. त्या दिवसापा
सून तो कलह वाढतां वाढतां त्या कुळांतही दोन फळ्या हो
ऊन त्या गोष्टी लोकांत प्रसिद्धीस येऊंलागल्या. शेवटीं ज्या
स पेशव्यानें चाकरीस ठेवतेसमयीं हा माणूस योग्य नव्हे असें
सदाशिवरावानें म्हटलें होतें तो मुजफरखान याचा कोणी शि
पाई संगमावर सदाशिवराव भाऊ आपल्या कचेरीच्या डेऱ्यांत
बसला होता तेथें हळूच त्याच्या जवळ जाऊन एकाएकीं खंजी
र काढून त्यास मारूं लागला. तों त्याचा कोणी माणूस जव
ळ होता त्याणें हात धरून पलिकडे सारला, त्या योगें त्यास
दाशिवरावाचें शरीर वांचलें, कांहींसें पाठीसमात्र तें शस्त्र ला
गलें. तेव्हां तो मारेकरी धरून त्यास मारहाण करून पुस
तांच तो कबूल झाला कीं, मला मुजफरखानानें सांगितलें,
त्यावरून मुजफरखानास आणून विचारिलें, ते समयीं तो कि
मपि नाकबूल नजातां हें मी केलें असें म्हणाला. मग तो मारेकरी
व तो मुजफरखान या दोघांस तेथून बाहेर काढून ठार मारिलें.
तेवेळस कोणी एक परभू त्या मुजफरखानाचा चाकर होता
त्याजकडेही या प्रकरणीं कांहीं अन्याय लागू झाला त्यावरू

न त्याला किल्ल्यावर ठाकिलें, त्यामुळें त्याचें कांहीं वर्तमान प्रसिद्धीस न आलें. यांत कांहीं आश्चर्य नाही, कांकीं, मराठे लोक यांची पूर्वापर चाल अशीच आहे कीं, जो सरकारचा अपराधी तो एकदां किल्ल्यावर टाकिला ह्मणजे पुनः त्याचें कांहीं वर्तमान दुसऱ्यास कळत नांहीं.

८ मग पेशव्याचे दरबारीं असा नेम ठरला कीं, रघुनाथरावानें पुण्यांत राहून मुलखी कामें करावीं, आणि सदाशिवरावानें स्वारीस जावें. नंतर सदाशिवराव लश्कर सहित उत्तरेकडे जावयास सिद्ध झाला, तेसमयीं असें वर्तमान आलें कीं. पूर्वी सदाशिवरावानें कपटें करून आमेदनगर घ्यावयाची मसलत केली होती त्याप्रमाणें मोंगलांच्या किल्लेदारानें लांच खाऊन तो जागा सदाशिवरावाच्या कारकुनाचे स्वाधीन केला. हें वर्तमान सलाबतजंग व निजाम अल्ली यांस कळलें तेव्हां ते फार क्रुद्ध होऊन पेशव्याशीं युद्ध करावें असें मनावर घेते झाले. परंतु तेसमयीं त्यांजपाशीं युद्धाजोगा बंदोबस्त नीट नव्हता, तथापि तें नगर निजामशाही बादशाहींत ली पुरातन राजधानी, आणि महाप्रयासें करून आपल्या हातास आलेली ती व्यर्थ गेली हा मोठा अपमान जाणून निश्चय केला कीं, याच समयीं विलंब न करितां युद्धास जावें. तेवढेस जे लोक मिळाले ते लागलेच पुढें रवाना केले; त्यांजबरोबर मोठ्या मोठ्या तोफा ही चालत्या केल्या. ते लोक बेदरा वरून धारूरास जाऊन पोहचल्यावर मागून सलाबतजंग व निजाम अल्ली हे दोघे सात हजार फौज बरोबर घेऊन जात होते, ते समयीं सदाशिवराव यानें भीमातीरीं जा

ऊन बहादूरगड घेतला होता, इतक्यांत त्यास हे दोघे भाऊ त्यांचे सैन्य बरोबर घेऊन जाताहेत असें वर्तमान कळलें ते झां त्याणें त्यांस मधूनच धरून न्यावया करितां आपली एक फोजेची टोळी पाठविली. तेवढेंसें त्या दोघां भावांनी मो ठी त्वरा करून आपल्या थोरल्या फोजेंत जाऊन मिळावें तें नकरितां ते उदगीर येथें ठाणें धरून राहिले. तेथें स दाशिवरावाचे बिनीवाले पुढें येऊन पोहंचले, त्यांशीं त्या दोघां भावांहीं लढाई करून आपली दारू व गोळी उगीच खरचली. ते बिनीवाले तर मागून सदाशिवराव येऊन पोहंचावा त्तणू न कालक्रमणार्थ हलकें हलकें युद्ध करीत होते. मग सदा शिवराव येऊन पोहंचला त्याजबरोबर चाळीस हजार स्वा र होते, व इब्राहिमखान नामें गार्दी पलटणी लोकांचा सरदा र होता त्याजवळ कवाईत शिकविलेले लोक ५००० होते, त्यां स गारदी त्तणत तोही येऊन पोहंचला. त्यासमयीं ते दोघे भाऊ समजले कीं, आली ठाणें धरून राहिलों हें ठीक झालें नाहीं. मग निज़ाम अल्ली तह करावयास सिद्ध झाला, परंतु सदाशिवराव ऐकेना. तेव्हां त्या दोघां भावांहीं मोठ्या निकरानें इब्राहिमाच्या पलटणांवर हल्ला केला, आणि त्याची अकरा नि शाणें घेतली. ते समयीं ते पलटणी लोक फार नाश पावले, आणि

+ इब्राहिमखान फ्रांशिसांचे हातारखालीं शिकलेला, आणि मुज फिरखान याचा तो नातलग होता; तो पूर्वी सलाबतजंग व निजामअ ली यांचें वांकडें पडले त्यासमयीं निजाम अल्लीजवळ होता, मग ने दोघे एक झाल्यावर निजाम अल्लीनें त्यास निरोप दिला. त्यासमयीं त्या इब्राहिमखा नाला सदाशिवरावानें आपल्या चाकरीस ठेविलें.

बऱ्हुतेक मेलेगेले. तथापि ह्या जयाचें फळ त्यांहीं फारवेळ नभोगिलें; कांकीं, इतकें होतआहे तों मराठ्यांची मोठी एकटोळी येऊन तिनें त्यांचे मोंगल सुमारें तीनहजार मारिले. असें झाल्यावर निजामअल्लीनें आपलें अधिकाराचें मोर्तब सदाशिवरावाकडे पाठविलें. त्यांत अर्थ असा कीं, आतां तुमच्या चित्तास येईल तें करावें. तेव्हां सदाशिवरावानें तह केला तो असा, किल्ला दौलताबाद व शिवनेरी व आशीरगड व विजापूर इतकें मराठ्यांकडे असावें; याशिवाय मराठ्यांहीं आमेदनगर जें घेतलें त्याविषयीं मोंगलांनीं वाद करूंच नये; यारखेरीज विजापूरपरगण्यांतील हिसा व बेदरचा कांहीं भाग व औरंगाबाद शहरावांचून तो प्रांत हरसोल व शीतारा शिवाय इतकें मराठ्यांच्या स्वाधीन असावें. याप्रमाणें तह होऊन जितका मुलूख मराठ्यांचे स्वाधीन झाला तितक्याचें उत्पन्न वर्षास बास ६ लक्ष रुपये होत असे. त्यांतून एकेचांळीस लक्ष रुपयांचा मुलूख पेशव्यानें आपल्या लश्करी सरदारांस जहागीर करून देऊन त्याबद्दल फौजेसुद्धां चाकरी करावी असें कबूल करून घेतलें. त्याची अशी चाल होती कीं, आपणास मुलूख मिळाला असतां त्यांतील कांहीं विभाग आपल्या सरदारांस असावा. यांत अर्थ इतका कीं, तो सरदार आपली चाकरी संभाळून मुलखाचा बंदोबस्त चांगला ठेवील आणि सावध असेल.

याप्रमाणें तह झाल्यावर दक्षिणेंत मुसलमानांचा विभाग होता तो त्यांच्या मुलखापासून बऱ्हुत दूर आणि त्या सभोंवता मराठ्यांचा मूलूख, त्यावरून असें दिसूं लागलें

..... नं. ११

कीं, तो विभाग कांहीं उशीर नलागतां मराठ्यांचे [illegible] जाई.
ल. आणि तो सारा मुलूख एकत्र झाल्यानें पूर्वीं शेंकडों व
र्षं दुसऱ्याचे आज्ञेंत वागलेले जे ब्राह्मणलोक ते स्वतंत्रप-
णें वागतील असाही अर्थ दिसूं लागेंला.

असें मराठ्यांचें प्राबल्य झाल्यानें प्रजेस सुख किंवा स्वस्थ
ता झाली नाहीं. कांकीं, जेथेंजेथें त्यांची सत्ता होई तेथें तेथें लूट
व जुलूम व नाश हीं तीन ही क्रियाचींच. ते लोक धर्मे करून
प्रजापालन कराव्याचा अर्थ मनास आणीतच नसत. अ-
शा अनर्थंति रयतेस सुख कोठून, परंतु जे लोक लश्करांशीं
संबंध नठेवितां शेतें करून आपल्या नीतीनें वागतात ते
जें मिळेल तें खाऊन सुखी असतात, आणि ते आप आप
ल्यांत एकमेकाविषयीं प्रीति मंत असून परस्परें विश्वास ठे
वितात; ते लोक आपल्या खेरीज दुसऱ्यासीं व्यवहार करूं ला
गले असतां दुसरे लोक त्यांच्या रीती सारिखे नचालिले तरीते
त्यास दूषण ठेवीत नाहींत.

बाळाजीबाजीराव आपल्या भावाच्या उद्योगें करून इ
छेसारिखा जय पावला असतां हिंदुस्थानांतून पराजय सूच
क कांहीं वर्तमान आलें तें पुढचे भागीं विदित होईल.

भाग एकुणिसावा

सनसत्राशें साठां पासून सनसत्राशें एकसष्ट पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ सनसत्राशें चौपन्नांत दिल्लीमध्यें शाबूदिन याणें क

त्रिमें करून दुसरा अलंमगीर नामें नवा तक्ताधिपति केला. त्यास दिल्लींत ठेवून त्याचा पुत्र अलीगोर नामें होता त्यास बरोबर घेऊन तो मुलतान व लाहोर यांजकडे गेला. त्याच्या मनांत होतें कीं, आफगांणांचा बादशाह आमेदशाह अबदाली याणें हे दोन्ही प्रांत आमचे घेतले आहेत ते माघारे घ्यावे, ते अबदालीनें घेतले ते समयीं तेथें दिल्लीच्या बादशाहाचा ठेवणाईत मीरमनू नामें होता त्याणें तर ते दोन्ही प्रांत पहिल्या नें रक्षिले, मग त्याचा उपाय चालेनासा झाला, तेव्हां तो त्या आमेदशाह अबदालीचीच चाकरी स्वीकारून त्याकडून ते प्रांत आपणाकडेसच घेऊन त्याच ठिकाणीं राहिला. पुढें तो मेल्यावर त्याचा पुत्र लहान होता म्हणून अबदालीनें ते प्रांत मीरमनू चे स्त्रीचे स्वाधीन ठेविले. मग तिचें स्वामित्व झाल्यावर त्या प्रांतांची फार अव्यवस्था होऊन तेथचे रयत लोक निर्धन झाले. तेव्हां त्यांतील कितीएक लोक ते प्रांत टाकून दूर जाऊन शीख लोकांच्या मंडळींत मिळाले. त्यासमयीं त्या बाईला तिचाच कोणीएक सरदार याणें कैद करून तिणें आपणास निमें राज्य द्यावें असा करार करून घेऊन सोडिली, आणि त्याप्रमाणें केलें. हें वर्तमान शाबूद्दिनाला समजलें तेव्हां तो तें राज्य घ्या यास हा उत्तम समय आहे असें जाणून त्या प्रांताकडे चालिला. तो तेथें जाऊन पोंहचतांच त्याणें तेथें एक फितुरी माणूस याची मैत्री केली. अबदालीची स्वारी त्यामुलखीं प्रथम होण्याचें कारण तोच मनुष्य, त्याचें नाव आदीनाबेगो त्याशीं स्नेह करून तीन्ही रमनूची स्त्री धरून दिल्लीस पाठविली, आणि तो आदीनाबेगो तेथचा सुभेदार केला.

हें वर्तमान त्या आमेदशाह अबदालीला कळतांच तो फार क्रुद्ध होऊन मोठें सैन्य बरोबर घेऊन निघाला, तो अटक न दी उतरून निर्भयपणें दिल्लीस पोंहचला. तेथील मुख्य वजीर मीरशाबूदिन याणें आपली गरीबाई दाखवून त्याचें बऊतआ र्जव केलें म्हणून त्या आमेदशाहानें क्षमा केली, परंतु त्याणें तें शहर लुटून फारनाश केला आणि मथुराशहराचीही तीच दशाकेली. पुढें आग्रेंशहर याचीही तीच वाट झाली अमती प रंतु त्या आफगाणांच्या लश्करांत असा रोग उत्पन्नझाला कीं, त्या अबदालीला तें वारें बदलाया करितां आपल्या काबुल प्रांतीं जावें लागलें. तेसमयीं त्या आमेदशाह अबदाली बादशाहानें आपला पुत्र तिमोरशा तोच मुलतान व लाहोर या सुद्धां पंजाब मुलखाच्या अधिकारावर आपला हस्तक करून पाठविला: आणि दिल्लीमध्यें कोणी मोठ्या योग्यतेस आलेला रोहिला नजीब अलवला नामें होता त्यास मीरउ ल्उमरा पद देऊन मीरबक्षाची जागा दिली. तें शाबूदिनाचे मनास ठीक वाटलें नाहीं. याकरितां अबदाली गेल्यावर त्या स पदच्युत करून तें पद आपला कोणी इष्ट यास द्यावें अशी इछा शाबूदिनानें धरिली. परंतु अलंमगीर बादशाह त्यास अनुकूळ होता. आणि दिल्लीशहर त्या दोघांचें स्वाधीन असे. म्हणून शाबूदिनानें आपला अर्थ शेवटास न्यावयासाठीं अ सा निश्चय केला कीं. आधीं दिल्ली शहर आपण घ्यावें. इतकें हो तें तों रघुनाथराव संनसत्राशें छप्पन्नांचे समाप्तीस माळव्यां त गेला होता, त्याजी त्याणें कांहीं बोलणें लावून त्यास आणून दिल्ली घेतली. आणि अलंमगीर बादशाह ही आपल्या स्वाधीन

१५

ठेविला. मग तो अबदालीचा ठेवणाईत नजीब आदवला यास होळकर याच्या आश्रयानें जीवसंरक्षणाकरितां पळून जावें लागलें.

२ यानंतर रघुनाथराव कितीएक दिवस दिल्लीजवळ डेरे देऊन राहिला होता, तों लाहोरीं आदीनाबेगोनें आज्ञेंत कांहीं अंतर केल्यामुळें तें लाहोर ठिकाण सोडून तो तेथून जवळच्याच डोंगरीं जाऊन राहिला. तेथें राहून ज्यांस पहिलें योगाभ्यासावांचून दुसरें कांहीं ठाऊक नव्हतें असे जे शीखलोक त्यांस युद्धकर्मांत कुशळ करून मग आपणास धरावया करितां आलेजे अबदालीचे लोक त्यांस मागें हटवून रघुनाथराव यास निरोप पाठविला कीं, यासमयीं तूं माझें साहाय्य कर आणि हा सारा मुलूख घे. त्यावरून तो संतोषानें तात्काळ तिकडे गेला. मग अबदालीचे जे मुख्य होते ते सर्व जिंकून मोठा जयवंत होत्साता लाहोरांत शिरला. असें संनसत्राशें अठ्ठावन्नांत झालें. त्याकाळीं रघुनाथराव त्या आदीनाबेगोस मुलतान व लाहोर यांचा सरसुभेदार करून त्याच्या मदतीस कितीएक मराठे लोक ठेवून आपण तेथून निघून पुण्यास आला. त्याणें हिंदुस्थान सोडिल्याचे पूर्वी दिल्लीजवळ जनकोजी नामें जयाप्पा शिंद्याचा पुत्र याजपाशीं कांहीं लश्कर समय विशेषीं लाहोरच्या लोकांस कुमक करावयास व रजपुतां पासून खंडणी घ्यावयास ठेविलें. माळव्याच्या बंदोबस्तास मल्हारराव होळकर व दत्तोजी शिंदा यांस ठेविलें. तो रघुनाथराव सर्वत्र जय पावला त्याणें आपणास व मराठ्यांस मोठी योग्यता संपादिली, परं

तु त्याजवळ ऐवज किमपि नव्हता, ऐशीं लांख रुपये कर्ज होतें, त्यावरून त्याशीं आणि सदाशिवरावाशीं भांडण लागलें.

३ यानंतर जोतपूरचा राजा आभीशिंग मेला तेव्हां त्या चे दोघे पुत्र रामशिंग व बेजीशिंग, ते दोघे तक्तासाठीं भांडूं लागले, तेव्हां रामशिंगानें पेशवा सहाय केला. त्याणें राणोजी शिंदा जो पूर्वी बाजिरावाचे वेळेस मोठा विख्यात झाला होता त्याचा पुत्र जयापा शिंदा त्यास आज्ञा केली कीं, रामशिंगाची मदत करून त्यांचा कलह तोडावा. मग त्या जयापाशिंद्याच्या आश्रयानें तो रामशिंग असें करिता झाला कीं, नागोर किल्ल्यांत आपला भाऊ असतां त्या किल्ल्यास घेरा घातला. ते समयीं त्या बेजीशिंगानें त्याचा बाप आभीशिंग याणें पिलाजी गाइकवाड जसा घाताने मारिला, तसाच आपला भाऊ रामशिंग मारेकरी घालून मारविला. त्यावर जयापाचें लश्कर मागें हटलें, परंतु पुढें रघुनाथरावानें अजमीर घेऊन जोतपुरची खंडणी ठरविली.

रघुनाथरावानें हिंदुस्थान सोडिलें तेसमयीं तेथें दत्ताजी व महादाजी शिंदे ठेविले, त्यांस शाबूदिनानें रोहिले जिंकावयास योजिलें, त्यांना प्रथम नजीब आदवला जिंकावा लागला. तो आपणावर एवढें मोठें सैन्य आलेंसें पाहून आपल्या रोहिल्यांसहित गंगेच्या कांठीं ठाणें धरून राहिला, आणि अयोध्येचा

+ राणोजी शिंदा शाहूमहाराज मेल्यावर पुढें थोडक्या अवकाशानें मेला; त्याचे तीन पुत्र, एक जयापा, एक दत्ताजी, एक जोतीबा, हे निघे, आणि दोघे दासीपुत्र, एक तुकोजी व एक महादाजी. तुकोजी मा असतांच मेला होता.

नवाब सुजाउदवला यास आपल्या कुमकेस बोलाविलें. त्याचें व रोहिल्ले यांचें पूर्वी पासून वैमनस्य होतें, परंतु मराठ्यांचें प्राबल्य त्या उभयतांस सारखेंच बाधक असें समजून त्या यें त्यास सहाय्य मागितलें. तो त्यास मान्य होऊन समीप आल्यावर दत्ताजी शिंद्यानें बुंदेलखंडचा सुभेदार पेशव्यांचा ठेवणाईत गोविंदपंत बुंदेला यास सांगितलें कीं, रोहिल्यांचे मुलखीं जाऊन त्यामुलखाचा अगदीं नाश करावा. त्यावरून तो त्यामुलखीं जाऊन तात्काळ त्याणें गंगेच्या पूर्वेकडचे त्यांचे मुलूख लुटले; व दुवाब नामें एक त्यांचा मुलूख होता, तोही लुटून उद्ध्वस्त केला. तेवेळेस तेथच्या सुख्याला तेथून जाऊन कमाऊ नामें डोंगर आहे, त्याचा आश्रय करावा लागला; परंतु त्या समयीं सुजाउदवला त्याणें गोविंदपंताचें लश्कर जवळ नेटलें- असें पाहून आपल्या लश्करची गोसांवी लोकांची मोठी ठोळी पाठवून त्याचा अगदीं मोड केला, आणि त्यास गंगेचे पार घालविलें.

त्यावेळेस दत्ताजीला असें वर्तमान समजलें कीं, आमेद शाह अबदाली तो मोठें सैन्य घेऊन मुलतान व लाहोर माघारें घ्यावयास येतो, त्यावरून त्याणें त्यारोहिल्यांशीं तह केला; आणि आपण लाहोरचे मराठे यांची मदत करावयास निघाला.

४ असें रोहिले व मराठे व अयोध्येचा नवाब यांचें वर्तमान असतां दिल्लीमध्यें शाबूद्दिन याणें अलंमगीर बादशा ह व आपला सोयरा इंतिजाम आदवला व हल्लीं दिल्लीवर ये तो आहे जो आमेदशाह अबदाली तो हे तिघे एकमत आहेत

१७

असें लोकांस विदित करून तो बादशाह व आपला सोयरा या दोघांस मारून टाकिलें; आणि त्या बादशाहाचे जागीं जो र गजेबाच्या कनिष्ठ पुत्राचा पुत्र याचें शहाजहान असें नांव ठेवू न तो तक्ताधिपति केला. एवढें दुष्कर्म करून मग मराठे व अ बदाली यांच्या युद्धांत कोण जय पावेल तें पहावया करितां जा टांचा राजा सुरजमल्ल यास तो शरण गेला आणि त्याच्या आश्रया नें राहिला.

५ तिकडे लाहोरामध्यें रघुनाथरावाचे मराठेलोक हो ते त्यांस होळकर व दत्ताजी शिंदा यांची कुमक येऊन पोहंचल्या चे अगोदरच त्या आमेदशाह अबदालीनें त्यांचा पराभव करू न हटविलें, आणि आपल्या लश्कराची बिनी त्यांचे पाठीसला लिली होती. मग दत्ताजी शिंदे व मल्हारराव होळकर आपल्या मराठयांच्या कुमकेस येऊन पोंहचले, आणि तेथें सुमार पाहूं लागले तों आपली दोघांची फौज तीस हजार, आणि ते अब दालीचे बिनीवाले पाठीस लागून आले त्यांचा मोठा जमाव अ सें समजून मागें हटले. ते यमुनेच्या पश्चिमकांठीं चालतांना त्याचें लक्ष्य आपल्या समूरच्या बिनीवाल्यांकडेसच असतां दिल्लीजवळ आमेदशाह अबदाली याणें यमुना उतरून एकाए कीं दत्ताजी शिंद्याच्या लश्करावर पडून त्यासैन्याचे दोन हिसे मारून टाकिले, बाकी एक हिस्सा उरला तो पळून गेला. त्यायु द्धांत दत्ताजी शिंदा व त्याचा भाऊ जोतीबा हे दोघे मारले गेले.

असें ऐकतांच होळकर आपल्या सेनेसहित लश्करलश्कर मागें हटूं लागला तो यमुनेच्या पूर्वेकडे शिरवंड शहर आहे तेथें पोहंचल्यावर तें स्थळ निर्भय असें समजून राहिला. तथापि

यांठिकाणींही आफगाणांची एक टोळी आपलें मोठें सैन्य सोडून त्याचे पाठीस लागत फार लांबून आली ती एकाएकीं त्यावर पडली, आणि त्याचा बहुत नाश केला.

६, मागल्या भागीं लिहिलें की, पेशाव्यास पराजयसूच क कांहीं वर्तमान समजलें तें पुढचे भागीं लिहिलें जाईल. तो प्रकार हा, हें वर्तमान पेशवा हैदराबाद संबंधें मोठा ला भ मिळवून संतोषेंकरून सदाशिवरावासह वर्तमान मांजरा नदीच्या तीरीं डेरा देऊन राहिला होता, तेथें त्यास समजलें. तेव्हां सदाशिवराव नुकता जय पावला होता त्यामुळें तो अ त्यंत आनंदानें आणि गर्वानें युक्त होत्साता बोलिला कीं, मी व विश्वासराव यांस या समयीं हिंदुस्थानांत नेमलें असतां आम्ही गेलेलें यश पुनः मिळवून आफगाणलोकांस अटके चे पार घालवून देऊं, असें म्हणतांच पेशव्यानें त्यांस आज्ञा दिली, तेव्हां सैन्य तयार होऊं लागलें. ते समयीं लोकांस असें वाटलें कीं, हे मोठा जय मिळवितील, परंतु असें नसमजलें - की. हा एवढा मोठा लढाऊ होऊन चालिला पर्ण यास युद्धाचें कौशल्य किमपि नाहीं; अनायासें जो जय प्राप्त झाला तित क्यानेंच तो गर्वास चढला. त्यासदाशिवरावास एकाएकीं मो ठी पदवी प्राप्त होऊन यश आलें. जर लढान कार्य करून त्या चा पराजय झाला असता तर तो पुढें सावधपणानें वागता. तात्पर्य एकाएकीं मोठ्या पदास चढला जो मनुष्य त्याचें जें अ- ज्ञान तें त्याची सेना व राज्य यांस परम अपायकारक झाल्यावां चून नष्ट होत नाहीं

७ सदाशिवराव व विश्वासराव यांजबरोबर हिंदुस्था-

नांत सरदार व फौज गेली तो प्रकार असा. निवडक घोडेस्वार मराठे वीस हजार, व कवाईत शिकविलेले पायदळ गार्दीलो क इब्राहिमखान गार्दी याचे व तोफखान्याचे लोक मिळून दहा हजार, यांखेरीज ते चंबळा नदीचे कांठीं पोहंचले नाहीं न तों बाळाजी बाजिरावाचे आज्ञेनें मल्हारराव होळकर व जनकोजी शिंदे व दमाजीगाइकवाड व यशवंतराव पंवार व आपाजीराव आठवले व अंताजीमाणकेश्वर व गोविंदपंत बुंदेले वगैरे सरदार आपआपली सेना घेऊन त्यांस मिळाले; याशिवाय बऊतेक रजपूतराजांनीं आपआपल्या स्वारांची एक एक टोळी पाठविली; यांखेरीज पेंढारी पुष्कळ होते.

सदाशिवरावाबरोबरचे जे सरदार होते त्यांत बळवंतराव गणपत मेहेंदळे व समशेरबहादूर व नारोशंकर व विठ्ठल शिवदेव विंचुरकर व त्रिंबक सदाशिव पुरंदरे व कितीएक मराठेकुळांतील मोठे मोठे मानकरीलोक होते: आणि होळकराच्या स्नेहास्तव जाटांचा राजा सुरजमल्ल तो तीस हजार सैन्यासहित येऊन मिळाला. तेसमयीं सदाशिवभाऊच्या लष्करचा संरंजाम असा थाटाचा केला होता कीं. जसा पूर्वी ऐकण्यांत व जेबानें केला त्या प्रमाणें कांहींसा असे. त्यापूर्वी मराठे लष्कराचा संरंजाम कधीं घेत नव्हते कामापुरता मात्र घेत.

तें लष्कर पुढें चालतें झालें असतां युद्धाविषयीं पर म कुशल असा सुरजमल्ल याणें जाणलें कीं, भाऊच स्वाधीन मोठा मोठ्या तोफा फार व पायदळ बऊत आणि बुणगे ही पुष्कळ यामुळें स्वारांस त्याबरोबर राहावें लागेल आणि युद्धांत त्यांस

अडचण पडेल,म्हणून त्याणें अशी मसलत केलीकीं, मोठ्या मो ठ्या तोफा व बुणगें एखाद्या किल्ल्याच्या आश्रयानें ठेवावें, आणि आपले व भाऊचे स्वार मिळून पुढें जाऊन त्या अबदाली च्या लश्कराच्या आसमंतात् उपद्रव करून त्याच्या धान्यादि साहित्याचा नाश करावा, तेणें करून तो आपल्या आपणच मागें हटेल.यामसलतीस होळकरही मिळाला होता,परंतु सदाशिवरावाचा सल्ला रामचंद्रबाबा शेणवी त्याचें व होळ कर याचें वैमनस्य होतें म्हणून त्या होळकराची सदाशिव रा वावर प्रीति नव्हती यास्तव त्या होळकराची मसलत सदाशिव रावास आवडेना,आणि जाटाचें व होळकराचें इष्टत्व होतें त्यावरून त्यासुरजमल्ला विषयींही भाऊच्या मनांतून कांहींशी अप्रीति झाली. अणखी त्याणें कवाईत शिकविलेले पलट णीलोक फ्रांशीस लोकांस बऊत उपयोगीं पडलेले पाहिले होते, या सर्व कारणांनीं हट्टास पेटून होळकर आणि जाटयां ची अत्यंत हितावह अशीजी मसलत ती न घेतां तो स्वबुद्धी नें वागूं लागला. मग त्याणें त्या लश्करासहित पुढें जाऊन प्रथम तोफांचे मोर्चे लावून दिल्ली घेतली. नंतर पुढें जावें परंतु यमुनेला पाणी बऊत आलें होतें तेणें करून पलीकडे जावयाची सोय नाहींशी झाली,म्हणून ते थेंच डेरे देऊन राहिला. त्यावेळे स त्याच्या मनांत आलें कीं, विश्वासराव यास दिल्लीचा बादशाह करून सुजाउद्दवला यास त्याची वजिरी द्यावी. परंतु त्या समयीं तें काम कांहीं निमित्तें करून राहिलें.

यानंतर त्या भाऊसाहेबाचें लश्कर बेसुमार व बुणगें ही पु ष्कळ यामुळें थोडक्याच दिवसांनीं दिल्लीच्या आसमंतात् धान्या

दिकांचा तोटा पडूं लागला; आणि भाऊ पाशीं द्रव्याचा तोटा पडेल असा सुमार झाला. त्याणें आपल्या बरोबर दक्षिणेंतून येते समयीं दोन कोटिरुपये आणिले होते; याशिवाय होळकर व शिंदे व गोविंदपंत व रजपूत याजवळ तीन कोटिरुपये होते; तथापि भाऊस वाटलेंकीं, खर्चास तोटा पडेल, या करितां त्याच्या मनांत आलेंकीं, बादशाह याचा दिवाणखाना सोन्यारुप्यानें मढविलेला आहे तो मोडून द्रव्य करावें. त्यावरून होळकर व सुरजमल्ल यांस फार वाईट वाटून त्यांहीं आग्रहानें विनंती केली कीं, हें आचरण केवळ अयोग्य आणि नाशकारक होय, असें बहुत प्रकारें सांगितलें तरी तो ऐकेना. मग त्याणें ती सर्वशोभा नष्ट करून सोनेंरुपें जवाहीर काढून घेतलें तरी त्यास फार लाभ न झाला, सारे सरदार लक्षरुपये उत्पन्न झाले. त्या भाऊच्या अशा दुष्ट आचरणानें तो सुरजमल्ल आपलें लश्कर घेऊन तेथून निघून चालिला. त्यानंतर त्या लश्करचे रजपूत लोक यांचे मोंगलांच्या लश्करांत कोणी स्नेही होते तेही त्यांच्या बोलण्या वरून तें लश्कर सोडून निघून गेले.

इतक्यांत आमेदशाह अबदाली लश्कर सुद्धां गंगेचे कांठीं येऊन अनूपशाहरा समूर डेरे देऊन उतरला. तो तेथें असतां त्याणें सुजाउद्दवला आपणाकडे करून घेतला.

९ मगपर्जन्यकाळ कांहींसा शांत झाल्यावर त्या सदाशिवरावानें अलंमगीर नामें दिल्लीचा बादशाह तो ते समयीं तेथेंन असतां त्याचा पुत्र मीरजवानखान यास तक्ताधिपती करून

सुजाउद्दवला त्याचा वर्जार असें लोकांस विदित केलें. त्यानंतर नारोशंकरास दिल्लीच्या किल्ल्यांत ठेवून आपण लश्करास हिन गंजपुरानामें कोणीएक कोट आहे तिकडे गेला. त्यामध्यें पुष्कळ शिपाई लोक व सामान यथास्थित होतें त्यास तोफाला बून तो कोट पाडून तें स्थान घेतलें. इतक्यांत आमेदशाह त्या ठिकाणच्या लोकांची कुमक करावी म्हणून फारउत्सुक झाला, परंतु यमुनेस उतार अगदीं नव्हता म्हणून निरुपाय झाला, तथापि तो लश्करसहित यमुनेच्याकांठाजवळ जाऊन राहिला. तेथें तह करावयाचें निमित्त करून त्याणें भाऊला बहुत भुलथापी दिल्या. नंतर दिल्लीपासून दहा कोसांवर एक यमुनेंत उतार शोधून काढिला, आणि आपलें लश्कर बहुतेक यमुनेच्या पार उतरून लाविलें. त्यासमयीं कोणी तें वर्तमान भाऊस कळविलें, परंतु त्याचें लश्कर बहुतेक उतरून येई तों पर्यंत तें भाऊ सत्य मानीना. शेवटीं संवत्सरांशें साठांचा महिना दहावा अकटोंबर याचे पंचविसावे तारिखेस ते सर्व मुसलमान लोक यमुनेच्या आलीकडे आले.

मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्या दोहीं लश्करांच्या चिनी बात्यांचा मोठा युद्धप्रसंग झाला. त्यांत दोघेही आपआपला जय झाला असें म्हणत होते, परंतु ते शेकीपक्ष समानच असत. तेसमयीं मराठ्यांच्या लश्करांत मसलत झालीकीं,

---

+ सुजाउद्दवला तेवेळेस आमेदशाह अबदाली याचा पक्षपाती झाला असतांही तो त्या युद्धांत पहिल्यापासून तहाचे द्वार झाल्या हो ना म्हणून त्याची प्रीति संपादन करावयासाठीं सदाशिवराम उद्योग करीत असे.

उद्यां मुसलमान लोकांवर एकाएकीं हल्ला करावा, परंतु होळकर म्हणे कीं, हें ठीक नव्हे, प्रथम त्यांस अनेक प्रकारें उपद्रव करून त्यांस धान्यादिकांचा तोटा पाडावा. या मसलतीस तात्काळ इब्राहिमखान गार्दी अमान्य होऊन बोलिला कीं, ही तुमची मसलत माझें पायदळ व तोफा शत्रूचे हातीं शीघ्र सांपडावया स कारण होईल अशीच आहे. यास्तव जो कोणी यामसलतीस मान्य होईल त्याजवर मी तोफांचा भडिमार करीन, असें त्या इब्राहिमखानाचें बोलणें होतांच तो व होळकर यांचें बिलुष्टमोठें पडलें; तें महाभयासानेंमिटविलें. तों पर्यंत मराठ्यांचेंलश्कर मागें हटत हटत पानपत पर्यंत गेलें. तेथें इब्राहिमखानाचे मसलतीनें सदाशिवराव भाऊ याणें आपल्या लश्करास भोंवता खंदक पाडिला. तो खोल आठ हात आणि रुंद तेहतीस हात या प्रमाणें केला. तेवेळेस आमेदशाह अबदालीही त्या लश्कराच्या जवळ येऊन उतरला. त्याणें आपल्या लश्करा सभोंवतीं मोठीं मोठीं झाडें पाडून आंत शत्रूचा प्रवेश नहोई अशी अडचण केली.

तेसमयीं मुसलमानांचें सैन्य एकेताळीस हजार आठशें स्वार व पायदळ अडतीस हजार इतकें निवडक सैन्य होतें. या खेरीज स्वतंत्र शिपाईलोक जे त्याच्या पक्षाचे तेही त्या निवडकां खालोखाल होते; त्याशिवाय तोफा त्या हात्तर होत्या.

मराठ्यांकडे पंचावन्न हजार स्वार व पंधरा हजार पायदळ आणि दोनशें तोफा. या खेरीज पेंढारी व बुणगें मिळून दोन लक्ष सुमारानें असतील.

याप्रमाणें दोन्ही लश्करें बंदोबस्तानें ठाणें धरून राहिल्या

नतर गोविंदपंतबुंदेला यास मोगलांच्या धान्यादि साहित्याचा नाश करावयाकरितां सदाशिवरावानें पाठविलें. तो तेथें जाऊन एका आंबराईत आपण हजारलोकांसहित गुसराकून बाकीच्या लोकांकडून तें धान्यादि साहित्य लुटावयाचें काम बऊ न युक्तीनें करवीत असतां कोणीएक आमेदशाह अबदालीचा सरदार येऊन एकाएकीं त्यावर पडून उभयतांची मोठी तोडातोडी होऊन त्याणें गोविंदपंताचें डोकें तोडून आमेदशाहअबदालीकडे पाठविलें. मराठ्यांचा तेवेळेस इतकाच नाश झाला असें नाहीं. त्या गोविंदपंताच्या मरणानंतर कितीएक स्वारदर असामी एकेकरुपयांची थैली घेऊन दिल्लीहून आपल्या मराठ्यांच्या लश्करांत येत होते ते रात्रीस वाटचुकून आफगाण लोकांच्या लश्करांत गेले, ते त्या लोकांमध्यें शिरतांच त्यांणीं त्यांस मारून तें द्रव्य घेतलें. प्रथम गोविंदपंत बुंदेला मारला गेला त्यापूर्वी मराठे व मुसलमान यांचा तह होईलसा दिसत होता; कांकीं, त्या दोहीं लश्करचे सरदार येऊन एकामेकास भेटत होते: मग तो मेल्यानंतर युद्धारंभेरीज उभयपक्षीं दुसरा उपाय नाहींसा झाला. मग तें युद्ध संनसत्तरशें साठांचा महिना अकरावा नवेंबर याचे एकुणतिसावे तारिखेस सुरू झालें. तो प्रकार असा, मराठे लोक पंधरा हजार सुमारें मोठ्या धैर्यें करून अबदालीच्या लश्करान्वेडावे बाजूस जेथें आमेदशाह अबदालीचा वजीर ठाणें धरून राहिला होता त्यावर पडून आपल्या मोठ्या मारापुढें त्यास उभें राहवेनासें केलें. त्यांत त्या अबदालीचे लोक आफगाण दोन हजारांवर मेले गेले. त्यानंतर त्या वजिरास अबदालीची कुमक चढुंकडून आली तेसमयीं मराठ्यांस मागें हटावें लागलें.

तेवेळेस त्यांचेही सुमारें हजार लोक मेले गेले. त्याच दाईत मुख्यत्वें होळकर होता. त्या दिवसापासून रोजरोज शिपाई व सरदार यांत ज्यांच्या मनास येईल ते इकडून व तिकडून कोणी बाहेर येऊन लढत, असें नित्यशः दिसेंबराचे तेविसावे तारिखेपर्यंत होत गेलें. मग एके दिवशीं त्याअबदालीचा वजीर शाहवलीखान तो आपल्याबरोबर स्वारांची टोळी घेऊन तेथून निघून जवळ एक मशीद होती तेथें जात असतां त्यास पाहून सदाशिवराव व बळवंतराव मेहेंदळे व विश्वासराव व होळकर वगैरे लश्करसहित कितीएक सरदार यांणी त्यावर जाऊन पडावयास त्यासभोंवता घेरा घातला; तें पाहून त्याचे कुमकेस अबदालीकडचे लोक व नजीब अदवला व दुसरेही कितीएक सरदार येऊन त्यांवर जाऊन पडले, तेव्हां त्याउभयतांचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. त्यांत नजीब अदवला त्यासमयीं आपल्या लोकांपेक्षां फार पुढें होऊन लढत होता, तेव्हां बळवंतराव मेहेंदळा त्यावर मोठ्या त्वरेनें जाऊन पडला, तेरसमयीं त्याजवळचे तीन हजार रोहिले मारिले गेले; आणि तोही मराठ्यांचे हातीं लागतां लागतां इकडे गोळी लागून तो मेहेंदळा मृत्यु पावला. तेव्हां सदाशिवरावास ती मोठी हानि वाटली, त्यायोगें तो फार कष्टी होऊन युद्ध न करितां तेंथेंच माघारें छावणीस गेला; तेव्हां नजीब अदवला यास मागें सरावयाची संधी सांपडली; तेवेळेस युद्ध तसेंच राहिलें. नंतर नित्य नित्य उभयपक्षीं ठोक्यां टोल्यांचीं युद्धें होत, असें असतां रोहिले लोक व सुजाउदवला हे सर्व मिळून एकदांच उठून मोठें युद्ध व्हावें म्हणून बादशाहाजवळ फार आग्रह करीत होते, परंतु

नो बादशाह फार शहाणा आणि सावध होता, त्याणें आपल्या लश्करांत धान्य पुर्तें नाहीं, तथापि मराठ्यांपेक्षां अधिक आहे असें असून, आपले लोक युद्धाविषयीं अधीर आणि मराठे तर फारच उतावळे असें समजून युद्धाविषयीं दिरंग लाविला. त्याची कल्पना ठीक होती कीं, मराठे यांजकडील धान्यादिसाहित्य अगदीं खर्चून ते पुढें उपाशीं मरणार आहेत. असें असतां कोणे एके रात्रीं त्यांच्या लश्करांतील बुणग्याची टोळी आपल्या बायकां मुलांस अन्न नाहीं या करितां धैर्य करून खंदकांतून पळी कडे उतरली, नंतर पुढें जाऊन ते लोक धान्याचा शोध करीत असतां आफगाण लोकांनीं येऊन त्यांसभोंवता वेढा घालून ते सर्व मारून टाकिले. त्यावर सर्व मराठेलोक आपापल्या सरदारांस बोलूं लागले कीं, आतां आपण इथें उपाशीं मरावें हें ठीक नाहीं, आम्हांस या युद्धांत मरूं द्या. असें त्यांचें बोलणें ऐकून सरदारांनीं भाऊला सांगितलें, तेव्हां त्याणेंही तें मान्य केलें. आणि सांगितलें कीं. उद्यां लढाई करावी. अशी आज्ञा देऊन ते दिवशीं राघोस सरकार कोडींत जितका धान्य संग्रह होता तितका सर्वांस वांटून दिला; कांकीं इतके दिवस धान्याचा तोटा होता, आतां आजरात्रीं सर्वांनीं स्वस्थ भोजन करून युद्धास सिद्ध व्हावें. मग दुसरे दिवशीं उजेडावयाचे पूर्वीं दोन घटिका रात्रीस संनसवाशें एकसष्टावा पहिल्या महिना जानेवारी त्याचे साहावे तारिखेस सर्व लश्कर सिद्ध होऊन आपले छावणी पासून डावे बाजूनें निघालें. तेव्हां पुढें तोफा व जेजाला व उंटावरचें जंबुरे व बाणदार असें चालतें करून त्याबरोबरच इब्राहिमखान गार्दी व त्याचीं पलटणें

त्यामागून दमाजी गाइकवाडाचे स्वार चालविले, त्यामागून वर कडजे मराठे सरदार त्यांचे स्वार, अशा बंदोबस्तानें ते अबदालीच्या लश्करावर जातेवेळेस मराठे असे दिसत होते कीं, ते लोक केवळ मरणाचाच निश्चय करून जाताहेत. आपणज य पावूं ही गोष्ट त्यांच्या मनांत आहे असें त्यांचें चिन्ह दिसत नव्हतें; कांकीं, त्यांचीं पागोटीं पदर सुटलेलीं, आणि तोंडास व हातास हळद लाविलेली असेते होते. ते त्यांवर चालून जात असतां तिकडे अबदालीच्या लश्करांत वर्तमान कळलें, ते समयीं बादशाहानें तो शोध घ्यावयास घोड्यावर बसून आपला तळ सोडून अधकोस पुढें जाऊन पाहिलें तंव त्या-च्या मनांत आलें कीं, मराठी लश्कर फार बंदोबस्तानें जसें तळ सोडून निघालें तसेंच उभें एथें आहे, असें दिसलें. त्यां त तोफा मात्र पुढें समूर केल्या होत्या, आणि जनकोजी शिंदा तो लश्करचे उजवे बाजूवर होता, आणि इब्राहिमगार्दी तो डावे बाजूवर होता. मग इकडे अबदालीचें लश्कर तयार झालें त्याचा बंदोबस्त असा, त्यांनीही तोफा समूर लावि-ल्या, आणि त्याच्या लश्कराचे उजवे बाजूस आमेदखान बंगष व रोहिले व कितीएक मोठे मोठे सरदार होते, मध्यभागीं शाहूवलीखान वजीर, व डावे बाजूस आफगाण लोक व सुजाउदवला व नजीब अदवला. या सर्वांचे डावे बाजूस एक आफगाणांची निवडक टोळी होती तिचा सरदार शाहूपसंदखा न नामें होता. याप्रकारें उभयपक्षीं लश्करांचा बंदोबस्त अस तां प्रथम परस्परें दोहींकडून तोफा चालू झाल्या, इतक्यांत नीं दोहीं लश्करें एकामेकांवर चालून घेऊं लागलीं. ते उभयपक्षीं

चे लोक तोफा टाकून पुढें सरले असतां मराठ्यांनीं एकाएकीं मो ठा हरहर अमा शब्द केला, ज्याची ध्वनी आकाशांत भरली. तेव्हां इब्राहिमखान गार्दी दमाजी गाइकवाडा सहित आपल्या समूरच्या रोहिल्यांवर धैर्यानें चालून गेला, तेवेळेस तो आपल्या डाव्या बाजूनें शत्रूचे लोक येतात असें पाहून त्यांकडे दोन पलटणें यांचा रोंख दाखवून आपण पुढें सरला, तोरोहिल्यांवर पडून त्याणें आठ हजार रोहिले मारून टाकिले; परंतु त्याचे ही अर्धे अधिक लोक मारिले गेले; आणि त्या इब्राहिमखानास ही जखमा लागल्या, परंतु जय मिळाला. मध्य भागीं सदाशिवराव होता त्याणें आपल्या समूर मुसलमानां च्या लश्कराचे मध्य भागीं शहानवाजखान होता त्यावर सैन्यासह वर्तमान मोठ्या वेगानें चाल केली. तेसमयीं त्याशहानवाजखाना चे जवळ दहा हजार स्वार होते त्यांणीं त्या सदाशिवरावावर चालून जावें तें नकरितां ते आपल्या ठिकाणींच उभे राहिले, तेणें करून ते स्वार व त्यांतील पायदळ यांचा अगदीं मोड करून मराठे त्यांतून पार गेले. त्यांत मराठ्यांचेही स्वार दोहीं लष्करी लोकांचे धक्काधक्कीनें कितीएक पडले. ते समयीं स्वकीय किंवा परकीय असें त्याउभयपक्षी लोकांस समजेना, आणि जी धूळ उडाली तेणें करून कांहीं त्यागर्दीत दिसेना असें झालें. तेव्हां मराठे व मुसलमान हातघाई करून संपूर्ण एकत्र होऊन आप आपल्यासच मारूं लागले. तेसमयीं कोणी कोणास वळखेना असें झालें. तेव्हां त्यांतील रवूण इतकीच की, मराठ्यांकडील हरहर आणि मुसलमानांकडील दीनदीन असा शब्द होई, तेणें करून जाब वळखून मारीत, पण कोणाचें तोंड कोणास

दिसेना. शेवटीं त्या गर्दींत आफगाणलोक कांहींसे मागें हटूंला गले, तें पाहून शाहूवलीखान आंगांत चिलखत चढविलेला होता तसाच घोड्यावरून उडी टाकून मोठी आरोळी देऊन बोलिला कीं, हे मित्रहो तुम्ही पळतां कोठें तुमचा मुलूख येथून जवळ आहे कीं काय? असें बोलून तेलोक आपले बरोबर घेऊन तेसमयीं त्याणें आपल्या जिवाचें संरक्षण केलें. याप्रमाणें मुसलमानलोकांचे लश्करच्या मध्यभाग चीव उजवे बाजूची अवस्था झाली, परंतु त्याचीडावी बाजू हालली नव्हती. त्यांतील सरदार शाफसंदरखान याणें चालून जातेवेळेस असें पाहिलें कीं, कदाचित् मोड झाल्यास पाठीमागें यावें लागेल, याकरितां त्याणें जागोजागीं चर खणून मातीच्या वेंड्या करून भिंती सारिखे आश्रय जागोजाग करून ठेविले होते. असें असतां बादशाहास लश्करची खबर दोन प्रहरीं कळली तेव्हां त्याणें आपल्या खासगीच्या शिपायांतून निवडक लोक होते त्यांस लश्करचे छावणीचे जागीं पाठवून त्यांस सांगितलें कीं, जे कोणी पळून जाऊन छावणीचे जागीं उभे असतील त्यांस हांकून युद्धास पाठवावें, असें सांगून उजवे बाजूचे लोकांचे कुमकेस कितीएक लोक पाठविले आणि शाहूनवाजखानास निरोप पाठविला कीं, दहा हजार स्वारांची एकेक टोळी करून मोठ्या वेगानें मराठ्यांचे लश्कराच्या मध्यभागावर हल्ला करावा. अशी आज्ञा झाली तेसमयीं त्याणें तसेंच केलें, आणि त्याचे बरोबर शाफसंदरखान व नजीबअदवला यांणीही हल्ला केला. तोवेग मराठ्यांहीं बऱ्हुतवेळ सोसून आफगाणलोकांस किती एकवेळां मागें हटविले. शेवटीं हातघाईचे वेळेस ते आफगाण

लोक शरीरानें पुष्ट आणि बळकट त्यांपुढें मराठ्यांचा उपाय चाले ना, तथापि त्यादिवशीं मल्हारराव होळकर खेरीज करून मराठे सरदार आपआपल्या सामर्थ्यानुरूप लढले. आणि मल्हारराव आपल्या शक्ती प्रमाणें लढला म्हणून कोणा कोणाच्या मनांत आहे कीं, हा होळकर कांहीं कृत्रिमी आहे.

१० यानंतर अडीच प्रहर दिवसाचे सुमारें विश्वासराव यास जबर जखम लागली, तें पाहून सदाशिवराव भाउनें आपल्या हत्तीवरून खालीं उतरून होळकरास निरोप पाठविला कीं, मी तुम्हास पहिलेंजें सांगितलें होतें तें आतां करावें, याप्रमाणें सांगून पाठविल्यावर मग तो भाऊसाहेब आपल्या घोड्यावर बसून युद्धाच्या गर्दीत शिरला, तो पाहतां पाहतां लोकांस दिसेनासा झाला. इकडे त्याचा निरोप होळकरास पोहंचला तेव्हां तो रणभूमी सोडून निघाला; त्याजबरोबर दमाजी गाइकवाड ही निघाला; तेवेळेस मराठेलोक युद्ध करावयाचें टाकून आपल्या जिवाच्या रक्षणासाठीं पळूं लागले. तेव्हां हजारों शिपाई तरवारीनें तोडले गेले व कितीएक छावणीकडे पळाले, त्यांस गर्दीमुळें त्या ठिकाणांत जावयाची वाट सांपडेना. तेव्हां त्या खंदकांत एकमेकावर पडून दडपून मेले गेले. त्या ठिकाणापासून जवळच पानपत नामें गांव होतें तेथें त्या मराठी लश्करच्या बायका व मुलें व कितीएक बुणग्यांतील लोक व कितीएक शिपाई एकदांच शिरले, त्यायोगें त्या सगळ्या गांवभर दाटी झाली. नंतर दिवस मावळला तेव्हां आफगाण लोक येऊन त्या पानपतास सभोंवता घेरा घालून रात्रभर तेथें राहिले. मग भानःकाळ झाल्या नंतर सर्वलोक बाहेर काढून त्यांस आफगाणांहीं आप

ल्या ठिकाणीं नेऊन त्यांतील बायका व मुलें वांटून घेतलीं आणि पुरुषांच्या दावणी करून त्यांच्या मस्तकांचे ढीग आपल्या डेऱ्यां पुढें घातले.

११ अशा निर्दयापणाच्या आचरणानें त्या लोकांची या पृथ्वीन निरंतर निंदा राहिली व त्या योगें मनुष्य जातीसही बट्टा लागला. कांकीं, असे निर्दय प्राणी मनुष्यांत उत्पन्न होतात इतकें कळलें.

नंतर त्या लढाईंत विश्वासरावाचें प्रेत सांपडलें तें आमेदशाह अबदाली याणें पहावयास आपले जवळ आणविलें, ते समयीं त्यास पहावया करितां आफगाण लोक मोठा शब्द करीत येऊन बऊन जमले तेवेळेस त्या लोकांची फार दाटी झाली, त्यांत अशा शब्द उठला कीं, आमच्या धर्माहून वेगळे जे लोक त्यांच्या बादशाहाचें हें प्रेत, यास्तव आत्मी याला वाळवून यामध्यें गवत भरून आपल्या काबुल प्रांतीं घेऊन जाऊं. असें नानाप्रकारें बोलत असतां गोहिलेलोक व सुजाउद्दवला यांणीं बादशाहाजवळ अर्जकरून तें प्रेत हिंदूंचे स्वाधीन करविलें, मग तेंहिंदूंनीं जाळून टाकिलें. त्याप्रमाणें सुजाउद्दवला याणें जनकोजी शिंदा व इब्राहिमखान गार्दी हे दोघे जरूर मी होऊन बादशाहाचें प्रेत सांपडलें होतें त्यांचाही प्राण वांचवावया विषयीं अर्ज करावयासाठीं उद्योग केला परंतु सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्या लोकांही असें केलें कीं, इब्राहिमखान गार्दी हा असत्य धर्मलोक यांचा पक्ष स्वीकारून सत्य धर्मी लोकांशीं लढला हें त्याचें मोठें दुष्कर्म जाणून त्याचा शिरच्छेद केला: शिंदा आणि नजीबअदवला या उभयतांचा फार द्वेष होता यास्तव तो ही मारिला गेला.

मग त्या रण भूमीच्या एके बाजूस एक शिर कापलेलें धड सां पडलें, तें सदाशिव रावाच्या आकृती प्रमाणेंच दिसत होतें, त्या समयीं हेंच भाऊचें शरीर असेल असें म्हणूं लागले; या शिवा य त्या भाऊचें विशेष कांहीं वर्तमान नाहीं. दुसरें यशवंतरा व पवार तो त्या रण भूमींतच पडलेला होता तो सांपडला. समशेर बहादूर तो त्या रण भूमींतून जखमी होऊन जिवाच्या भ यास्तव पळत असतां त्यास कोणी गांवकरी यांणीं मारिलें. मग विठ्ठल शिवदेव विंचुरकर व दमाजी गाइकवाड व नारोशं कर व आणखी कितीएक शिपाई सरदार दिल्लींतून माघारे आपले मुलखीं सस्थपणें आले. त्या मराठी लश्करचे जे लोक परत आले त्यांचा सुमार असा आहे कीं, जितके गेले तितक्यां चा चतुर्थांश माघारे आले. या प्रमाणेंच बुणग्याचा प्रकार झाला, यावरून असें वाटतें कीं, त्या भाऊसाहेबाचे लढाईसंबंधें दो न लक्ष सुमारें मराठी लोक मेले गेले. त्यांतून पळून कितीएक लोक सूरजमल्लाकडे गेले, त्यांस त्याणें आपल्या मुलखीं कृपा करून रक्षिलें; ती त्याची कीर्ति अद्यापि मराठे लोकांस आहे.

१२ असा वृत्तांत हिंदुस्थानांत झाला तें वर्तमान पेशव्या स कांहींसें कळलें, तेव्हां तो आपले खासगीचें सैन्य व दहा हजार सैन्यासहित जानोजी भोंसला यास बरोबर घेऊन हिंदुस्था नांत जावया करितां निघाला. तो त्या वर्षाच्या जानेवारीचे म ध्यभागीं नर्मदा उतरत होता तेव्हां त्याच्या लोकांस कोणीएक सावकार याचा जासूद औरंगाबादेस जात होता तो सांपडला, त्याणें मराठ्यांच्या पराभवाचें वर्तमान सांगितल्यावरून त्याला पेशव्याजवळ नेलें, तेव्हां पेशवा याणें त्याजवळचे कागद

उघडून पाहिले त्यांत संकेतानें लिहिलें होतें की, दोन मोतीं गळून गेलीं, आणि सत्तावीस मोहरा सांडून गेल्या, आणि रुपये व खुर्दा किती हरवला त्याची संख्या लागत नाहीं. यावरून सदाशिवराव व विश्वासराव आदिकरून मंडळीची दशा काय झाली ती पेशवा समजला. त्यानंतर थोडक्याच अवकाशा नें त्यास त्या लढाईतून आलेले लोक भेटले, त्यांत बाबुराचा-चा पुतण्या बाळाजी जनार्दन तो प्रथम भेटला; पुढें तोच नाना फडनवीस यानावानें लोकांत प्रसिद्ध झाला. मग पेशवा-ला अनर्थाचा प्रकार पुरतेपणें समजून घेऊन हळूहळू माघा रा पुण्यास येऊं लागला. मग त्या दुःखेंकरून त्याचे बुद्धीस कांहीं अंतर पडलें, आणि त्या दिवसापासून त्याच्या शरीरास दिवसान दिवस असमाधान होत चालिलें. मग त्याच वर्षाच्या पां चव्या महिन्यांत जुनाट अरबेरीस तो पर्वतीच्या देवळांस मरण पा वला; तें देऊळ त्याणेंच बांधिलें होतें.

तो सदाशिवराव भाऊचा अनर्थ सर्व मराठी लोकांस दुःख शोकादिक होण्याचें कारण झाला; मग पेशवाही मरण पावला त्या योगें अधिकच अवघड पडलें.

१३ तो बाळाजी बाजीराव फार योग्यतेस चढला, परंतु के-वळ आपल्या सामर्थ्यानें योग्य झाला असें नाहीं; त्याचे आगो धरचे पुरुषांचें कृत्य त्याचे वेळेस शेवटास गेलें. तो राजनीति दृष्या दिकामांत निपुण होता असें त्यास त्याचे लोक म्हणत, परंतु बहु धा कुटिल वर्तनास ते लोक बुद्धि असें मानितात, ही त्यांचे समजु तीस चूक आहे, पण असें नव्हें, सत्यतेमध्ें भागावें साच बुद्धि

बाळाजी बाजिरावाचे वेळेस भोगला कायकाय सुख तीं

तो शोध केला असतां असें दिसतें कीं, मरवत्याच्या मामलतीं ची चाल मोडिली व कोणी लुटारू आला असतां गांवकरी यांणींच मारावा असें शिकविलें तेणेंकरून प्रजा सुख पावली असेल. मग पेशव्यांनें प्रांतांत जागोजाग सुभेदार व मामलतदार ठेवून त्यांचे चवकशीवर सरसुभेदारही केले; आणि वसूल जमाकरणारांची पाहाणी झाली असा ही त्याणें बेत ठेविला होता. याशिवाय जो हिशेब देईना त्याचें पारिपत्य करून हिशेब घेत असत. पुण्यांत बाळकृष्ण गाडगीळ मोठा कुलीन शास्त्री तो न्यायाधीश केला, त्या योगें शहरचे लोक फार सुख पावले. या सर्व उत्तम रीतींचें मूळ रामचंद्रबाबा शेणवी, तो मेल्यानंतर सदाशिवरावानें ही तसेंच चालविलें. त्या राज्यांत ब्राह्मणांचीं कुळें बऊते क योग्यतेस आलीं, आणि त्या राज्यांत प्रजाही सुख पावून लोक नाना साहेब पेशवा धन्य प्रभु असें म्हणूं लागले, ती कीर्ति अद्यापि त्या लोकांत आहे.

भाग विसावा.

संनसबाशें एकसष्ट पासून सासष्ट पर्यंत झालेली वर्तमानें.

१ संनसबाशें एकसष्टांचा नववा महिना सप्तेंबर या नें अरबेरीस रघुनाथराव याणें आपला पुतण्या बाळाजीबाजिराव चा दुसरा पुत्र माधव यास बरोबर घेऊन साताऱ्यास जाऊन

राजापासून त्यामुलाचे नावें पेशवाई संपादिली; तेसमयीं त्या माधवरावाच्या वयास सत्रावें वर्ष होतें.

२ त्यापुढें तीन महिन्यांनीं ताराबाई मृत्यु पावली; तेव्हे स तिचें वय शायशीं वर्षांचें होतें. तिणें राजाराम राजा के देंत ठे विला, तो त्या दिवसापासून तसाच होता. ती ताराबाई मरण पर्यंत बाळाजी बाजीराव पेशवा व सदाशिवराव भाऊ यांचा द्वे ष करीत होती, ती मरणसमयीं बोलली कीं, हे दोघे दुर्दशा हो ऊन मेले तेणें करून माझे मनोरथ पूर्ण झाले.

३ बाळाजी बाजीराव मेला हें वर्तमान सलाबतजंग व निजाम अल्ली यांस बेदर मुकामीं कळलें; तेव्हां निजाम अल्ली तो आपणास दिवाण म्हणवी, आणि सलाबतजंग यास ना वाचा मात्र धनी असें करून आपण सर्व राज्य सुखाचा अनुभव घेत होता. तेव्हां तो समजला कीं, मराठ्यांहीं आपला मुलूख घेतला आहे तो या समयीं सोडवावया विषयीं सुलभ पडेल, म्ह णून त्याणें कांहीं एक निमित्त करून औरंगाबादेच्या आसमंता त मोठी फौज जमा केली. ही त्याची कल्पना खरीच होती, कां कीं, त्या पूर्वी चाळीस वर्षे त्यास अशी संधी सांपडली नाहीं. तो प्रकार असा, पानपताचे लढाईंत मराठे पराभव पावले त्यामुळें ब्राह्मण व मराठे मोठे मोठे सरदार एकमेकांत परस्परें त्या नाशा चें कारण कल्पून भांडू लागले, त्या योगें आपआपल्यांत फार वैमनस्यें पडलीं; आणि रघुनाथराव तो आपला पुतण्या माधवरा व पेशवा याचें वय लहान म्हणून राज्यकारभार आपण चालवी त असे. त्यावेळेस त्यापाशीं सैन्य त्या निजाम अल्लीच्या निवारणा स पुरे असें नव्हतें. हें वर्तमान त्यास कळतें तर तो मोठा लाभ पाव

ता,परंतु तें त्याला पुरते पणें न समजलें.

४ या शिवाय त्याणें दक्षिणेंत येऊन प्रथम टोंक्यामध्यें हिंदूंचीं देवस्थानें होतीं तीं फोडलीं, तेव्हां त्याचे मुसलमान लोक व तो असें समजलाकीं; हें आम्हीं केलेलें कर्म ईश्वरास संतोष कारक झालें, परंतु तेणें करुनच त्या निजाम अल्लीचा नाश झाला. कांकीं, त्याचे लश्करांत रामचंद्रजाधव वगैरे हिंदू सरदार जे त्याचे चाकरीस होते ते रुष्ट होऊन बहुतेक त्यापासून निघून गेले; आणि पेशव्याकडे जाऊन राहिले. त्यांणीं मीर मोंगल नामें निजामउल्मुलुखाचा कनिष्ठ पुत्र होता तोही बरोबर नेला.

५ त्यानंतर निजाम अल्लीचें लश्कर पुण्यावर येऊं लागलें, त्याचें निवारण करण्याविषयीं दिवसंदिवस मराठ्यांचा उद्योग वृद्धिंगत होत गेला. गोवरीं तो पुण्याजवळ एका मजलेवर आला, तेव्हां त्याचें पहिलें मानस होतें कीं, मराठ्यांपासून आपला सर्व मुलूख सोडवावा, तें टाकून इतकें मात्र केलेंकीं, बेदर व औरंगाबाद यां पासून सत्तावीस लाख रुपये मराठे घेत होते ते त्यांहीं द्यावे. त्यावर निजामअल्ली बेदराकडे मागें गेला, तो तेथें जाऊन त्याणें आपला भाऊ सलाबतजंग तो संनसवाशें बाराव्या जुलाई महिन्यांत कैदकरून त्यापुढें पंधरा महिन्यांनीं जिवें मारून टाकिला. अशीजी त्याणें बंधुहत्या केली तीव्यर्थ केली असें दिसतें,कांकीं, सलाबतजंग केवळ गरीब होता,त्याच्या हातून किमपि नाश झाला नसता.

६ ते मुसलमान लोक पुण्यापासून दूर गेल्यावर सदाशिव चिमणाजी भाऊ याचा मामा चिंबकराव तो दक्षिणेंतील वसूल

जमाकरून माघारा पुण्यास आला; नंतर पेशव्याचा चुलता रघुनाथराव यास ह्मणूं लागला कीं, तुह्मीच सर्वकार भार करितां यांत कांहीं माझा भाग असावा, तेव्हां त्याउभयतांचा वाद पडला. मग तो रघुनाथराव व सखारामबापू कैरे जे मुख्य कारभारी होते त्यांस पेशवा श्रेष्ठमानीत असे यावरून ते आपल्या मनां त समजले कीं, आपणां वांचून कारभार चालणार नाहीं, ह्मणून ते सारे क्रुद्ध होऊन कारभार सोडून आपले घरीं स्वस्थ बसले; आणि दुसरें समजलें कीं, आह्मांवांचून कामांत अडचण पडूंलागली ह्मणजे हा आपणच आमचें आर्जव करूंलागेल. परंतु माधवरावानें त्यांचें आर्जव न करितां त्या मामास तात्काळ जवळ बोलावून आणून दिवाणगिरीचें काम त्यास सांगितलें. तेव्हां त्याणें गोपाळराव गोविंद पटवर्धन मिरजकर याचे विद्यमानें कबूल केलें. तें सर्व समजून रघुनाथराव व सखारामबापू यांच्या मनांत त्या मामा विषयीं हेवा व द्वेष उत्पन्न झाला. त्या वरून रघुनाथराव पुणें सोडून नाशिकास गेला. मग तो तेथून थेट औरंगाबादेस जाऊन त्याशहरचा मुख्य अधिकारी मुरादखान होता त्याणें त्याचा मोठा संमान करून त्यास मोंगलांची कांहीं फौज दिली; त्यानंतर त्याला मराठे ही पुष्कळ जाऊन मिळाले. त्यावर तो पुण्यास येऊं लागला तेव्हां त्याच्या लश्कराची आणि माधवराव पेशव्याच्या लश्कराची गांठ पुणें व आमेदनगर यां चे मध्यभागीं पडली, तेसमयीं पेशव्याचें लश्कर रघुनाथरावाच्या

+ रघुनाथरावाच्या मनांतील द्वेष वाढावयाचें कारण आनंदीबाई, ती रघुनाथराव याची स्त्री. माधवरावाच्या मनांतील द्वेष वाढावयासकारण गोपिकाबाई, ती त्याची मातुश्री, तिचा तो माधवराव पुत्र.

लश्करा पेक्षां फारकमी असें समजून ते लोक त्यांशीं युद्धास उभे न राहिले. त्यावेळेस तो रघुनाथराव याचे कुमकेस निजामअल्ली हीयेन होता, आणि वराडांतून जानोजी भोंसला तोही सेनेसहित पुण्याकडे येऊं लागला होता, परंतु तो कोणाचा पक्ष स्वीकारील तें समजलें नाहीं. हें सर्वजाणून माधवराव यानें परमदक्षतेनें वशहाणपणेंकरून मनांत निश्चय केलाकीं, यासमयीं आपण काकाचे स्वाधीन व्हावें. मग आपल्या बरोबरच्या लोकांस सांगितलें कीं, तुम्ही आप आपले प्राण संरक्षणास पाहिजे तिकडे जावें. नंतर आपण जाऊन काकास भेटून त्याच्या समूर उभागडून बोलिलाकीं, आपल्याराज्यांत विभाग व कलह नसावा, याकरितांमी तुमचे स्वाधीन झालों. तेव्हां रघुनाथरावानें त्यास बंदींत ठेविलें, परंतु त्याचा असन्मान रक्षिलाकीं, तो बंदीं न असतां ही त्याची जेवढी प्रतिष्ठा होती तेवढी पुढें रघुनाथराव मोठी योग्यता मिळवून निरंकुशपणें मोठे पदवीस चढला तरी त्यास मिळाली नाहीं.

यानंतर मोंगलांनीं कुमक केली यास्तव रघुनाथरावानें कबूल केलें होतेंकीं, दवलताबाद व शिवनेरी व आशीरगड व आमेदनगर व एकावन्न लक्ष रुपये प्रतिवर्षी उत्पन्न होतअसा मुलूख देईन, त्यामाणें त्यांस द्यावयाची तात्काळ आज्ञा दिली; परंतु तें त्यांचे स्वाधीन झालें नाहीं, तों कांहीं मध्येंच निमित्त उत्पन्न झालें, तो प्रकार पुढें लिहिण्यांत येईल. तेवेळेसत त मोंगलांस दवलताबाद माघ दिली. मग निजाम अल्ली पेरगावीं येऊन रघुनाथरावपास मिळाला तेव्हां त्याला समजलें कीं, हेचुलते पुतणे एक झाले, त्यावरून त्याणें असें दर्शविलें

कीं, हें तुमचें ऐक्य पाहून मी संतुष्ट झालों.

७ याप्रमाणें रघुनाथरावाची सत्ता झाल्यावर त्यांणें सखा राम बापू व नीळकंठ महादेव पुरंधरे हे दोघे आपले मुख्य कारभारी केले. त्यावेळेस जगजीवनराव प्रतिनिधीचा पुतण्या श्री निवासराव तो प्रतिनिधि असतां त्यास दूर करून रघुनाथरावा नें आपला पुत्र भास्करराव तो फार लहान बालक होता त्यास प्रतिनिधि करून नारोशंकर हा त्याचा मुतालीक केला; आणि काझोजी मोहिते यांस सरलश्कर पदवी दिली. पेशव्याचे फडनवीस बाळाजीविश्वनाथापासून भानूच्या कुळांतले झाले, त्यांतील मोरोबाबूराव भानू यापासून ती फडनविशी घेऊन चिंतो विठ्ठल यास दिली.

याप्रमाणेंरघुनाथरावानें प्रतिनिधि आदि करून नवे केले, तेणें करून तो थोरांच्या मनांतून उतरला. असें असतांही आपला पूर्वीचासूड उगवावयासाठीं गोपाळराव पटवर्धन याचा किल्ला मिरज लढून घेता झाला, त्यायोगें मोठमोठ्या लोकांचें मन फारच विटलें. मग गोपाळराव पटवर्धन व जे त्यारघुनाथरावापासून दुःख पावलेले सरदार ते निजाम अल्लीचा वजीर विठ्ठलसुंदर याच्या बोलण्यावरून निजामअल्लीस जाऊन मिळाले. त्यांत रामचंद्रजाधवही होता, तो धनाजीचा नातू, त्यास रघुना

+ विठ्ठलसुंदर यजुर्वेदी ब्राह्मण होता, त्यास निजामानें आपला भाऊबंदींत घातला तेसमयीं दिवाणगिरी दिली. पुढें मुरादखानाच्या योगें मराठे व मुसलमान यांचा तह झाला, तेव्हांपासून तो विठ्ठलसुंदर त्या मुरादखानाच्या हेव्यास्तव पुनः नवें युद्ध उत्पन्न करावयास उद्युक्त झाला होता.

थरावानें सेनापतित्व दिलें असतांही गुजराथेच्या आधिपत्या विषयीं त्याला इच्छा होती, त्यामाणें तें न मिळालें म्हणून तो तिकडे गेला. मग त्या मुरादखानानें केलेला पेरणीवचा तह मोडून मराठेलोक वमुसलमानलोक पुनः संनसत्राशें सदसष्टींत युद्धाचा प्रसंग करिते झाले.

८ ही एवढी घटना होईलशी त्या रघुनाथरावाची अटक व्हावयाची नाहीं, म्हणून त्याणें युद्धाची तयारी केली नव्हती. त्या वेळेस माधवराव बंदींत असतांही त्याणें आपल्या शक्तीप्रमाणें काकाची कुमक केली; आणि मल्हारराव होळकर व दमाजी गाइकवाड हे दोघें रघुनाथरावाकडेस होते, असें असतांही तें लश्कर मुसलमानांच्या समूर लढावयाजोगें नव्हतें. म्हणून त्या लोकांच्या समूर युद्धासंगेल्या सारिखें भासऊन मग एकीकडेजाऊन मोंगलांचें लश्कर आपल्या पाठीमागें घेऊन औरंगाबादेस जाऊन त्याशहराचे तटास शिडीलावून आंत शिरावयाचा उद्योग केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. नंतर तो निजामअल्ली पाठीसलागला असा पाहून वराड प्रांतीं जाऊन जानोजी भोंसल्याचा मुलूख लुटतां लुटतां मलकापुरा ची खंडणी साठ हजार रुपये घेतली. त्यानंतर मोंगलांच्या प्रांतीं जाऊन फार नाश केला. तेसमयीं तो निजामअल्ली त्या रघुनाथरावाचे पाठीस लागून बऊत वेळ झाल्यावर समजला- कीं, हा आपल्याहातीं लागत नाहीं; तेव्हां तो सूड उगवावयास त्याणें निश्चय केला कीं, पुण्यासजाऊन तें शहर अगदीं लुटून जाळून टाकावें. हेंवर्तमान रघुनाथरावास कळलें तेसमयीं त्याणें ही तो सूड घ्यावयासाठीं हैदराबाद जाळावयाची मसलत

केली, आणि तो तिकडे चालिला.

९ पुण्यांतील लोकांस वर्तमान कळलें कीं, मोंगल पुणें शहर जाळावयास येतो, तेव्हां तेथचे बहुतेक लोक आपलीं घरें टा कून आपल्या सामर्थ्या प्रमाणें संसार खंटलीं घेऊन डोंगरी कि ल्ल्यांतून व कोंकणांत जाऊन राहिले. मग निजाम अल्ली येऊ न पुण्या जवळ उतरला; नंतर ज्याज्या घरांची खंडणी त्यास न मिळाली तींतीं घरें कांहीं मोडली व कांहीं जाळिलीं. मग पुरं दरा कडे जाऊन भीमा नदीपर्यंत मुलूख उद्ध्वस्त केला. त्यानं तर पाऊस काळ जवळ आल्यामुळें तो बेदरास जाणार होता परंतु जानोजी भोंसल्याचे मसलतीनें औरंगाबादेस जावयाचा नेम ठरला.

१० इकडे रघुनाथराव हैदराबादेस गेला, तेव्हां त्याच्हरा सभोंवतालचा होता त्याज मुळें तें शहर घेतां येईना, तेव्हां बाहे र च्या पेंठेची खंडणी एकलक्ष ऐंशीं हजार रुपये घेतली. मग हैद राबाद सोडून निजाम अल्लीचें काय वर्तमान आहे तो शोध घ्या वयास आला; त्याणें त्यावेळेस निजाम अल्ली कडचे जे मराठे म रदार होते त्यांशीं कांहीं बोलणें करून सुमार पाहिला कीं, जो त्यांज कडील मराठ्यांतील मुख्य जानोजी तो आपलेकडचा होई ल, कांकीं, तो निजामास मिळाला ते समयीं जसा त्याचा मनो रथ होता त्या प्रमाणें त्यास लाभ न झाला. तेव्हां रघुनाथरावानें प्रतिवर्षी तुलास बत्तीस लक्ष रुपये देऊं असें कबूल करून तो समयीं आपल्या पक्षाचा होईलसा करून ठेविला.

मग मोंगल सहित निजाम अल्ली औरंगाबादेस आला असतां तीन चार मजली तो त्याचे पाठीमागें होता, तो गोदावरी

जाऊन पोहंचला तेसमयीं आपण व बऊतेक लोक मिळून पळी कडे उतरून गेला, तेव्हां आली कडे आपला दिवाण व कांहींलो क राक्षसभुवन गांवाजवळ तो सर्व खटला उतरून पार जाई तों पर्यंत ठेविले. तेवेंळेस जानोजी भोंसला आपले फोजेस कांहीं दरमहा न पोहंचल्याचें निमित्त करून त्या दिवाणास सो डून त्यापासून कांहीं अंतरानें उतरला. तें वर्तमान रघुनाथरा वास कळलें, तेव्हां तो समजला कीं, हें चिह्न आपल्यास हितावह आहे. त्यावरून तो मोठ मोठ्या मजला करून अकस्मात् मोंगलांच्या लश्करावर जाऊन पडला, तेथें मोठ्या निकरा चें दोन दिवस युद्ध+ होऊन त्यांत मोंगल लोक बऊतेक मेले गेले; त्यांत दिवाणही मृत्यु पावला. त्याप्रसंगीं माधवरा व होता, तो आपल्या शौर्यें करून व सावधपणानें आणि चातु र्यें करून मोठा विख्यात झाला. तेसमयीं निजाम अल्ली गोदाव रीचे पलीकडे होता त्याच्यानें त्या दिवाणास कुमक करवेना, तेव्हां त्याच्या लश्कराचा नाश पाहून आपण औरंगाबादशाह रांत शिरला, त्याचेही पाठीस मराठे लागून त्यांहीं औरंगाबादे वर पुनः हल्ला केला, तेव्हांही त्यांचे लोक फारमेले गेले, परंतु अ र्थसिद्धीस गेला नाहीं.

११ त्यानंतर निजाम अल्ली फार पश्चात्ताप पावल्याच्या आ कारें करून रघुनाथरावाचे भेटीस आला; आणि आपणजें कृत्य केलें तें सर्व दिवाणानें करविलें असें रघुनाथरावास समजावून त्याचें मन असें सुप्रसन्न केलेंकीं, त्याणें जानोजीभोंसल्यासजो अती

+ त्यायुद्धास मराठे तें दळजाचें युद्ध म्हणतात.

सलक्षरुपये उत्पन्न होतसा मुल्हूख देऊं केला होता तो वजा करून बाकीचा एकावन्न लक्ष रुपये उत्पन्नाचा जो पूर्वी लाऊन दिलेला मुल्हूख होता त्याचे भरतीचा एकूणीस लक्षाचा राहिला तो घाव यास सिद्ध झाला, परंतु त्याच्या कारभारीलोकांहीं हें ठीक नव्हेसें समजाविलें, त्यावरून त्याणें त्यास दहा लक्ष रुपये उत्पन्नाचा मात्र दिला. या प्रमाणें पूर्वीच्या करारापेकीं नऊ लक्ष रुपयांचा मुल्हूख दिला नाहीं. तो पेशाव्यास लाभला. मग त्यानिजामअलीशीं आणि पेशाव्याशीं अकटोंबर महिन्यांत नवा तह झाला, ते समयीं जानोजी भोंसल्यास बत्तीस लक्षांच्या मुलखाची सनद देतांना रघुनाथराव त्यास बोलिला कीं, तूं आपल्या वडिलांचें महत्व जेणें करून वाढलें असें जे मराठ्यांचे राज्य तें बुडवावयाचें कृत्य केलेंस, आणि निजामाचा आश्रय संपादिलास, मग त्याचाही घात केलास, या प्रमाणें त्यास निषेधून करारा प्रमाणें सनद दिली. त्याबेळेस भास्करराव प्रतिनिधि मरण पावला. तेव्हां नीजागा भवानराव प्रतिनिधि यास पुनः प्राप्त झाली; आणि गोपाळराव पटवर्धन यास मिरजेचा किला रघुनाथरावानें पुनः माघारा दिला; तेव्हसमयीं मोरोबा फडनवीस याचा अधिकार त्यास न देतां त्याचा चुलत भाऊ बाळाजी जनार्दन भानु यास तो अधिकार दिला.

१२ पूर्वी लैसटरचें वर्तमान लिहिलें त्यांत हैदर अल्लीचा प्रकार आला. तो हैदर कोणे प्रकारें विख्यात झाला तो विस्तार असा, मराठेलोक पानपताच्या लढाईला दक्षिणेकडून उत्तरेस गेले तेसमयीं सलाबतजंग आपणास स्वतंत्रपणें राज्य मिळवावयास हा व उत्तम समयसा जाणून करनाटकांत गेला, आणि तेथच्या हैद

र अल्लीशीं स्नेह केला. नंतर त्या सलाबतजंगानें कांहीं एकही मुलूख घेतला नाहीं तोंच त्याहैदर अल्लीनें तो शेरा प्रांतींचा नवाब केला मग ते दोघे बरोबर जाऊन उसकटा व शेरा व बडावा ळापूर इतकीं घेतलीं. नंतर सलाबतजंग यानें आपला भाऊ निजाम अल्ली याच्या भयास्तव हैदर अल्ली याची संगत सोडिली, आणि आंदोणी नामें आपलें रहावयाचे पहिलें ठिकाण तेथें गे ला; परंतु हैदर अल्ली त्यासारखा नभिऊन तेथेंच राहिला; आणि तें राज्य अगखी साधावयास उद्युक्त झाला. मग त्यानें कि तीएकां पाळेगारांपासून खंडणी घेऊन बेदनूर प्रांत आपल्या सत्तेंत आणिला. त्यापुढें संनसत्राशें चौसष्टांत त्यानें सावनूर चा नवाब जिंकिला. मग कांहीं कारणानिमित्त त्याहैदराला बेद नुरीं जावें लागलें, म्हणून तेथें एकसरदार ठेविला, त्यानें धा रवाड घेतलें आणि हैदराचें ठाणें कृष्णातीरानजीक बसविलें.

१३ तोहैदर अल्ली असा पराक्रम करीत असतां मराठे उगेचन बसले, त्यांहीं त्याचा उत्कर्ष आपल्या नाशास कारण असें सम जून संनसत्राशें चौसष्टांतच पुण्यामध्यें मोठें सैन्य जमा केलें. मग मे महिन्यांत ती फौज घेऊन माधवराव कर्नाटकांत शिरला ते समयीं हैदर अल्लीचें लश्कर मोठें बळकट स्थळ करून अन वती नामक नाग्यावर छावणी करून राहिलें होतें. माधवराव आपल्या सैन्यासुद्धां तेथून पुढें दुसरी एक युद्धाचे उपयोगीं अशी बळकट चांगली जागा पाहून राहिला. त्या हैदराजवळ वीसह जार घोडेस्वार व पायदळ चाळीस हजार होतें, त्यांत वीस हजार कवाईत शिकविलेले पलटणी लोक असत. तेथें मराठ्यांचें ल श्कर जवळ जाऊं लागलें तेव्हां त्या मराठी लोकांनीं मसलत केली

कीं, याचें ठाणें बळकट आहे यास्तव सम्मूर जाऊन लढूं नये. अगो धर त्याणें वर्धा नदीचे उत्तरेस ठाणीं बसविलीं आहेत नीं उठ वावीं म्हणजे तो बाहेर निघून मोठी लढाई झाली असतां त्यांत आपलें हित होईल. तें ऐकून त्या हैदरानें मसलत केलीकीं, आपण ठाणें सोडून जातों असें दाखवून बाहेर निघून मराठे आंगावर आले असतां मागें हटून त्यांस पुरते आंगावर घे ऊन एकदांच हल्ला करून मारून टाकावें, अशी कल्पना करू न तो त्या प्रमाणें उद्योग करूं लागला. मराठे ही तेसमयीं तो त्या चा संपूर्ण मतलब जाणून आपणभितों असें दाखवून मागेंमा गें हटूं लागले. याप्रमाणें करतां करतां यांनीं त्यास पुरता आ पल्या आंगावर घेऊन मग एकाएकीं त्याच्या लश्करास भोंवती आपले स्वारांची दाटी करून त्याचा बहुत नाश केला, तो अ साकीं, शेवटीं त्याला आपलें पहिलें ठिकाण अनवलीजागची छावणी मोठ्या प्रयासें करून प्राप्त झाली. असा हैदरअली- चा पराभव झाल्यानंतर मुरारराव घोरपडा पेशव्यास जाऊ न मिळाला, त्या मुरारराचा मूळपुरुष संताजी घोरपडा त्याचें स्वरूप राजाराम राजा याच्या वेळेस अनीती मुळें प्रकट झालें ना हीं, यास्तव यासमयीं त्याचा वंशज मुरारराव जाणून सेनापतीची पदवी यास द्यावी हें सुनीतीस योग्य असें ठरून तो मुरारराव घोर पडा सेनापति केला.

यानंतर तें युद्ध समाप्तीस जाऊन मराठे यश पावतील अ सें निश्चित समजलें असतांही माधवरावानें आपल्या काकास निरोप पाठविला कीं, आपण येवून हें काम शेवटास न्यावें, यांत त्या माधवरावाची परमसुशीलता प्रकट झाली, परंतु ती राजनी

ति नद्दे; कांकीं, आपणास यश्या येत असतां त्याचा अधिकारी दुसऱ्यास करणें हें साधुमार्गास फार योग्य आहे, आणि राजा सत्तर अहितच.असा त्या माधवरावाचा निरोप गेल्यावर तोरघुनाथराव येऊन त्यास मिळाला, तेवेळेस तें लश्कर वरधा नदी उतरून पलीकडे जाऊं लागलें.असें सत्राशें छप्पन्नांत घडलें.

तें मराठ्यांचें लश्कर वरधा नदी पलीकडे जाऊन अनवती समीप दाटरान होतें तें तोडून आपणास तिकडे जावयाची मोठी वाट करून हैदर अल्लीचें लश्कर व बेदनूर यांच्या मध्यभागींठा णें घालावयाचा बेत करीत होतें.तें वर्तमान हैदरास कळतां च तो मोठ्या त्वरेनें बेदनुराकडे जाऊं लागला. त्यासमयींम राठे तो मुल्हरव झाडीमुळें आंत शिरावयास फार कठीण म्हणून हैदराच्या लश्करास दोन दिवस फारसा उपद्रव न देतां यथा शक्ति कांहींशी खटपट करीत राहिले. मग तिसरे दिवशीं मै दान मुल्हरव लागला तेव्हां मराठ्यांच्या लश्कराची एक टोळी त्याच्या लश्करा पलीकडे जाऊन बेदनूराच्या आलीकडे अगोद रच उभीराहिली होती, तेथें जाऊन पोहंचला, तेसमयीं त्या हैदरा स युद्धाविषयीं उभें रहाणें प्राप्त झालें. तेव्हां मराठे त्यावर मोठ्या वेगें करून हल्ला करूं लागले असतां हैदरअल्लीयाचे बऊते कलोक रानांत पळून गेले, मग हजार पायदळ वं अडीच हजा र स्वार इतक्या फौजेनिशीं तो बेदनुरास पोहंचला. त्याचे पाठि मागून मराठे ही मुल्हरव घेत घेत गेले.शेवटीं रघुनाथराव यानें हैदराकडून कबूल करविलें कीं, पेशव्यास बत्तीस लक्ष रुपये द्यावे व घोरपडे यांचा मुल्हरव त्यानें घेतला होता तो त्यांस माघारा

द्यावा; याशिवाय सावनूरच्या नवाबापासून खंडणी वगैरे कांहीं घेऊं नये. असा तह रघुनाथराव याणें केला तो माधवराव याच्या मनास आला नाहीं, परंतु त्यावर सर्व कार्यभार सोंपवि ला होता म्हणून त्यादेखेस त्याला किर्मांपें प्रतिकूळ न बोलतां त्या चे दुसरे वर्षी फेब्रूवारी महिन्यामध्यें तो माधवराव करनाटक सोडून कृष्णे पलीकडे गेला.

१४ मग त्याच वर्षी निजामअल्ली व पेशवा हे दोघे एकचि त्त होऊन वराडास जाऊन जानोजी भोंसला याशीं युद्ध करून तो अगदीं नम्र केला आणि त्याणें पेशव्याशीं व निजामअल्लीशीं दगलबाजी करून मुलूख संपादिला तो बत्तीस लक्षांचा होता त्यापैकीं त्याला चवथाई ठेवून बाकी सर्व घेतला. त्यांतून पं धरा लक्षांचा मुलूख माधवरावानें निजामअल्लीस दिला, तो त्याचे मैत्रीसाठीं दिला असें पुण्याचे बखरींत लिहिलें आहे, परंतु असें दिसतें कीं, करनाटकीं आपण स्वारीकरून हैदर अल्लीला जिंकणार त्या कार्यास निजामअल्लीनें सहाय्य व्हावें म्ह णून माधवरावानें त्याशीं गुप्तपणें कांहीं बोली केली त्यावरून पंधरा लक्षांचा मुलूख दिला, त्यांतही तो संबंध असेल.

भाग एकविसावा

सनसत्तावीसांसालापासून बाहात्तर पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ पूर्वी हिंदूंच्या मुलखांत इंग्लिश+ व फ्रेंच यांचें किती एक वेळां युद्ध होऊन शेवटीं इंग्लिशांहीं फ्रेंच लोकांस जिंकिलें. ते इंग्लिश आपली विलायत सोडून प्रथम हिंदूंच्या मुलखीं आले तो प्रकार असा. तेथले कितीएक द्रव्यवंत लोक मिळून एकचित्त होऊन त्यांहीं असा बेत केला कीं, हिंदूंच्या मुलखीं जाऊन कांहीं उदीम करावा, मग त्याच्या साधनार्थ ते आपल्या बादशाहाजवळ जाऊन विनंती करिते झाले कीं, आम्ही इतकेजण मिळून आपलें द्रव्य एकत्र करून दूरदेशीं हिंदूंच्या मुलूखांत जाऊन उदीम करूं इच्छितों, त्यास या आमच्या मंडळी खेरीज दुसरा कोणी तिकडे नजावा, आणि आम्हांस या कामा विषयीं अनेक प्रकारें सरकारचा आश्रय असावा, या विषयीं कृपा करून आमचा उद्योग निर्बाधपणें चालेशी आम्हास सनद द्यावी, त्यावरून बादशाहाची तशी सनद मिळाल्या वर त्या मंडळीचे कितीएक लोक‡ तेथून निघून हिंदूंच्या राज्यांत कलकत्ता व मद्रास व मुंबई यांतहीं ठिकाणीं आपलीं स्थळें करून राहिले. मग तेथें कांहीं उदीम करीत असतां त्यांस त्या मुलखींच्या रहाणारांशीं त्या कामा विषयीं कांहीं संबंध पडला. तेव्हां त्या हिंदू लोकांच्या कापट्या मुळें त्या इंग्लिश लोकांना आपल्या उद्दमाचें व प्राणांचे रक्षण व्हावें म्हणून शि

+ इंग्लिश लोकांस मराठे लोक इंग्रेज असें म्हणतात आणि फ्रेंचांस फ्रांशीस असें म्हणतात, परंतु इंग्लिश व फ्रेंच हे शब्द शुद्ध.

‡ ज्या सनद घेतलेल्या मंडळीचे नाव विलायतेत असें पडलें कीं, अनरावल्ड ईस्ट इंदिया कंपनी म्हणजे हिंदुलोकांशीं संबंध ठेवून व्यवहार करणारी श्रेष्ठ मंडळी.

पाईलोक बाळगून किल्ले बांधावे असें अगत्य पडलें. मग तेथच्या राजाशीं संबंध पडून त्यांचे हातीं कितीएक मुलूख सां पडला, तेव्हां त्यांस तें काम श्रेष्ठ असें नवाटतां राजा प्रमाणें वर्तविें लागलें.

२ फ्रेंच जिंकिले तेसमयीं बहुतेक मुलूख त्यांच्या हा तास लागला नेणें करून तेपरम विस्मय पावून मनांत वि चार करूं लागले कीं, यांत कांहीं एक भाग आपल्या कामापु रता ठेविला आणि बाकी टाकिलातर आपणास बरें पडेल कीं नाहीं, तेव्हां असें ठरलें कीं, अर्धें मुर्धें टाकावें आणिअ र्धें मुर्धें भोगावें हें ठीक नव्हे, त्यास टाकणेंतर अगदीं सारेंच टाकून विलायतेसजावें, किंवा उत्तरोत्तर जसें कारण पडे ल तसें आणीक आणीक घेऊन आपण त्यालोकांचे आच रणानुरूप वर्तविें हें योग्य.त्यावरून बंगाल्यांत क्लेव्ह नामें लॉट तो विलायतेचे बादशाहापासून सरकार आज्ञेनें मुल खाच्या बंदोबस्तास संनसत्राशें छप्पन्नांत कलकत्यास आला, त्यानें असें पाहिलें कीं, आपले रक्षण करीत उगेंच बसणें ठी- क नव्हे, कांकीं, नशानें रक्षण नीट होत नाहीं; दुसरा मारूला गे तों पर्यंत उपेक्षा करण्यांत मोठी हानि आहे; यास्तव पुढें हो ऊन अवश्य कांहीं उद्योग करावा. अमा निश्चय करून त्या स प्रथम दोन कार्यें साधावयाचें अगत्य पडलें; त्यांत एक कार्य असें, साष्टी व करंजें व मुंबई जवळचा आणखी एकटां पू आपले स्वाधीन व्हावा; दुसरें कार्य असें, फ्रेंच लोकांस नि

+ लाट म्हणजे मोठ्या रुमणाचा मारिचें पर आहे.

जामानें शिबंदीच्या खर्चास दिलेले पांच परगणे मद्रासेजवळआ हेत ते आपल्या सत्तेंत आणावे. तेव्हां साष्टी आदिकरून ठांपूम रांठे देईनात; कांकीं, पूर्वी विलायतचे पोर्टुगीस लोक यांस जिं कून त्यांहीं ते घेतलेले होते, ते जर या इंग्लिशांस दिले तर आपली मान हानि होईल व यांची वृद्धि आपणास बाधक होईल असें त्यांच्या मनांत आलें. मद्रासेजवळचे परगणे निजामअल्लीक डे होते त्या पांचां परगण्यांतील एक गंठूर नामें परगणा तो त्या निजामाचा भाऊ सलाबतजंग यास जहागीर होता म्हणून तो निजाम देईना. तेव्हां त्यास लाट म्हणालाकीं, या गंठूरा खेरी ज चार परगणे आहेत ते तुम्हीं पूर्वी अर्कटचे नवाबास मरव त्यानें देत होतां तेव्हां त्यांचें उत्पन्न त्यापासून जें घ्यावयाचा नेम ठरविला असेल त्यापेक्षां सहापट आम्हीं तुम्हांस देऊं, त्यास ते चारी परगणे आम्हास तुम्ही द्यावे. असें मागितलें अ सतांही तो निजाम ऐकेना, तेव्हां त्या लांटानें निश्चय केलाकीं, बलात्कारें करून आपल्या रक्षणार्थ घेतले पाहिजेत. त्यावरून त्याणें दिल्लीच्या बादशाहाची सनद त्या परगण्या विषयीं संपाद न करून मद्रासेस जो कोणी मुख्य साहेब होता त्यास आज्ञा देऊ न त्याणें राजमंड्री शहर घेतलें.

३ त्यावरून निजाम अल्लीस राग येऊन बोलिलाकीं, आ तां आम्हीं इंग्लिशांला अगदीं निर्मूळ करून टाकूं. त्यानंतर त्याणें हैदरास शिकविलें कीं, तुम्हीं कर्नाटकीं जाऊन इंग्लिशां हीं घेत लेला मुलूख सोडवावा. तेव्हां तो अनर्थ चुकवावया करितां है दराशीं स्नेह करावयास कांहीं बोलण्या निमित्त इंग्लिशांनीं वकी ल पाठविला, परंतु तो हैदर वकिलास आपल्याकडे येऊंच देईना.

हें वर्तमान लाडास समजलें तेव्हां त्याणें मद्रासच्या साहेबास लिहिलें कीं, हल्लीं हैदर व निजाम व मराठे यांचीही एकचित्तता आहे, त्यांत मराठे व-निजाम यांचें पहिलें वैमनस्य होतें, त्यावरून असें दिसतें कीं, निजामाचीं स्नेह करावा म्हणजे त्याच्या साहाय्यें करून हैदर व मराठे यांच्या मर्यादेंत वागावयास फार सुलभ पडेल. मग ही स्नेहाची गोष्ट निजामास कळविली, तेव्हां त्यास तें बरें वाटलें; कांकीं, त्याच्या मनांत होतेंच कीं, हैदरास जिंकून मर्यादेंत ठेवावें, परंतु त्याच्या मनांत आलें कीं, एकदांच उभयतांशीं नडिटावें; मराठ्यांशीं युद्धपणें जो तह केला आहे तो तसाच राखून आधीं हैदर जिंकावा. त्यावरून त्या निजामानें इंग्लिशांशीं स्नेह करून चारी परगण्यांची सनद दिली, आणि त्यापासून प्रतिवर्षीं सात लक्ष रुपये घ्यावे असा करार करून घेतला. त्याशिवाय ज्या वेळेस गरज लागेल तेवेळेस आपल्या चाकरीस इंग्लिशांचीं दोन पलटणें व सहा तोफा सिद्ध असाव्या, त्यांचा खर्च चाकरी पडेल तेसमयीं आम्ही देऊं. असें निजामानें कबूल केलें.

४ इकडे मराठ्यांचे दरबारीं इंग्लिश व निजाम यांचे मनांतील संकेत कळले असतील असें वाटतें; कांकीं, संनसत्राशें सदसष्टांचे जानेवारींत माधवरावानें आपल्यास निजामानें पूर्वलिसंकेता प्रमाणें येऊन मिळावयाची वाट न पहातां एकाएकीं कुच्चे पलीकडे लश्कर सहित जाऊन दोहों महिन्यांत शोरा व उसकडे हे परगणे घेतले; व हैदरापासून तीसलक्ष रुपये घेऊन करना

टक चे दुसरे जे कोणी मोठे मोठे संस्थानी होते त्यांपासून सवा लक्ष रुपये घेतले; आणि तें सर्वद्रव्य जमा करून निजामाची मिळता झाली नाहीं तोंच आपण आपले मुलखीं माघारा आला. नंतर निजाम व इंग्लिश या दोघांहीं पेशाव्यास त्या नेलेल्या द्रव्याची वांटणी मागितली, तेव्हां तो त्यांस तुच्छ मानून मान्य झाला नाहीं.

नंतर निजाम अल्ली तो इंग्लिशांचा पक्ष सोडून हैदराकडे मिळून इंग्लिश जिंकावयाची मसलत बांधूं लागला. मग सन नसत्राशें अडुसष्टांच्या फेब्रुवारीचे तेविसावे तारिखेस तो निजाम हैदराचा पक्ष सोडून पुनः इंग्लिशांशीं स्नेह करिता झाला. त्यांत पूर्वीच्या स्नेहापेक्षां इतकें अधिक झालें तें असें, निजाम आणि इंग्लिश या उभयतांच्या मतें असें ठरलें कीं, हैदर अल्लीस पजे केवळ बंड याच्या मानरक्षणाचें आपणास प्रयोजन नाहीं, त्यास याचा मुलूख घेऊन चित्तास येईल तो प्रकार केल्यास दोष किमपि नाहीं. त्यावरून निजामानें नेम केला कीं, हाहै दर दिल्लीच्या बादशाहाच्या हातचा स्थापित दक्षिणेचा अधिकारी आहे, त्यापेक्षां करनाटक बालेघाट घेऊन किंवा त्यास्थानीं न्यून हैदरास भ्रष्टकरून तेथेंवहिवाटीस इंग्लिशांला दिवाण करीन; या शिवाय मलाबतजंगास गंडूर परगणा जहागीर आहे तोही सलाबतजंग मेला असतां अथवा त्याचे वर्तणुकेंत अंतर पडलें असतां मी इंग्लिशांस देईन.

५ त्याचे अदलें वर्षी रघुनाथराव मल्हारराव होळकरास बरोबर घेऊन हिंदुस्थानची स्वारी करावयास गेला तें समयीं तो

मल्हारराव मृत्यु पावला, त्यायोगें रघुनाथरावानें कल्पिलेलें कार्य सिद्धीस न गेलें; व पूर्वी पानपतचे लढाईनंतर गोहदचा राणा एक जाट होता, त्याणें पेशव्याचा पक्ष सोडून विपरीत वर्तणूक केली, यास्तव रघुनाथ रावानें त्याच्या पारिपत्या साठीं त्याच्या शहरास घेरा घातला; आणि कितीएक वेळां युद्ध प्रसंग करून शेवटीं तो किल्ला हातास येत नाहींसें समजून त्यापासून तीन लक्ष रुपये खंड घेऊन आपण माघारा दक्षिणेस आला.

६ त्याचे आगोदर च माधवराव पेशवा करनाटकांत जाऊन पोहंचला होता, त्याणें काकास निरोप पाठविला कीं, आपण ढोंक्यासयेऊन मला भेटावें. तेव्हां काकानें तर आनंदीबाईच्या सांगण्यावरून मुलखाचा अर्धाभाग घ्यावा अशी मसलत केली होती, त्यावरून त्यास वाटलें कीं, माझी मसलत फुटली, त्यास तेथें गेलों तर माधवरावाच्या केदेंत सांपडेन, या शंकेनें तो ढोंक्यास जाईना. मग गोविंदशिवरामाच्या योगें करून निर्भयपणें तेथें गेला, तेव्हां पेशव्याच्या मनांत होतें कीं, त्या काकास बारा तेरा लक्ष रुपये वर्षास उत्पन्न होतील अशी गोदावरीचे उगमीं जहागीर करून द्यावी, तिचा उपभोग करून काकांनीं कारभार न करितां स्वस्थ असावें. परंतु त्या रघुनाथरावास राज्याचा अर्धभाग पाहिजे होता, म्हणून तें देणें त्याच्या मनास येईना. तरी त्याणें त्या प्रमाणें घेतलें, तथापि त्याचें मन संतुष्ट न झालें.

+ मल्हारराव होळकर मृत्यु पावला तेव्हां त्याचे जागीं त्याचा नातू मालूराव स्थापिला. तो हीलवकरच मेला. मग त्या मल्हाररावाचा दिवाण व अहिल्याबाई खंडेराव होळकराची बायको यांचा या अधिकाराविषयीं वाद पडला. शेवटीं अहिल्याबाईनें आपला भाऊबंद नव्हे असा कोणीएक पराक्रमी शिलेदार होता तो या अधिकाराचा धणी केला.

त्यापुढें पर्जन्यकाळ समीप आला तेसमयीं रघुनाथरावानें पंधराह जारांवर सैन्य जमा करून चांदोरच्या डोंगरांत घोरपडणून किल्ला आहे तेथें त्यालश्करासहित जाऊन आपणास जानोजी भोंसल्यानें येऊन मिळावें असें करून तो त्याची मार्ग प्रतीक्षा करीत त्या ठिकाणीं राहिला. त्याचे मनांत होतें कीं, आपणास पाहिजे ति तकें राज्य आपण बलात्कारें करून घ्यावें. त्यासमयीं सदाशी गाइकवाड व होळकराचा दिवाण गंगाधरयशवंतराव हे होते, त्यांत गंगाधरयशवंत रघुनाथरावाविषयीं प्रीतिमान आणि पेश व्याविषयीं तो आंगचा द्वेषी असे; कांकीं, पूर्वीज्यासमयीं रघुना थरावानें राज्यकारभार टाकिला होता तेसमयीं कोणे एके दिवशीं पेशव्याचे घरीं कचेरीमध्यें बोलतां बोलतां या गंगाधरयशवंतरा वानें रघुनाथरावाची स्तुति व माधवरावाची निंदा दर्शविली,ते ह्मां माधवरावानें कांहीं न बोलतां आपल्या आसनावरून उठू न त्याजवळ जाऊन मोठया आवेशानें एक त्याच्या तोडांत मारि ली होती.

७ रघुनाथरावयास त्याडोंगरी ठिकाणीं पेशव्यानें फार दिवस राहूं दिलें नाहीं. कांकीं, त्यास भयउत्पन्न झालें कीं, काका ला जानोजी भोंसला येऊन कुमक करील.म्हणून मोठी खराकरून लश्करसहित एकाएकीं जाऊन त्यारघुनाथरावावर पडून त्याच्या लश्कराचा अगदीं पराभव केला, तेंव्हां तो रघुनाथराव त्या घोरप किल्ल्या मध्यें शिरला मग त्याणें तो किल्लाही घेऊन काकाला धरू न पुण्यास आणिलें.

८ त्यावेळेस पर्जन्यकाळामुळें पेशव्यास जानोजीच्या पारि पत्या करितां पुढें जावयास अवसर झाला नाहीं, परंतु दुसरे वर्षी

संन सत्राशें एकुणहात्तरांत पेशवा आपल्या सैन्यासहित चरोब र रुकन अद्वला नामें मोगलांचा वजीर फौजेसुद्धां घेऊन नागपुरा सचालिला. तेसमयीं जानोजी आपल्या संरक्षणार्थ युद्धाचे तया रीचा चांगला बंदोबस्त करिता झाला. ' सो पेशव्याच्या समूर युद्धा स उभानराहतां आमेदनगरा पलीकडे जाऊन पुण्याचे आसमंता तलुटता झाला. इतक्यांत माधवरावपेशवा याणें त्याच्या मांतांत न जातां सर्वजागीं ठाणीं बसवून वसूल घेतला. मग चांडा किल्लायास घेरा घालून गोपाळरावपटवर्धन व रामचंद्रगणेश यांजबरोबर बत्तीस हजार स्वार देऊन ते जानोजी भोंसल्याचे पाठीस लाविले. नथापि पुण्याचे आसमंतात् जोउपद्रव होत असे त्याचा प्रतिबं धन झाला; कांकीं, त्या दोघांहीं त्या जानोजीशीं आंतून गुप्तपणें स्नेह ठेविला होता.त्यावरून पेशवा चांडा किल्ल्याचा घेरा उठवून गोदावरीकडे आला. तेसमयीं त्याजानोजीनें असा आकार दाख विलाकीं, आतां त्याच्या समूरजाऊन लढतों, परंतु त्याच्या मनांत तसें नव्हतें; कांकीं, त्याणें पेशव्याचें लश्कर माऊरा समीप एकीकडे टाकून वाट धरिली. तेवेळेस त्याचा कोणीएक सरदार बापूखरां ट्या नामें होता तो त्याजानोजी कडून येऊन पेशव्याचे लश्करच्या बुणग्यावर पडून कांहीं लूट घेऊन गेला. त्यापुढें पेशवा व जा नोजी भोंसला हे उभयतां युद्ध करणें ठीक नव्हेसें समजून मार्चाचे तेविसावे तारिखेस भीमेचे उत्तर कांठीं कंकापुरीं तह करिते झा ले. त्यांत असें ठरलें कीं, पूर्वीच्या दिलेल्या बत्तीस लक्षांच्या मुलखा पैकीं आठांलक्षांचा मुलूख पेशव्यानें त्याकडे राखिला होता तो घ्यावा,आणि अक्कलकोटचा राजा फत्तेसिंग भोंसला या चे जमीचा कांहीं वसूल होईल तोहा पेशव्यानें घ्यावा; याशिवा

य पेशव्याचे लश्कर चा कोणी शिलेदार रुसून येईल तो जानोजी नें आपल्याजवळ बाळगूंनये; यारवेरीज दक्षिणी सुभेदार व दिल्लीचा बादशाह व अयोध्येचा नवाब व इंग्लिश व रोहिले यां तून कोणा एकाशींही स्नाभोंसल्यानें राजकारणीं मसलत करूंन ये. याप्रमाणें कबुलात होऊन त्यादिवसापासून पांचांवर्षां नीं पांचलक्ष व एक इतके रुपये पेशव्यास द्यावे असें ठरलें. या करारांत अणखी प्रकार पुष्कळ होते, परंतु जे त्यांत मुख्य ते लिहिले. पेशव्यांनीं करार केला कीं, कधीं हिंदुस्थानांत सैन्या सहितजावें लागल्यास वाटेनें जानोजी भोंसल्याच्या मुलखास उपद्रव देऊंनये; जर दुसरा कोणी तिकडे स्वां री करील तर लश्कर पाठवून जानोजीचें साहाय्य करावें.

या प्रमाणें पेशव्यास जो लाभ झाला त्यापेकीं निजामास तीनलक्ष रुपये वर्षास पावूं लागले; व त्याचा वजीर रुकन अ-दवला यास प्रतिवर्षी एक लक्षरुपये माधवरावापासून पावूं लागले.

९ इकडे करनाटकांत हैदरअल्ली इंग्लिशांशीं कांहीं स्ने हकरून आपल्या पुष्टीकरणार्थ समयविशेषीं ते आपल्याउप योगीं पडतील असें जाणून मराठ्यांचें भय मानीनासा झाला. मग तो आपण मराठ्यांस खंडणी न देतां पेशव्यांचे पक्षाचा को-णी पाठेगार होता त्यापासून खंडणी घेता झाला. असें त्याचें वि परीत आचरण कळलें तेव्हां माधवराव पेशव्यानें बऊत स्वारज माकरून गोपाळराव पटवर्धन व मल्हारराव रास्ते वगैरे सरदार यांस त्यां बरोबर देऊन त्याहैदरावर पाठविले. मग थोडक्याच अवकाशांत आपण वीस हजार स्वार व पंधराहजार पायदळ

बरोबर घेऊन त्यांचे पाठीमागून गेला, तो तात्काळ दोघीं बाळापु
रें व कोल्हार व नंदीदुर्ग व मनवगळ यांखेरीज सोळा पांहाडी कि
ल्ले व पंचवीस भुईकोट किल्ले घेता झाला. असें वर्तमान मंनस
वाशें सत्तरांत घडलें.

१० मनवगळचा किल्ला घेतांना असें झालें कीं, घाडगेकु
ळाचे विभागी दोघे, एक बुधकर नामें, दुसरा मलावरीकर नामें,
या दोहीं कुळांचा वाद वतना विषयीं ब्राह्मणी वंशाचे बादशाहा
पासून चालत आला होता तो तेसमयीं नव्यानें उत्पन्न झाला,
त्याची पंचाईत होऊन नागोजी नामें घाडगा होता तो त्या घाडगेव
र नाचा अधिकारी साठरला. त्याचा प्रतिवादी बाजी घाडगा ना
में होता तो झुंजारराव घाडग्याचा वंश त्याच्या मनास ती पंचाई
त येईना. तेव्हां तो माधवराव पेशवे यांजवळ बोलिला कीं,
आमच्या वादास पंचाईत उपयोगी नाहीं; भाल्यानें जो जिंकी
ल तो आमच्या वतनाचा अधिकारी होईल. तेव्हां माधवराव
यानें तशी आज्ञा न दिली. मग त्या किल्ल्याच्या हल्ल्याचे वेळेस
असा नेम ठरला कीं, या दोघां वाद्यांत ज्याचें निशाण जरी पटक्या
च्या निशाणापुढें जाऊन या किल्ल्याच्या तटावर आधीं चढेल
तो वतनाचा अधिकारी होईल. या प्रमाणें कल्पना निघाल्या
नंतर बाजी घाडगा प्रतिवादी याचा निशाण धरणारा सरदार ह
ल्ला करितेसमयीं पडला, आणि जरी पटक्याचा धरणारा दुसरे
या नामें सरदार होता तोही पडला. तेव्हां नागोजीनें आपले नि-
शाण घेऊन पुढें सरून तो जरीपटका उचलून मोठ्या वेगानें कि
ल्ल्यांत शिरून त्याच्या तटावर जाऊन तेथें आपले निशाण उभें के
लें, आणि त्याच्याच काठीवर जरीपटका उभारिला; तेंपाहून सर्व

मराठे लोक मोठ्या हर्षानें नागोजीची प्रशंसा करीत होत्साते मो ठाजयजयंकार शब्द करिते झाले. या प्रमाणें शौर्य करून म रा ठ्यांहीं तो किल्ला घेतला, परंतु त्यांत एक मोठी अपकीर्ति झा-ली.ती अशी, तो किल्ला घेतल्यावरजे त्यांत शिपाई लोक होते ते सर्व मारून टाकिले.

११ यासुदें माधवरावाचे प्रकृतीस बरें वाटे नासें झाल्यामुळें त्यास जून महिन्यांत माघारें पुण्यास यावें लागलें; परंतु तेथ-चें कार्य सिद्धीस न्यावया साठीं वीस हजार स्वार व सारें पायद ळ त्याणें तेथें त्रिंबकराव मामाचे स्वाधीन करून ठेविलें. मग पर्जन्यकाळ गेल्यावर माधवराव सैन्य घेऊन त्रिंबकराव मामा स जाऊन मिळावें म्हणून पुनः निघाला. तेव्हांही त्याचे प्रकृतीस आणखी समाधान नाहीसें झालें, यास्तव पूर्वी पानपतचे ल ढाईंत मृत्यु पावला जो बळवंतराव मेहेंदळा त्याचा पुत्र आपाब ळवंत यास तें कार्य संपवून आपण माघारा पुण्यास आला.

१२ त्यानंतर संनसत्तरशें एकाहत्तरांत तो आपाबळवंत जाऊन त्रिंबकराव मामास मिळाला, तेसमयीं त्याहोघांचें मिळू न सैन्य नोफखाना खेरीज करून चाळीस हजार स्वार व दहा हजा र पायदळ जमा झालें. त्यावेळेस हैदराकडे बारा हजार स्वार व पंचवीस हजार पायदळ व चाळीस तोफा होत्या, तरी तो मराठ्यां च्या भयास्तव युद्धास निघेना. तेव्हां त्रिंबकराव मामा याणें तो हैदर अल्ली बाहेर निघावयासाठीं युक्तीनें लटकेंच वर्तमान उ ठविलेंकीं, त्रिंबकरावानें आपलें अर्धे लश्कर दुसऱ्या कामास पाठविलें, तें त्यास सत्य वाटून तो हैदर धैर्य करून बाहेर आला; परंतु युद्धसमयीं त्यास पुर्तेपणें समजलें कीं, आतीं फसलों.

तेव्हां तो आपलें पूर्वीचें शौर्य टाकून युद्ध न करितां केवळ घा
वरे पणानें पळाला, आणि श्रीरंगपट्टणीं आश्रय धरून राहिला.
तेवेळेस त्याचा सर्व तोफखाना व रावटया डेरे वगैरे सरंजा
म व पंचवीस हत्ती हेंसर्व मराठ्यांचे हातीं लागलें. यानंतर
त्रिंबकरावानें त्या श्रीरंगपट्टणासही घेरा घातला, आणि तेथें स्था
स्थानाविषयीं सवा महिना पर्यंत झटून पाहिलें, परंतु तेंस्था
न हातीं लागेना; तेव्हां तें सोडून तो त्या मुलखाची खंडणी घेत
चालिला. तेसमयीं त्याची मसलत होतीकीं, सुंदा व बेदनू
र हे दोन परगणे घ्यावे, परंतु त्याचें आरंभींच असें वर्तमान आ
लेकीं, पुण्यांत माधवराव पेशव्याचे प्रकृतीस फार अजार झाल
आहे, असें ऐकून त्याला पुण्यास माघारें जावें अशी उत्कंठा
लागली; यास्तव तो त्या वेळेस हैदरानें तहाचें बोलणें लाचि
लें होतें त्यास च आपण मान्य होऊन तह करिता झाला. त्यां
त असें ठरलें कीं, पूर्वी शिवाजीचे वेळेस करनाटकचा मुल्
ख जितका मराठ्यांकडे होता तो त्यांहीं घ्यावा; याशिवाय
मदगिरी व गरमकोंडा हे दोन्ही किल्ले त्रिंबकराव मामानें घेत
लें होते तेही मराठ्यांचे स्वाधीन असावे; यारखेरीज तूर्त ल
श्कर खर्चा बद्दल हैदरानें मराठ्यांस छत्तीस लक्ष रुपये द्या
वे, आणि प्रतिवर्षी चवदा लक्ष रुपये खंडणीचे द्यावे यास अंतर
करूं नये. या प्रमाणें ठराव मंनसुबा शें बहात्तरांत झाला.

इकडे माधवरावास पुणें येथें कफोद्भव होऊन हैराण हो
ना तो कफपर्जन्यकाळांत उपशम पावून त्याची प्रकृती बरी हो
ईल अशी दिसायाला लागली.

१३ मग हिंदुस्थानांत पानपतचे लढाईपासून कायकाय

वर्तमान झालें तो प्रकार असा, तें युद्ध संनसत्राशें एकसष्टांत झालें. 'त्यांत अबदाली बादशाह जय पावला. नंतर त्याणें दिल्ली च्या पहिल्या बादशाहाचा औरस पुत्र शाह अलंम तो ते समयीं दिल्लीपासून दूर बंगाल्याचा नवाब व इंग्लिश या उभयतांशीं युद्धकरीत होता, ऐकून तो येईतों पर्यंत त्याचा पुत्र जवान बख्ता में होता त्याणें तें आधिपत्य चालवावें असें केलें; आणि त्याची वजिरी अयोध्येचा नबाब सुजाअदवला यास सांगितली, व नजीब अदवल्यानें पूर्वी अमीरउलउमराव पदवी संपादिली होती ती पुनः त्यास दिली. इतकीं कार्यें करून तो दिल्लीस गे ला. तेसमयीं नजीब अदवला दिल्लीच्या बादशाहाजवळ राहिला, आणि सुजाअदवला तो आपल्या अयोध्येस जाऊन तेथचा बंदोबस्त करून काशीस गेला. तेथें शाह अलंम बाद शाह येऊन त्यास भेटला, मग त्या उभयतांनी मिळून बुंदलखंडां त जाऊन झांशी घेतली, आणि त्या प्रांतांतून मराठे लोक यां-स काढून द्यावयाचें काम आरंभिलें; तें सिद्धीस च गेलें असतें, परंतु मीरकाशीम नामें बंगाल्याचा अधिकारी तो इंग्लिशांचे भ यें करून पळाला, तोसुजाअदवला यास शरण आला, त्याच्या अभिमानास्तव त्याणें इंग्लिशांशीं विरोध बांधिला, त्यायोगें तें काम तसेंच राहिलें. नंतर संनसत्राशें चौसष्टांत अकटोंबराचे ते विसावे तारिखेस बक्सार शहराजवळ त्याची व इंग्लिशांची गां ठ पडली, तेव्हां त्याउभयतांचें युद्ध होऊन सुजाअदवला पराभव पावला; आणि शाह अलंम बादशाह इंग्लिशांचा आश्रयक रून राहिला. त्यापुढें दुसरे वर्षी आगष्टमहिन्यांत सुजाअदव ला याणें इंग्लिशांशीं तहकरून त्यांहीं आपला मुलूख घेतला हो

ता त्यापेकीं आल्हाद व खोरा या दोहों खेरीज अयोध्येचें राज्य संपा दिलें, आणि अबदालीनें दिलेली दिल्लीच्या बादशाहांची वजिरीति ला अडथळा न होईसें केलें.

१४ दिल्लीमध्यें जवानचक्क तो अबदालीनें नक्काधिपतिके ला होता, तेथें नजीब अदवला याणें तें सर्वकाम आपले हातीं ठेविलें, यास्तव शाहअलंम बादशाह निर्बळ होऊन इंग्लिशांया सून आल्हाबाद व खोरा यांचें उत्पन्न घेऊन खातराहिला. त्या स आशा होती कीं, इंग्लिशांच्या आश्रयानें आपलें तक्त आप णास मिळेल.

१५ जाटांचा राजा सुरजमल्ल तो हळू हळू बळादय होऊन नजी बअदवला यास युद्धें करून मर्यादेंत ठेवावया विषयीं त्याशीं लढू न मृत्यु पावला. त्याच्या पुत्रानें मल्हारराव होळकराच्या आश्र येंकरून कांहीं दिवस दिल्ली सभोंवता घेरा घातला, परंतु त्या न- जीब अदवल्यानें होळकराशीं कांहीं बोलणें करून त्याणें त्यासु रजमल्लाचे पुत्राचा पक्ष सोडून जावें असें केलें; तेव्हां तो मूल हो ळकर यास सोडून निघून गेला. हेंवर्तमान संनसत्राशें चौसष्टां त घडले.

१६ होळकराच्या यास्वांरी शिवाय संनसत्राशें एकसष्टांपा सून सत्राशें एकुणहत्तर पर्यंत चंबळा नदीपलीकडे मराठयांची स्वांरी गेली नव्हती. त्यावर्षाचे समासीस माधवराव याणें विसाजी कृष्ण यास सेनापति करून पन्नास हजार स्वांर व पुष्कळ पायद ळ व मोठा तोफखाना बरोबर देऊन चंबळानदीपलीकडे पाठ विला. त्याविसाजी कृष्णानें संनसत्राशें सत्तरांत रजपुतां च्या राजापासून खंडणीचा बाकी ऐवज गाहिला अर्थ लिहिल

करून दहा लक्ष रुपये घेतले. त्यानंतर नोजाटाचे मुलखांतून खंडणी घेत घेत भरतपुरा समीप गेला, तेथें त्याणें मोठें युद्ध करून जाटास जिंकिलें. आणि त्यापासून दहा लक्ष रुपये रोख घेऊन पंचावन्न लक्ष रुपये हप्त्यानें घ्यावे असें केलें.

१७ यानंतर मराठ्यांचें लश्कर दिगच्या किल्ल्या जवळ पर्जन्यकाळीं छावणी करून राहिलें असतां नजीब अदवला याणें ते समयीं असा विचार केला कीं, मराठेलोक आपला बांध व मोंगलां पासून मृत्यु पावल्याचा सूड उगवितील, असें जाणून पुढें अनर्थ नव्हावा. यास्तव त्यांशीं मैत्री करावया विषयीं वकील पाठविला, आणि बोलणें लाविलें. त्यांत विसाजी कृष्ण समजला कीं, यास लूखांत मराठ्यांचें हित आहे, परंतु त्याज बरोबर रामचंद्र गणेश व महादजी शिंदा हे दोघे होते ते गेल्यांचा सूड घेण्या विषयीं फार आग्रह करूं लागले. मग असें ठरलें कीं, धण्याचें आज्ञे प्रमाणें वागावें, त्या वरून तें वर्तमान त्यांही पेशव्यांस लिहून विदित केलें, त्याचें उत्तर आलें कीं, नजीब अदवला व मराठे यांशीं शुद्ध स्नेह तर होणार नाहीं, परंतु दिल्लीचा बादशाह शाहअलंम नो सांप्रत इंग्लिशां च्या आश्रयास आहे, त्यास आपल्या आश्रयांत आणावयाची मसलत नजीब अदवल्याचे द्वारें शेवटास जाईल, यासाठीं तूर्त विसाजी कृष्णाचे विचारें चालावें; त्यावरून मराठे व मोंगल यांचा तह ठरला; मग त्या नजीब अदवल्यानें विश्वासार्थ आपला पुत्र जाबिताखान विसाजी कृष्णा जवळ पाठविला. त्यापुढें सेन सत्राशें सत्तरांचे अकटोंबरांत तो नजीब अदवला मृत्यु पावला त्यावेळीं त्याचे जागीं त्याचा पुत्र दिल्लीस जाऊन आपल्या बापाचे काम चालविता झाला.

१८ यानंतर मराठे त्यादिगच्या छावणीपासून उठून दिल्ली वर कांहीं मोहीम नकरितां रोहिल्यांचा मुलूख सहज घेते झाले. त्यावरून इंग्लिशांला कांहीं आश्चर्य वाटलें; त्यास ऊऊक नकतें कीं, मराठ्यांचे व शाहअलम यांचें ऐक्य आहे. पुढें त्या शाह-अलमानें इंग्लिशांस समजाविलें कीं, मराठ्यांच्या आश्रयास जातों. मग मेराठे रोहिलखंड सोडून संनसत्राशें एकाहत्तरं त पर्जन्यकाळाचे अगोदर दिल्लीस आले, त्यांहीं त्याजवानबक्ता चे मर्यादेस्तव दिल्लीच्या आंतील किल्ला मात्र आपल्या सत्तेंत न आणिला, वरकड सर्व जागीं आपलें ठाणें घातलें. यानंतर महादजी शिंदा याणें इंग्लिशांकडे जाऊन शाहअलमास भेटून त्यास आपल्या लश्करांत विसाजी कृष्णाजवळ आणिलें. नोबा दशाह त्याच वर्षी दिसेंबराचे समातीस मराठ्यांच्या आश्रयानें दि ल्लीच्या तक्ताचा अधिपति झाला.

१९ सुजाअदवला दिल्लींत मराठे होते तोंपर्यंत आपण त्या बादशा हाचे वजिरीच्या कामास आंगें आला नाहीं, नथापि त्याचें व मराठयांचें ऐक्य होतें; कांकीं, नजीबअदवल्याच्या पुत्रास मरा ठे बुडविणार होते; आणि सुजाअदवला याच्या मनांत होतेकीं, रोहिले निर्बळ करून पुढें संपूर्ण मुलूख आपले सत्तेंत आणा वा. त्यावरून मराठयांहीं जाबितारखान नजीबअदवला याचा पुत्र याचा बऊतेक मुलूरक घेतला, तेसमयीं रोहिलेल्लोक त्यांस असे भीत होतेकीं, ते मोठया बळकट किल्ल्यांत असेलतरी यांहीं मरा ठे येतात असें ऐकूनच तें ठिकाण सोडून पळावें. त्यापुढें सुजा-अदवला समजलाकीं, जर मराठयांहीं रोहिले अगदीं जिंकिले तर आपलीही दशा तीच होईल, यास्तव त्याणें रोहिले यांचे

सरदार यांपासून चाळीस लक्ष रुपये घेऊन त्यारोहिल्यांशीं संकेत केला कीं, तुम्ही व आम्ही मिळून मराठ्यांस रोहिलखंडांतून बाहेर घालवूं

२० इकडे दिल्लीमध्यें बादशाह याणें विसाजीकृष्ण वदुसरे कोणी ब्राह्मण होते ते केवळ अतृप्तस्वभाव असें जाणून तोफार पश्चात्ताप पावला, आणि मनांत निश्चय करिता झाला कीं, कसेंही संकट प्राप्त झालें तरी या लोभी लोकांचा संबंध टाकावा. मग त्याणें आपल्या लश्करचा मुख्य सरदार नजीफखान यास सांगितलें कीं, मराठे युद्धें करून आपल्या मुलखांतून काढून द्यावे. हें सर्व वर्तमान विसाजीकृष्णास समजतांच तो विचार करिता झाला कीं, शेवटचा उपाय युद्ध, त्याचांचून दुसरी कांहीं युक्ती करून कार्य साधेल तें बरें, म्हणून त्याणें तेथचा सर्व वृत्तांत पुण्यास लिहून पाठविला; त्यांनी सुचविलें कीं, आतां कोणत्या प्रकारें वर्तावें ती आज्ञा व्हावी.

२१ त्या उत्तराची मार्गप्रतीक्षा करीत असतां इकडे असें झालें कीं, माधवराव थेऊरास मृत्यु पावला, तेसमयीं त्याचे वय अठ्ठावीस वर्षें झालेलीं होतीं. त्यास पुत्र किंवा कन्या कोणी अपत्य नव्हतें, त्याची स्त्री रमाबाई तिची व त्याची फार प्रीति असे म्हणून ती त्याबरोबर सती गेली. असें वर्तमान संनसत्राशें बहात्तरांच्या नवेंबराचें अठरावे तारिखेस घडलें.

तो माधवराव अनेकगुणांनी संपन्न होता, त्याणें युद्धादिकौशल्यें करून मोठी ख्याति मिळविली, परंतु त्याची राजनीतींत दक्षता अशी होती कीं, तिच्या पुढें त्याची शौर्यप्रशंसा हलकी, तो राज्यकर्ता लागला तेवेळेस त्याचा मुख्य कारभारी फाराद्दिवसांचा आणि

मोठा चतुर असा सखाराम बापू नामें होता तो लोभी असतांही त्या च्या चातुर्यामुळें लोकांस त्याची भीड फार असे. त्याच्या पुढें माध वराव राज्याधिकारी असतांही त्याचा मान तादृश होईना, आणि रघुनाथराव तोही मोठा पराक्रमी त्यामुळें त्याची प्रशंसा होईना, पुढें त्याणें रघुनाथरावाला बंदीस घातलें त्यापासून त्यास कांहीं सें लोक मानूं लागले. मग त्याणें त्यासखाराम बापूला आपल्या प्रतिष्ठेस अपायसा जाणून एकदिवस एकांतीं त्याला नेऊन विचा रिलेंकीं, या लोकांत माझा मान किमपि दिसत नाहीं, त्यास मी च अयोग्यआहें, किंवा दुसरें कांहीं कारण आहे तें सांगा, व यास उपाय काय तोही सांगा. त्यावर त्याणें त्याचे मनांतील अर्थ सम जून उत्तर केलें कीं, यांचे कारण मींच आहें, त्यास मोरोबा फड नवीस याला कारभार सांगावा, म्हणजे तुमच्या मनोदयानुरूप होईल; असें त्याणें शहाणपणाचें उत्तर केलें, त्यावरून माध वराव प्रसन्न होऊन त्या सखाराम बापूनें आपली जहागीर खांऊ न स्वस्थ रहावें असें केलें, आणि मोरोबा फडनवीस यास कारभार सांगितला.

२२ याप्रमाणें माधवराव मोकळेपणा पावल्यावर पुढें तो कांहीं मोठें कार्य करणें तर तें आपल्या आज्ञेवांचून करूं देत न से; त्याणें त्यावेळेस लोकाचें वृत्त समजावयास अनेक प्रकारचे उत्तम कायदे केले. तो माधवराव राज्यकरीत असतां त्यासयु द्धा खेरीज कधीं रिकामपण सांपडलें नर त्या अवकाशांत तो आ पल्या प्रजेस कोणे प्रकारें सुख होईल तो विचार पहात असे; कोणेही ठिकाणीं फिर्याद झाल्यास त्याचा न्याय खरा करण्याविष यीं त्यास मोठी आवड होती, याविषयीं त्याणें कोणी एक रामशा-

स्त्री नामें ब्राह्मण वाळगला होता तो फार उपयोगी असे. त्या रामशास्त्र्यानें ज्याज्या युक्ति करून पंचाइती ठरविल्या ते ठराव अद्यापि न्यायाचे उपयोगीं पडतात. तो रामशास्त्री चांगल्या मार्गानें वागणारास आसासारखा आणि दुष्टास यमासारखा होता, तो साताऱ्या नजीक माकुली क्षेत्रीं जन्मला, त्याचें अडनाव परभुणे, तो तरुण पणीं विद्याभ्यास करावया करितां काशीस गेला होता, त्यास बाळकृष्ण शास्त्री याचा मृत्यु झाला ते समयीं पुण्याचे दरबारीं, त्याज कडून कांहीं यत्न नसतां बोलावून नेऊन सर्वशास्त्री यांचा तो मुख्य केला. पुढें माधवराव योग्यतेस येऊं लागला तेसमयीं तो त्यास नीतिविचार सांगत असे, त्याविषयीं एक गोष्ट आहे. कोणे एके समयीं माधवराव यास पंडितांचे भाषणें करून इछा झाली कीं, कांहीं तपस्या करावी, त्यामुळें माधवराव जप करूं लागला, मग एक दिवस तो जपास बसला असतां रामशास्त्री कांहीं कामा निमित्त त्याज कडे गेला तेव्हां त्या जवळच्या शिष्यांहीं सांगितलें कीं, या वेळेस श्रीमंतांची गांठ पडणार नाहीं; कांकीं, ते जपास बसले आहेत, त्यावरून तो आपल्या घरीं जाऊन विचार करिता झाला कीं, जर याविषयीं वाद करावा तर ठिक नव्हे; त्यास याचा आश्रय सोडून जावें हेंच बरें, मगदुसरे दिवशीं त्याज कडे जाऊन बोलिला कीं, मला काशीस जावयाची आज्ञा द्यावी. तें ऐकून माधवराव बोलिला कीं, आपण येऊन गेलां ते समयीं मी जप करित होतों त्या निमित्तें आपली गांठ पडली नाहीं; त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, आपण जें निमित्त सांगतां तें ब्राह्मणास योग्यच आहे; परंतु ब्राह्मण जर आपलें कर्म सोडून राज्य करूं लागले तर त्याणीं प्रजापालन करावें; तें टाकून

जप करीत बसलें तर तो अन्याय. त्यास जर आपल्या चित्तांत जप करावा असें आहे तर हें सर्व राज्य टाकून मजबरोबर चलावें, मी तें आपणास पुर्तेपणें शिकवीन. त्यावरून माधवराव मनांत समजून त्याणें तें कृत्य टाकिलें, आणि रामशास्त्री याच्या अनुलक्ष्यें करून चालूं लागला.

भागवे विसावा

संनसवाशें बहात्तरा पासून संनसवाशेपंचेहत्तरा पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ माधवराव पेशवा तो आपला अंतकाळ समीप आला असें जाणून धुटें रघुनाथराव याचें आनुकूल्य नसल्यास आणि कारभारी लोकांत वैमनस्य असल्यास आपला भाऊ नारायणराव यास राज्य संभाळावयाचें अवघड पडेल, असें समजून त्याणें सखा रामबापूला जवळ बोलावून आपली दिवाणगिरी सांगितली, आणि रघुनाथराव काका बंदीतून काढून आपल्या जवळ नेला, आणि सरवाराम बापूच्या देखतां मोठ्या अगत्यानें कारभारी व धणी यांची एकचित्तता असल्यानें राज्यास फार हित आहे असें समजाविलें, मग आपल्या भावाला त्या दोघांच्या स्वाधीन केलें.

+ स्वाधीन केला हा सर्व वृत्तांत थेउरास माधवरावाचे शरीरीं समाधान नसतां झाला.

पुढें तो माधवराव पेशवा मेल्यावर त्याचें उत्तरकार्य झाल्या नंत र त्याचा भाऊ नारायणराव तो साताऱ्यास जाऊन राजाराम रा जा याचे हातून पेशवे पदवीचीं वस्त्रें पावला. तेसमयीं त्याना रायणरावाच्या नावास राजा नें नवें कारभारी असें पदजोडून ब जाबापुरंधऱ्या त्याचा दिवाण केला, आणि नानाफडनविसास त्या ची वडिलोपार्जित फडनविशी दिली.

तो नारायणराव पेशवा व त्याचा काका रघुनाथराव यांचा कांहीं दिवस स्नेह राहिला, मगरघुनाथराव याची बायको व ना रायणराव याची आई या दोघींचें मन मिळेना, त्यायोगें या दोघां चा द्वेष पडला. तेव्हां त्यानारायणरावानें आपले कारभारी मि ळवून मसलत केलीकीं, काकाला पुनः बंदीस घालावें. त्या क्ल त्यास सरवारामबापूचें मात्र अनुमोदन नव्हतें, तो म्हणाला कीं, हें केवळ अनुचित कर्म दिसतें. मग एप्रेलाचे अकराचे तारि खेस पुण्यांत नारायणराव ज्या वाड्यांत रहात होता त्यांतच एका खोलींत रघुनाथराव काका याचा प्रतिबंध केला.

या पुढें पेशवा याणें आपल्या कारभारी मंडळीच्या लोकाम ध्यें बजाबापुरंदरे व नानाफडनवीस व हरीपंत फडके यांवर विश्वास ठेवून बऱ्हुतेक राज्यकारभार यांचे हातून चालविला. हे तिघे कारभारी यांचें व सरवारामबापूचें वैमनस्य असे, परंतु ते सारे शहाणे म्हणून बाहेर असें दिसत होतें कीं, मुख्य कारभारी सरवारामबापू.

२ जानोजी भोंसला तोही माधवरावाचे मरण समयीं थे उरास होता त्याणें पूर्वीच माधवरावाचे आज्ञेनें आपला भाऊ मुधोजी भोंसला याचा पुत्र रघुजी भोंसला तो दत्तक घेतला.

त्या मुधोजी शिवाय जानोजीला आणखी भाऊ होते, त्यांस संतति नव्हती. जानोजीनें तो मूल घेतल्यावर त्या मुलाचा बाप मुधोजी तोच त्याचा रक्षक केला असेल असें वाटतें, परंतु तो अर्थ निश्चित होत नाहीं. त्यापुढें दुसरें वर्षी मे महिन्यांत तुळापु राजवळ जानोजी भोंसला मरण पावला, तेव्हां त्याचा पुत्र रघुजी भोंसला याचा रक्षक कोण म्हणून जानोजीचे भाऊ मुधोजी भोंस ला व साबाजी भोंसला हे दोघे भांडूं लागले, तेसमयीं जानोजी ची स्त्री दर्याबाई भोंसली ती त्या दोघां दिरांतून एकासही मुला चा रक्षक न करितां आपणच भोंसल्याचे राज्याचा कारभार क रिती झाली, त्यावेळेस तिणें साबाजीला आपले लश्कर चेंना म मुख्यत्वें सांगितलें, तेव्हां तो मुधोजी भोंसला आपणास या समयीं युद्धावांचून दुसरा उपाय नाहींसा समजून लश्कर जमा करून युद्धास सिद्ध झाला. मग तो व त्याचा भाऊ साबाजी यांची गांठ पडून कुंभारीगांव आकोल्या जवळ आहे तेथें यु द्ध झालें, त्याप्रसंगीं मुधोजी भोंसला याचा अगदीं पराभव हो ऊन तो आपले जिवाचे रक्षणासाठीं पळून गेला. मग पेश्वा- च्याचे योगें ते दोघे भाऊ युद्धकंरणें ठाकून एकमेकास भेटले असतां त्या दर्याबाईनें एकाएकीं साबाजीला टाकून मुधोजी चा पक्ष अवलंबिला. असें झाल्यावर मुधोजी इलिचपूरचा कोणी मुख्य पठाण होता त्याचे साहाय्यें करून पुनः युद्धास उद्युक्त झाला, आणि साबाजी, निजाम व पेशवे यांचें साहाय्य संपादा व यास यत्न करूं लागला, इतक्यांत असें झालें कीं, नारायणराव पेशवा मारेकरी यांणीं मारिला, त्या अनर्थामुळें इतर सर्व मोठ मोठीं कार्यें राहिलीं. असें संनसवारो वेहात्तरांच्या आगष्ट महि

च्याचे तिसरे तारिखेस झालें.

२ मारेकरी याणीं नारायणराव पेशवा मारिला तो प्रकार असा. एकेदिवशीं नारायणराव भोजन करून आपल्या महालांत निजला होता; तेसमयीं त्या वाड्यांत एकाएकीं गडबड मोठीच झाली ती ऐकून तो जागा होऊन पाहूं लागला तों बाज्यांत गारदी लोक शिरले, त्यांत सुमेरसिंग व महंमद यूसफ् हे दोघे होते, ते आपला रोजमुरा बाकी राहिला म्हणून कांहीं दांडगाई करितात असें ही त्याचे दृष्टीस पडलें, आणि ते आपल्याअंगावर येतात असें पाहून तो पळत पळत आपल्या काकाचे खोलींत गेला, त्याचे पाठीस गारदी लोक लागले, त्यांत सुमेरसिंगफा रजपळ होता, तेहां तो आपले काकाचे शरीरास मिठी मारून बोलिला, काका माझा प्राण यावेळेस वांचवा, असें ऐकून रघुनाथराव मध्यें होऊन सुमेरसिंगास त्याचे रक्षणार्थ दयायुक्त बोलणें बोलिला, तेहां सुमेरसिंग म्हणाला कीं, मीं हें कृत्य येथपर्यंत केलें तें जर आतां सोडिलें तर माझा नाश मी आपल्या हातें केला सा होईल, आतां तुम्ही याची आशा सोडा आणि यापासून लवकर दूर व्हा, नाहीं तर दोघे मेले जाल. तेहां रघुनाथरावानें आपल्या शरीराची मिठी सोडवून त्याला दूरसारून गच्चीवर पळून गेला, त्याचे पाठीमागें फिरून त्यास धरावयास नारायणराव तिकडे लवरेनें जाऊं लागला असतां कोणी एक हत्यारबंद रघुनाथरावाचा चाकर वेल्या पंवार होता त्याणें त्या नारायणरावाचे पाय धरून मागें ओढून पालथा पाडिला, त्याच क्षणीं नारायणरावाचा चा

+ वेल्या म्हणजे तुळाजी असेल.

कर परम विश्वासू छोपाजी + ढिले कर नामें होता तो जवळ हत्यार नसतांही मोठ्या त्वरेनें धावून आपला धणी आपल्या आंगा खालीं घालून त्याच्या रक्षणार्थ आपण त्यावर पडला. तेसमयींसुमेरशिंग व त्याचा पंवार या दोघांहीं एकेजागीं बस्तेबर ते दोघे धणी व चाकर तरवारीनें ठार मारिले. हें वर्तमान बाहेर कळल्यावर सखा राम बापूनें हरीपंत फडक्याचे हाताने झालेल्या प्रकाराचें पत्रलि हवून शोधास वाड्यांत रघुनाथरावाकडे पाठविलें, त्याचें त्याणें उत्तर असें दिलें कीं, हें कृत्य गारदी लोकांनीं केलें. त्यावरून रघुनाथरावानेंच हें कृत्य केलें असा मनांत संशय उत्पन्न होऊन हरीपंत फडके तेच वेळेस बारामतीस पळून गेले, आणि सखाराम बापू याणें शहरचे लोक फार गडबडले होते, त्यांस धैर्य देऊन स्वस्थ केलें. मग चिंबकराव मामा त्या वाड्यांत जाऊन त्याणें तें पेशव्यांचें प्रेत नेऊन जाळिलें.

रघुनाथराव त्यागारदी लोकांचे बंदींत बाकीरोज मुरा देण्याचे निमित्तें करून राहिला असतांही वकील व कारभारी लोकत्या जकडे जात असत, नंतर सर्वकारभारी लोकांचे मतें असें ठरलें कीं, नारायणरावास रघुनाथरावानेंच मारविलें असेल, परंतु त्या चा निश्चय होत नाहीं, त्यास हालीं याला पेशवे पदवी प्राप्त झाली ती याणें भोगावी.

या विचारास रामशास्त्री ही अनुमोदन देता झाला, परंतु तो बऱ्हुत युक्तीनें गुप्तपणें त्याचा आंतून बारीक शोध काढूं लागला. त्यावर दीड महिन्यानें त्यास पुरतेपणें तें सर्व विदित झालें. तेव्हां

+ छापाजी म्हणजे चांफाजी.

रामशास्त्री रघुनाथरावापाशीं जाऊन बोलिला कीं, हें अक र्म तुम्हींच करविलें, मी याचा पुरतेपणें शोधकरून तुम्हाकडे आलों. असें त्याचें भाषण ऐकून रघुनाथराव याणें इतकें च मान्य केलेकीं. मी त्यास धरावा असें मात्र पत्र दिलें होतें. हें वर्तमान खरेंच असेल कांकीं, पुढें तो रघुनाथरावाच्या हातचा अस्सल कागद रामशास्त्री यास सांपडला, त्यांतील लेख मुळ चा असा होताकीं, तो धरावा, त्या धकारावर कोणी आणीक शा ई घालून मारावा असें केलें होतें. तेंकृत्य आनंदीबाईचेंच अ सेल असें सर्वांच्या मनांत आलें. नंतर रघुनाथरावानें त्यास धरण्या विषयीं पत्र लिहिलें हा अन्याय आपणापासून घडला असें मान्य करून रामशास्त्री यास विचारिलें कीं, या दोषास प्रा यश्चित्त काय करावें, त्यावर त्याणें उत्तर केलें कीं, यास देहांत प्रायश्चित्त पाहिजे, कांकीं, तुमचें बाकी उरलें जें आयुष्य त्यांत तुम्हापासून सद्गति न होणार नाहीं. आणि या पुढें तुम्हीं च तुम चें राज्य याची धडगति मला दिसत नाहीं; यास्तव इतःपर तुम्ही राज्य करीत असाल तों पर्यंत मी पुण्यास येणार नाहीं, आजप र्यंत सरकारचा आश्रित झालों होतों तोमी आतां नव्हें, इतकें बोलू न तो शास्त्री तेथून निघून वायीं सेवाजवळ एका लहानशा गावीं राहून काळक्षेप करिता झाला.

इकडे त्या गारदी लोकांचा बाकी रोजमुरा देऊन रघुनाथरा व मोकळा झाल्यावर त्यास साताऱ्याहून पेशवे पदवीचीं वस्त्रें आ लीं.

नारायणराव मारिला गेला तेव्हां त्याचें वय केवळ अल्प अठरा वर्षांचें होतें तितक्यांत त्याचे गुण अथवा दुर्गुण हे लोकांस

दिसून आले नाहींत, परंतु त्याच्या धैर्या विषयीं एक कथा आहे ती अशी. माधवराव पेशवा असतां हे दोघे भाऊ पुण्यामध्यें गुल टेंकडीकडे हत्तींची लढाई पहात बसले असतां त्यांतून एक ह त्ती मोठ्या त्वरेनें जेथें ते दोघे बसले होते तेथें समूर धांवून आ ला तेव्हां त्यांजवळचे जे चाकरलोक वगैरे होते ते सर्व पळाले, तेसमयीं तो नारायणराव हीउठून पळावयास सिद्ध झाला; इतक्यांत माधवराव त्याच्या हातास धरून बोलिला कीं, तूंजरप ळालासतर तुजविषयीं आकबार लिहिणारे कायलिहितील? तें ऐकतांच तो त्याजवळ स्थीर बसला; नंतर तो हत्ती केवळ निक ट येऊन पोंहचला असतां कोणीएक आपाजीराव पाटणकर नामें मराठा शिलेदार होता त्याणें मोठ्या धैर्यानें धांवत येऊन नारायणरावाचे पुढें होऊन हत्तीच्या सोंडेंस खंजीर खुपसून त्या हत्तीला एकीकडेस केलें.

४ हिंदुस्थानांत लष्कर सुद्धां विसाजीकृष्ण होता तो असें इच्छित असे कीं, मोंगलांशीं युद्ध न होतां सलूख्यानेंच कार्यसाधा वें; परंतु तें न होतां संनसवाशें वहात्तरांच्या दिसेंबराचे एकुणि सावे तारिखेस दिल्लीजवळ त्याचा व मोंगलांचा युद्धप्रसंग झाला, त्यांत मराठेजय पावले. नंतर त्यांशीं व बादशाहाशीं तह झाला, त्यांत असें ठरलें कीं, पेशव्यास बादशाहापासून वक्षीपदवी असा वी; आणि त्याचा हल्लक जाविनारखान त्याकामावर ठेवावा; आ णि जाटापासून बादशाहानें सरंपूर घेतलें होतें नें त्याचें त्यास धा वें. यारबेरीज इंग्लिशांनीं नजीबअदवल्यापासून खोरा व ख रा हे दोन परगणें घेतले ते बादशाहाकडे असत ते ही जाटास धा वे. याप्रमाणें करार झाल्यावर विसाजीकृष्ण लश्कर सुद्धां पर्जन्य

काळाचे अखेरीस पुण्यांत दाखल झाला.

५ जानोजी भोंसला याचा दत्तपुत्र रघुजी भोंसला तो र घुनाथरावास पेशवे पदवी प्राप्त झाली असतां, आपली माता जानोजीस्त्री दर्याबाई व सुधोजी भोंसला यांसहित येऊन पे शव्यास मिळाला; तेव्हां त्या रघुजीस सेनासाहेबसुभा पदवी प्राप्त झाली. नंतर रघुजी व दर्याबाईहीं तेथून निघून वरा डाकडे गेलीं; परंतु सुधोजीनें पाहिलें कीं, साबाजी आपले पेक्षां बलाढ्य झाला म्हणून तो पेशव्याजवळ राहिला.

६ या प्रमाणें दक्षिणेंतील वर्तमान असतां हैदर व निजा म यांच्या राज्यांत मसलती होत होत्या कीं, मराठ्यांत वैमनस्यें पडून फार अव्यवस्था झाली आहे, त्यास यासमयीं कांहीं आ पला लाभ पहावा; त्यांत निजाम याची सिद्धता जहाली नाहीं तोंच रघुनाथराव मोठी खराक करून त्यानिजामावर चालून गे ला; तेव्हां त्यास असें अगत्य पडलें कीं, ज्याचे प्रतिवर्षीं वीस लक्ष रुपये उत्पन्न व्हावे असा मुलूख देऊन तह करावा. एवढी मिळकत त्यारघुनाथरावास मिळाली, तीजर तो आपले मराठे मुख्य सरदार यांस वांटून देता तर त्याचे पेशवे पदवीस दटता येती परंतु तें न करितां त्याणें निजामाच्या गोड गोड गोष्टी ऐकिल्या कीं, तुलसी व आली बऊतां दिवसांचे सोबती, त्यावरू न मोहिन होऊन तो वीसलक्ष रुपयांचा मुलूख घेतलेला त्याचा त्यास माघारा दिला.

७ त्यावेळेसजे त्यारघुनाथरावाचे अनिष्ट चिंतक होते त्यांस मोठा हर्ष झाला कीं, हाएवढा मूर्खपणा याणें केला यायो गें हालच करच बुडेल. असेंच आणीक एक त्यांस हर्ष होण्या

वें कारण झालें, तें असें; औरंगाबादेजवळ साबाजी भोंसला लश्कर सहित होता त्यावर त्याणें त्रिंबकराव मामास पाठविलें, आणि आपण करनाटकांत जाऊन हैदर व इंग्लिश यांशीं युद्ध प्रसंग करावयाची मसलत चालविली. " त्यामुळें त्या अनिष्ट चिंतकांस त्याचे पेशवे पद्वीस कांहीं विघ्न उत्पन्न करण्यास तो दूर गेल्यावर पाठीमागें सुलभ पडेलसें वाटलें. त्यावरून सखाराम बापू व नानाफडनवीस हे दोघे त्या रघुनाथरावाचें लश्कर सोडून माघारे पुण्यास आले. त्यांचे मागून थोडक्याच वेळानें गणपतराव रास्त्या व बाबुजी नाईक बारामतीकर व मोरोबाफडनवीस व बजाबापुरंदरे वगैरे लश्कर सोडून कांहीं निमित्त करून माघारे पुण्यास आले. तेसमयीं त्या रघुनाथरावाचे पक्षपाती आणि तो रघुनाथराव यारवेरीज सर्वलोक समजलेकीं, रघुनाथरावास घातक अशी कांहीं मोठी मसलत होत आहे; त्यावेळेस पुण्याचा कारभार चालविणारे सखाराम बापू व त्रिंबकराव मामा व नानाफडनवीस व मोरोबाफडनवीस व बजाबापुरंदरे व आनंदराव जिवाजी व हरीपंत फडके इतके असत, ते पेशवे कुळाचे योगेंच वाढलेले. शाहू महाराजाचे अष्टप्रधान यांशिवाय दुसरे होते, असें असतां तेवेळेस त्या अष्टप्रधानास बसवून कारभार हे चालवित होते. त्यांहीं मसलत केलेली लोकांस पहिल्यानें कळली नाहीं; शेवटीं त्या कारभाऱ्यांनीं असें केलेंकीं, नारायणरावाची स्त्री गंगाबाई गरोदर होती तिजबरोबर दुसऱ्याकांहीं गरोदर स्त्रिया देऊन त्यांसहित ती पुरंदर किल्ल्यावर ठेविली; आणि जे रघुनाथरावाचे पक्षी होते त्यांस बंदीस घालून कारभार त्या गंगाबाईचे नावें चालविला; ते ह्मणे लोक

समजले कीं, गंगाबाईस पुत्र होईल तो अथवा त्यांतील एकी चा पुत्र तो गादीचा अधिकारी करून रघुनाथरावास भ्रष्ट करावें, अशी मसलत आहे. त्याकारभारीलोकांहीं त्यावेळेस निजामअल्ली व साबाजी भोंसला हे आपल्या मसलतीस अनुकूल केले; आणि रघुनाथरावाच्या लश्करांत मुख्य कारभारी बुराव बळवंत होता तोही इकडून कांहीं सुचना झाली असतां या मसलतीस अनुसरेलसा केला. असें संन सत्राशेंचवऱ्या-हात्तरांत झालें.

८ याप्रमाणें पुण्याचें वर्तमान असतां रघुनाथराव करनाटकांत बलारीपलीकडे जाऊन त्याणें हैदराशीं कांहीं बोलणें लाविलें होतें. तेसमयीं त्यास कांहीं द्रव्याची गरज लागली; तेव्हां त्या हैदरानें कांहीं नगद रुपये देऊन पुढें पंचवीसलक्ष रुपये पर्यंत द्यावयाचा करार केला, यास्तव त्यारघुनाथरावानें करनाटकांत मराठ्यांचे तीन परगणे होते ते त्या हैदरास दिले. त्यानंतर त्यास पुण्याची मसलत कळली; तेव्हां त्याचे मनांत होतेंकीं, अकबर च्या नवाबाचा मुलूख लुटावा, तें सोडून त्याणें त्या हैदराशीं तह करून ठरविलेंकीं, वर्षासि सहालक्ष रुपये खंडणी तुत्यासच देऊं, आणि पेशवे तुलींच. मग त्यारघुनाथरावास कोणी सांगितलें कीं, तुमच्या लश्करांतील सरदार लोक क्षत्रिमी आहेत, त्यांत भवानराव प्रतिनिधि मुख्य; त्यास तुली आपली सावधगिरी ठेवा. त्यावरून प्रतिनिधीस त्याणें विचारिलेंकीं, तुम्ही तीनशें स्वारांनिशीं आपल्या अधिकारा प्रमाणें चाकरी करावी, असें असतां, तुम्हास चार हजार स्वार ठेवायाचें प्रयोजन काय? त्यावर तो कांहीं उत्तर देईना; तेव्हां मुरारराव घोरपडे सेनापति

यांस सांगितलें कीं, भवानराव प्रतिनिधि याचें लश्कर लुटा; त्या वर त्याणें उत्तर कलें कीं, तुमचा जो द्रव्य असेल त्यावर आम्हीं जाऊं, हा आपले घरचा खटला यांत आम्हीं शिरणार नाहीं. मग वामनराव गोविंद पटवर्धन वगैरें सरदार यांला क्रमें करून न तेंच सांगितलें असतां त्यांणीं ही तेंच उत्तर केलें, तेव्हां तो आपले खासगीचे लोक व कांहीं तोफा घेऊन त्या लश्करांतून बाहेर निघाला; तरी प्रतिनिधि त्याणें पुसल्याचें उत्तर देईना. त्या प्रतिनिधीच्या जवळचे शिपाई लोक बऊत करून माननदीचे व येरळा नदीचे कांठीं रहाणारे होते, त्यांहीं प्रतिज्ञा केली कीं, आमच्या धन्याचे जिवास जर बरें वाईट होईल, तर आम्हीं इतकेही मरून जाऊं. हें वर्तमान कळतांच रघुनाथराव युद्धाचा उपाय टाकून आपण त्या भवानरावाकडे एकांत करावयास गेला; तेव्हां प्रतिनिधीनें त्याचा संमान करून एकांतीं दोघे बसते सम यीं आपली तरवार दोघांमध्यें ठेविली; तेव्हां रघुनाथरावानें त्यास विचारिलें कीं, तुमास येवढया दूरदृष्टीचें प्रयोजन काय आहे? त्यावर तो बोलिला कीं, कदाचित् पंतप्रधान प्रतिनिधीशीं बोलताहेत त्यांत विसर पडेल. मग त्या एकांतांत एकमेकांचीं प्रमाणवचनें होऊन त्या रघुनाथरावानें प्रतिनिधीला कांहीं द्रव्य द्यावयाचें कबूल केल्यावर उभयपक्षीं युद्धादि प्रकार नाहींसा झाला; नंतर रघुनाथराव आपल्या बरोबर मुरारराव घोरपडा व प्रतिनिधि यांस घेऊन पुण्यास येऊं लागला, तेव्हां वामन

+ पंतप्रधान म्हणजे रघुनाथराव, त्यास प्रतिनिधीनें तुम्हीं व आम्हीं सारिखेच असें दर्शविलें.

राव पटवर्धन वगैरे सरदार तेही त्याबरोबरच होते;परंतु त्याच्या लश्करांत तेनमिळतां वेगळेच उतरत,आणि रात्रीं रघुनाथरावाचा छापा पडेल म्हणून फार सावधपणा राखीत असत. तेसमयीं रघुनाथरावावर हरीपंत फडका लश्कर सहित पुण्याहून येत होता, आणि त्रिंबकराव मामा व साबाजी भोंसला परिंड्याहून येत होते,व निजामअल्ली तो कलबुर्ग्याहून येत होता,यांतिघांतून जोकोणी प्रथम पुढें येईल त्यास मिळून रघुनाथरावाशीं युद्धकरावें,अशी वामनराव वगैरे सरदारमंडळीची मसलत होती. त्या निघांयेणारांत त्रिंबकराव याच्या मनांत आलेकीं, रघुनाथराव मोठा शूर आहे; त्यास जिंकिलें असतां आपली मोठी कीर्ति होईल; आणि साबाजी भोंसला तर आपल्या कामा करितां याकामास विलंबकरितो; असें मनांत आणून आपण एकदाच पुढें लश्कर सहित येऊन भीमानदीचे पार उतरून पंढरपुराजवळ मोठ्या मैदानांत रघुनाथरावास गांठून त्यावर एकाएकीं पडला; त्या समयीं मामापेक्षां त्याजवळ फौजकमी असतांही त्यारघुनाथरावानें त्याचा पराभव केला,त्यांत तो मामाही फारजखमी झाला. तेसमयींरघुनाथरावानें त्यास धरून कैदेंत ठेविलें. त्यालढाईंत रघुनाथरावाचे सुमारें दहाहजार स्वार होते,त्यांत पुढचे तोंडीं आपण होऊन मोठ्या आवेशानें लढला. तेसमयीं मामाकडचा सरदार गंगाधरराबरास्ता तोहीजखमी झाला; परंतु रघुनाथरावाचे हातीं नसांपडतां वांचला. प्रतिनिधि व मुरारराव घोरपडा हे दोघे रघुनाथरावाकडचे होते, परंतु ते त्या युद्धांत नशिरतां एकीकडे उभेराहिले; मग थोडक्याच दिवसांनीं प्रतिनिधि हरीपंताच्या लश्करांत जाऊन त्यास मिळाला;

आणि मुरारराव घोरपडा आपलें स्थान घुटी तेथें जाऊन राहिला; मग हरीपंत फडका साबाजी भोंसला व निजामअल्ली यांस जाऊन मिळाला; परंतु त्या दोघांचे मनांत लवकरच जाऊन रघुनाथराव वर पडावें असें नव्हतें. असा तो रांघोबाजय पावल्यावर त्या चे मसलतींत कांहीं जीव आहे सें कांहीं दिवस दिसत होतें; कां कीं, विसाजी कृष्णानें हिंदुस्थानांतून जवाहीर आणिलेलें होतें तें त्याणें पंढरपुरांत मोडिलें; आणि तेथची खंडणी घेऊन द्रव्य जमा केलें; त्यावरून त्याजपाशीं फौज जमा होऊं लागली; तेव्हां तो रघुनाथराव पुण्याची वाट धरिता झाला. मग कांहीं मजला तिकडे गेला असतां त्याच्या मनांत आलें कीं, माझ्या जवळचें द्रव्य या एवढ्या लश्करास पुरणार नाहीं; आणि हें द्रव्य सरल्यावर लश्कर आपल्या जवळ टिकेल सा विश्वास नाहीं, यास्तव तो पुण्याचा मार्ग सोडून बऱ्हाणपुरास चालिला; आणि इंग्लिश व होळकर व शिंदा यांची कुमक घेऊन कार्य साधावें असें मनांत योजिता झाला. याविषयीं त्याणें पूर्वीपासूनच त्यांतिघांशीं कांहीं बोलणें लाविलें होतें. तो रघुनाथराव पुण्यावर येऊं लागला त्यावेळेस पुण्यांतील कारभारी लोक फार भ्याले; कांकीं, कदाचित् साबाजी भोंसला व निजामअल्ली हे रघुनाथरावाचा पक्ष धरितील असा संशय होता; यास्तव यांहीं विचार ठरविला कीं, साताऱ्याचा राजा मुक्त करून त्याचे मुख्यत्वें रघुनाथरावाचा पराभव करावा; परंतु तो बऱ्हाणपुरास जाऊं लागला त्यावरून ते निर्भय होत्साते लश्कर जमा करून त्याचे पाठीस लाविते झाले. त्यावर निजामअल्ली व हरीपंत फडका तेही त्याचे पाठीस लागले. त्या सर्वांचें मिळून सत्याऐंशी हजार लश्कर होतें.

९ रघुनाथराव बऱ्हाणपुरीं शिंदा व होळकर यांची गांठ पडायाचे आशेनें थोडकेसे दिवस राहिला. मग तें न झालें म्हणून तेथून निघाला; त्यास त्याचे लोक नेवेळेस बऱ्हुत प्रकारें निषेधीतअसतां तो तें न मानितां न मंदापार गेला; तेव्हां त्याजवळ सातहजार स्वार मात्र राहिले; त्यां खेरीज मुधोजी भोंसला वगैरे सरदार त्याला सोडून निघून गेले. नंतर तो राघोबादादुरास पोंहचला तेथें शिंदा व होळकर होते त्यांहीं त्याचा मोठा मान करून त्यास आपल्या लश्करा मध्यें घेतलें. त्यावरून अशी वदंता उठली कीं, या दोघांहीं रघुनाथरावाचा पक्ष धरिला, आणि गोविंदराव व फत्तेशिंग गाइकवाड हे दोघे भाऊ गुजराथच्या आधिपत्याविषयीं भांडताहेत तेही आपला कज्जा शिंदा व होळकर यांजकडे नेऊन ते सांगतील त्यास मान्य होऊन त्यांचे विचारें रघुनाथरावाचें साहाय्य करणार.

परंतु त्या पूर्वी एप्रेलाचे अठराव्या तारिखेस नारायणरावाची स्त्री गंगाबाई प्रसूत झाली तो पुत्र जन्मला; तेणें करून रघुनाथरावास पेशवे पदवी प्राप्त होणार नाहींसा निश्चय ठरला. त्यामुलाचे नांव माधवराव नारायण असें ठेविलें. त्याच्या जन्मदिवसापासून चाळिसावे दिवशीं त्यास सातारच्याहून पेशवाईची वस्त्रें येऊन तो राज्यावर स्थापिला.

१० इकडे रघुनाथरावाच्या पाठीस लागलेले निजामअली व हरीपंत फडके होते, त्यांत निजामअली तो पुण्यांतील कारभारी लोकांहीं मुलूख द्यावयाचा कबूल केला होता त्या प्रमाणें मिळाला नाहीं व शिंदे आणि होळकर यांणीं रघुनाथरावाचा सन्मान केला हें वर्तमान ऐकून त्याची पाठ सोडून वासम नजीक

छावणी धरून राहिला; आणि हरीपंत फडके यांणीं बक्षाणपुराजवळ मुकाम केला. यानंतर पुण्यांतील कारभारी लोकांमध्यें ईर्ष्या उत्पन्न होऊन एकमेकांच्या विश्वासांत कांहीं अंतर पडून त्यांमध्यें दोन फळ्या झाल्या. त्यांत एक फळी अशी, मोरोबा फडनवीस व बाबुजी नाईक बारामतीकर व बजाबापुरंदरे हे तिघे रघुनाथरावाचे पक्षपाती झाले. यांहीं मसलत केली कीं, सखाराम बापू व नानाफडनवीस व गंगाबाई व तिचा पुत्र यांस धरून कैद करावें. त्यावेळेस पुरंदर किल्ल्यावर पर्जन्यकाळामुळें धुकें फार म्हणून ते सारे त्या किल्ल्यावरखालीं उतरून सासवडांत राहिले होते, त्यांस तें वर्तमान जून महिन्याचे तिसाव्या तारिखेस कळलें; तेव्हां ते तात्काळ पुरंदरावर चढले.

११ करनाटकीं हैदरअल्लीनें दक्षिणेंतील हें सारें वर्तमान ऐकून तुंगभद्रेचे दक्षिणेस जितका मराठ्यांचा मुलूख होता तो सर्वहस्तगत केला; आणि सलाबतजंग मराठी मुलखांत शिरून आथणी व मिरज पर्यंत खंडणी घेत आला.

१२ रघुनाथराव बरोबर तीसहजार फौज घेऊन इंदूर सोडून तापीनदीचे कांठीं जाऊन उतरला; त्यासमयीं त्याजवळची फौज बहुतकरून शिंदे व होळकर यांजकडची होती, त्याचे मनांत होतेकीं, मुधोजी भोंसले व गोविंदराव गाइकवाड हे येऊन आपणास मिळतील, त्या आशेनें त्यांची मार्गप्रतीक्षा करीत असतां त्यांनीं दुंम्बिलांशीं पुनः तहाचें बोलणें लाविलें. त्या दुंम्बिलांच्या मनांत पूर्वी पासून फार दिवस असें होतें कीं, मुंबईजवळचे लहानतांपू व माही व वसई हीं घ्यावीं, आणि याविषयीं ते फार उद्योग करीत असत, परंतु त्यांची ती मसलत सिद्धीस गेली नाहीं. मग रघु

नाथराव यास जेव्हां त्यांचें अगत्य पडलें तेव्हां ते समजलेकीं, यार घुनाथरावाच्या द्वारें आपला अर्थ सिद्धीस जाईल म्हणून त्यांहीं आपला वकील मोस्तिनूसाहेब नामें होता त्यास आज्ञा दिलीकीं, हें कार्य तुम्हीं साधावें.

१३ त्यापूर्वी संनसवाशें बहात्तरांत ज्यादिवशीं माधवराव वाचा मृत्यु झाला तेच दिवशीं इंग्लिशांहीं भडोज घेतली. त्या घेण्याचें कारण असें, इंग्लिशांकडे सुरतेचें आधिपत्य असतां त्यांस भडोजच्या नवाबाकडची खंडणी यावयाची होती ती तो देईना; तेव्हां इंग्लिशांहीं संनसवाशें एकाहात्तरांत पर्जन्यकाळांच कांहींसें पूर्वी तोफेका मागावयास फौज पाठविली तरी त्याणें खंड जी दिली नाहीं. मग तो नवाब पर्जन्यकाळानंतर मुंबईस येऊ न इंग्लिशांचीं कांहीं सह करून गेला. पुढें तो तह त्याचे मना स ठीक वाटला नाहीं म्हणून त्याणें तेथें इंग्लिशांचा वकील हो-ता त्याचा कांहीं अनादर केला; त्यावरून त्यावकिलास मुंब ईसरकारची आज्ञा झाली कीं, तुम्हीं भडोजेहून निघून सुरतेस जावें; आम्हीं लश्कर पाठवून तो किल्ला घेऊं. त्यावरून वकी-ल तेथून गेल्यावर मुंबईहून फौज जाऊन तो भडोज किल्ला घे तला.

१४ रघुनाथराव पुण्यास येत होता तो तीवाट सोडून बऱ्हा

+ वकीलमोस्तिनूसाहेब तो माधवराव पेशवा याच्या मरणाचे कां हींसा आगोदर पुण्यास पोहोंचला होता, त्यास विलायतेंतून कंपनी सरकार ची आज्ञा होतीकीं, हिंदूंच्या मुलखीं आपले उदमी लोक आहेत त्यांचा व देशच्या आपल्या मुलखाचा बंदोबस्त ठेवून त्यालोकांशीं सलुखा माव ठेवा वा, परंतु कोणाशीं हेवें घेणें वगैरे कोणत्याही गोष्टीचा संबंध करूं नये.

ण पुरास गेला; तेव्हां साष्टी वगैरे स्थानें हस्तगत करण्या विषयीं मोम्मि नूसाहेबाचा यत्न होता, परंतु रघुनाथराव दूर पडला यास्तव तेंका र्यसिद्धीस जाईना; पुढें रघुनाथराव तापीउतरला तेव्हां सुरतेचा अधिकारी साहेब होता त्याकडून त्यामसलतीसंबंधें बोलणें पुनः लाविलें, परंतु तो साष्टी वगैरे घ्यावयास कबूल होईना, त्यणून तें सिद्धीस गेलें नाहीं; आणि दुसरें कांहीं बोलणें होत होतें तों पोर्तुगी स लोकांच्या विलायतेंतील बादशाहाकडून साष्टीवगैरे स्थानें इंग्रजलोकांपासून माघारीं घ्यावयास फौज गोमंतकीं आली; त्याव रून मुंबईसरकारांत असें ठरलें कीं, गणेंनामें साष्टीचा किल्ला तो आपण न घेतल्यास पोर्तुगीस घेतील, यास्तव त्वराकरून तें गणें आपण घ्यावें. तेव्हां सहाशें गोरेलोक व एकहजार पल्टणी शिपाई तोफांसुद्धां त्याकामावर नेमिले, ते संनसवाशें चौऱ्याहत्तरांच्या दिसंबराचे बारावे तारिखेस मुंबईहून निघाले. त्याचे दुसरे दिवशीं पोर्तुगीस लोकांची जहाजें येऊन मुंबईजवळ नांगरलीं; आणि तेलोक इंग्लिशांस म्हणाले कीं, साष्टीवगैरे ठिकाणें पूर्वी पासून आमचीं तीं आम्हीं घेऊं, त्यास तुमचे जे लोक तिकडचा ना झाले ते मागें फिरवा. असें त्यांचे बोलणें इंग्लिश ऐकेनात तेव्हां ते लोक तेथूनच माघारे गेले, आणि इंग्लिशांच्या लोकांहीं तेथें गेल्यापासून सातवे दिवशीं ठाणें घेतलें; नंतर थोड्याच दिवसांत संपूर्णसाष्टी आणि उरण ठांपूहीं त्यांहीं हस्तगत के लीं.

१५ असें मुंबईकडचें वर्तमान असतां पुण्यांतील कारभारी लोकांहीं गुप्तपणें शिंदे व होळकर यांनीं रघुनाथरावाचा पक्ष सो डून आपला पक्ष धरावा असें केलें, आणि तीस हजार स्वारज

मा करून पुरंदराहून निघाले ते रघुनाथरावावर चालिले. तीता रीख नवेंबराची सत्ताविसावी. असें झालें असतां रघुनाथराव शिंदे व होळकर यांचें कृत्रिम समजून पुरंदराकडील लश्कर येऊन तापीवर पोहोंचलें नाहीं तोंच शिंदे व होळकर यांचेंल श्कर टाकून निघाला; तो तेथून पुढें तापी नदीचे कांठीं ताल नेर नामें किल्ला आहे त्यांत आपले खासगीचे लोक भरून आ पण गुजराथेकडे चालिला. तेव्हां त्याचीस्त्री आनंदीबाई बऊ तांदिचसांची गरोदर होती ती धारेच्या किल्लांत नेऊन ठेविली, आणि थोडकेसे दिवस तेथें राहिला असतां तीप्रसूत होऊन पुत्र झाला, तो बाजीरावरघुनाथ. त्याचा जन्मकाळ चा योग असा हो ता कीं, ब्राह्मणाच्याराज्याचा शेवट तो जिवंत असतांच झाला.

१६. अनंतर रघुनाथराव संनसत्राशें पंचेहत्तरांत जाने वारीच्या तिसरे तारिखेस बडोद्यांत पोहोंचला, ते समयीं त्याब रोबर दहाहजार स्वार व चारशें पायदळ होतें. तो बडोद्यास गेला यांचें कारण असें कीं, त्याच्या मनांत गोविंदराव गाइकवाड यांशीं स्नेह करावा आणि इंग्लिशांशीं बोलणें लाविलेलें शेवटास न्यावें. इकडे पुण्यांतील कारभारी लोकांनीं तो नालगेर किल्ला घेऊन रघुना थराबाचे पाठीस हरीपंत फडका फौज देऊन लाविला, आणि सखा रामबापू व नानाफडनवीस हे होते तेथून माघारे पुरंदरास आले, ने थेंच त्यांणीं कारभार चालविला.

रघुनाथराव बडोद्यास गेला तेव्हां गोविंदराव गाइकवाड तो आपला भाऊ फत्तेसिंग बडोदे शहरांत असे त्या शहरास घेरा घालू न लढत होता. पूर्वी संनसत्राशें अडुसष्टांत रघुनाथरावाचें व माध वराव पेशव्याचें वैमनस्य पडलें तेव्हां दमाजीगाइकवाडानें रघुना

थरावाच्या साह्यास आपला पुत्र पाठविला तोच हा गोविंदराव गाइकवाड.

माधवरावानें रघुनाथरावास जिंकिल्यावर पुढें थोडक्याच दिवसांनीं तोदमाजी मृत्यु पावला. त्यासमयीं त्याचे पुत्र चार होते, त्यांत एक सयाजी, दुसरा गोविंदराव, तिसरा माणिकजी, चवथा फत्तेशिंग; इतक्यांत सयाजी वडील, परंतु तोदमाजीच्या दुसरे स्त्रीचा पुत्र; गोविंदराव तो दुसरा पुत्र परंतु पहिले स्त्रीचा; माणिकजी व फत्तेशिंग हे दोघे निसरीचे. दमाजी मेला तेसमयीं गोविंदराव हा रघुनाथरावाकडचा म्हणून पुण्यांत प्रतिबंधांत होता, तथापि त्यास त्याचे बापाचें स्थान व त्याची पदवी सेनाखासखाईल नामें होती ती त्याला प्राप्त होण्यास कोणी प्रतिपक्षी नव्हते; कांकीं त्यानें आपण रघुनाथरावाचा पक्ष स्वीकारिला या अन्यायाबद्दल नेवीस लाख रुपये दंड दिले, आणि नजर एकवीस लाख, याशिवाय आणखी कांहीं कारणास्तव साडेसहा लाख, मिळून साडेपन्नास लक्ष रुपये दिले, आणि प्रतिवर्षी सात लक्ष एकुण हत्तर हजार रुपये द्यावयाचे कबूल केले; या खेरीज पुणे मुकामीं निरंतर त्याजकडील सरदारांहीं चाकरी तीन हजार स्वारांनिशीं करावी, आणि कधीं मोहिमेचे समयीं चार हजार स्वारांनिशीं चाकरीस असावें असें त्यानें मान्य केलें; यास्तव नें स्थान व तें नाव त्यास मिळालें. इकडे बडोद्यांत त्याचा वडील भाऊ सयाजी तो वेडसर होता, तथापि त्याचा कनिष्ठ बंधू फत्तेशिंग त्यानें पुण्यास येऊन त्या सयाजीचें मुख्यत्व स्थापिलें, आणि आपण त्याचा मुतालीक झाला. यावरून तो फत्तेशिंग व गोविंदराव यांचें वांकडें पडलें. तें त्यांचें वैमनस्य माधवराव पेशव्यास इष्ट असेल, त्याची मस

लत होतीकीं, गाइकवाड यांस वादूं देऊं नये, आणि तो संकल्प सिद्धीस न्यावया साठीं त्या भावा भावांत युद्ध करवावें हाच उपाय श्रेष्ठ असें तो मानीत होता.

नारायणराव पेशवा याच्या मृत्यूनंतर रघुनाथराव पेशवा झाला, तेव्हां त्याणें पुनः ती पदवी गोविंदरावास दिली. त्यावर गोविंदराव गुजराथेंत जाऊन आपल्या भावास शिकावायाचा उद्योग करूं लागला. रघुनाथराव निकडे जाईनंव पर्यंत तें त्याचें कार्य होवदास गेलें नव्हतें, मग तो गोविंदराव व रघुनाथराव त्या कामाविषयीं एकत्र झाले.

१७ याशिवाय रघुनाथरावानें तेव्हा समयीं सुरतेचा अधिकारी साहेब होता त्याशीं पूर्वीचें आरंभिलेलें बोलणें चालविलें तेंव्हा तेंक होऊन शेवटीं तेनसमध्यें त्याहत्तरांच्या मार्च महिन्यांत सामील गेलें. तो प्रकार असा, रघुनाथरावाचे कुमकेस मुंबई सरकारांतून पांचशें गोरे व एक हजार पलटणी शिपाई लोक व तशा च त्यांचे बरोबर तोफा खचित घाव्या; मागून अणखी कांहीं गोरे लोक व पलटणी शिपाई पाठवून तीन हजारांची भरती करावी; त्या फौजेच्या खर्चास दरमाहा दीड लाख रुपये गधोद्यानें द्यावया स कबूल केले; आणि त्या देण्याबद्दल इंग्लिशांकडे गहाणा दाखल गुजराथचा आमोद परगणा व हानसोठ व वरसाल व आखल शीर यांतील कांहीं विभाग इनकें दिलें. त्याशिवाय साष्टी च वसई व मुंबई जवळचे लहान लहान सर्व तांबू सनदेकरून दिले. या खेरीज गुजराथेंतील जंबूसर परगणा व उल्पाड परगणा दिला, आणि आखलशीर परगण्याच्या जमेंतून वर्षास पाउण लाख रुपये द्यावयाचा करार केला. आणीक ही इंग्लिशांस उपयोगी

अशा कांहीं बाबती त्या करारांत होत्या, परंतु तो विशेष लिहिला मा नाहीं. त्यावेळेस रघुनाथरावाजवळ रोकड द्रव्य नव्हतें म्हणून न सांहालक्षांचें जवाहीर मुंबईमध्यें इंग्लिशांकडे तूर्त मनेच्या खर्चा निमित्त ठेविलें. असा राघोबाचा व इंग्लिशांचा तह झाला, त्याच कारणानें पुढें इंग्लिश व मराठे लोक यांचें प्रथम युद्ध उत्पन्न झालें.

१८ हरीपंत फडके रघुनाथरावाचे पाठीस लागून गुजराथेंत गेले, तेव्हां त्यांजवळ फौज तीस हजार होती, तीजवळ आली असें समजून रघुनाथराव व गोविंदराव हे दोघे घेरा घालून बडोद्याशीं लढत होते तोंस तेंयुद्ध टाकून माघी सरी पलीकडे जावें लागलें. ते तेथें वासद गांवीं जवळ डेरे देऊन राहिले, म ग फेब्रुवारीचे सव्वावे तारिखे पर्यंत हरीपंत फडके यांजबरोबर फत्तसिंग गाइकवाड ही आला होता त्याचे मसलतीनें आपल्या लश्कराच्या तीन टोळ्या करून तीन ठिकाणीं एकदांच माघीन दी उतरले, आणि त्या तीन टोळ्यांचे मधली टोळी रघुनाथरावा वर पडली, तिजबरोबर तो युद्ध करीत असतां त्याचे मागून गो विंदराव गाइकवाड व खंडेराव* गाइकवाड हे दोघे येऊन पोंहोंच ले नाहींत तों त्या दोहींकडच्या दोन टोळ्या रघुनाथरावावर येऊन

+ महालक्षांचे जवाहीर मुंबईमध्यें ठेविलें होतें तें पुढें अठ्ठावीस वर्षांनीं बाजीराव रघुनाथ पेशवा होऊन करी दंगा उलगडल्यावर पुनः स्थापि ला त्या समयीं इंग्लिशांहीं त्याला बक्षीस पाठवून दिले.

---

* खंडेराव गाइकवाड तो गोविंदराव गाईकवाडाचा चुलता.

पडल्या. तेव्हां रघुनाथरावाचे दोघे मोठेसरदार सखारामहरी व माना जीफांकडेंयांस फार जरबमा लागल्या, आणि त्यारघुनाथरावानें आ रबांची एकटोळी नवीढेविलीहोती तीकांहीं दरमहाथकल्याचें नि मित्तकरून युद्धनकरितां एकीकडेउभीराहिली, आणि तीलढा ईची जागाफार अडचणीची होती त्यायोगें बऊत अव्यवस्था हो ऊन रघुनाथरावास असेंवाटलेंकीं, आतां माझेचलोकमला ध रतील, म्हणून तो त्याभयेंकरून ताबडतोब हजारस्वार बरोबर घेऊ न मोठ्या त्वरेनें घोडींपिटीन खंबाइतीकडे गेला. त्याखंबाईत च्या नवाबाचे मनांत पूर्वी होते कीं, रघुनाथरावास मिळावें, परं तु तो पळून आलासा पाहून त्यास आश्रय द्यावयास भिऊंला गला. तेसमयीं तेथें इंग्लिशांचा वकील मालेटसाहेब नामें होता त्याणें त्याला भावनगरास पोंहोंचविलें. मगतो तेथून सुरतेस दाखल झाला. नंतर चौंदिवसांनीं संनसबाशें पंचाहात्तरांच्या फे ब्रुवारी महिन्याचे सत्ताविसावे तारखेस मुंबईहून इंग्लिशांचें लश्कर सवाचारशें गोरे व साडे नऊशें पलटणी शिपाई तोफांसहि त सर्व मिळून पंधराशेंलोक त्याला कुमक येऊन पोहोंचले. ते व्हां रघुनाथरावाचे लोक पराभव पावलेले ऐकतेस पालंपुरीं गेले होते त्यांस मिळावयाविषयीं सुरतेहूनही पुढें खंबाइतेसजाऊ नउतरावें असा त्यांचा विचार ठरला, आणि रघुनाथरावही त्यांज बरोबर तिकडे गेला.

१९ तेंलश्कर खंबाइतेंत असतां त्यास आणीकही कुमक मुंबईहून मद्रासरक्षात्याच्या शिपाई लोकांचें एकपलटण आणि पावणेदोनशें सुमारें गोरेलोक आले. यानंतर एप्रेलामध्यें पालं पुराहून गायकवाडांचें लश्कर इंग्लिशांस मिळावया करितां निघालें

तें व इंग्लिश लोक यांची खंबायते पासून यांचा कोसांवर गांठ पड ली. त्या लष्करांत सखाराम हरी व मानाजी फांकडे यांचे लोक सहा हजार किंवा आठ हजार चांगले होते, परंतु त्यांस रोजमुरा नमि ळे म्हणून दांडगाई करीत, वरकड बारा किंवा पंधरा हजार सु मारें अणरवी होते, ते केवळ लुटारू, त्यांपासून उपयोग न होतां नाशास मात्र कारेण असे असत. परंतु इंग्लिशांचा जो मुख्य का रणेल किटिङ् नामें होता त्याला मराठ्यांच्या लष्कराचा अनुभव नव्हता, म्हणून त्याणें तें लष्कर एवढें मोठें आणि ज्या मध्यें निशा णें वडेरे फार पाहिले, इतक्या वरूनच तो मोठा संतुष्ट झाला; आणि त्याणें आपल्या लोकांसाठीं बरोबर द्रव्य नेलें होतें तें ही त्यां तून कितीएकांस वांटिलें. त्यानंतर एप्रेलाचे तेविसावे तारिखे स तेथून तें लष्कर उत्तरेकडे मातर गांवीं गेलें, त्यास तेथें पोंहचाव याचे पूर्वी वाटेनें दोनवेळां हरीपंताच्या लष्कराची गांठ पडून कांहीं कांहींसें युद्ध झालें. त्यांत पहिलें असामली गांवाजवळ युद्ध झालें तें इंग्लिशांचे लोकांशीं, त्यांत इंग्लिशांचे लोक पडले नाहींत. दुस-या मध्यें रघुनाथरावाकडचे जखमी व मेले मिळून पन्नास साठ सुमारें पडले, इतक्यानेंच रघुनाथरावाकडचे लोक अधीर होऊन त्या पुढें युद्धास झटेनातसे झाले. त्यायुद्धांत रघुनाथरावाच्या लोकांचा पराभव झाला असतां त्यांचे डावे बाजूस इंग्लिशांचे लोक होते त्याव र हरीपंताच्या लोकांहीं हल्ला केला, परंतु रघुनाथरावाच्या लोकां पेक्षां त्यांचा अधिक नाश होऊन ते निघून गेले. त्यापुढें राघोबा च्या मनांत आलें कीं, पर्जन्यकाळजाई तों पर्यंत अमदाबादेंत रहावें, परंतु इंग्लिशांची मसलत होती कीं, त्याच वेगानें पुण्याव र जाऊन पडावें, या स्तव सा रघुनाथरावानें निकडे चाल केली, पर

तु कोणेरिनीची मसलत त्या का मास असावी ती नीट नव्हती, आणि त्या गुजराथेंतील मार्ग संकोचित असे, ज्यास दोंही बाजूनें उंचउंच कुडणें केलेलीं, त्यामुळें नें लश्कर फार हळू हळू जाऊं लागलें असतां नापार गांवा जवळ मे महिन्याचे अठराव्या तारिखेस पोंहचलें, इतका त्यास विलंब लागला.

२० त्या लश्करानें खंबायत सोडिल्यापासून त्याबरोबर किनिङ् साहेब होता त्याणें रघुनाथरावाच्या लोकांस सांगितलेंकीं, तुमीं दोहीं बाजूंनीं चालून मध्यें बुणगें घेऊन बंदोबस्तानें चाला, परंतु ते त्या प्रमाणें न करितां कधीं शत्रु येतो असें ऐकिलें म्हणजे बुणग्या मध्यें शिरून चालत, अथवा इंग्लिशांचे टोळीचा आश्रय धरीत. असें झालें असतां रघुनाथरावाच्या सांगण्यावरून त्या साहेबानें त्या लोकांस धैर्य यावयाकरितां शंभर गोरे लोक व शंभर पलटणी शिपाई अशा दोन दोनशें लोकांच्या दोन टोळ्या करून त्यांस दोन तोफा देऊन त्यांतली एक टोळी मागें चालावयास देविली, व एक टोळी दोहों बाजूंनीं चालविली; आणि समयपडल्यास त्या दोहीं टोळ्यांहीं एकमेकीस कुमक करावी अशी आज्ञा केली. याप्रमाणें बंदोबस्तानें तें लश्कर चालत असतां अठराव्या तारिखेस नापार सोडून एका कोसावर गेलें, तों तेथें वाटेच्या डावे बाजूस एक मोठ मोठ्या वृक्षांची झाडी होती तींतून एकाएकीं मोठ्या तोफांचा मार त्या मागल्या टोळीवर चालू झाला, आणि त्या झाडींतून च शत्रूच्या लश्कराची एकमोठी टोळी धांवून येते असें पाहिलें. तेव्हां त्या किनिङ् साहेबानें जे लोक पुढें चालत होते ते उभे केले, आणि आपण एक तोफ व एक गरनाळ बरोबर घेऊन मागें आला. इतक्यांत ती बाजूची टोळी पाठीमागचे टोळीस ये-

ऊन मिळाली तेव्हां शत्रूनें तोफांचा मारबंद करून ती आपली टोळी मागें फिरविली. तेसमयीं त्यासहा तोफा पैकीं त्यांच्या दोन तोफा तेथें राहिल्या त्या घ्याव्या असा बेत करून इंग्लिशांचे लोक तिकडे जाऊं लागले असतां ती वाट अडचणीची आणि ते फार लवरेनें गेले तेणें करून त्यांच्या चालण्याच्या बंदोबस्तांत कांहीं अंतर पडलें. मग ते त्या तोफांचे जवळ पोंहचल्यावर आपला बंदोबस्त नीट करावायास गुंतले असतां त्यांवर शत्रूंची एक टोळी मोठ्या वेगानें येऊन पडली, तेव्हां ते इंग्लिशांचे लोक त्यांशी लढूं लागले, तों त्या किलिङ्-साहेबानें आपल्या लोकांस तोफांची कुमक करून शत्रूचे लोक मागें हटविले. नंतर इंग्लिशांचे लोक त्या तोफा घ्यावयास पुनःउद्युक्त झाले, तेसमयीं त्यांवर पूर्वीचे पेक्षां मोठी स्वारांची टोळी फारवेगानें येऊन पडली, तेव्हां ही त्यांणीं त्यांचे कितीएक लोक मारून त्यांस मागें हटविलें, परंतु तेसमयीं इंग्लिशांचेही कितीएक लोक मेले गेले. तेव्हां राघोबाचा कोणी कारकून होता त्याणें कृत्रिम करून त्या अडचणींत दोन हत्ती घालून तीवा ट बंद केली, आणि शत्रूस धैर्य देऊन मागून हल्ला करविला; तेव्हां ही त्या पलटणी लोकांहीं त्वांकडे तोंडें करून त्यांशीं लढून त्यांस दूर केलें. इतक्यांत राघोबाचे स्वार व आरब वगैरे लोक मिळून आले ते इंग्लिंश लोकांचें लश्कर व पुढची टोळी या दोहीं मध्यें शिरले, तेव्हां शत्रूच्या पक्षाचे कोण व रघुनाथगावा चे कोण ते इंग्लिशांस समजेना असें झालें. मग ती गोरे लोकांची एक टोळी कांहीं कारण नदिसतां आपलेवाचून मागें हटूं लागली

+ त्या रोलीस सरदारांनीं आज्ञा दिली कीं, बाजूस व्हावें, ते समजले कीं, मागें सरावें, असें चौकशी करून पुढें समजण्यांत आलें.

तेव्हां काळे लोक ही आपला मोड झाल्याचे भ्रांतीनें तसेच मागें हटूं लागले; तेहटत हटत थोडक्याशा वेळानें आपल्या लश्करा कडे बंदोबस्त मोडून पळूं लागले. तेसमयीं शत्रूचे लोकांनीं त्यां मध्यें शिरून तेलोक आपल्या ठिकाणीं पोंहचत तों पर्यंत त्यांनी ल कितीएक मारिले; परंतु ते त्या ठिकाणाजवळ पोंहचले तेव्हां इंग्लिशांच्या तोफांचा व त्या सर्व पलटणी लोकांचा एक दांच मार त्यांवर पडून त्यांचा फार नाश होऊन ते पळाले. याप्रमाणें अरा साजवळची लढाई झाली त्यांत इंग्लिशजय पावले, परंतु त्यांत अ नर्थ न झाला असें नाहीं, कांकीं, त्यांचे गोरे लोक जखमी झाले व मेले मिळून शायशीं, आणि पलटणी लोक जखमी व मेले मिळू न एकशें छत्तीस असे सर्व मिळून दोनशें बेवीस पडले.

यानंतर किलिङ्ग साहेब भडोंजेस जाऊन आपले जखमीलो क नेथें ठेवून आपण तेथून निघून नर्मदेच्या उगमाकडे त्या भडोंजे पासून बारा चौदा कोसांवर बडूपीरास एक मजल करून गेला, तेव्हां नेथें नवें वर्तमान आलेंकीं, हरीपंताचें लश्कर नदी उतरून गेलें नाहीं, आपल्या पासून पांच कोसांचें अंतरानें आहे, तेव्हां किलिङ्ग साहेब त्याच दिवशीं मध्यरात्रीं निघाला आणि मनांत आ णिला झालाकीं, एकाएकीं हरीपंताच्या लश्करावर जाऊन छापा घा लावा; नी त्याची कल्पना शेवटास जाती, परंतु रघुनाथरावाचे स्वारांस कांहीं एकादोहोंरोजांचा पैका भडोंजेस मिळाला होता तितक्यानेंच त्यांस कांहीं धैर्य उत्पन्न झालें म्हणून किंवा कांहीं त्यांस लूट मिळेल या अर्थानें ते मागें राहीनांत; त्यांणीं इंग्लिशांच्या लोकांत शिरून अ

ही अव्यवस्था केली कीं, त्यासाहेबास आपल्या पलटणी लोकांचा बंदोबस्त नीट करितां दिवसउगवे तों पर्यंत पुढें जाववयाची संधी सांपडली नाहीं, त्यामुळें ते हरीपंताचे लोक सावध झाले आणि त्यांहीं आपल्या तोफा वगैरे जडसामान नर्मदेंत बुडवून खटलें पुढें चालतें केलें, मग हेजाऊन पोंहचत तोपर्यंत आपणही निघून गेले; नेक्षां त्यांचे दहापांचउंट व एकदोन हत्ती तळावर होते ते रघुनाथरावाच्या लोकांहीं बळवून नेले. असें वर्तमान जुनाचे आठव्या तारिखेस झालें. तेसमयीं पर्जन्यकाळजवळ आल्या मुळें पुढें जाववयाची सोय नाहीं ही पाहून इंग्लिशांचें लश्कर बडोद्यापासून दहा कोसांवर दुभाई शहर आहे तेथें छावणी करून राहिलें, आणि रघुनाथरावाचें लश्कर बडोदें व दुभाई यांमध्यें भीलापूर नामें गांव आहे तेथें उतरलें. तेव्हां गोविंदराव गाइकवाडाच्या बोलण्यावरून असें ठरलें कीं, पर्जन्यकाळ गेल्यावर फत्तेसिंगाशीं लढून बडोदें घ्यावें.

२१ याप्रमाणें खुसकीवर युद्ध होत असतां समुद्रांतहीयुद्ध चालतें झालें, तो प्रकार असा; त्या युद्धाचे प्रारंभीं मराठ्यांचीं पांच जहाजें मोठीं होतीं, त्यांत एकशें चाळीस तोफांचें एक, अडुतीस तोफांचें एक, आणि बत्तिसांचें एक, व दोन सदुसांचीं; याखेरीज दहा फत्तेमाच्या, एकेकीवर दोहोंपासून नऊपर्यंत तोफा होत्या, अशीं पंधरा. याप्रमाणें असतां एके दिवशीं इंग्लिशांची व त्यांची समुद्रामध्यें गांठ पडली तेव्हां इंग्लिश लोकांच्या जहाजांचा मुख्यसरदार कामोदोरजानमुर नामें होता, तो त्या मराठीलोकांस नभितां

खांजवर चालून गेला; त्याजवळ दोन जंहाजें माच होतीं असें असतांही त्यास पहातांच मराठे आपल्या गलबतांचीं सारीशि डें हांकारून मागें पळून जाऊं लागले, तेव्हां तो त्यांचे पाठीस ला गला. मग त्या इंग्लिशांच्या दोहों जहाजांतील एक मोठ्या लरेनें चालणारें मुंबईगुराब नामें मोठें जहाज होतें तें पुढें नेऊन मराठ्यांच्या जहाजांतील मोठें समशेरजंग नामें एकशें चाळीस तोफांचें ज हाज होतें त्यास गांठून त्याशीं तो साहेब लढूं लागला, तों त्याचें दुसरें ही जहाज येऊन पोंहचलें. नंतर एक प्रहर पर्यंत युद्ध झा ल्यावर त्यास समशेरजंग जहाजावरच्या दारूखान्यांस तोफेचा गो ळा लागून ती दारू पेटली तेव्हां त्या जहाजाचे तुकडे तुकडे होऊ न ऊंच उडाले. तेवेळेस त्याजहाजावरचा मुख्य व दुसरे या चे लोक बऊन एक मेले गेले, आणि त्यांतून थोडके से वांचले.

या प्रमाणें इंग्लिशांची कुमक राघोबाचे उपयोगीं पडली असतां त्याणें आमोद परगणा व हनसोठ परगणा हे दोन्हीं इंग्लि श लोकांला सनद करून दिले; तेसमयीं त्या दोंहों परगण्याचीजमा दोनलक्ष सत्याहत्तर हजार रुपये वर्षासि उत्पन्न होत होती.

२२ इकडे बडोद्यांत गोविंदराव गाइकवाड व फत्तेसिंगगा

+ दोहों जहाजांत एकाचें नाव रिवेंज, सातशावें बारदान १३०७ सुरती खंडी होतें, त्यावर तोफा १८ रतली गोळ्यांच्या २० व ४ रतली गोळ्यांच्या ६ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्व मिळून १६५ असामींचा होता, त्या मध्यें सत्तर गोरेलोक होते; दुसरें मुंबईगुराब, त्या नांवाचे बारदान १६० सुरती खंडी होतें त्यावर तोफा १० रतली गोळ्यांच्या १६ व ३ रतली गोळ्यांच्या ८ होत्या, व त्यावर दर्यावर्दी लोकांचा भरणा सर्व मिळून १६६ असामींचा होता, त्या म ध्यें गोरे लोक ६० होते.

इकवाड यांचा कलह होता तोही इंग्लिशांच्या योगानें मिटला, त्यांत राघोबास तीन महिन्यांत सवीस लक्षरुपये मिळतील असें ठरलें, आणि गोविंदरावास रघुनाथराव यानें दहा लक्षांची जहागीर दक्षिणेंत द्यावी असा नेम केला; आणि कंपनी सरकारास भडोंच इ शहराच्या वसुलांतील जितका भाग गाइकवाडाचा होता तो व दुसऱ्या कितीएक गांवांच्या सनदा मिळून वर्षासि दोन लक्ष तेरा हजार रुपये उत्पन्न होत असा मुलूख गाइकवाडानें द्यावा असा निश्चय झाला.

२३ याप्रकारें राघोबाचा उत्कर्ष होत असतां पुण्यांत माधवराव नारायणाचा ह्रास दिसूं लागला. तो असा, इंग्लिशांच्या भयेंकरून हरीपंत फडका लश्कर सुद्धां नऊपीरापासून माघारा दक्षिणेस आला; असा आपल्या सैन्याचा पराभव झाला असतां सखाराम बापू व नाना फडनवीस यांचे चित्त उद्विग्न झालें; आणि वरकड मंडळीच्या मनांत येऊं लागलें कीं, रघुनाथरावाचा उत्कर्ष झाला असतां बराडचा राजा ही त्याचा पक्ष धरील. त्यापूर्वी शिंदे व होळकर ही त्या कारभारी मंडळीचा पक्ष सोडून निराळे झाले होते; आणि निजामअल्ली तो ही त्या मंडळीस भयप्रदर्शनार्थ रघुनाथरावाशीं कांहीं बोलणें लाऊन त्यांस खेळूं लागला कीं, नारायणरावास पुत्र झाला तो खरा नसेलसा अल्लास वाटतो, त्यावरून त्या कारभारी मंडळीनें त्यास सत्तर लक्ष पंचायशीं हजारांचा मुलूख देऊन तो अनुकूल केला. या सर्व गोष्टीं वरून लोकांस असें वाटलें कीं, पुढें पर्जन्यकाळ गेल्यावर रघुनाथराव येऊन त्याचा यत्किंचित् जय झाला तरी ते सर्व कारभारी त्यास अनुकूळ होऊन तो आधिपत्य पावेल, अथवा माधवराव नारायणाचें रक्षण मुख्यतें आपण करील, परंतु

इंग्लिशां मध्यें कांहीं अकल्पित खटला उत्पन्न झाल्यामुळें तें प्र करण तसेंच राहिलें. तो खटला उत्पन्न झाल्याचा विस्तार पुढचे भागीं लिहिण्यांत येईल.

भागतेविसावा

संनसत्राशें पंचाहत्तरांपासून एकुणऐंशींपर्यंत साालेलीं वर्तमानें.

१ संनसत्राशें चवऱ्याहत्तरांत विलायती सरकारचे आ ज्ञेनें बंगाल्याचा मुख्य साहेब व त्याचे मंत्री मिळून मुंबई व मद्रा स येथील व हिंदूंच्या मुलखांतील जीं इंग्लिशांचीं मुख्यस्थानें तेथी ल मुख्य साहेब व त्यांचे मंत्री कसे कसे वागतात तीचवकशी प्र थम करूं लागले, तेव्हां त्यांस असें समजलें कीं, मुंबई सरकारा नें मराठे यांशीं संबंध करून कांहीं मुलूख संपादिला, त्यावरून त्याहीं त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं हें काम सरकार हुकमा खेरीज केलें, त्यास तें लवकर टाकून द्या, आणि जें लश्कर मराठ्यांच्या मुलकेस पाठविलें आहे तें माघारें आपल्या कंपनीच्या मर्यादे म ध्यें आणावा, आणि साष्टी व वसई मात्र आपल्याकडे ठेवा; आम्ही वकील पाठवून पुण्याचे गादीचा जो मुख्य असेल त्याशीं स्नेह करूं; राघोबा हत्या करणारा तस्मात् तो अयोग्य असेल, त्याचा पक्ष ध रणे नीट नव्हे. त्यावर मुंबई सरकारानें आपण केलेल्या कृत्यास साधक अशीं अनेकप्रकारचीं साधनें बोलण्यांत आणिलीं; आणि राघोबाच्या हातून हत्या घडली नाहीं असें अत्यास पुर्ते

पणें ठाऊक आहे सें समजाविलें, तरी कलकत्त्याचा मुख्य वल्याचे मं त्री ऐकेनात; तेव्हां ते निरुपाय होऊन त्यांहीं कितिउ साहेबास लिहिलें कीं, पत्र पावतांच युद्ध मना करावें, आणि मार्ग चालू झालेल्या जे कंपनीच्या मर्यादेंत सुरतेजवळ लश्कर सुद्धां येऊन रहावें.

२ याअंतर दिसेंबर महिन्यांत बंगाल्याहून आपूतन् साहेबाचे नामें वकील पुरंदराम आला, त्याजबरोबर सरवाराम बापूला गवरनर जनरालाचें पत्र होतें, त्यांत लिहिलें होतें कीं, आम्ही दिलायतेहून बादशाहापासून आपल्या कामावर मुख्यत्वें आलों, त्यास आमचे आज्ञेवांचून मुंबईसरकारनें कोणाशीं तह किंवा युद्ध करूं नये, असें असून त्यांहीं राघोबाचा पक्ष स्वीकारिला म्हणून आम्ही तें सर्व मोडून तुमच्या सेहाकरितां तुम्हाकडे वकील पाठविला आहे. हें वर्तमान राघोबास कळलें, परंतु असें होण्याचें कारण काय तें तो नसमजला म्हणून त्यास आश्चर्य वाटलें. मग त्याच्या मनांत आलें कीं, मी जें इंग्लिशांस द्यावयाचें कबूल केलें तें त्यांस थोडकें असें वाटत असेल, याकरितां तो आणखीही बऊत द्यावयास सिद्ध झाला.

इकडे पुरंदरीं कारभारी लोक हें गवरनरजनरालचें पत्र वाचून आपणास फार उपयोगी असें जाणून हर्ष पावले, आणि तो वकील त्यांशीं नम्रतेनें वागे त्यावरून त्यांस वाटलें कीं, इंग्लिश आम्हाला भितात, तेव्हां ते त्याशीं बऊत वरचढपणा करून त्यास बोलूं लागले कीं, साष्टी वगैरे स्थानें लवकर आमचे स्वाधीन करा, आणि राघोबालाही आम्हाकडे लवकर पोंहचता करून द्या,

या प्रमाणें केल्यावर आम्ही कृपाकरून तुमच्या मुंबई सरकारा स खर्चा निमित्त बारा लक्ष रुपये देऊं. या बोलण्यांतच त्यास कांहींशी धमकीची गोष्ट ही दर्शविली. त्यावरून त्याचकिल्लानें कलकत्त्यास लिहून पाठविलें कीं, आम्ही यांशीं नम्रतेनें वागतों तेणें करून यांस वाटतें कीं, आपणास इंग्लिश भितात, आणि म्हणी वगैरे स्थानें यांच्या सनदा त्यांपाशीं मागाव्या अशी मला आशा होती नें कांहीं घडत नाहीं; आणि यांशीं स्नेह करणें नें ही शेवटास जात नाहीं. नें पत्र कलकत्त्यास पोंहचल्या वर पहिली मसलत फिरून अतें ठरलें कीं, आतां महा प्रयासें करू न राघोबाचा पक्ष स्वीकारावा, त्यावरून गवरनर जनराल आ णि त्याचे मंत्री यांणीं निजाम अल्ली आणि हैदर यांचे द्वारें राघोबा ला अनुकूलतेचें पत्र पाठविलें; आणि शिंदा व होळकर व मु धोंजी भोंसला यांस लिहिलें कीं, तुम्ही रघुनाथरावास अनुकू असावें, हें कदाचित् न झालें तर त्यास प्रतिकूळ तरी नसावें. या खेरीज त्यांनीं कांहीं द्रव्य व कांहीं सैन्य मुंबईस जाण्या क रितां सिद्ध केलें, आणि मद्रासचे पलटणी लोकही मुंबईस जावे अशी आज्ञा झाली. हें वर्तमान ऐकून राघोबास मोठा आ नंद झाला, परंतु या प्रमाणें सिद्धीस गेलें नाहीं; कांकीं, पुरंदरचे कारभारी लोकही हें सर्व आणून एकाएकीं नम्र होऊन इंग्लिशांहीं मागितल्या प्रमाणें द्यावयास सिद्ध झाले. तेव्हां तो आपूतन साहेब वकील तो कलकत्त्याचे आज्ञेची वाट न पाहतां तह करिता झाला; त्यांत असें ठरलें कीं, साष्टी इंग्लिशांहीं घेतली आहे ती त्यांकडेसच असावी, आणि भडोंज शहराचा पेशव्यांचा जो भाग असेल तो व त्या शहराचे आसमंतात् तीन लक्षांचें उत्पन्न होईल तो मुलूख इंग्लि

शांस जो मुल्लूख दिला तो घावयास गाइकवाडास सत्ता नाहीं अ
सें ठरलें तर इंग्लिशांहीं तो मुल्लूख पेशाव्यास परत द्यावा, आणखी
रघोबाशीं मुंबईसरकाराचा तह झाला आहे तो इतःपर नसावा,या
तहास रघुनाथराव अनुकूळ झाला तर त्याणें महिना पंचवीस ह
जार रुपये खर्चास घेऊन गोदातीरीं कोपरगांवीं रहावें,त्याजबरोब
एक हजार स्वार शोभार्थ असावे.

या प्रकारें तह ठरल्यावर मुंबईसरकारास दडून विषम
वाटलें,कांकीं, ते मराठी लोकांचे माहितगार झालेले असतां त्यां
स नविचारितां बंगाले सरकारानें परभारां ठराव केला तो मराठ्यां
स फार हितकारक होईल.

तेंतहावें वर्तमान ऐकून रघोबाचें बोलणें अ सें पडलें कीं,
या तहास अनुकूळ झावें त्यापेक्षां मला कोणी दुसरा सहाय्य नस
ला तरीमी एकठाच युद्ध करीन; परंतु त्यास कोणी मराठा अंतः
करणपूर्वक सहाय्य मिळेना,आणि कलकत्त्याची मसलत झाले
ली पुनः फिरणार नाहीं असें समजून त्याणें आपल्या सैनेस र
जा देऊन दोनशें माणसांनिशीं तो रघुनाथराव सुरतेंत इंग्लिशां
च्या आश्रयानें राहिला.

३ त्यावेळेस कोणी सदोबानामें ब्राह्मण होता, त्याणें पान
पतचीलढाई झाल्यावर आठांनवांवर्षांनीं आपण सदाशिवरा
व विंमणाजी असें सोंग केलें, त्यावेळेस माधवरावानें त्याचीच
चकशीकरून तो खोटा असें ठरविलें, आणि त्यास बंदींत
घातलें होतें. त्यास एके ठिकाणीं ठेवीत नसत, त्याचें स्थानांत
र करतां करतां जेव्हां तो रत्नागिरीस ठेविला, तेव्हां [illegible]
भेदार रामचंद्रनाईक परांजपे नामें होता त्याणें पुण्यांतील क

व्यवस्थाजाणून हा मुक्त केलानर आपणास मोठा लाभ होईल असें समजून त्यास सोडिलें, आणि लोकांस विदित केलेकीं, सदाशिवराव भाऊ हा खरा असतां कारभारी लोकांनीं यावर जुल्म करून उगाच यास मेनिबंध केला. हीगोष्ट लोकांस सत्य वाटून त्याजवळ वीस हजार फौजजमा होऊन त्याणें कोंकणांतील बीस बेचीस किल्ले घेतले. असें झालें असतां मुंबईच्यास रकारासही तो खरा वाटला; मग त्यांहीं त्याजकडे वकील पाठवून त्याचा मोठा संमान केला. शेवटीं तो सदोबा आपल्या सैन्यासुद्धां बोरघाटानें वर चढून गेला, व त्याणें राजमाचीचा किल्ला हस्तगत केला. तेव्हां तो त्या राजमाचीस असतां पुरंदरच्या कारभारी लोकांहीं तो तेथें कांहींसा उपद्रव करितां भुलथापीनें तहाचें बोलणें लाविलें, आणि त्यास नकळतां शिंद्याचा सरदार रामजी पाटील नामें व भिंवराव पानशा यांस लश्कर सुद्धां राजमाचीस पाठवून एकाएकीं त्याजवर हल्ला करविला. तेसमयीं त्याचेला क व तो भयभीत होऊन कोंकणांत पळाले, त्यांतून किसीएकाकडे साष्टीचे गण्या भिंतीचा आश्रय केला. मग तो मुंबईस गेला, तेथें मुख्य साहेब नकळता लंगून तो बोलिला कीं, एकां आलाब्यास जातों, मग मुख्य साहेब आल्यावर पुनः येऊं, असें सांगून तो कुलाब्यास गेला. तेथें रघुजी आंग्र्या होता त्याणें कैदकरून पुण्यास पाठविला; तेथें त्यास हत्तीचे पायीं दे[illegible]गें.

रिला तो ब्राह्मण होता, यास्तव पुण्यांतील ब्राह्मण आपल्याक[illegible] हत्तेचा दोष नयावा खपून कोणीएणतकीं, तो सोनार होता; कोणी एणत कीं, तो ब्राह्मण होता, यास्तव तो हत्तीच्या पायीं दिला नाहीं, परंतु त्याअ

इकडे मुंबई सरकारानें त्या सदोबाचा संमान केला; आणि राघोबा संनसवाशें शाहात्तरांत नवेंबराचे अकरावे तारिखेस सुरतेहून मुंबईस आला त्यास इंग्लिशांहीं दरमहा दहाहजार रुपये खर्चास देऊन आपल्या आश्रयांत ठेविलें. त्यावरून पुरंदरच्या कारभारी मंडळीनें बंगाल्याचा मुख्य गवरनरजनराल न त्याचे मंत्री साहेब यांस शब्द लावून लिहिलेकीं, तुमचा व आमचा नह असतां मुंबई सरकारानें याचा प्रमाणें कृत्रिम केलें. न्या वरून मुंबईसरकारही त्याकारभारी लोकांस शब्द लावी कीं. तुह्मी आह्मास जो तीन लक्षांचा मुलूख दिलात त्याचें उत्पन्न आलांत सें होत नाहीं, असाबाद किलीएक दिवस होत राहिला

फत्तेशिंग गाइकवाड तो आपणास पेशव्याचा तांबेदारत्व णवीत असे, परंतु पेशव्याचे कारभारी लोक दुश्चित होते कीं, आपल्या आज्ञेवांचून कोणाशीं युद्ध किंवा तह करणार नाहीं, व मुलूखही आज्ञेवांचून कोणास देणार नाहीं, असें गाइकवाड यापासून लिहून घ्यावें. याप्रमाणें त्यांच्या मनांतील अर्थ जाणून फत्तेशिंग याणें पेशवे यांचा धनीपणा मानिला, परंतु युद्धकरणें किंवा मुलूखदेणें याकामास मला दुसऱ्याचे आज्ञेची गरज नाहीं, असें बोलून त्याणें इंग्लिशांस मुलूख दिला होता तो माघारा इंग्लिशां जवळ मागितला. तें मागणें त्याकारभारी मंडळीच्या मसलतीनेंच झालें असा अर्थ नाहीं; कांकीं, राघोबानें गाइकवाडास मुलूख देऊं केला होता तो त्या प्रमाणें त्यास प्राप्त न झाला म्हणून त्याणें इंग्लि

न्यायाची शिक्षा लोकांत दाखवायासाठीं अहंमदनगरच्या किल्ल्यांत त्यास पाठवून तेथें कोणीएक सोनार महा अपराधी होता त्यास जिवें मारण्याची आज्ञा झाली होती, तो त्यास दोबाबद्दल उपोषणादि दुःख देऊन मारिला, म्हणोन सदोबा मोडिला.

शास आपला दिलेला मुलूख मांघारा मागितला.

इकडे पुरंदरच्या कारभारी लोकांही तो सदाशिवराव भाऊचें सोंग करणारा याचें पारिपत्य केल्यावर कोंकणांत फौज पाठवून त्यास दोबानें घेतलेले किल्ले सर्व हस्तगत केले.

४ यानंतर संनसबाशें सत्याहत्तरांत पर्जन्यकाळ गेल्यावर हरीपंत फडका फौज घेऊन हैदराशीं युद्ध करावयास करनाटकांत गेला, परंतु तदनुसार लाभ नपावला. त्यावेळेस त्या हरीपंताच्या लश्करांतील मानाजी फांकडा नामें सरदार व कितीएक मराठे मानकरीलोक त्याहैदरअल्लीनें फितविले होते, तें समजून हरीपंत फडका तेथून माघारा लवकर निघूं लागला. नंतर त्यालोकांतलाच एक ल्हसवाडचा देशमूख यशवंतराव नामें फितुरी होता तो हरीपंतानें तोफेच्या तोंडीं दिला त्यावरून तो दंगा शांत झाला. त्याच वर्षी सातार्‍यांत राजाराम राजा फारवृद्ध झालेला होता तो दिसेंबराचे बारावे तारिखेस मृत्यु पावला. त्याच सुमारें भवानराव प्रतिनिधीही मरण पावला; त्याचे जागीं परशुरामश्रीनिवास नामें त्याचा पुत्र स्थापिला.

राजाराम मृत्यु पावल्याचे कांहीं सें पूर्वी त्याचा दृष्टापकाळ जाणून बावीगांवचा पाटील भिंबकजीराजा भोंसला तो मालोजीचा भाऊ जो विठोजी भोंसला त्याचा वंश्य, त्याचा पुत्र राजारामास रक्तक देऊन त्यानें नाव शाहू महाराज ठेविलें, तो विठोजी शिवाजी महाराजाचा बाप जो शाहाजी त्याचा चुलता होय.

५ त्यापूर्वी संनसबाशें साठांत कोल्हापूरचा राजा संभाजी तो डिसेंबर महिन्यांत मरण पावला होता. त्यानंतर दोनवर्षांहीं त्या राजाची स्त्री जिजाबाई जिनें इंदापूर परगण्यांतील खानवत

गांवचा पाटील शहाजी भोंसला याचा पुत्र दत्तक घेऊन तो गादीचा धणी करून त्याचा कारभार आपण चालवूं लागली. तेव्हां त्या रा ज्यांत पूर्वीच्या रीतीस फार अंतर पडूं लागलें: तें असें, निजे पे शव्यांच्या राज्यास उपद्रव दिला, आणि निजामाशीं कांहीं संबंध ठेविला, तेणें करून माधवराव बळवंत सावेळेचा पेशवा त्यास रा ग येऊन त्या कोल्हापूरकरांचा कितीएक मुलूख घेऊन आपले सोइरे पटवर्धन यांचे जहागिरीकडे लाविला. याशिवाय तिणें समु द्रांत चांचेपणा केला म्हणून इंग्लिशांहीं तिचा मालवण किल्ला व सां वन वाडी संबंधें रेडी किल्ला घेतला.

वराडांतील वर्तमान असें, संनसवाशें पचाहत्तरांत साबाजी भोंसला व मुधोजी भोंसला या दोघांचें युद्ध होऊन त्यांत साबाजीचा जय झाला. त्याच्या लोकांनीं मुधोजीस वेढून धरिलें, आणि त्यासते कैद करीत होते, इतक्यांत साबाजी त्याजयाच्या आनंदांत आपला हत्ती मुधोजीच्या हत्तीजवळ नेऊन बोलिला कीं, आतां कशास ल ढतां, असें म्हणत असतां त्यामुधोजीनें त्यास किमपि उत्तर नदेतां जवळ पिस्तुल होतें त्याचा चाप दाबून त्या पिस्तुलाच्या गोळीनें त्या स मारून टाकिलें. मग तो मुधोजी आपला पुत्र रघूजि भोंसला याचा रक्षक होऊन कारभार चालवूं लागला.

इकडे बडोद्यांत फत्तेसिंग गाइकवाड याणें पेशवे सरकारा स पांचलाख रुपये नजर व खंडणीचा बाकी ऐवज साडेदहा लक्ष रुप ये दिले, आणि नानाफडनवीस व सखाराम बापू यांस दरबार खर्चा ए कलक्ष रुपये देऊन तो आपलें सेनाखासखेल पद पावला.

६ संनसवाशें अठ्याहत्तरांत पुण्यामध्यें कारभारी लोकांत वैमनस्य पडलें तें उत्तरोत्तर वृद्धिंगत झालें, तो प्रकार असा, नाना-

फडनवीस तो आपला चुलत भाऊ मोरोबा फडनवीस याचे बुद्धीस तुच्छ मानून त्याचा द्वेष करीत होता. त्या मोरोबास जे राघोबाचे पक्षपाती मानीत होते त्यांत मुख्य बजाबा पुरंदरे व सखाराम हरी व चिंतो विठ्ठल व विष्णू नरहर, यांहीं मिळून नुकोजी होळकर आपल्याकडे घेतला असे; आणि मोरोबाफडनवीस व सखाराम बापू यांची मसलत होऊन पुनः राघोबास स्थापावा असें ठरलें, परंतु त्याचे अदले वर्षी माधवराव नारायणाची आई गंगाबाई मरण पावली तेव्हां पासून मोरोबा विषयीं कांहीं मनांत शंका उत्पन्न झाल्या मुळें सखाराम बापू त्या कामांत पुर्तेपणें शिरेना ही गोष्ट यावरून समजते कीं, ज्यावेळेस मोरोबानें हें वर्तमान मुंबई सरकारास विदित केलें त्यावेळेसने इंग्लिश ही अनुकूळ होऊन सखाराम बापू पुरंदरचा तह करणारा मुख्य त्याची अनुकूळता याकामास पाहिजे असा आक्षेप धरिले झाले. तेव्हां तो तसें पत्र देईना यास्तव तें सिद्धीस गेलें नाहीं. यावरून नाना फडनवीस यांणें मनांत आणिलें कीं, मोरोबास धरून कैद करावें, परंतु तो त्याचा मतलब मोरोबास कळला, तेव्हां तो पुण्याहून पळून गेला. तेव्हां नाना फडनवीस समजला कीं, हें कृत्य मी एकांच केलें हें ठीक झालें नाहीं. नंतर सखाराम बापूच्या द्वारें युक्तीनें तो माघारा यावयासाठीं कारभारी मंडळी नवीच होणार त्यांत मोरोबा व बजाबा पुरंदऱ्या हे असावे असा आकार घातला, तेव्हां मोरोबावरुन होऊन पुण्यास माघारा आला; परंतु बजाबा पुरंदऱ्या नानाच्या कृत्यास विश्वासेना; आणि सखाराम हरी मोठ्या धैर्यानें स्पष्ट बोलिलाकीं, मोठा शूर आणि प्रामाणिक व भोळा असाजो रघुनाथराव त्याचा पक्ष सोडून मी कदापि कृत्रिमी व भित्रा असाजो नाना फडनवीस

याचा पक्ष धरणार नाहीं.

७ या पुढें मोरोबाचे पक्षपाती जितके होते त्यांकर नानाफ डनविसाची शक्ति होळकराच्या बळा सुळें चालेनाशी झाली, ह्मणून तो पुरंदरास निघून गेला'. मग थोडक्याच दिवसांनीं त्या मोरोबास त्याणें असें दर्शविलेंकीं, जर मला अभय असेल तर मी ही रघुनाथरावास अनुकूळ आहें. इतकें करून त्याणें सरकारमबापूचा व मोरोबाचा बहुत मान रक्षून त्यांची प्रसन्नता संपादिली. त्यानंतर पुण्यांत पुनः विचार होऊं लागला कीं, रघुनाथराव त्यापदावर स्थापावा किंवा नस्थापावा. असें असतां तो मोरोबा आपल्या भोळेपणानें समजला कीं, आतां मी मुख्य झालों; आणि त्यास नानाफडनवीस वारंवार समजाऊं लागला कीं, रघुनाथरावाचे आचरण नीट नाहीं व तो पदारूढ असतां त्याणें बहुत द्रव्य व्यर्थ खर्चिलें, त्यावरून त्याच्या मनांत आलें कीं, आतां रघुनाथरावाचें महत्व झालें असतां माझी योग्यता उतरेल; ह्मणून त्यास रघुनाथरावाविषयीं इंग्लिशांही सांगितलें असतांही त्याकामास तो आळस करूं लागला; काकीं, त्याचे मनांत तें कार्य दोघांस जावेंसें नव्हतें. त्यावरून इंग्लिशांच्याही ती गोष्ट सोडिली.

८ यानंतर नानाफडनवीस मोठ्या आर्जवें करून त्याकारभारी मंडळीची सुप्रसन्नता राखीत असे. त्याचे पक्षी महादजी शिंदे व हरीपंत फडके हे फौजेसुद्धां करनाटकीं जाऊन हैदर अलीशीं युद्ध करून मिरजेस दोघे एकत्र मिळाले, तेथून पुढें निरनिराळे निघून पुरंदरास जून महिन्याचे आठवे तारिखेस उभयतां येऊन पोंहचले. तेव्हां नानाफडनवीस आपली मुख्यता पूर्वीच्या प्रमाणें साधूं लागला, आणि मुख्य मुख्य स्थानीं आपलीं ठाणीं बसवून

शिंद्याचे द्वारें होळकरास रघुनाथरावाचा पक्ष नाहींसा केला. त्यावरू मोरोबा फडनवीस मात्र्‌ल्यान आपणास इंग्लिश सहाय्य करावया विषयीं उद्युक्त झाला, परंतु तें कार्य सिद्धीस जावें असा अवकाश सांपडला नाहीं. कांकीं, जून महिन्याचे अकराचे तारिखेस महादजी शिंद्याच्या स्वारांची एकेटोळीनें येऊन अकस्मात् त्या मोरोबास धरून नानाजवळ नेलें. त्याणें त्यास अहमदनगराच्या किल्यांत बंदीस घातलें; तेसमयीं त्याचे कितीएक पक्षपातीही सांपडले ते कैद केले. सरखारामबापूनें इंग्लिशांशीं पुरंदर मुकामीं जो तह केला होता तो त्यास प्रतिबंध केला तर राहणार नाहीं म्हणून तो तसाच मोकळा ठेविला. त्यासमयीं सरखाराम हरी तोरघोबाचा मोठा अभिमानी आणि विश्वासू असा सेवक होता, यास्तव त्याचे पायांत अडीजाड बिडी घातली कीं, तो पुरुष बलाढ्य असतां तो मनांत आणूं ही त्याला ती उचलेना; आणि त्याचे खाण्यापिण्याचे असे हाल केले कीं, चौदा महिन्यांत त्याला उठावयाची शक्ति राहिली नाहीं. तरी तो आपल्या धन्याच्या अभिमानें करून बोलत असे कीं, माझें बरें गेलें आणि प्राणही लवकरच जातील, परंतु मी मेल्यावर माझीमिर्मास हाडेंही रघुनाथरावाच्या कैल्याणाचे शब्द करीत राहतील.

९ याप्रकारें नानाफडनवीस आपल्या कपट युक्तीनीं त्या कारभारी मंडळींत आपली श्रेष्ठता पावला असतां तो मनांत आणूं

+ तो सरखाराम हरी जातीचा परभू होता, त्यावरून त्या जातीचे कित्येक पुरुष परम अभिमानें करून मराठ्यांची चाकरी करीत आले असें मराठ्यांच्या बखरी वरून दिसत होतें

लागला कीं, अशाच कृत्रिमानें इंग्लिशही ठकतील. त्यापूर्वी सन मजाउीं सत्त्याहत्तरांत कोणीएक फ्रेंच वकिलाच्या वेषेंकरून पुण्यांत आला होता, त्या फ्रेंच लोकांशीं व इंग्लिशांशीं हिंदूच्या मुलखाचे राज्याविषयीं परस्परें स्पर्द्धा पहिल्यापासून फार आहे, असें त्यानानाफडनविसास ठाऊक होतें, त्यावरून त्याणें अशी कल्पना केली कीं, आपण फ्रेंचलोक हातीं धरिले असें इंग्लिशांस भय दाखवून कांहीं एक प्रकारें ते वश्करावे. म्हणून त्यादिवसापासून तो त्या फ्रेंचांचा बडुमान राखिता झाला.

१० त्यापूर्वी पुरंदरच्या तहासंबंधें कांहीं खटले पडले तेंहीं तसेंच होतें, असें असतां नानाफडनवीस व शिंदे व होळकर यांस कलकत्त्याहून इंग्लिशांचें लिहिलें आलेकीं, आमचें व फ्रेंचलोकांचें विलायतेमध्यें युद्ध असतां ते लोक सांप्रत तुमच्या राज्यांत बडुमानानें वागतात, त्यास्तव कदाचित् आमच्या मुंबईसरकारास प्रतिपक्षी होतील, याकरितां आमचीं पलटणें खुसकीच्या मार्गानें कलकत्त्याहून मुंबईस येतील त्यांस तुमचा अडथळा न होई अशी सनद द्या. त्यागोष्टीस शिंदे व होळकर तात्काळ मान्य झाले, परंतु नानाफडनविसास असा विचार पडला कीं, जरमी हें मान्यकरीन तर ते लोक इकडे येऊन प्रबळ होतील, आणि जर मान्य नकरीन तर ते युद्धास सिद्ध असतील. तस्मात् आपण त्या इंग्लिशांस भयप्रदर्शनार्थ फ्रेंच लोकांची प्रतिष्ठा वाढविली तो उद्योग बहुत नहोता तर बरें असतें, आतां यांत फसलों असें दिसतें. इतका विचार करून तोही निरुपाय होऊन मान्य झाला, परंतु त्याचे सरदार बुंदेलखंडांत होते त्यांस गुप्तपणें लिहिलें कीं, माझें अंग नदर्शिवतां होईल तितका इंग्लिशांस अडथळा करावा. यानंतर मुंबई सरकार यांणीं

ही त्याकारभारी मंडळीस स्पष्ट सांगितलें कीं, जे तुम्ही नवे का
रभारी आहांत ते पुरंदरचा तह झाला आहे त्या प्रमाणें मान्य
आहांतकीं नाहीं तें उत्तर द्या, व त्यापेकीं कांहीं अंश राहिला तो आ
मचा आम्हास प्राप्त होण्यास विलंब नसावा; आणि तुम्ही पुण्यां
त फ्रेंचलोकांचा वकील ठेविला यावरून तुमच्या चित्तात काय
आहे तें आम्हास समजत नाहीं, यास पुढें कर्तव्य काय असेल
तें आम्हाला कळविलें पाहिजे. यावरून नानाफडनविसानें
पुण्यांत लुबीनू नामें फ्रेंचांचा वकील होता, त्यास निघून जाण्या-
ची आज्ञा दिली, परंतु त्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर विलंबानें कुटि
ल मार्गाचें आणि अस्पष्ट असें दिलें. यावरून मुंबईस ठरलें
कीं, हे पुरंदरच्या तहाला मान्य नाहींत, त्यापेक्षां यांबरोबर युद्ध
करावें.

११ असें झाल्यावर नानाफडनवीस समजलाकीं, हा मज
वर मोठा अनर्थ येऊन पडेल; यास्तव कांहीं मोठा उपाय केला
पाहिजे. म्हणून त्याणें मुंबईमध्यें या प्रकरणीं युद्धाची गोष्ट मात्र
निघाली तोंच कांहीं एक युक्तीकरून कालहरणार्थ कोणी एक वकी
ल मुंबईस पाठविला, आणि मुलखो मुलखींच्या शिलेदारांही द
सऱ्यास पुण्यावर येऊन मिळावें अशी आज्ञा केली. याविषयीं
कोंकणांत जेथें जेथें त्याचीं जहाजें होतीं तेथें तथें त्याजहाजांवर
धान्यादि साहित्य भरून युद्धाची सिद्धता करविली. या प्रमाणें नाना
फडनविसाची तयारी होत असतां मुंबईमध्यें त्या युद्धास जावया
ची गोष्ट मात्र निघून तयारीस विलंब लागला यांचें कारण असें की,
तेथचे मुख्य व त्यांचे मंत्री यांचा विचार एकरूप होईना.

१२ मग असें ठरलें कीं, रघुनाथरावाबरोबर कांहीं फौज देऊ

न त्यास पुण्यांत पाठवून तो माधवराव नारायणाचा मुख्य रक्षक क रून स्थापावा. हीगोष्ट सिद्धीस न्यावयाकरितां त्यावरोदर सेनादि ली, आणि त्यासेनेचा सरदार व दोघे तिफाईत साहेब त्या कामास नेमून तो अर्थ शेवटास जावयासा केला. त्या फौजेंत सहाशें सुमा रें गोरे लोक व दोनहजार दोनशें पलटणीलोक तोफखान्या सहित होते. ते त्या राघोबानें रोबर निघून दिसेंबराचे ते विसावे तारखेस बोरघाटावर सारेजाऊन एकेजागीं मिळाले. त्यांत पलटणी सर दार साहेब व ते दोघे तिफाईत साहेब यांचें कांहीं वैमनस्य पड लें, आणि तो पलटणी साहेब हिंदूंशीं युद्ध करण्या विषयीं माघे न नफुता म्हणून त्यास खंडाळ्या पासून कारल्या पर्यंत जावया स शहूची फारशी अडचण नसतांही आठ दिवस लागले.

१३ तेथून पुढें तळेगांवावर पोंहचले तेव्हां ज्यांत महादजी शिंदे व हरीपंत फडके मुख्य असेंजे मराठे यांचें मोठें लश्कर या ची गांठपडली, तें सैन्य सुमारें पन्नास हजार होतें. ते समयीं प्रथ म मराठे यांहीं आपण युद्ध करणार असें दर्शविलें, परंतु इंग्लि- श आपल्या बंदोबस्तानें त्यांवर चालूनजात असतां ते मराठे स मूर उभे राहीनातसे झाले. नंतर ते इंग्लिश तळेगांवा जवळ जाऊन पोंहचतांस तों तो गांव उजाड झालेला होता; आणि त्यां स दुसरें वर्तमान कळलें कीं, या गांवा प्रमाणेंच चिंचवड व पुणें ओस पाडावें अशी नानाची आज्ञा झाली आहे. त्यावरून मराठे फार निकरानें लढतील अशी अटकळ करून ते साहेब माघा रे मुंबईस जावयास सिद्ध झाले. इतके होईतों पर्यंत लहानलहान युद्धें कोणी पागे व पलटी लोक यांहीं झालीं त्यांत इंग्लिश जय पा वले, त्यांचे जवळ आणखी अठरा दिवस पुरेशी सामग्री होती.

आणि राघोबा व ते पलटणांतले कितीएक सरदार यांच्या मना स ती माघारें जावयाची मसलत येईना. असें असतां ते तसेच पु ढें जाऊन जर तात्काळ पुणें घेते तर तें कार्य सहज झालें असतें, प रंतु तें न करितां त्याच रात्रीस इंग्लिश आपलें मोठ्या तोफा वगैरे ज ड सामान तेथच्या तळ्यांत बुडवून डेरे पाडून मागें फिरले.

१४ तेव्हां त्यांस वाटलें कीं, आतां शत्रूस नक्कळतां एक मज ल थार होऊं, परंतु मध्यरात्री नंतर दोन अडीच घटिकांनीं त्यां च्या बिनीवर शत्रूचा मार होऊं लागला, आणि त्यावेळेस त्यांचें कांहीं खटलें ही लुटलें गेलें. मग थोड्याशा वेळानें जी त्याच्या पाठी मागची दोन तोफांसहित सहाशें पलटणी काळ्या लोकांची एक टोळी होती तीवर शत्रूनें हल्ला केला असतां ही तें लश्कर श त्रूशीं लढतां लढतां उजेड़ल्यावर पुढें चालनें झालें. तेसमयीं त्यांच्या दृष्टीस पडलें कीं, आपल्या सभोंवती शत्रूच्या स्वारांची मो ठी दाटी झाली आहे, आणि ते आपणावर हल्ला करणार आहेत, असें समजलें तेव्हां तो हल्ला आपणावर घ्यावयास ते बंदोबस्ता नें उभे राहिले, त्यावेळेस मराठेलोक यांणीं शहाजहाना पासून चाल पडल्या प्रमाणें त्यांच्या समूरून लढतां त्यांवर मागून हल्ला केला. तेव्हां ते मागचे शिपाई लोक सर्वकाळे होते, त्यांचा मुख्य साहेब हार्तलिना में युद्धांत निपूण होता त्याची आज्ञा वारंवार मानू न ते मोठ्या स्थिरतेनें तेथेंच असून त्यांहीं तो शत्रूच्या स्वारांचा हल्ला मागें हटविला, आणि त्यांस पिटून त्यांचे पाठीस लागावें अशीआ ज्ञा ते पलटणी लोक मागूं लागले. मग सूर्योदयाचे समयीं मराठ्यां चे पायदळ आणि स्वार मिळून त्यांणीं पुनः मागच्या टोळीवर चाल केली, आणि मोठ मोठ्या तोफा आणून त्या लश्कराच्या थोरल्या

भागावर लाविल्या. तेव्हां इंग्लिश यांणीं ही आपल्या तोफा सुरू केल्या, आणि मागचे टोळीचे कुमकेस चारशें सुमारें गोरे लोक व दोनशें काळे लोक पाठविले. ते त्यांस मिळतांच त्या मागल्या टोळी-च्या लोकांहीं दोन प्रहर पर्यंत त्यांवर मराठे फार निकरानें हल्ला करीत होते तो निःष्फल केला. तेव्हां मराठे यांच्या बंदोबस्तांत कांहीसें अंतर पडलें, अशी संधी पाहून ते लोक आपल्या थोरल्या भागास जाऊन मिळाले. तेसमयीं ते थोरल्या भागाचे लोक वड गांवांत ठाणें धरून मराठ्यांशीं तोफांनीं लढत होते. मराठे त्या गांवांत शिरतेवेळेस त्यांचें बुणगें त्या पलटणाचें टोळींत मिसळ ले, त्या योगें त्यांचा बंदोबस्त कांहींसा विस्कळीत झाला, ती संधि पाहून मराठ्यांहीं त्यावेळेस मात्र हल्ला करून त्यांचा कांहींसा नाश केला. मग तिसरे प्रहरीं मराठ्यांहीं बहुत करून युद्ध सो डिलें. त्या संधींत साहेबलोक समजले कीं, आह्मी एथपर्यंत आ पलें सर्व संभाळून आणिलें, आतां या पुढें नीट संभाळून जाणें होणार नाहीं, म्हणून त्यांहीं तहाचें बोलणें करावया साठीं मरा-ठ्यांकडे वकील पाठविला; आणि राघोबानेंही आपल्या विषयीं शिंद्याशीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांत इंग्लिशांहीं कबूल केलें कीं, संवत्सरांत्याहत्तरां पासून जो हिंदूचा मुलूख घेतला आ हे तो माघारा घ्यावा, व कलकत्त्याहून मजकर मुंबईस येतें आ हे तें माघारें फिरवावें; आणि राघोबा नर आपण होऊनच शिंद्या च्या स्वाधीन झाला, या शिवाय इंग्लिशांहीं आपला भडोंच शहर चा भाग शिंद्यास द्यावा, आणि त्या शिंद्यांचे कारभारीलोक यांस एकेचाळीस हजार रुपये दरबार खर्च द्यावा, असा करार झाल्या वर मराठ्यांहीं त्या इंग्लिशांस जाऊं दिलें.

१५ बंगाल्याकून लश्कर निघून मुंबईस येत होतें तें मे महि न्यांत यमुना पारउतरलें, त्यांस आज्ञा होती कीं, वाटेनें नीट मुंबई सजावें, परंतु मराठ्यांच्या सरदारांहीं वाटेंतच त्यांना अडविलें, त्यावरून त्यांच्या पारिपत्त्याकरितां त्या लश्करास विलंब लागला; ते समयीं त्यालश्करी लोकांहीं मराठ्यांशीं युद्ध करून कात्र्याचा किल्ला घेतला; आणि बुंदेल खंडच्या रजपुतांशीं लढतांना ही कांहीं उशीर लागला, त्यावरून कलकत्त्याच्या मुख्य साहेबास राग येऊन त्यालश्करचा मुख्य सरदार साहेब होता त्यास माघारें बोलाऊन करनेल गाड्डुड नामें साहेब त्याकामावर नेमिला; तो त्या लश्करांत जाऊन पोंहचतांच तेथून पुढें सुरतेस लश्कर सुधां चालता झाला. त्यासही वाटेनें कोणी मराठ्या सरदारां हीं उपद्रव केला, परंतु तो त्यास जिंकून पुढें जाऊन नर्मदा पार उतरला. नंतर त्याणें मुधोजी भोंसल्याशीं कांहीं तहाचें बोलणें करावयासाठीं कांहीं दिवस तेथें मुकाम केला, तो तह कलकत्त्याचे साहेब यांणीं मुधोजी भोंसला आपणास वश होऊन त्याणें पेशव्याचा पक्ष सोडावा या अटीनें मान्य केला; आणि मुधोजीही तदनुरूप वागणार होता, परंतु पुण्यांतील तयारीचें वर्तमान ऐकून तें घडलें नाहीं. मग तो गाड्डुड साहेब नर्मदा सोडून केंब्रूवारीचे महि नांत नारिन्वेस बऱ्हाणपुरावरून सुरतेस जाऊन पोहंचला. तेथें त्याशीं मार्गांत मराठे सरदार जसें शाबु भायानें वागत होते तसें मोंघाच्या नवाबानें नवागतां त्या इंग्लिशांचा मोठा संमान केला, आणि पुढें मराठ्यांचा राग आपणावर होईल हें नमानितां त्याणें इंग्लिशांस जीजो पदार्थ पाहिजे तोतो आपल्या शक्तीप्रमाणें अनुकूल करून देऊन त्याशीं स्नेह ठेविला. त्यामुळेंहास्तव इं-

ग्लिशांनींही त्यास अभर केलें. तोलाभ अद्यापि त्याचे वंश्य अनुभवितात.

१६ महादजी शिंदा तो नानाफडनविसाचा पक्षपाती असून त्याच्या मनांत होतें कीं, आपण नानाच्या हातावालचा वाघ णारा असें नव्हावें; किंबहुना स्वतंत्र पणें वागून त्यापेक्षां आपली श्रेष्ठता असावी;म्हणून त्याणें रघुनाथरावास हातीं धरिलें, आणि त्यास खर्चासाठीं बुंदेलखंडीं बारालक्षांची जहागीर नेमिली; आणि त्याराघोबास सांगितलें कीं, हेंतुम्हास अविछिन्न पोंहचेल, नपोंहचल्यास मी देईन. इकडे नानाजवळ बोलिला कीं, हा रघुनाथराव कांहीं अनर्थ उत्पन्न करीलतर त्याचा जाबसाल मला पुसावा,असा तो उभयपक्षीं आपण मध्यस्त झाला. त्याचा मत लब असा होता कीं, नानाफडनवीस याचा उत्कर्ष नसावा,आणि त्याशीं व इंग्लिशांशीं विरोध असलातर नानास वारंवार आमची गरज लागून आपली श्रेष्ठता राहील,यास्तव त्याणें इंग्लिशांशीं द्वेष पडावयासाठीं कांहीं नानास मसलत देऊन त्याकडून त्याइंग्लिशांचा किल्ला बाणकोट याजवर हल्ला करविला.

याशिवाय राघोबा बुंदेलखंडांत आपली जहागीर घ्याव यास पाठविला नेवेळेस त्याचे बरोबरचे जेलोक होते ते तोफखाना वगैरे सरंजाम सुद्धां त्या समागमें जाऊं दिलें; आणि त्या रघुनाथरावाच्या चवकशीस जे आपले लोक त्या बरोबर पाठविले ते त्याच्या लोकांपेक्षां कांहीसे अधिक होते. तो राघोबा तिकडे जात असतां नर्मदेसमीप पोंहचला तेव्हां त्यास कोणीस मजा विलें कीं, तुम्हास झांशीच्या किल्ल्या मध्यें शिंदा बंदीस घालणार आहे, त्यावरून रघुनाथरावानें आपल्या बरोबर चवकशी

करितां जे शिंद्याचे लोक आले होते त्यांवर चोळीमहेश्वराजवळ न-
दीउतरतेसमयीं एकाएकीं हल्लाकरून त्यांस पळविलें, आणि
आपण मोठ्यात्वरेनें भडोंजेस जाऊन इंग्लिशांचा आश्रय केला.
या सर्वप्रकाराचा विचार पाहिला असतां असें दिसतें कीं, शिंद्या-
नें राघोबास बंदीस घालण्याचें भय आपणच दाखविलें असेल;
कांकीं, तें सत्य मानून त्याणें पळून जावें, आणि इंग्लिशांच्या आ
श्रयास रहावें, तेणे करून इंग्लिश व नानाफडनवीस यांमध्यें प-
क्का विरोधउत्पन्न होऊन आपली श्रेष्ठता अधिक ठावी; याचअ
र्थें त्याणें राघोबाबरोबर चकशीस लोक थोडे पाठविले. असारा
घोबा पळून जाण्यास अणीक एक शिंद्याची मसलत असेल
ती अशी कीं, समयविशेषीं आपणास इंग्लिशांची प्रसन्न-
ता संपादन करण्याचें कारण पडल्यास हेंकृत्य उपयोगास
येईल, हा एकअर्थ दिसतो; कांकीं, त्या पूर्वी त्याणें कितीएक
वेळां साहेबलोकांपाशीं भाषण प्रसंगीं तुमची व आमची मैत्री
असावी असें दर्शविलें होतें. त्यापैकीं एकगोष्ट अशी आहे कीं,
वडगांवच्या तहानंतर कोणे एके समयीं तिघेचवघे साहेब
व तो महादजी शिंदा बोलत बसले असतां त्याबैठकींत महा
दजी शिंदा इंग्लिशांच्या लष्करचे मागल्या गोष्टीशीं पूर्वी लढाई
झाली त्याचें स्मरण करून स्तुति पूर्वक बोलिला कीं, धन्यतुम
ची युद्धशिक्षा, जो मी एवढा लढणारा त्या मजपुढें तुमचे पलट-
णीलोक एकसारिखे तांबडया भिंती प्रमाणें मला दिसत असत, ती
भिंत एखादे जागीं तुटली असतां तात्काळ पुनःसांधली जाई. अ
सें बोलतां बोलतां त्यांतील एक बालद नामें साहेब याच्या का
नांत त्याणें सांगितलें कीं, असें युद्ध करणारे तुमचेलोक व

माझे शिपाई एकमत झाले असतां फारच मत्कार होईल, यास्तव तो समय यावा असें मी इच्छितों.

१७ राघोबा पळाला तेसमयीं नानाफडनविसा बरोबरी-चा सखारामबापू व रघुनाथरावाचा मुख्य कारभारी चिंतोवि ठ्ठल हे शिंद्यापासून नानाफडनविसानें मागून घेतले, ते क्षणीं त्याणेंही त्याप्रमाणें त्यांस त्याचे स्वाधीन केलें. त्यावरून च कोणी म्हणतील कीं, तो महादजी शिंदा अंतःकरण पूर्वक नानाफडनविसास अनुकूळ होता, तर नसें नव्हे; कांकीं, त्याणें आपलें आंग राघोबास पळवावया विषयीं किमपि नव्हतें अ सें त्या नानाला समजावयासाठीं ते त्याचे हातीं दिले असतील. या नंतर नानाफडनविसानें तो सखारामबापू मोठा शाहाणा मनु ष्य तो कोणे वेळेस कायकरील तें समजून देतां आपणच सर्व आ टपील या भयास्तव त्याला एके ठिकाणीं नठेवितां त्यास कांहीं दिवस सिंहगडीं च कांहीं दिवस प्रतापगडीं व दुसऱ्या किल्ल्यां वरून कांहींदिवस ठेवितां ठेवितां शेवटीं तो सखारामबापू हाल होऊन त्याबंदी मध्यें रायगडीं मृत्यु पावला; आणि चिंतोविठ्ठल ही तसाच कोणे एके किल्ल्यांत मरण पावला.

भागचौविसावा

संनसत्राशें एकुण ऐशीं पासून पंचायशीं पर्यंत झालेली वर्तमानें.

१ गाडुड साहेब सुरतेस जाऊन पोंहचला, नंतर त्यास क

कत्याच्या साहेबांनीं मोठा मान वाढवून त्यास जनराल पदवी देऊन त्यास आज्ञा केलीकीं, नानाफडनवीस व मुंबईसरकार यांशीं स्नेह पडेल असा उद्योग करावा, त्यांत पुरंदरच्या तहाप्रमाणें बेनअ सावा. अशी आज्ञा झाली. त्यांत विशेष इतकाच कीं, फ्रेंच लोकांस हिं दूंच्या मर्यादेंत येऊं देऊं नये. त्यावरून त्यासाहेबाचें व नानाफ डनविसाचें बोलणें चाललें असतां संनसत्राशें एकुणऐशीं मध्यें पर्जन्यकाळाचे समाप्तीस त्यासाहेबास वर्तमान कळलेंकीं, एक समयावछेदें करून इंग्लिशांची संस्थानें कलकत्ता व मद्रास व मुं बईहीं हल्ला करून घ्यावीं, आणि इंग्लिशांस घालवून द्यावें असा बेत झाला आहे. आणखी हें वर्तमान ऐकिल्याचे पूर्वीच त्याणें ना नाफडनविसास मेची संबंधें कांहीं स्पष्ट प्रश्न केला होता तेव्हां नानानें विलंब न करितां उत्तर दिलेंकीं, साष्टी व राघोबा आमचे स्वाधीन केल्यानंतर तहाचा विचार करितां येयील. या दोहोंका रणावरून तो गाडुडसाहेब कांहीं उत्तर नदेतां मुंबईस गेला. तेथचा मुख्य साहेब व त्याचे मंत्री यांच्या विचारें असें ठरलेंकीं, मलबार प्रांतीं समुद्रतीरीं मद्रास खातें संबंधें लश्कर आहे तें आ पल्या कुमकेस बोलावून युद्धाची तयारी करावी; याशिवाय मुंबई स फौज तयार करून गुजराथेंत पाठवावी.

२ राघोबा भडोंचेस पकडून गेला तेसमयीं इंग्लिशांहीं त्याचा पहिल्यानें फारसा सन्मान केला नाहीं, परंतु आश्रय मात्र दिला. मगजून महिन्याचे चारावे तारिखेस तो राघोबा आपले पुत्र अमृ तराव व बाजीराव हे दोघे बरोबर घेऊन सुरतेस जनराल गाडुडसा हेब याचे भेटीस गेला, तेव्हां त्या साहेबानें त्यास दरमहा पन्नासह जार रुपये खर्चास देऊन ठेविला; आणि पुढें जे काय विशेष क

र्नेच्य तें त्यास किमपि सांगितलें नाहीं, कांकीं, तो मराठेलोकांचे मनांतून उतरलेला त्यास बळेंच मुरव्य करून स्थापणें हें चांगलें नव्हे. आणि आपण याची सदृश प्रतिष्ठा वाढविली असतांही ते कारभारीलोक पुरंदरच्या तहाप्रमाणें न वागले तरी आपणआपल्या मानरक्षणार्थ स्वयेंच युद्ध करावें हें उचित असा विचार त्यांहीं ठरविला होता.

३ यानंतर गाडुड साहेब याणें संनसत्राशें एकुणऐंशींच्या शेवटीं सुरतेस माघारें येऊन तेथें नानाफडनविसाचा वकील होता त्यास निरोप दिला, आणि आपण आपल्या लश्कराची तयारी करूं लागला. तेचसमयीं त्यासाहेबानें फत्तेसिंग गाइकवाड यास मैत्री संबंधें कांहीं प्रश्न केले, त्यांचें त्याणें उत्तर विलंबें करून अस्पष्ट दिलें. त्यावरून तो गाइकवाड पूर्वीच्याबोलण्या प्रमाणें वागणार नाहीं सें समजून गाडुड साहेब आपल्या लश्करा सुद्धां तापीउतरून संनसत्राशें ऐंशींच्या जानेवारीच्या पहिले तारिखेस उत्तरेकडे गेला. तोबडोद्याजवळ दुभाय शहर आहे तेथें किल्लेदार ब्राह्मण दोनहजार लोकांसहित त्याकोटांत होता, त्यापाशीं तें ठिकाणं साहेबानें मागितलें असतां त्याणें दांडगाईचे उत्तरकेलें, आणि आंतून जेजालांचे बार टाकिले. तेव्हां इंग्लिश रात्रीमध्यें मोर्चा बांधून प्रातःकाळीं पाडूं लागले तों कोट रिकामा टाकून ते लोक रात्रीसच निघून गेले होते. असें तें शहर हस्तगत झालें.

४ नंतर फत्तेसिंग गाइकवाड कृत्रिम टाकून सरळपणें न हाचें बोलणें करूं लागला, तेव्हां असें ठरलेंकीं, माही नदीचे उत्तरेस पेशव्याचा जो भाग आहे तो फत्तेसिंगास असावा. त्या

बद्दल फत्तेसिंगानें अठ्ठाविसीनामें तापीनदीचे दक्षिणेस अठ्ठावीस महाल आहेत ते व भडोंजचा जो गाइकवाडाचा भाग होता तो व त्यापरगण्यांत त्यांचे कांहीं गांव होते ते व नर्मदेच्या कांठीं शिनोर नामें परगणा आहे तो इतकें इंग्लिशांस द्यावें, परंतु इंग्लिशांहीं पेशव्यांचें अमदाबादशहर घेऊन गाइकवाडास अगोदर दिलें पाहिजे.

५ असा करार झाल्यावर जनराल गाडुड साहेब मोठ्यालष्करेनें अमदाबादेवर गेला; तेंशहर मोटें आणि त्याचा कोट फार बळकट असे. तेवेळेस तेंशहर ओस होतें तथापि सात एकलक्ष मनुष्यांची वस्ती होती; आणि तेथचा किल्लेदार ब्राह्मण असे, त्यास तीं किल्ला इंग्लिशांहीं मागितला, तेव्हां त्याणें उत्तरकेलेंकीं, मी एकांच धावयास सिद्ध आहें, परंतु मजपाशीं आरब व हिंदीलोक मिळून सहाहजार व दोनहजार मराठे स्वार आहेत इतके वश करावयास कांहीं विलंब लागेल, असें बोलणें लागलें असतां ही दुसरे दिवशीं इंग्लिशांचे कितीएक लोक त्या कोटा जवळ गेले, त्यांवर त्या कोट कऱ्यांहीं तोफांचा भडिमार करून त्यांतील कितीएकलोक मारिले. त्यावरून त्या गाडुड साहेबानें मोर्चेलाधून एके जागीं तो कोट पाडून मोठें खेंडार आंत जावया जोगें एकादिवसांत केलें. मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं इंग्लिशांच्या लष्कराची टोळी त्या कोटांत जावयास सिद्ध झाली असतां आरब व हिंदीलोक त्या खेंडारावर चढून त्यांस प्रतिबंधक राहयास उभेराहिले, तेव्हां त्या उभयतांचा युद्धप्रसंग झाला, तेसमयीं त्यांचे तीनशें लोक पडले आणि इंग्लिशांचे जखमी व मेले मिळून एकशें सहा पडले. शेवटीं ते आंतून मोठ्या निकरानें

वाट धरून उभे होते ते मागें सरले, आणि इंग्लिशांचे लोक आंत च दून गेले. असें तें शहर इंग्लिशांहीं घेतलें, तेव्हां त्या साहेबानें फार बंदोबस्त ठेविला कीं, आपण आंत शिरल्यावर शहरांतील कोणा एकाही माणसास उपद्रव नव्हावा. तरी ते आंत गेल्यावर तेथच्या शिपायां खेरीज त्याशहरचीं दोन माणसें मारिलीं गेलीं.

६ याप्रमाणें गुजराथेंत इंग्लिशजय पावत असतां शिंदे व होळकर यांणीं वीस हजार सांरा सहित नर्मदाउतरून बडोद्या जवळ येऊन मुकाम केला. हें वर्तमान ऐकून जनराल गाडुडमा हेब अमदाबादेकून निघाला तो फाजिलपुराजवळ मायीनदीउ तरून बडोद्याकडे चालिला, तेव्हां शिंदे व होळकर बडोद्यापा सून निघून पवनगडास गेले. तेसमयीं शिंद्याजवळ वडगांव च्या तहासंबंधें जामिनादारवल दोये साहेब होते ते त्याणें गाडुड साहेबाकडे पाठवून त्यास समजाविलेंकीं, मी तुमचा स्नेहीआ हें. त्यांच्यामनांत आलें असेल कीं, आपण इंग्लिशांशीं स्नेह ठेवू न पेशव्यांकडे भारीपणानें वागावें, परंतु इंग्लिश असें इच्छित होते कीं, आपला मान किमपि कमी नहोतां त्या लोकांशीं निष्पुण स्नेह मात्र असावा, पण कांहीं एक निमित्तें दुसऱ्याशीं संबंध ठेवून आपलें राज्य वाढवावें अशी त्यांची वासना नव्हती. त्यानंतर शिंद्यानें त्या जन रालसाहेबाकडे वकील पाठविल्यावर त्याजवळ तो साहेब बोलि लाकीं, तुमचें तहाचें बोलणें तीनदिवसांत झालें, उगाच विलंब का मचा नाहीं. त्यावरून तो वकील माघारा शिंद्याकडेंजाऊन त्याणें तेथून उ त्तर आणिलें कीं, राघोबानें वडगांवच्या तहामध्यें कबूल केलें होतें कीं, आम्ही झांशीकडे बारालक्ष रुपयांची जहागीर खालून राहूं, आमचा पुत्र बाजीराव हा माधवरावनारायण पेशवा याचा दिवाण

करावा, याप्रमाणें झालें पाहिजे. त्यावर इंग्लिशांचे बोलणें पडलें कीं, राघोबाचे मनास आलें तर तो झांशीस जाईल, त्यावर बलात्कार कर्तव्य नाहीं. याप्रमाणें उभयपक्षीं विचार परस्परें थोडक्याच दिवसांत विदित झाले. नंतर तो महादजीशिंदा समजलाकीं, या गाडुड साहेबाशीं आपल्या कपटाच्या युक्ती चालावयाच्या नाहींत, आणि तहाच्या निमित्तें कालक्रमणा होईलशी दिसत नाहीं. ह्मणून त्याणें गोविंदरावगाडकवाडा शीं बोलणें लाविलें कीं, मीतुह्माला गुजराथेच्या राज्याचा अधिकारी करितों. असें असतां तो शिंदा आपणावर त्यासा ठेवाच्या लश्करांचा छापा एकाएकीं येऊन नपडावा ह्मणून आपल्या लश्करासभोंवत्या लहानलहान टोळ्या बसवून नोफावगैरे जडसामान पवनगडाचे नटारवाली पाठवून सावधपणें राहूं लागला. असाबंदोबस्त झाल्यावर इंग्लिशांचें लश्कर त्याच्या जवळ नीमकोसांवर उतरलें असतां त्याणें त्यास किमपि अडथळा नकेला. मगतीं दोहीं लश्करें एकमेकांची चवकशी सादिवस करीतराहिलीं होतीं. नंतर एप्रेलाचे दुसऱ्या तारिखेस गाडुड साहेब कांहीं एक लोकांची टोळी तयार करून आपल्या बरोबर घेऊन गुप्तपणें रात्रीस शिंद्याच्या लश्करावर चालून गेला, तो त्याच्या लश्कराचे सभोंवत्या टोळ्या बातमीस ठेविलेल्या होत्या त्यांस कळूं न देतां त्याच्या थोरल्या लश्कराजवळ जाऊन पोंहचला, परंतु दिवस उगवावयाचा समय झाला त्यामुळें छापाघालावयाचा बेत साधला नाहीं. तेलोक घोड्यावर तयारच होते, त्यांहीं प्रथम त्या इंग्लिशांच्या समूर उभेंराहून त्यांवर चालून जातांत असें त्यांस दाखविलें, मगते इंग्लिश त्यांजवर भडमार

करूंलागले, तेव्हां ते तेथून मागें सरून त्यांच्या गोळीचा मारचुक वून दूरउभेराहिले; तेव्हां इंग्लिशांहीं आपल्याकडचे अयोध्येच्या नबाबाचे स्वार त्यांचे पाठीस लाविले, तेव्हां ते तेथूनही दूर पळून गेले. त्या प्रसंगीं इंग्लिशांच्या पलटणीलोकांपैकीं कोणीएकही पडला नाहीं; नवाबाचे पंधरा स्वार मात्र पडले. त्यावेळेस यांपेक्षां मराठ्यांचा मारा फार झाला असेल. याप्रमाणें मराठ्यांचें लश्कर पळाल्यानें तो गाडुडसाहेब समजला कीं, आपला जय झाला, परंतु मराठे तेथून पळाले होते ते परतून येऊन तो साहेब जेव्हां डेरे देऊन उतरला तेव्हां तेही पहिल्याप्रमाणें त्यापासून तीन कोसांच्या अंतरानें डेरे देऊन उतरले, आणि पूर्वापेक्षां विशेष सावध झाले. त्यानंतर मुंबईहून मद्रासखात्याचे कांहीं लोक येऊन त्यासाहेबास मिळाले, तेव्हां त्याणें त्याच महिन्याचे एकोणिसावे तारिखेस पुनः मराठ्यांवर छापा घालावयाचा उद्योग केला. तेसमयीं मराठे उभेराहून इंग्लिशांस आपल्याजवळ बाणाच्या टप्यांत येऊं देऊन एकाएकीं त्यांजवर बाणांचीस रबत्ती करून मागें सरले.

तेसमयीं मुंबईकडे युद्धाचें कांहीं प्रयोजन लागलें यास्तव त्यासाहेबास लिहून आलें कीं, तुह्मांजवळ कारणेल हाटली साहेब आहे त्याजबरोबर कांहींलोक देऊन तो आह्माकडे पाठवून द्यावा. मग त्यास पाठविल्यावर गाडुडसाहेब उरलेले लोक घेऊन पर्जन्यकाळ जाईतों पर्यंत नर्मदेच्या कांठीं जाऊन राहिला. त्यापूर्वी सुरतेच्या साहेबानें गाडुडसाहेबास लिहिलें कीं, एथें कोणी मराठा गणेशपंत नामें लश्कर सहित आला आहे, त्यावरून त्या साहेबानें बंगाल्याच्या तुर्कस्वारांचें एक पलटण व अ

योध्येच्या नवाबाचे स्वार व कितीएक पायदळ पाठवून एप्रेलाचे तेविसावे तारिखेस त्या गणेशपंताच्या लश्करावर छापा घातला, तेव्हां त्याचे शेंसवाशें लोक मारिले गेले, आणि त्या गणेशपंताला ही फारजरवमा लागल्या, त्या कांहीं उपाय चालेनाशा होत्या. त्या च्या तीन तोफा व त्या लश्करचें बुणगें लुटून त्याचें सर्वसामान घेतलें; मग त्यालोकांहीं पारनेर व वगवारा व इंद्रगड हे तीन किल्ले घेतले. त्याच सुमारें गाडुड साहेबानें नर्मदेच्या कांठींशि नोरा समीप एक शिंद्याच्या लश्कराची टोळी होती तिजवर बंगा ल्याचे पलटणीलोक पाठवून त्यालोकांस तेथून हांकून दिलें; त्या योगें इंग्लिशांहीं गुजराथेंत नवा मुलूख जितका संपादिला होता त्यास पर्जन्यकाळ जाईतों पर्यंत कांहीं उपद्रव नव्हावासा बंदोबस्त झाला.

हाटली साहेब कोंकणांत गेला तेसमयीं मराठेलोक इंग्लिशांहीं घेतलेला कल्याण गांव तो घ्यावयास फारजमून आले होते नेमे महिन्याचे पंचविसावे तारिखेस हल्ला करून कल्याण घेणार होते, परंतु त्याचे अगोदर चोविसावे तारिखेस मध्यरात्रीं हाटली साहेब येऊन पोंहचला त्याणें एकाएकीं त्यालश्करांत शिरून त्यांचा कांहींसा नाश करून त्यांस पळविलें. त्या दिवसा पासून फार दिवस पर्यंत मराठ्यांचें मोठें लश्कर कोकणांत गेलें नाहीं.

१७ असें मुंबई कडचें वर्तमान असतां बंगाल्यांत मसलत झा लीकीं, माळव्याचे ईशानीस लश्कर पाठवून मराठ्यांशीं युद्ध करून त्यांचें चित्त आपणाकडे गुंतवून मुंबई सरकारास सुलभ पडेलसें करावें, त्यावरून दोनहजार चारशें पलटणीलोक पायदळ व पलटणीस्वार यांची एकटोळी व लहान लहान तोफा गोरे गोलं

हाजांसहित असें सैन्य तयार करून पाठविलें, नें फेब्रुवारी महिन्यांत यमुनापार उतरलें. तेव्हां गोहदशहराचे आसमंतात मराठ्यांची फौज कांहीं गांव लुटीत होती ती त्याहीं जिंकिली. नंतरला गोहदच्या राण्याचे बोलण्या वरून काल्पीच्या पश्चिमेस एक लाहोर नामें किल्ला आहे तो घ्यावयास तेउद्युक्त झाले, तेव्हां त्याइंग्लिशांजवळ भिंतपाडावया जोग्या तोफा नव्हत्या, तरी त्या लश्करचा कप्तान फाफम् नामें मुख्य साहेब होता तो आपल्या लोकांच्या शौर्यावर विश्वास ठेवून थोडकीशी भिंत पाडून हल्ला करिता जाला; तेव्हां तो किल्ला हातीं आला, परंतु जे लोक हल्ला करायास पुढें गेले होते त्यांतील दोन सरदार साहेब व सवाशें शिपाई लोक मेले गेले. असा त्यासाहेबानें तो किल्ला घेतला त्या योगें त्याची प्रशंसा झाली, परंतु त्याणें त्या पूर्वी ग्वाल्हेर नामें किल्ला तो त्याहून फार बळकट होता तथापि आपलें एकही मनुष्य नमारविता तो किल्ला हस्तगत केला तेव्हांच तो मोठा नामांकित झालेला होता. तो किल्ला घेतल्याचा प्रकार असा, तो फाफम्साहेब त्या किल्ल्यापासून पांचकोसांवर पाऊसकाळ जाईतोंपर्यंत छावणीकरून राहिला होता, तो तेथें गेल्यापासून हा किल्ला कोणत्या प्रकारें हातीं लागेल असा विचार करीत होता. त्यास तेथचें कच्चें वर्तमान गोहदच्या राण्याचे लोक कळवीत होते. त्या प्रमाणें दोन महिन्यांनीं त्यांणीं तो किल्ला हातीं लागावयास मसलत योजिली कीं, पलटणी काळ्या लोकांच्या कंपनी दोन त्यांजबरोबर चार साहेब लोक सरदार देऊन राचीसच त्यांहीं पुढें जावें. आणि त्यांचे पाठोपाठ

+ कंपनी म्हणजे ऐशीं पासून शंभर पर्यंत शिपाई असतात.

वीस गोरे लोक शिपाई व त्यांमागून काळ्या शिपायांचीं पलट णें पाठव्यावीं, अशीकल्पना करून त्या प्रमाणें रात्रीसच निघाले ते तेथें जाऊन पोंहचतांच त्या किल्ल्याचे तळची भिंत दहा हात उंच होती तिला शिडी लाँवून सर्व चढून आंत उतरले. मग त्या भिंतीच्या आंत त्यांस ऐशीं हात सुमारें चढाव लागला तोही ते चढून गेले. त्यापुटें दुसरी भिंत वीसहात उंचीची लागली ते ठां त्याज बरोबर जे त्यांस माहितगारी करून देणारे लोक होते ते बहुत युक्तीनें त्या भिंतीवर चढले, आणि तेथून दोरीचीशि डी लाविली, मग त्यावरून एकेक शिपाई चढून आंत उतरून त्याभिंती जवळच बसले. या प्रमाणें वीस शिपाई व एक साहेब आंत उतरून गेले, इतक्यांत त्यांतल्या तिघां शिपायांहीं फार वेडेपणा केला तो असा, तेथें कोणी शत्रूचे लोक निजले होते त्यां वर बंदुकेचे बारटाकिले त्या योगें ते आंतले लोक जागे होऊन त्यां वर चालून आंले, तेव्हां ते वीस शिपाई व तो साहेब त्या लोकांशीं चांगले लढूं लागले तोंच त्यांचे मागून दुसरे लोक मोठ्या खरेंनें ये ऊन येऊन विशेष जमाव होत चालिला, तो पाहून ते लोक पळालें नंतर सूर्योदयसमयीं आगष्ट महिन्याचे चवथ्या तारिखेस तो किल्ला इंग्लिशांचे स्वाधीन झाला.

८ तेचराचीं कोंकणांत पनवेली जवळ मोठा बळकट बा वामलंगड नामें किल्ला आहे तो मुंबईच्या कोंकणांतून फार चम त्कारिक दिसतो, त्यावरही इंग्लिशांहीं जाऊन छापा घातला, परं

+ त्यासमयीं वीस गोरे पुटें नेमिलेले यावें कारण असें कीं, ते पुटें गेल्यास कदाचित् शत्रु सावध होतील.

तु त्याप्रमाणें तेसमयीं तो किल्ला हस्तगत नझाला. ते छाया घालणा रे लोक त्या किल्ल्याचे माचीस गेले, परंतु त्या किल्ल्याचे लोकांन मिसळल्याचे पूर्वीचि ते किल्ल्यावरचे लोक सावध होऊन पळून बाले किल्ल्यावर चढले. तोडींगर अवघड यांस्तव त्यांचे पाठीस लागून इंग्लिशांच्या शिपायांस वरजावयेना, तेव्हां ते रवाली च राहून त्या वर गेलेल्या लोकांला वरच कोंडिते झाले.

त्या वर्षी मुंबई सरकारांत द्रव्याच्या तोठ्या मुळें पुढें व्यवस्था कोणे प्रकारची होईल असा विचार पडला, त्यावरून त्यांहीं बंगाल्यास लिहिलें त्याचें उत्तर आलेंकीं, यासमयीं हैदर अल्ली मोठ्या लश्करासहित अर्काट प्रांतीं आला आहे यासंकटा मुळें आत्माकडून पैक्याची तरतूद होणार नाहीं. तेव्हां मुंबई सरकारांत असें ठरलेंकीं, मराठ्यांचा कोंकणांतील मुलूख घेऊन वसुलाचा ऐवज जमा करावा. तेवेळेस मुंबईच्या कोठींत दहा बारलक्षांचें तांबें होतें तें विकून पैका केला, मग जनरल गाइडसाहेब यास वसई किल्ला घ्यावयाची आज्ञा झाली. नंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्याणें येऊन वसई किल्ल्यास घेरा घातला, आणि कारणेल हाटली साहेब यास पांच पलटणी देऊन कोंकणांतील मराठ्यांचीं ठाणीं उठवून वसुलाचा बंदोबस्त करावयास सांगितलें, परंतुजेलोक बावा मलंगड घ्यावयास घेरा घालून त्यावरच्या लोकांस प्रतिबंध करून राहिले होते त्यांवर मराठ्यांचे तीनहजार लोकजाऊन त्यांहीं त्यासंभोंवता वेढा घातला होता यासाठीं त्याकारणेलास तेलोक सोडावयाचें काम आधीं करावें लागले. हाटलीसाहेबानें तें कार्य फार युक्तीनें करून मराठ्यांचें लश्कर कोंकणांतून पार घालविलें, आणि आपण बोरघाटाखालीं जाऊन आपल्या लोकांसहित रा

हिला. नंतर तेथून कोंकणचा वसूल मुंबईसरकारा कडे जमा होऊं लागला.

९ इकडे पुण्यांत हरीपंत फडके व नानाफडनवीस मि ळून कोंकणांतील मुल्लूख इंग्लिशांपासून सोडवावा व वसई किल्ल्याचा घेरा उठवावा याविषयीं फार उद्युक्त झाले, परंतु त्यां ची तयारी तशी झाली नव्हती म्हणून तेवेळीं त्यांहीं रामचंद्रगणे श व आनंदराव रास्ते व परशुराम भाऊ पटवर्धन यांस कोंक णांत पुढें पाठवून मग त्यां मागून जोजो सरदार आला तो तो एक एकटाच त्यांच्या कुमकेस पाठवून दिला; त्यामुळें कारणेल हाट ली साहेबत्यांचे वाटेवर होता म्हणून त्याच्या लश्करास प्रतिदिव शीं युद्ध करावें लागलें. असा एक महिना गेला, तेव्हां त्याच्या लोकां न जखमी व अजारी मिळून सहाशें लोक निरुपयोगी झाले; आ णि त्याणें वसुलाच्या कामास कोंकणांत जागो जाग लहान लहान टोळ्या पाठविल्या होत्या त्यायोगें त्याजवळ दोनहजारांवर कांहीं से अधिकलोक मात्र राहिले. तेसमयीं तोसाहेब मराठ्यांस जिं कून वसुलाचा आटोप आपणास होणार नाहींसें जाणून बोरघा ट सोडून निघून वसईचे पूर्वेस साडेचार कोसांवर दुधारा पाशीं ग णें धरून राहिला. तेव्हां रामचंद्रगणेश समजलाकीं, कार्णेल व- सईकडे गेला यास्तव तो घेरा उठवावायाचें कार्य शेवटास जाणा र नाहीं, त्यावरून तो मोठ्या रागानें कारणेलाच्या लश्कराचा ना श करावयास उद्युक्त झाला. त्याणें दिसेंबराचे दहावे तारिखेस पायदळ व स्वार मिळून वीसहजार फौजेसहित येऊन नीनवे ळां त्या कारणेल साहेबाच्या लश्करावर हल्ला केला, परंतु त्या इं ग्लिशांहीं तिनवेळां तो मारा हटविला. त्यांतील एका हल्ल्यांत

रामचंद्र गणेश याची पांचहजार स्वारांची टोळी इंग्लिशांचे पलटणाचे डावे बाजूवर चालून मोठ्या वेगानें येऊन पडली, तेव्हां इंग्लिशांचे जखमी व मेलेले मिळून अठराशिपाई व दोघे साहेब पडले. असें तें युद्ध झालें, परंतु ते इंग्लिशांचे लोक मोठ्या स्थिरतेनें वागले, त्या योगें त्या दिवशीं त्यांचा आणखी नाश न झाला.

दुसरे दिवशीं मराठ्यांचे स्वार यांहीं त्यांजवर हल्ला केला नाहीं तथापि त्यांच्या मोठमोठ्या तोफांच्या मारानें इंग्लिशांचे मेले व जखमी मिळून शें सवाशें शिपाईलोक व दोघे साहेब पडले. त्या दिवशीं इंग्लिशांहीं आपल्या लश्कराच्या डाव्या व उजव्याबाजूच्या दोहों टेंकड्यांवर लश्कराच्या संरक्षणार्थ दोन तोफा ठेविल्या, त्या युद्धाच्या कामास बऊन उपयोगी झाल्या, परंतु त्यांच्या नाशाविषयीं मराठे फारउद्युक्त झाले असें इंग्लिशांस दिसूं लागलें. त्यावरून कारणेल हाटली साहेब याला समजलें कीं, उद्यां निःसंशय शत्रू या दोहों टोल्यावरच हल्ला करितील, यास्तवास्तवणें तेच रात्रीं त्यांच्या बंदोबस्तास त्या दोहों टेकड्यांवरून एकेक तोफ ठेविली, आणि त्यांसभोंवते तट व खंदक केले. दुसरे दिवशीं सूर्योदयानंतर तीन घटिका दिवसास त्यांतील उजवे बाजूच्या टेंकडीवरच्या लोकांस समजलें कीं, आपणावर मराठे यांची तयारी झाली, परंतु त्या वेळीं धुकें फार होतें त्या योगें तेलोक केवळ त्याच्या समीप आले तरी त्यांस समजलें नाहीं. मगएकाएकीं तें धुकें जाऊन सूर्यप्रकाश स्पष्ट झाला तेव्हां त्यांस असें दिसलें कीं, आपल्या पाठी मागें व पुढें आपल्या शत्रूचे स्वार व उजवे बाजूनें पायदळ व कवाईत शिकविलेले पेशव्याचे पलटणीलोक आप-

णावर चालून येतात, ते समयीं ते इंग्लिशांचे टेंकडीवरचे लोक यां णीं त्या मराठ्यांवर फार त्वरेनें गोळ्या घातल्या असतांही मराठ्यां च्या मोठ्या लश्कराच्या तोफांचा मार त्यांवर पडून त्यांचा फार ना श झाला; तरी ते मागें हटेनांत, आणि त्यांचे पायदळ लोकही बार करीत करीत पुढें चालून येऊं लागले असें असतां एकाएकीं मराठेलोक झटून लढेनातसे झाले; आणि कोणा मोठ्या सरदारा चें प्रेत मराठे माघारें घेऊन जातात असें इंग्लिशांहीं पाहिलें, मग त्यांस तो रामचंद्रगणेश पडला असें समजलें. तो पडला ते क्षणीं त्यांच्या पलटणी लोकांचा सरदार पोर्टुगीस तोही जखमी झाला, यास्तव मराठे तें युद्ध सोडून निघून गेले. अशी दुधा राजवळची लढाई झाली; त्यांत मुंबईचे शिपाई लोक यांचा जय होऊन मोठा मान पावले. त्याचे पूर्वदिवशीं गाडुडसाहे ब यास वसई किल्ला तेथचा किल्लेदार निरुपाय होऊन देता झाला. मग तो साहेब तेथून उठून कारनेल हाटली साहेबाचे कुमकेस गेला. तेव्हां तीं दोन लश्करें एकत्र झालीं त्यांत आप-त्यापेक्षां दुसरे मोठमोठे साहेब आलेले पाहून तो कारणेल हाटली साहेब सरकारची आज्ञा घेऊन विलायतेस गेला.

१० त्यानंतर जनराल गाडुडसाहेब यास वर्तमान कळ ले कीं, कलकत्यांतील मुख्य साहेब याणें मुधोजी भोंसला याच्या द्वारें मराठ्यांशीं स्नेह करून त्यांचे द्वारें इंग्लिशांस बुडविणारे हैद र व निजाम यांस जिंकावया विषयीं उद्योग केला, या प्रमाणें स मजताच त्याच्या मनांत आलें कीं, जर मी यासमयीं पुण्यास गे-लोंनर ही बंगाल्याची मसलत सिद्धीस लवकर जाईल. त्यावरू न तो आपले लश्कर घेऊन बोर घाटावर चालिला. ते समयीं हरी

पंत फडका कोंकणांत होता तो पुण्यास गेला, त्याणें जातांजातां बो
रघाटांत वाटेच्या प्रतिबंधार्थ कांहीं लोक ठेवून आपण पुढें गेला.
त्या मागून इंग्लिशांचे लोक येऊन त्या घाटांतील लोकांचा तात्काळ
पराजय करून घाटावर चढून खंडाळ्याजवळ उतरे देऊन उतरले,
परंतु तो जनराल गाडुड साहेब आपण कितीएक लोकांनिशीं त्या
घाटा खालींच खोंपवलीस राहिला. त्यावेळेस इंग्लिशांचे लश्क
र साडे सहाशें सुमारें गोरे लोक व साडेपांचहजार सुमारें काळे लो
क इतके होते.

पुण्यांत नानाफडनवीस याणें इंग्लिश जवळ आल्याचें कि
मपि भयन मानितां आपल्या लश्कराची तयारी आरंभिली; आणि
कितीएक नवेनवे लोक ही ठेवावे व कारण पडल्यास पुणेंशहर
व तंथपासून खंडाळ्यापर्यंत मुलूख उद्ध्वस्त करावा असा बेत केला.
तेव्हां जनराल गाडुड साहेब याणें मुधोजी भोंसला याशीं व कल्लक
त्याच्या साहेबाशीं तह झाल्याचा प्रकार त्या नानाफडन विसास लि-
हून समजाविला, तो त्याणें नमानून उत्तर दिलें कीं, हें वर्तमान आ-
त्यास मुधोजीनें लिहिलें नाहीं, आणि हेंदर अल्लीतर आमचा वि
भागीच आहे; त्यावरून जनराल गाडुड साहेब मनांत असें योजि
त होता की, आपणास पुण्यास जाऊन पुणें घ्यावयाचें सामर्थ्य
नाहीं, पण मराठ्यांस उगीच धमकी दाखविल्यानेंच बंगाल्याचीम
सलत सिद्धीस जाईल, परंतु नें न झालें.

त्यावेळेस नानाफडनवीस याणें परशुराम भाऊ चरोवर बारा
हजार फौज देऊन त्याणें कोंकणांत जाऊन गाडुड साहेबाच्या लश्क
राच्या कोठीस उपद्रव करावा, आणि मुंबईची वाट बंद करावी. अ-
शी योजना केली; आणि आपल्या चरोवर हरीपंतफडके व तुकोजी

होळकर यांस मोठया लढाईस सहित घेऊन आपण सत्याद्रीकडे चालिला. तेसमयीं माधवराव पेशवा सुरंद्रीं पाठविला, तेव्हां तो सातां वर्षांचा होता.

तेवेळेस मद्रासेकडे हैदर अली वरून उपद्रव करीत होता, त्या सारिखा शत्रु त्या इंग्लिशांस त्यापूर्वी कधींही भेटला नाहीं. त्यणून त्यांहीं मुंबई सरकारास लिहिलेंकीं, या समयीं तुह्मीं आमची कुमक करावी. हेंन होयतर आमचें जेंव्हढें पूर्वी तुह्माकडे आलें आहे तें आमचें आह्माकडे पाठवावें. असें पत्र पाहून मुंबई सरकारांत असें ठरलेंकीं, गाडुडसाहेब घाटावर गेला आहे त्यास मुंबईकडे बोलावून समुद्रकांठीं हैदर अलीच्या मुलखीं दोन पलटणें पाठवून त्याहैदराशीं युद्ध चालवावें, व मद्रासेचे लोक मद्रासेस पाठवावे, असें होऊन गाडुडसाहेबास आज्ञा गेली. तेसमयीं त्यासाहेबानें आपलीं तीन पलटणें तोफखान्या सहित व सातशें स्वार मुंबईहून लष्करी सामान आणावया करितां पनवेलीस पाठविले होते त्यांची तो मार्गप्रतीक्षा करीत होता. मग तें लष्कर सामान सुद्धां एप्रेलाचे चवथे तारिखेस खोपवलींत

+ तें सामान आणणारे लोक यांस लुटावया करितां परशुराम भाऊ याचे कुमकेस नाना फडनविसानें लुकोजी होळकर पाठविला, तोजाऊन त्या समिळाला, तेव्हां त्या दोघांचे मिळून लष्कर सुमारें पायदळ व बाणदार स्वारी जमकरून पंचवीस हजार स्वार जमा झालें. त्यांशीं लढत लढत इंग्लिशांचे लोक तें आपलें सामान संभाळून पनवेलीहून निघाले ते तीन दिवसांनीं खोपवलीस पोंहचलें. तों पर्यंत त्या युद्ध प्रसंगेंकरून त्या लष्करांतील लोक मेले व जखमी मिळून एकशें सहा काले पलटणी शिपाई व पांच साहेब पडले.

येऊन पोंहोचलें. नंतर तो साहेब तेथून निघून मुंबईस जावया ची तयारी करूं लागला; त्यांत प्रथम त्याणें आपले लोक मोठ्या मोठ्या नौका वगैरे सामान लुटून नेलें. तेसमयीं वरकड मराठे सरदार ही इंग्लिशांच्या नाशाविषयीं पूर्वीपासून त्यासमयाची वाट पहात होते, त्यांत नुकोजी होळकर पंचवीस हजार स्वारासहित कुसुरघाटाचे पायीं उतरला होता, आणि परशुराम भाऊ तो बारा हजार स्वारां सहित भिमाशंकराजवळ पडला असे, तेही त्या हरीपंत फडक्या बरोबर इंग्लिशांच्या पाठीस लागले. ते दिवशीं दोन प्रहरांवर दोन घटिका पर्यंत गाडुड साहेब यास त्यालोकांशीं युद्ध करितां करितां खोंपवलीहून चौका पावेतों पोंहचे तों पर्यंत डेरे देऊन उतरावयास अवसर सांपडला नाहीं. मग दुसरे दिवशीं त्या साहेबास त्याहून मोठ्या फौजेनिकरानें युद्ध करावें लागलें; त्या प्रसंगीं त्याणें बंगाल्याचे लोक आपल्या लश्कराच्या पाठीमागे चालविले होते त्यांवर मराठ्यांचा मार विशेष पडला. मग त्यादिवशीं मध्यें एक मुकाम करून दुसरे दिवशीं ते विसावे नारिखेस तो गाडुड साहेब आपल्या

पलटण सहित पनवेलीस पोंहचला. तेवेळेस बंगाल्याचें सहावें पलटण व मुंबईचें तेरावें पलटण हीं दोन्हीं त्या लश्कराच्या पाठीमागचे टोळींत बुणग्याच्या रक्षणार्थ नेमिलीं होतीं, तीं विशेष युद्धप्रसंगें करून मोठ्या योग्यतेस चढलीं. त्या दोहीं पलटणाचा मुख्य बंगाल्याचा करणेल पारकर नामें साहेब होता तो त्या लढाईतच मृत्यु पावला; आणि गाडुड साहेबाचे मेले व जखमी झाले मिळून चारशें अठेचाळीस काळे शिपाई व अठरा साहेबलोक पडले. असा नाश पावून इंग्लिश खोंपषलीकून मुंबईकडे गेले, त्यावरून मराठे आपण जय पावल्याची प्रसिद्धि लोकांत करूं लागले, परंतु त्यांत त्यांचा नाश नव्हे तसा नव्हता.

यानंतर इंग्लिश महिना दीड महिना पनवेलीस राहून मग तेथून कल्याणास जाऊन पर्जन्यकाळ जाईतों पर्यंत तेथें छावणी करून राहिले. इतकें होई तोंपर्यंत मराठ्यांच्या लश्करांतील सरदार माधवराव रामचंद्र बरोबर दहा हजार स्वार घेऊन गुजराथेंत गेल्या; आणि कोंकणच्या किल्ल्यांच्या बंदोबस्तास प्रतिकिल्ल्यावर पहिल्याप्रमाणें शिबंदी वाढवून बाकी उरलेले लश्करीलोक सर्वनिघून आपआपल्या ठिकाणांस गेले.

११ असें मुंबईकडचें वर्तमान असतां गोहदच्या राण्याचे कुमकेस जाऊन ग्वाल्हेर घेऊन मग माळव्यांत शिरून शिंद्यांस हस्तगत करून सरोज पर्यंत गेलेलें जें इंग्लिशांचें लश्कर तें खोडेर घालवावयास महादजी शिंदा येऊन त्या इंग्लिशांच्या लश्करास आसमंतात कोंडून सात दिवस त्यांच्या डेऱ्यावर मोठ मोठ्या तोफांचे गोळे डुलून डाकिना झाला; तेणें करून इंग्लिशांस तें स्थळ सोडून जाणें प्राप्त झालें. तेव्हां तो साहेब कोणास न कळतां मा

चौथे महिन्याचे सातवे तारिखेस मध्यरात्रीं उठून निघून गेला. मग दिवस उगवल्यावर तो साहेब गेला असें समजून शिंदा लश्कर सुद्धां त्याचे पाठीस लागला. तो वाटेनें दिवसास त्याबरोब युद्ध करी आणि रात्रीस त्यापासून दोन कोसांच्या अंतरानें मोठ्या सावधपणें राहून असें. याप्रमाणें चौविसावे तारिखे पर्यंत त्या साहेबानें आपलें लश्कर मात्र संभाळिलें, त्या शिंद्यावर हल्ला केला नाहीं. त्या वरून तो शिंदा पूर्वीं जिसा रात्रीस सावधपणा ठेवीत असे तसा ठेवीनासा झाला. नेहमीं इंग्लिशतर त्याच्या असावधपणाची संधी पहातच होते; त्यांस ती संधी सांपडतांच त्यांणीं चौविसावे तारिखेस रात्रीं त्या शिंद्याच्या लश्करावर छापा घालून त्याचे बहुते कलोक मारिले, आणि त्याच्या तेरा तोफा व तीन हत्ती व थोरला झेंडा व कितीएक उंट व कितीएक घोडे लुटून घेतले, आणि तें सर्व लश्कर हां करून दिलें. मग पर्जन्यकाळीं ते इंग्लिश त्या शिंद्याच्या मुलुखांतच राहिले; आणि त्यांहीं पूर्वी ग्वाल्हेर किल्ला घेतला होता तो गोहदच्या राण्याचे स्वाधीन केला. त्यासमयीं कलकत्त्याचा मुख्य साहेब व याणें ही त्यामुलुखा समीप राहणारे जे रजपूत लोक यांणीं मराठ्यांचा पक्ष सोडून आपणास वश्य व्हावें यासाठीं उद्योग केला, परंतु तो शेवटास गेला नाहीं. • गोहदचा राणा मराठ्यांशीं वक्र व्हावा या आशेनें त्यास ग्वाल्हेर किल्ला दिला, तरी तो आपल्या सामर्थ्या प्रमाणें मराठ्यांशी विरोध करीना.

१२ त्या वेळेस कलकत्त्यांत मसलत ठरली कीं, मद्रासेचे कुमकेस सहा पलणें पायवाटेनें पाठवावीं, त्या प्रमाणें पायवाटेनें सहापलटणें पाठविलीं. तेसमयीं त्यास अडथळा न होण्या विषयीं मुधोजी भोंसल्या व कलकत्त्याचा साहेब यांची कांहीं गुप्तरूपें समजून पडली होती. तो मुधोजी भोंसल्या पेशवे व वरकड म

वलाणें स्या तह नाम्यावर आपली मान्यता लिहावयास तं वर्ष वाट पास जाईतों पर्यंत विलंब केला, परंतु तो हैदर अल्ली दिसंबराचे सातवे तारिखेस मृत्यु पावला, तेणेंकरून स्या नाना फडनविसास नेविसावे तारिखेस स्या पत्रावर मान्यता लिहिणें प्राप्त झालें.

१४ याच अवकाशांत इंग्लिशांहीं वडगांवच्या तहांत शिंधास भडोंच किल्ला देऊं केला होता त्या प्रमाणें त्याच्या स्वाधीन केला.

१५. हैदर अल्ली मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र टिपू यास त्याचे जागीं स्थापिलें. तो मराठ्यांस दारवीकीं, आपण साल्ष्याच्या तहास मान्य आहोंत, परंतु इंग्लिशांशीं युद्ध प्रसंगकरण्याविषयीं त्याणें अंतर न केलें. मग महादजी शिंदा त्याहैदराच्या पुत्रास निर्वीत असतां त्याणें तें नमानिलें, त्यावरून महादजी शिंदा मराठ्यांचें व इंग्लिशांचें लश्कर एकत्र करून त्यावरजावें अशी मसलत करूं लागला. तेसमयीं नाना फडनविसास ही त्या कामांत आपलें हित आहेसें समजत होतें, परंतु त्या महादजी शिंद्याचा उत्कर्ष होईल म्हणून त्या विषयीं त्यानाना फडनविसास मत्सर उत्पन्न झाला, यास्तव त्याणें ती मसलत लांबविली. इतक्यांत मद्रासचे इंग्लिश यांहीं केवळ आपल्याच हितार्थ टिपूचा उपद्रव आपणास न लागावा म्हणून साल्ष्याच्या तहाप्रमाणें तो बेत नष्ट विता त्या निराळा त्या टिपूशीं तह केला. हें वर्तमान कलकत्त्याच्या मुख्यास कळतांच तो क्रुद्ध होऊन त्याच्या मनांत आलें कीं, तो तह मोडावा, परंतु मद्रासकरानें तें काम बळुनेक शेवटास नेलें म्हणुनें त्याचा उपाय चालेनासा झाला. ती गोष्ट

साल्याच्या तहानिराळीशी जाणून मराठे रुष्ट झाले, तेसमयीं त्याच्या रोषाच्या शमनार्थ कलकत्त्याच्या साहेबानें मराठ्यांची समजूत पाडिली कीं, मद्रासकर यांहीं माझे आज्ञेचा भंग केला.

१६ नानाफडनवीस याच्या मनांत पूर्वीपासून होतें कीं, टिपूला सामर्थ्यहीन करावें, यासाठीं त्याणें निजामाशीं स्नेह करून त्याउभयतांहीं संकेत ठरविला कीं, निजामापाशीं खंडणीची बाकी मागावयाचे मिषेंकरून नानानें फौजेसहित आपले देशाचे मर्यादिपर्यंत जावें; आणि निजामानेंही त्याखंडणीबाबद कांहींबोलण्याचें निमित्त करून फौजेसहित त्याठिकाणीं येऊन पोंहचावें; मग ने उभयतां एकत्र मिळून हैदरावर स्वारी करावी. त्यांतजो लाभ होईल त्यापैकीं इंग्लिशांस भाग न द्यावा, यासाठीं त्यांची कुमक ही घेऊ नये. या प्रमाणें गुप्त मसलत ठरवून नानानें निजामास व टिपूस एकदांच, खंडबाकीचें मागणें केलें, तें टिपूनें मान्य करून उत्तर दिलें कीं, सांप्रत आपणाजवळ ऐवज नाहीं; निजामानें लिहिलें कीं, या प्रकरणीं बोलणें करावयास आपण फौजेसहित येदगिरास यावें, आम्हीही लश्कर सुद्धां तेथें येतों, मग दोघांच्या बेताप्रमाणें ठराव होईल. असें झाल्यावर नाना व निजाम हे उभयतां संकेताप्रमाणें लश्कर सुद्धां भीमा व कृष्णा यांच्या संगमाजवळ त्या संकेतस्थलीं येदगिरास एकत्र मिळाले. ते समयीं त्याउभयतांचें बोलणें त्या बाकी प्रकरणीं माव प्रसिद्ध पणें झालें, आणि दुसरें बोलणें हैदरानें निजामाचा व मराठ्यांचा मुलूख पेतला होता तो मांघारा द्यावा व टिपूवर मोहीम करावी, या विषयीं जो संकेत झाला तो गुप्त रक्षिला. आणि ते समयीं तें काम न सेंच राहिलें, कोकीं, निजाम आपलें सामर्थ्य वि

शेषसें जाणून नानास अगोदरच असा विभाग मागूं लागला कीं, त्या प्रमाणें नानास कबूल करवेना. मग इनकेंच ठरलेंकीं, दूर्त हें काम असेंच रहावें, पुढें जेझां उभयतांचे एकमतें ठरेल तेझां करतां येईल. नंतर ते दोघे आप आपले ठिकाणीं गेले. त्यांत निजामअल्ली आपली राजधानी हैदराबाद येथें पोंहचतांच त्यास वर्तमान कळलें कीं, टिपू फौजे सहित येऊन छत्र्याचे दक्षिणेस मोंगलांचे मुलखीं स्वारी घालणार आहे; आणि त्यावेळेस त्या टिपूनें ही निजामास खेद उत्पन्न होईसा निरोप पाठविला कीं, तुझी विजापूरचा धनीपणा करितां तो खोटा, त्यास तें स्थळ माझे स्वाधीन करा. यावरून असें वाटतें कीं, निजामाचा व नानाफडनविसाचा गुप्त तह झाला तो टिपूला कळला असेल.

तो निरोप पोंहचतांच निजाम अल्लीनें नानाफडनविसास आपल्या कुमकेस बोलाविलें, परंतु तो नाना आपल्या राज्यांत कांहीं कामास गुंतला, आणि त्याच्या लश्कराची ही तयारी ताबडा नव्हती, म्हणून निजामानें आपला वकील टिपूजवळ होता त्याचे हातून तो अनर्थ शमविला.

१७ नानाफडनवीस कामास गुंतला म्हटलें तें असें, त्यास वर्तमान कळलें कीं, माधवराव नारायण यास पदच्युत करून गादीचा अधिकारी रघुनाथरावाचा पुत्र बाजीराव करावा, अशी मसलत बऱ्हाणपूरजणांनीं फार दिवसांपासून केलेली आहे ती सिद्धीस जाईल, यास्तव तें बंड मोडावया विषयीं त्यास यत्न करावा लागला. त्यावेळेस रघुनाथराव यानें कुटुंब साल्याच्या सहा प्रमाणें कोंपर गांवीं होतें; आणि तो रघु

नाथराव तेथें गेल्यावर दोन तीन महिन्यांनीं मृत्यु पावला होता, ते समयीं त्याची स्त्री आनंदीबाई गरोदर होती ती त्याच्या मरणा नंतर थोडक्याच दिवसांनीं प्रसूत झाली, तो पुत्र जन्मला, त्या चें नाव चिमणाजी आपा. रघुनाथरावाचे मृत्यु समयीं बाजीरा व नवांवर्षांचा लहान असतांही त्या रघुनाथरावाचे पक्षपाती व नानाफडनविसादींकरुष्ट झालेलेजे लोक होते ते सर्व मिळू न त्या बाजिरावाला गादीचा अधिकारी करावयास उद्युक्त झा ले असत. नेहमीं नानाफडनवीस याणें त्या कोंपरगांव प्रकरणीं मं डळीस किमपि उपद्रव न देतां त्यांचा विश्वासभाव नठेविला.

मग पुढें रघुनाथरावाचे पुत्र बाजीराव व चिमणाजी आपा यां-चा आणि नानाफडनविसाचा द्वेष पडला, त्याचें कारण हेंच.

१८ रघुनाथरावाच्या पुत्रास गादीचा अधिकारी करणारे जे लोक यांत महादजी शिंदा मुख्य लें आहे अशी त्यावेळेस वदंता उठली होती, परंतु ती खरीच असेल असा निश्चय करितां येत नाहीं. त्यांत इतकें मात्र खरेंकीं, नानानें निरंतर चिंतेंत असावें या विषयीं महादजी शिंदा यास मोठी आवड होती, परंतु तें सि द्धीस न्यावेंच असा त्याचा मनोरथ नसेल; उगेंच त्या नानाला भयमात्र असावें इतकेंच असेल. कांकीं, त्याचें मन पुण्याच्या कारभारांत फारसें नव्हतें, तो हिंदुस्थानांत आपली श्रेष्ठता वाढवावयाविषयीं अत्यंत उद्युक्त होता, त्याच्या उद्योगाचा प्रकार समजावयासाठीं संनसवाशें ब्याहत्तरांत मराठ्यांहीं हिंदुस्थान सोडिलें त्यापासून तिकडे काय काय वर्तमान झालें तें ध्यानांत आलें पाहिजे.

मराठ्यांहीं दिल्ली घेतली तेसमयीं तेथच्या बादशाहाचा

सेनापती नजीफखान यास पदच्युत केलें. मग मराठे दक्षिणेम आल्यावर तो पुनः अधिकारावर कायम होऊन निकडेम राठ्यांचीं ठाणीं होतीं तीं उठवूं लागला; आणि बंगाल्याचा नवाब सुजाअदवला तोही तसाच वागत असतां त्याच्या मनांत आलें कीं, आपण नजीफखान यास मिळून नर्मदेच्याउत्तरेस जितके मराठे असतील तितके हांकून द्यावे, परंतु तोसुजा अदवला संनसत्राशें पंचाहात्तरांच्या जानेवारींत मृत्यु पावला त्यामुळें तें तसेंच राहिलें.

१०. त्या सुटें नजीफखान दिल्लीच्या बादशाहाचा सर्वकारभार फार चातुर्यें करून मुख्यत्वें आपण करूं लागला, तो संनसत्राशें ब्याण्णवीच्या एप्रेल महिन्यांत मृत्यु पावला. तेव्हां त्याचा दत्तपुत्र होता तो व तेथचे दरबारीलोक यांचीं बऊन भांडणें होऊन मग त्याशीं विरोध करणारे ते बऊतेक त्यास गेले; त्यापेकीं साल्म्याच्या तहाचे वेळेस एकमात्र त्याचा विरोधी राहिला होता. मग दुसरे वर्षी तो दत्तपुत्र याच्या स्वाधीन तो बादशाहही झाला असतां त्याणें त्याशत्रूपेक्षां आपलें सामर्थ्य कमीसें जाणून दुसऱ्या कोणा बळवानाचें इष्टत्व संपादन करून त्यास जिंकावयाचा उद्योग आरंभिला. त्यांत प्रथम त्याणें इंग्लिशांकडे यत्न केला तो साधेना यास्तव शिंद्याकडे यत्न करिता झाला, तेव्हां शिंद्यानें तात्काळ तें अंगिकारून तो महादजी शिंदा व तो दत्तपुत्र यांची आग्र्यामध्यें भेट झाली, परंतु थोड्याच दिवसांत तो दत्तपुत्र मारेकरी यांणीं मारिला. त्यानंतर शिंदामुख्यत्वें दिल्लीचा कारभार करूं लागला, त्यावर बादशाहाची कृपा होऊन बादशाहानें त्यास आपला सेनापती करून दिल्ली व आग्रे हीं

दोघीं त्याचे स्वाधीन केलीं.

२० असा शिंद्याचा उत्कर्ष झाल्याचें वर्तमान पुण्यास येऊन पेशवे व नाना फडनवीस वगैरे कारभारी यांस विस्मय आणि आनंद झाला. त्यावरून पेशव्यांहीं एक फौजेची टोळी त्या शिंद्याकडे पाठविली; त्यांत अर्थ असा कीं, याला भांत पेशवे यांचा अंश आहे सें सर्वत्र प्रसिद्ध व्हावें. याप्रमाणें तो शिंदा योग्यतेस आला तेव्हां त्यास असा गर्व झाला कीं, नाना फडनवीस व होळकर हे आपला मत्सर करितील, हा अर्थ त्याच्या मनांतच नआला; आणि तो केवळ उन्मत्त होऊन त्यांणें इंग्लिशांकडे बंगाल्याची ही चौथ मागितली. तेव्हां तेथच्या मुख्य साहेबानें त्याचा धिक्कार करून त्यापासून उलटें असें लिहून घेतलें कीं, तुम्हाजवळ आम्ही मागणें केलें ही आम्हापासून चूक झाली. त्या शिंद्याचा मानहलका करावा विषयीं नाना फडनवीस इंग्लिशांस म्हणत होता कीं, तुमचा कोणीएक साहेब आम्हाजवळ असावा, केवळ शिंद्याच्याच हातें कारभार न चालावा, असें असतांही ते इंग्लिश आपला साहेब देत नव्हते, परंतु तो शिंदा उन्मत्त जेव्हां दिसला तेव्हां त्यांहीं ती गोष्ट मान्य केली. ते समयीं त्यांहीं पुण्यास मालिट साहेब नामें आपला वकील पाठवावयाचें मान्य केलें, असें वर्तमान संनसत्राशें पंचायशींत पडलें.

भाग पंचविसावा.

संनसवाशे पंचाएशी पासून नवद पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ टिपूनें निजामास जें लिहिलें होते कीं, विजापूर माझे स्वाधीन करा, त्या धमकीवर्णीत अर्थ इतकाच कीं, तुम्ही व पेशवे मिळून ज्या ज्या मसलती करितां त्या सर्व मी जाणतों. कां कीं, ते समयीं टिपूनें निजामावर चालून जावें अशी त्याजवळ फौजेची तयारी नव्हती; आणि निजामानेंही त्यास उलट गोष्ट सांगावी अशी त्या निजामास ही शक्ति नव्हती; म्हणून त्या उभयतांचा तह श्रीरंगपट्टणा जवळ झाला तो त्याउभयपक्षीं निर्बळतेनें मुळेंच ठरला. परंतु तो फार दिवस टिकणार नाहीं असें ते दोघे जाणत होते. वास्तव तो तह झाला तरी युद्धोपयोगी लष्कराची सिद्धता व आपल्या मुलखांतील किल्ल्यांचा बंदोबस्त यानें करून करीत होता त्याची सिद्धता झाल्यावर त्या टिपूनें तेसमयीं युद्ध उत्पन्न होण्यास कांहीं निमित्त केलें, तें असें, मलप्रभेचे दक्षिणेस सहा कोसांवर नरगुंदनामें किल्ला आहे तो व त्याच्या आसमंतानू भाग चा मुलूख तो कोणी देसाई ब्राह्मण याच्या स्वाधीन होता, तो देसाई पूर्वी मराठ्यांस त्या देशाची खंडणी देत असे. मग हैदरानें कृष्णेचे दक्षिणेकडचा मराठ्यांकडील मुलूख घेतला त्यांनच तो देसायाचाही मुलूख त्याजकडे गेला, तेव्हां तो देसाई त्या हैदरास मराठ्यां प्रमाणें खंडणी देऊं लागला. पुढें तो हैदर मेल्यावर टिपू त्या देसायाकडे अमर्याद मागणें मागूं लागला, तेव्हां तो ब्राह्मण पेशव्यांस शरण गेला; त्यावरून त्या टिपूस त्यां

हीं निषेधून सांगितलें कीं, जहागीरदार आपल्या मार्गानें वा गत असतां दुसरी मुद्दा झाली तरी त्यापासून अधिक घेणें हें ठीक नव्हे. त्यावर टिपूनें उत्तर केलें कीं, मी आपल्या राज्यांत इच्छेस येईल तसें आपल्या प्रजेपासून घेईन. असें उत्तर ये ण्याप्रमाणें करून तिकडे लश्कर पाठवून त्यास आज्ञा दिली कीं, जर तो देसाई ब्राह्मण आम्ही पैका मागितल्या प्रमाणें नदेईल तर तो किल्ला घ्यावा. यानंतर नें लश्कर जाऊन त्याणें किल्ल्यास घेरा घातला, तेव्हां त्या ब्राह्मणाचे कुमकेस मराठ्यांकडून गणेश पंत बेहरे व परशुराम भाऊ पटवर्धन हे लश्कर सुद्धां तिकडे गेले. त्यासमयीं टिपूचा वकील पुण्यांत होता म्हणून नाना फडनविसा नें त्या उभयतांस सांगितलें कीं, आधीं मराठ्यांहीं युद्धाचा आरंभ न करावा. मग ने होये सरदार नरगुंदास येंहचल्यावर त्यांस टि पूच्या सरदारांकडून विनोदयुक्त कांहीं धटाईचा निरोप आला, त्या वरून ते गणेश पंत बेहेरे व परशुराम भाऊ हे क्रुद्ध होऊन नाना चें सांगणें न मानितां टिपूच्या लश्करावर चालून जाऊन त्याल श्करास भोंवल्या त्यानें लहान लहान टोळ्या बंदोबस्तास ठेविल्या होत्या त्यांवर पडून त्या टोळ्या त्याच्या थोरल्या लश्क रांत मिळविल्या. तेव्हां त्यांतून टिपूचीं दोन पलटणें व किती एक स्वार पुढें होऊन लढूं लागले, ते समयीं मराठ्यांचे वीस शिपाई व एकहत्ती मेलागेला, इतकें होतांच ते मराठे मागें हटले. हें वर्तमान नानास कळतांच त्याणें दुसरें लश्कर मोठें तयार करून ते गणेश पंत व परशुराम भाऊ यांच्या कुमकेस पाठवून त्या टिपूला लि- हिलें कीं, हा कलह मजकडून उत्पन्न झाला नाहीं. हे चाकरलो क च भांडतात, त्यास हा कलह जर मिटेल तर मी फार संतोष

पावेन त्यावर टिपूनें उत्तर दिलेंकीं, मी ही तेंच इच्छितों, आणि जर तुम्ही या नरगुंदसंबंधें माझा धनीपणामात्र मानाल तर मी याची खंडणी तुम्हास दोनवर्षांची देईन. असें उत्तर गेल्यावर नानानें निजाम अल्लीच्या मसलती प्रमाणें मान्य करून आपलें लश्कर कृष्णेच्या उत्तरेस नेलें, आणि टिपूनें आपल्या बोली प्रमाणें खंडणीचा ऐवज सत्तावीस दिवसांत पोंहचता करून देतों म्हणून कबूल केलें. या प्रमाणें मराठ्यांचें लश्कर दूर झालें असतां टिपूनें तो नरगुंदकिल्ला घेऊन त्यादेसायाला कुटुंबसुद्धां अक्षय बंदींत ठेविलें, आणि त्याची कन्या आपली स्त्री केली, ती शिवाय त्याच्या पहिल्या बायका होत्या. असें असतां त्याणें एवढें अन्याय कर्म केलें, आणि मराठ्यांस जें द्यावयाचें कबूल केलें होतें तेंही दिलें नाहीं. यांत टिपूचा कुटिलपणा स्पष्ट दिसून आला.

२ याशिवाय कित्तूर किल्ला यांचा खंड मराठे घेत होते तोही नरगुंदासारिखा हैदराकडे गेला, नंतर त्या टिपूनें तो हस्तगत केला. मग त्याणें जितकीं अन्याय कर्में केलीं तितक्या नेंच मराठ्यांस कदाचित् पुर्ता खेद न होईल म्हणून त्याणें कृष्णेच्या दक्षिणेचें बहुतेक हिंदू धरून बलात्कारानें त्यांच्या सुंता करून मुसलमान केले. असा टिपूनें अनर्थ केला तेव्हां शंकराचार्याचे शिष्ये दोन हजार ब्राह्मण यांस तो हुलूम सोसेना यास्तव त्यांहीं अनेक प्रकारानें प्राण त्याग केले.

३ नानाफडनवीस याणें मनांत निश्चय केला होता कीं, टिपूला जिंकून तत्संबंधी लाभापैकीं इंग्लिशांस किमपि भाग न द्यावा, तथापि यासमयीं टिपू प्रबल झाला आणि त्याचा प-

लटणीचा बंदोबस्त फार चांगला आहे, आणखी आपला सहाय जो निजाम अल्ली त्याचें लश्कर केवळ अव्यवस्थित,असें जाणून त्याणें इंग्लिशांकडे कुमक मागावया करितां मनांतकल्पना आणिली कीं, टिपू व इंग्लिश या मध्यें पहिलेंच वैमनस्य आहे यास्तव तो जिंकाया विषयीं यत्किंचित् लाभ दाखविल्यानेंच इंग्लिश आपल्यास सहाय होतील, ह्मणून मुंबई सरकारांत त्याणें आपला वकील पाठविला. तेव्हां त्यांहीं त्या वकिलाचें बोलणें आळसत आळसत ऐकून त्याचा अंगीकार न करितां तें प्रकरण कलकत्त्याच्या मुख्याकडे लोटून दिलें. तेव्हां तेथच्या मुख्यानें ही तें काम स्वीकारिलें नाहीं. इतक्यांत पुण्यामध्यें मराठ्यांचें लश्कर त्या टिपूवर जाव यास सिद्ध झालें, तेसमयीं पेशवे व मुधोजी भोंसले यांचा तह झालाकीं, इंग्लिश पेशव्यावर चालून येत असतां मुधोजीनें त्यांस अनुकूळ न व्हावें,व पूर्वी माधवराव पेशवे व जानोजी भोंसले यांचा तह झाला आहे त्यांत अंतर न करितां मुधोजी भोंसल्यानें यागावें.

४ त्या वर्षी पर्जन्य फार लांबला ह्मणून मराठ्यांच्या लश्करास दिसेंबराचे पहिले तारिखेपर्यंत निघावयास अवसर सांपडला नाहीं. मग हरीपंत फडका लश्करासुद्धां पुण्याहून निघून भोंसले व निजाम यांच्या लश्करास मिळावयासाठीं पूर्वेचे संकेतस्थळीं येऊन गिरास जाऊ लागला, त्याबरोबर नानाफडनवीस ह्मी निजाम अल्लीशीं कांहीं बोलणें करावयास निघाला. नंतर तीं सर्व लश्करें एकत्र मिळाल्यावर निजामाशीं आणि मराठ्यांशीं मसलत ठरली की, टिपूचें सर्व राज्य घ्यावें आणि त्या

चे सहा विभाग करून त्यांतील दोन विभाग पेशवे यांणीं घ्यावे, व दोन निजामअल्लीनें स्वीकारावे, व एक शिंद्यास द्यावा, व एक होळकरास द्यावा. असा नेम होऊन तुकोजी होळकर व गणेशपंत बेहेरे या दोघांबरोबर पंचवीस हजार फौज देऊन त्यांस टिपूचें कांहीं लश्कर किल्ल्यापाशीं होतें त्यावर नेमिलें, आणि थोरलें लश्कर टिपूच्या मुलखांत बदामीवर चालिलें. ते समयीं मसलत झालीकीं, बदामीजवळ जाऊन पर्जन्यकाळ पर्यंत युद्धाचा उपक्रम न करितां उगेंच रहावें, पुढें पर्जन्यकाळीं नद्या भरल्यावर तेथें टिपूची कुमक पोंहचेनाशी झाली म्हण जे युद्ध आरंभावें. त्या मसलतीस निजामअल्ली मान्य झाला होता, परंतु पर्जन्यांत युद्ध करणें त्यास आवडेना यास्तव तो आपला सेनापति पंचवीसहजार सैन्यासहित हरीपंताचे स्वाधीन करून आपण हैदराबादेस माघारा गेला.

५ त्यानंतर मराठ्यांहीं टिपूची अडचण न होईलसें समजून त्या किल्ल्यास घेरा संनसवाशें शायद्दीं च्या मे महिन्याचे पहिले तारिखेस घातला. तो बदामी किल्ल्याचें शहर मोठ्या मैदानांत असून त्या मधोंवता तट आहे, त्याच्या मध्य भागीं गढी आहे, आणि त्या तटाच्या दोहोंबाजूंस बाहेरचे आंगीं दोन डोंगरी किल्ले आहेत, त्यातटाशीं मराठे बीसदिवस तोफांचा मार करून लढले, तथापि तो न ट फारसा ढांसळला नाहीं. तेव्हां असें ठरलें कीं, याच्या आंत जावया स शिडी शिवाय दुसराउपाय नाहीं. मग विसावे तारिखेस मोंगल व मराठे त्याकृत्यास सिद्ध झाले, तेव्हां त्या कोटांतील साडेतीन हजार लोक त्यांच्या नाशार्थ आंतून त्या भिंतीवर चढले; त्यांहीं चूर्णाचि त्या तटास भोंवते दारूभरलेले बुधले जागोजाग पुरू-

न ठेविले होते; मग ते मराठे व मोंगल त्यांवर हल्ला करीत असतां ते केवळ त्या पुरलेल्या बुधल्यांवर येऊन पोंहचले, तेव्हां अकस्मात् त्या बदामी करांही त्या बुधल्यांस बत्ती देऊन त्यांचा फार नाश केला; तथापि ते मराठे व ते मोंगल यांमध्यें मोठी ईर्ष्या उत्पन्न झाली होती त्यायोगें ते तो नाश न मानितां तसेच मोठ्या वेगानें पुढें सरून त्या तटास जागोजाग शिड्या लाऊन वर चढून आंत उतरले. नंतर त्या शहराच्या आंतील गढीपाशीं मात्र कांहींसा विलंब लागला. ते समयीं त्या तटांतील लोकांचे पाठीस शत्रु लागले असतां ते बऱ्हतेक पळून त्या दोहों बाजूंच्या दोहों किल्ल्यांवर चढून स्वस्थपणें राहिले. नंतर ते त्यांच्या पाठीस लागलेले मराठे व मोंगल यांवर त्यांहीं त्या दोहों किल्ल्यांवरून मोठे मोठे दगड लोटून त्यांवर बंदुकांचाही भडमार करून त्यांचा बऱ्हत नाश केला, तरी ते मराठे व मोंगल यांचा अतूट उद्योग व मोठा वेग पाहून ते किल्लेकरी अत्यंत भयभीत होऊन केवळ जीवदान मात्र मागून त्यांस ते दोनी किल्ले देते झाले.

६ असें झाल्यावर नानाफडनवीस तें युद्धाचें काम हरीपंतफडके यांस सोंपऊन आपण पुण्यास माघारा गेला. तसाच मुधोजी भोंसला यानेंही आपले बऱ्हते कलोक आपला दुसरा पुत्र खंडोजी भोंसला याच्या स्वाधीन करून तें कृत्य हरीपंतास सोंपऊन त्यास कबूल केलें कीं, मी दसरा झाल्यावर आपीक फोज घेऊन तुमचे कुमकेस येतों, इतकें करून तो माघारा नागपुरास गेला. तेसमयीं होळकर अगोधरच कितुरास गेला होता, तो त्या पर्वणीवर सर्व टिपूचीं ठाणीं उठवून त्या किल्ल्याशीं लढत होता, त्यावर कांहीं वेळानें तो किल्ला घ्यावयाचें काम न

सेंच ठेऊन तो होळकर तेथून एकादिवसांत तीस बत्तीस को सजाऊन सावनुरास पोंहचला. तो तेथें टिपूचा एक मोठा साव कार राघवेंद्रराव नामें होता, त्यास धरावयाच्या बेतानें गेला, परंतु तो तेथून पळून गेला होता; तेव्हां त्या होळकरानें तेथचे दु सरे दोनतीन सावकार धरून त्यांपासून दोनलाख रुपये खं डणी घेतली.

७ सावनूरचा नबाब यास पूर्वी टिपूनें आपली बहीण देऊन त्याचे पहिले घेतलेले बारा परगणे त्यास माघारे दिले हो ते, तथापि तेसमयीं टिपूनें त्या नबाबास कांहीं उपद्रव दिल्या मुळें तो टिपूचा पक्ष सोडून होळकरास मिळाला.

८ हरीपंत फडका तो बदामी किल्ला घेतल्या नंतर गजेंद्र गड वगैरे आणीक किल्ले घेऊन कोपाळ किल्ल्यास गेला असतां त्यास वर्तमान कळलें कीं, टिपू मोठ्या लश्करासहित आपणा वर येण्यासाठीं टोंकऱ्यांच्या नावांत बसून तुंगभद्रा नदी उतरून आलीकडे आला; तेव्हां हरीपंत फडका त्या टिपूवर जावयास सिद्ध झाला, परंतु तो मुल्लूख खांरांच्या युद्धास उपयोगी नाहीं- सा समजून तो सावनुरास गेला. तों तेथें टिपू ही येऊन मराठे व मोंगल यांच्या लश्करापासून तीन कोसांवर उतरला; तेव्हां तीं दो ह्मीं लश्करें सावनुरांच्या दोहोंकडे होतीं; मग पंधरा दिवसपर्यंत ने उभयपक्षीं वेलोक आप आपले तळावर उगेच होते. नंतर टि पूनें पहांटेची पांच घटका रात्र असतां मराठ्यांच्या तोफखान्या वर छापा घातला, परंतु तत्संबंधें त्या टिपूच्या हातीं कांहींच ला गलें नाहीं. त्यावेळेस मराठ्यांच्या लश्करांत कांहीं धान्यादिकांचा तोटा पडला, आणि टिपूच्यानें ही मैदानांत येववणार नाहीं, या दो-

हों कारणास्तव तो हरीपंतफडका सावनूर टाकून लश्कर सुद्धां पांचकोस मागें जाऊन दुसरी मैदानाचीजागा धरून राहिला. तेथें टिपूला त्याचे पाठीस लागवेना म्हणून तोसावनुरांत शिरूनराहिला. याप्रमाणें त्यादोहीं लश्करांचा युद्धप्रसंग न होतां व त्यांतील एकास ही विशेष लाभ नसतां एकाएकी टिपूनें संनसत्राशें सत्त्यायशींच्या फेब्रुवारींत मराठ्यांशीं तहाचे बोलणें करावया करितां हरीपंताकडे तुकोजीहोळकराचे द्वारें वकील पाठविला. त्याच्याबोलण्याचा विश्वास हरीपंत धरीना, म्हणून एप्रेलपर्यंत तें तह प्रकरणीं बोलणें चाललें होतें, मग तो तह ठरून मराठ्यांस कित्तूर व बदामी व नरगुंद प्राप्त झालें. याशिवाय पंचेताळीस लक्षरुपये टिपूनें मराठ्यांस देतों म्हणून कबूल केलें, आणि सावनूरच्या नवाबासही आपल्या मुलखाचा कांहीं भाग द्यावयास तो कबूल झाला, परंतु त्यासही टिपूचा विश्वास येईना म्हणून तो मराठ्यांच्या लश्करा बरोबर पुण्यास गेला.

टिपूनें एकाएकी मराठ्यांशीं तह करून कलह मिटविला, याचें कारण असें, बदामीस नानाफडनवीस असतां इंग्लिशांचा वकील मालीटसाहेब तो मराठ्यांकडे नेहमी राहावयास पूर्वसंकेताप्रमाणें आला, तेथें त्याची व नानाफडनविसाची प्रथमभेट त्या बदामीस झाली, मग तो नानाबरोबर होता; आणि कलकत्त्यास ने समयीं नवा मुख्यसाहेब आला त्याणें कलकत्ता व मद्रास व मुंबई इतक्या जागीं आपल्या पलटणींचा बंदोबस्त चांगला आरंभिला, या सर्वप्रकारांवरून टिपूला वाटलेंकीं, मराठे व इंग्लिश निःसंशय एकचित्त आहेत, नेंच भयमानून त्याणें युद्ध सोडिलें.

९ महादजी शिंदा यास दिल्ली व आग्रे प्राप्त झाले, तथापि तेथें पूर्वी अव्यवस्था झाली होती त्यामुळें त्याबंदोबस्तास जो खर्च लागला त्याप्रमाणें तेथें उत्पन्न झालें नाहीं; लोकिकांत दिसण्यांतर तो त्यास मोठा लाभ झाला असें झालें, परंतु निश्चि
ता र्थ तसा नव्हता. मग थोड्याच दिवसांत त्यास द्रव्या-
चा तोटा पडला, यास्तव त्याला ज्यांत मसलत नाहीं अ
सें अन्यायकर्म करावें लागलें. त्यांत जे मुसलमान सरदा
र त्याशिंद्यास मिळाले होते त्याबद्दलच्या जहागिरी त्या
णें जप्त केल्या; आणि ज्यांच्या जप्त केल्या नव्हत्या त्यांसही शं
का उत्पन्न होऊन ते त्याचा द्वेष करूं लागले.

१० असें असतां शिंद्यानें बादशाहाचें नाव करून त्यारजपुतांस खंडणी मागावया करितां आपण लश्कर सहित जयपूरच्या दरवाज्यापाशीं जाऊन तेथें डेरा देऊन उ तरला, आणि त्या सर्वरजपुतांस सांठलक्ष रुपये खंडणी मा गितली, त्याप्रमाणें त्यांहीं बव्हतेक पैका देऊन बाकी राहिला तो कांहीं अवकाशानें देऊं म्हणून कबूल केलें. मग त्या अ वकाशाप्रमाणें ती वेळ आल्यावर महादजी शिंद्यानें तो ऐव ज मागावयास त्याजी पाटील नामें आपला सरदार पाठवि ला, तेव्हां त्याजयपूरकरास बादशाहाचे मुसलमान सरदा र आंतून अनुकूळ होते यास्तव तेरजपूत यांणीं त्यारयाजी शीं लढून त्याचा पराभव केला. तेवेळेस दिल्लीचा बादशाह जो कोणी बलवान् होईल त्यास आपलें कार्य करून घेण्या स निमित्तमात्र झालेला असे, आणि केवळ दुसऱ्यानें दिले लें खाऊन गरीबासारिखा होता, तोही त्यासंधींत शिंद्याचा

तिरस्कार करून म्हणूं लागला कीं, या शिंद्यानें माझा किमपि मान ठेविला नाहीं, असे हे मराठेलोक केवळ रानवट आहेत.

११ तेसमयीं तो महादजी शिंदा यांणें मनांत विचार केला कीं, मी रजपुतांशीं वांकडा झालों आणि मजविषयीं बादशाहाचे लोक रुष्ट झाले, या शिवाय आपलें लश्कर व बादशाहाचें लश्कर यांच्या रोजमुऱ्याची बाकी देणें पुष्कळ थकली, अशा समयीं युद्ध करून जय न झाला तर माझा समूळ नाश होईल. एवढें संकट त्याजवर पडलें असतां ही या महादजी शिंद्यास युद्धावांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला. तेव्हां त्याणें आपाजी खंडेराव नामें आपला सरदार जवळ बोलाविला, आणि पूर्वी दिब्बायन् नामें फ्रेंच जातीचा मोहाना मांकित सरदार याणें शिकविलेलीं त्याचीं दोन पलटणें नुकतींच बुंदेलखंडांतून आलेलीं होतीं तींही जवळ बोलाविलीं; मग तो आपलें लश्कर व बादशाहाचें लश्कर बरोबर घेऊन संन १७८७ शीं त दिल्ली हून लिघून रजपुतांवर चालिला. तो जयपुराजवळ पोहोंचला असतां त्याच्या मनांत आलें कीं, रजपुतांशीं युद्ध करून आपला परिणाम नीट होणार नाहीं, म्हणून त्याणें त्याजयपूरवाल्याशीं तह करावयाचा उद्योग आरंभिला; परंतु तो जयपूरचा राजा प्रतापसिंग यास जोतपुरचा राजा व दुसरेही कितीएक रजपूत राजे मिळून तेथें मोठें सैन्य जमा झालें होतें म्हणून ते सर्व रजपूत तो तह न मानून त्याशिंद्याच्या लश्करचे कोठीस उपद्रवक रून अनेक प्रकारें त्यास बेजार करूं लागले. असा थोडका सावेळ गेल्यावर त्या महादजी शिंद्याकडचे मोंगल व मराठे त्या उपद्र

वास कटालून बादशाहाकडच्या सर्वसरदारांत मोठा सरदार महंमदबेग अमदानी नामें होता तो व त्याचा पुतण्या इसमायलबेग हे होते त्याशिंद्याचा पक्ष सोडून रजपुतांस मिळाले. नेझां तो महादजीशिंदा समजला कीं, जर आतां युद्धास विलंब करीं नतर हे बादशाहाचे सर्वलोक रजपुतांस जाऊन मिळतील, म्हणून तात्काळ मोठ्या निकरानें परस्परें युद्ध होऊं लागलें, त्यांत महंमदबेग मोठ्या तोफेच्या गोळ्यानें मृत्यु पावला. तेसमयीं अशी संधी उत्पन्न झाली कीं, या महंमदाचें सर्व लश्कर पळून जावें आणि मराठ्यांचा जय व्हावा, परंतु इसमायलबेग याणें मोठा उद्योग करून त्या सर्वलोकांची थोपाथोपी केली, आणि युद्ध चालविलें, तेसमयीं शिंद्यास मागें हटावें लागलें. त्यानंतर तिसरे दिवशीं शिंदा फिरून रजपुतांशीं लढावयास सिद्ध जाला, तेसमयीं बादशाहाचे सर्वपायदळ लोक ऐशीं तोफा सहित अकस्मात् त्याइसमायलबेगास मिळाले. अशाही संकट समयीं शिंद्यानें आपलें धैर्य किमपि नसोडितां फार युक्तीनें बाग थोपक केली; ती अशी, त्यासमयीं त्याणें आपलें सर्वजड सामान व बहुतेक बुणगें कुशळ गडा करून ग्वाल्हेरास पाठविलें, मग आपल्या लश्करासुद्धां मोठ्या त्वरेनें दीग किल्ल्या पर्यंत हटत गेला; तो तेथें राहून आपल्या लश्कराच्या लहानटोळ्या आसमंतात चौंहीकडे गेलेल्या जमा करिता झाला. मग आपणास जाटलोक सहाय करून घेण्याविषयीं त्या जाटांचा दीग किल्ला त्यांस माघारा दिला, आणि आपल्या मोठमोठ्या तोफा त्या जाटांचा दुसरा भरतपुर नामें किल्ला आहे तेथें ठेविल्या. मग आपण आग्र्याजवळ जाऊन तो किल्ला घ त्या आग्र्या खेरीज अ-

ल्हीगर नामें दुसरा किल्ला आहे, त्या दोहीं जागीं शिबंदी पाठविली.

१२ ते समयीं ते रजपूत लोक यांच्या मनांत मराठे समूळ बुडवावे असें नव्हतें म्हणून ते निरनिराळे होऊन आपआपले ठिकाणास गेले. मग इस्मायलबेग तो बादशाहाचा मुलूख मराठ्यांहीं घेतलेला सोडवावयास एकदाच उद्युक्त झाला. तो प्रथम आग्र्याजवळ जाऊन उतरला, आणि शिंद्याशीं मोठें युद्ध करून आग्रें घेणार होता, परंतु शिंदा हलकें हलकें युद्ध करी, मोठ्या युद्धास भिडेना, असे आठ दिवस गेले; नंतर शिंद्याला असें वर्तमान कळलेंकीं, इस्मायलबेगाचे कुमकेस गुलाम कादर नामें रोहिला जाबितारखान रोहिला याचा पुत्र येतो, असें ऐकतांच तो शिंदा आपल्या लश्करासहित निघून ग्वाल्हेरास गेला. तेथें त्याणें पूर्वी पेशव्यांस कुमक मागितली होती ती पोंहोचली नाहीं म्हणून नानाफडनविसास पुनः मोठ्या आग्रहानें लिहिलेंकीं, माझें कार्य अद्यापि नष्ट झालेसें नाहीं, परंतु सांप्रत मोंगल व इंग्लिश रजपुतांस मिळतील असें दिसतें, हें झालेंतर मराठ्यांचा समूळ नाश होईल, त्यास यासमयीं सर्वहीं आपला धनी एकदा आहे असें ध्यानांत आणून निर्मत्सरपणें एकचित्त होऊन आपलें राष्ट्र संभाळावयाचा अभिमान धरिला पाहिजे. असें त्या महादजी शिंद्यानें नानाफडनविसास कुमकेविषयीं लिहिलें असतां स्वतःउद्योग किमपि नव्हता केला.

१३ त्या शिंद्याचे लोक आग्र्यामध्यें इस्मायलबेगाशीं लढत आहेत, आणि जाट लोक यांची इस्मायलबेग स्पर्धा करितो म्हणून ते आपल्या लोकांच्या साहाय्यार्थ इस्मायलबेगाला

उपद्रव करिताहेत; असेंजाणून त्या महादजी शिंद्यानें मनांत आणिलेंकीं, इस्मायलबेगास गुलाम कादरजरी मिळाला आहे तरी या समयीं आपण जाऊन ते आपले आप्ताचे लोक यांस कुमक करावी, त्यावरून त्याणें आपला सरदार राणे खान व आपाजी खंडेराव यादोघां बराबर लश्कर देऊन त्यांत दिबायनाचीं दोन पलटणेंही नेमिलीं. तो राणे खान भरतपुरास जाऊन तेथून जाटाचें लश्कर घेऊन तेसर्व आग्र्यावर जावया स निघाले, तों इस्मायलबेग व तो गुलामकादर आग्र्याची लढाई कांहींशी राखून तेथून निघून त्यांवर आले; त्यांची व राणेखानाची गाठ त्या भरतपुरापासून आठां कोसांवर पडतांच त्याउभयपक्षीं लश्कराचें युद्ध मोठ्या निकराचें झालें. तेव्हां महादजी शिंद्याचीं पलटणें फार झटून लढलीं; त्यांवर इस्मायलबेग आपल्यारीतीं प्रमाणें मोठ्या त्वरेनें स्वयें चालून आला असतांही फारवेळपर्यंत त्याचाउपाय त्यापलणां पुढें चालला नाहीं. त्याप्रमाणेंच दुसरा एक लिस्तेनो नामें फ्रेंच जातीचा मोठा नामांकित सरदार जाटां कडचा असे त्याचींही पलटणें फार झटून गुलाम कादराशीं लढलीं; त्यापुढेंही त्या गुलामकादराचा इलाज चालेना; परंतु त्याजाटाचीं दुसरीं तीन पलटणें कोणी जहानगीरखान नामें मुसलमान सरदार याचे स्वाधीन होतीं तो एकही वार न करितां इस्मायलबेगास जाऊन मिळाला. हेंन होतें आणि त्या लश्करचे स्वार तीं युद्ध करणारीं पलटणें यांस झटून कुमक करिते तर तेसमयींच शिंदा जयपावला असता, परंतु तें न झालें, त्यणून त्यापलटणी लोकांचा बहुत नाश होऊन [illegible] युद्ध सोडून राचीच्या आश्रयानें आपल्या जीवाचें संरक्ष

ण करून माघारें भरतपुरास जावें लागलें.

१४ असा मुसलमानांचा जय झाल्यावर जाटांचा मुख्य रण जितसिंग यास इस्मायलबेग म्हणूं लागलाकीं, आग्रें घेतलें म्हणजे मी तुझें पारिपत्य करावयास चुकणार नाहीं, असें म्हा इस्मायलबेगाचें फुशारकीचें बोलणें शेवटास नगेलें; कांकीं, लरबादादा नामें आग्र्याचा किल्लेदार होता त्याणें आपल्या किल्ल्याच्या संभाळाचा उद्योग निरालस्यपणें केला, त्यामुळें तेंकार्य फारलांबलें; तेव्हां त्या मुसलमानलोकांत परस्परें अविश्वास उत्पन्न होऊन वैमनस्यें पडतगेलीं. यारेखरीज त्या समयीं राणेखानास वर्तमान कळलेंकीं, शीखलोक यांणीं उत्तरेकडून येऊन मोंगलांच्या मुलखांत स्वारी घातली, तेव्हां त्याराणेखानानें आपल्या लश्कराची एकठोळी त्याशिखांचे कुमकेस पाठवून त्यांस सांगितलें कीं, गुलामकादराचे जहागिरीचा नाश करावा. तेसमयीं त्यांहीं तसेंच केलें असतां तो गुलामकादर आपलें सैन्य घेऊन तो उपद्रव मोडावया साठीं आपल्या मुलखास गेला. तेव्हसमयीं शिंद्यानें राणेखानाच्या लश्करास कुमकपाठविली, तेव्हां तो पुनः इस्मायलबेगास जिंकावयाकरितां आग्र्यास गेला. मग संनसबाशें अठ्यांयशींच्या जूनमहिन्याचे अठरावे तारिखेस त्या आग्र्याजवळ मोठें युद्ध होऊन त्या इस्मायलबेगाचा पराभव झाला. त्यायुद्धांत तो इस्मायलबेग फार जखमी झाला, परंतु त्याचा घोडा बहूत चांगला होता म्हणून तो त्या घोड्यासुद्धां यमुनेंत उडीघालून आपला जीव वांचवून पार निघून गेला; मगतसेच त्याबरोबर यमुनेंतून पारगेलेल्या घोडक्याशा लोकांनिशीं तो गुलामकादराच्या लश्करांत गेला;

आणि लावेजेलोक पळाले तेबहुतेक दिल्लीस गेले. त्यासमयीं शिंद्याचा दिबायन यांचीं पलटणें मोठीं योग्यता पावलीं.

असा जयपावल्यावर तो महादजी शिंदा लागलाच दिल्लीस गेला, म्हणून तेवेळचेलोक ती त्याची मोठी चूकशी मानूं लागले; परंतु त्यानजाण्यांत शिंदा आपलेंहित असें समजला असेल कीं, इस्मायलबेग व गुलामकादर हे दोघे दिल्लीमध्यें आपल्या लश्कराचा बंदोबस्त करीत असतां यांचा स्नेह फारदिवस टिकणार नाहीं, मग दुफळीजाल्यावर एक आपणास अनुकूळ होईल; या खेरीज पुण्याहून नानाफडनविसाकडून कुमक ही तों पर्यंत येईल. मग त्याप्रमाणें पुण्याहून तुकोजी होळकर व अल्लीबहादर हे दोघे लश्कर घेऊन आले. नंतर शिंद्यानें राणेखान व आपाजीखंडेराव व अल्लीबहादर व दिबायन यांचीं दोनपलटणें इतके दिल्लीस पाठविले.

१५ इकडे दिल्लींत गुलामकादर व इस्मायलबेग यांणीं आपल्यालश्कराचा बाकी ऐवज घ्यावयाकरितां बादशाहाचें घरलुटलें. नंतर तोगुलामकादर दिल्लींत प्रबळ होऊन त्याणें दोन महिनें पर्यंत त्यांबादशाहास व त्याच्या कुटुंबास अत्यंत दुःख दिलें; असेंकीं, तेंपाहून इस्मायलबेगास ही बहूत खेद वाटून त्याउभयतांचें वांकडें पडलें. मग मराठ्यां

+ तोगुलामकादर दिल्लींत प्रबळ होऊन त्याणें तेथचा बादशाह शाहा अलंयास तक्तावरून उठवून त्याचा पुत्र बेदरबक्तयास त्याचे जागीं स्थापून त्या बादशाहाचा फारअपमान करून खंजिराच्या अणीनें आपल्या हातें त्याचे डोळे काढिले, आणि त्याच्या स्त्रिया व कन्या व त्याचे सरेसोयरे व त्यांच्या स्त्रिया यांची अनिर्वाच्य विटंबना केली, आणि त्यांतून कितीएकांस अन्नावांचून उपाशीं मारिलें.

वेंलश्करं दिल्लीस येऊन पोंहचलें, तेव्हां तो इस्मायलबेग वगैरे तेथचेलोक मोठ्या हर्षेंकरून सामोरे घेते झाले. नंतर त्यांहीं एक मोठीशी टोळी सिद्ध करून गुलामकादरास धरावयाचा उद्योग आरंभिला; तेव्हां तो आपल्या लोकांसुद्धां पळून जाऊन मिरत नामें किल्ला आहे त्यांत शिरला. मग त्याचे पाठीस लागलेल्या लोकांशीं तो तेथून मोठ्या निकरानें लढला, परंतु त्या किल्ल्यांतली धान्यादिकांची बेगमी सरली; तेव्हां तो चांगल्या घोड्यावर बसून एकटाच तेथून पळाला, तो कांहींसा दूर गेल्यावर रात्रीं आंधारांत त्याचा घोडा अडखळून पडला, तेव्हां त्यास असा धक्का बसलाकीं, त्यायोगें त्याला गतप्राणाचे परी मूर्छा येऊन तो अचेतन पडला; मग दिवस उगवल्यावर कोणी शूद्र तेथें आला त्याणें त्यास पाहिलें, मग तेथून उचलून तो मराठ्यांच्या लश्करांत नेला. नंतर तो त्यालश्करांत बंदीस असतां कांहीं दिवसांनीं शिंद्यानें त्याचे हातपाय तोडून तो थोंटा केला; मग तो कांहीं दिवसांनीं मृत्यु पावला. नंतर त्या गुलामकादरानें शहाअलंबादशाहाचा पुत्र बेदरबख्त तो या दिल्लींतून आपण पळून जातांना आपल्यावरोबर मिरत किल्ल्यांत नेला होता तो मराठ्यांच्या हातीं लागला, त्यांहींत्यास किमपि दुःख न देतां तो मर्यादेनें बंदींत ठेविला; शेवटीं त्याच्या वडिलास शिंद्याचे योगें पुनः तक्ताधिपत्य प्राप्त झाल्यावर त्योगें त्या आपल्या पुत्रास जिवें मारून टाकिलें. असें वर्तमानसंनसत्रा शें एकुण नवदांत घडलें.

१६ त्यानंतर महादजी शिंदा याणें गुलामकादर याची जहागीर व बऊतेक दुवाबप्रांत व दिल्ली व आग्रें हेदोन परगणे घेतले. एवढें यश त्यास प्राप्त झालें नथापि तो निर्भय झाला नव्हता. तेव्हेलेस

आफ्गाणांचा बादशाह तिमोरशाह अबदालीयाचेलोक मुलखांत स्यांच्या घालीत होते ते आपणावर येतील असें त्या महादजी शिंद्यास वाटत होतें. या खेरीज रजपुतांमध्येंही मोठेमोठे त्याचे द्वेष्टे असत. याशिवाय त्याचे साहाय्य करणारे जे होळकर व अल्लीबहादर यांस त्याचें कार्य शेवटास नेण्यापेक्षां त्याणें संपादिलेल्या मुलखाचा भाग घेण्याविषयीं आशाफार होती. तो हें सर्वजाणून होता तथापि आपल्या वृद्धीचा उद्योग त्याणें टाकिलानाहीं. तोप्रकार लिहिण्याचे पूर्वी शिंद्यानें आपल्या लश्कराचा कायकाय बंदोबस्त नवा केला तो समजला पाहिजे.

१७ प्रथम त्याणें पहिल्यापेक्षां रजपूत व मुसलमान बहुत चाकरीस ठेविले, आणि त्याचे स्वार पूर्वी चोळणे घालीतअसत तीचाल मोडून स्वारांहीं खोंटेपर्यंत लांबीच्या विजारा घालावयाची चाल पाडिली; आणि त्या पूर्वी मराठ्यांच्यालश्करांत गोसांवी लोक फारसे नव्हते ते अधिक ठेवून त्यांचा एक नवाच मोठासाजमाव करून हिंमत बहादर नामें त्यांचा गुरू होता त्यास त्यामंडळीची मुख्यता दिली. यासर्वांपेक्षां त्याणें त्या दिवायनाची दोन पलटणें होतींतीं प्रतिपलटणास सातशेंलोक याप्रमाणें चोवीस पलटणें केलीं, आणि त्याप्रतिपलटणास मैदानांतलढाईच्या उपयोगी अशा हलक्या हलक्या तोफा पांच पांच दिल्या. त्या चोविसांपलटणांतील आठां आठां पलटणाचा ब्रृगेद नामेंएक एक भागकरून एकेका ब्रृगेदास पांच पांचशें स्वार नेमिले. या इतक्या समुदायाचें मुख्यत्व दिवायनास दिलें; आणि त्या पलटणांच्या खर्चास पुरेसा मुलूख देऊन त्या मुलखाचे उत्पन्नांत

शेंकडा दोनरुपये प्रमाणें त्या दिवायनानें आपलें स्वामित्व घ्यावें सें केलें, व त्यास जातीनें दरमहा दहा हजार रुपये केल्य. त्या पलटणी लोकांत त्या दिवायनानें आपल्या हातासवालीं विलायतच्या किसीएक मुलुखचे मोठे मोठे चतुर साहेब लोक ठेविले होते. त्यांत एक सांगस्तर नामें साहेब होता तो बंगल्याच्या मुख्य साहेबापाशीं होता, मग त्याणें गोहदच्या राण्याची चाकरी कांहीं दिवस करून शिंद्याच्या पलटणांत राहिला. तो तोफाओतावयाच्या कामांत अत्यंत कुशळ असे, त्याणें फारचांगल्या साठ तोफा शिंद्यास ओतून दिल्या. मग शिंद्याचा तोफखाना चढतां वाढतां त्यांत अनेक प्रकारच्या तोफा दोनशांवर जमल्या. एवढी त्यामहादजी शिंद्याची दवलत दृष्टीस पावली.

भागसविसावा.

संनसवाशें नवदां पासून ब्याण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ संनसत्राशें सत्त्यांयशीं मध्यें टिपूनें फार झटून तह केला, तथापि हरीपंत फडका याचें लश्कर तुक्केचकृष्णेचे पलीकडे पोंहचलें नपोंहचलें तोंच त्याणें कितूर मराठ्यां पासून घेतलें, व बेदनुरास कांहीं लश्कर जमा करून कोंकणपट्टी मराठ्यां

पासून घेणार असें दर्शविलें. असें त्याचें एकसमयींच तहकरणें आणि तद्विपरीतवागणें झालें. याचें मूळ कारण त्या टिपूच्या चंचल स्वभाव वा वांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं. परंतु त्या समयीं कित्येक इंग्लिश असें समजलेकीं, टिपूव नाना फडनवीस व निजाम अल्ली व फ्रेंच हे सर्व मिळून आम्हास बुडविणार आहेत; आणि नानाफडनवीस समजलाकीं, मराठे बुडावे असेंच टिपूच्या मसलतीचें तात्पर्य, त्यावरून त्या नानानें कलकत्त्याचा मुख्य लाट्कानवाली मनामें साहेब होता त्याकडे वकील पाठवून सुचविलेंकीं, टिपूचें प्राबल्य न होण्यास तुमचें व आमचें ऐक्य असावें. त्यावर त्या साहेबानें उत्तर दिलेंकीं, यांत आमचें हितच आहे, परंतु आमच्या सरकाराची आज्ञाअशी आहेकीं, जो आपणाशीं विरोध करील त्याशींमात्र वांकडें असावें. टिपूनें पूर्वी आम्हांशीं जेंबोलणें केलें आहे त्यांतजरत्याकडून कांहीं अंतर पडेल तर आम्ही तुम्हास मिळूं.

२ यानंतर टिपूचें आचरण इंग्लिशांविषयीं विपरीत नाहींसें समजून कलकत्त्याच्या मुख्यानें मनांत निश्चय केलाकीं, पूर्वी सनसत्राशें अडसष्टांत निजाम अल्लीनें करार केला होताकीं, सलाबतजंग मृत्युपावल्यावर त्याची जहागीर गंठूर परगणा इंग्लिशांस मी देईन, त्याप्रमाणें तो सलाबतजंग सनसत्राशें ब्यांयशींत मृत्युपावला, त्यास यासमयीं याला तो मागावयास योग्य आहे, असें समजून त्याकडे त्या साहेबानें वकील पाठवून मागतांच त्या निजामानें तो परगणा त्यांस दिला. तो मांत अनिउत्कृष्ट असून त्याणें उगाच दिला असें नाहीं, तो समजलाकीं, हाल्लीं हिंदुस्तानांत मराठे व इंग्लिश व टिपू व आल्ली सत्ता करितों या सर्वांत

मध्यें न्यूनबळ असा मीच आहें, त्यासयांनील कोणा एकाचाआश्रय केल्या वांचून माझेंराज्य टिकणार नाहीं.

त्या निजामाच्या मनांत होतेंकीं, टिपूशीं स्नेहकरावा; कांकीं, तो आपल्याजातीचा मुसलमान आहे, परंतु त्याचे वजीर वगैरे मुत्सद्दी यांणीं त्यास मसलत दिली कीं, या समयीं तुम्ही पूर्वीच्या तह्या प्रमाणें इंग्लिशांस गंडूर परगणा देऊन दोन पलटणें व सहा तोफा व खंडणी पहिल्या करारा प्रमाणें त्यां इंग्लिशां स मागून मग त्यांशीं स्नेह ठेवाल तर तो उपयोगीं होईल. असें ठरल्या वरून त्या निजाम अल्लीनें कलकत्यास वकील ही पाठविला, परंतु सरळपणानें वागणें त्याच्यानें होईना; तें असें, त्याणें कलकत्त्याच्या मुख्याकडे वकील पाठविला असतां ही टिपूशीं स्नेह साधावयाकरितां दुसरा वकील टिपूकडे पाठविला, त्याचें बोलणें आलें कीं, तुमचा स्नेह मला मान्य आहे, आणि तुमचा व आमचा कांहीं शरीरसंबंध हीव्हावा, त्यावरनि जामास राग येऊन तें मान्य न करितां नसेंच राहिलें. असें असतांही इंग्लिशांकडे टिपूचा वकील बोलणें करीत होता म्हणून त्या निजामाचे वकीलास त्यांतला दुकानवालिसानें उत्तर दिलें कीं, पूर्वीच्या करारा प्रमाणें तुम्हास आम्ही पलटणें व तोफा व खंडणी ही देतों, परंतु टिपूला जिंकावया विषयीं या वेळेस आम्ही तुमचे साह्यास विलायतेंचे आज्ञे वांचून येणार नाहीं; आणि पुढेंकधींही करनाटक, बालेघाट, आमच्या स्वाधीन झाल्यावर त्या विषयीं जो तुमचा व आमचा पूर्वी करार ठरलेला आहे त्या प्रमाणें तो मुद्दल तुम्हास देऊं. असें त्यालाशचें उत्तर निजामास गेल्यावर टिपूलासमजलें कीं. आम्हांस जिंकावया विषयीं निजा

माला इंग्लिश अनुकूळ झाले, यावरून तो टिपूकुद्ध झाला, आणि पूर्वी त्याणें इंग्लिशांचें साहाय्य करणारा जो त्रावनकोरचा राजा त्यावर मोहिम करून तो मुलूख घ्यावयाचा बेत केला होता तो सिद्धीस न्यावयाचा उद्योग करूं लागला.

तो टिपू सन सत्राशें एकुणनव्वदांच्या दिसेंबर महिन्यामध्यें त्रावनकोरास जाऊन त्याराजाच्या लष्करावर हल्ला करिता झाला. त्या युद्धामुळें नानाफडनवीस याच्या पूर्वील बोलण्या प्रमाणें सन सत्राशें नव्वदांच्या जून महिन्याचे पहिले तारिखेस पुण्यामध्यें इंग्लिश व नानाफडनवीस व निजामअल्ली यांचें ऐक्य झालें. त्यासमयीं असें ठरलेंकीं, निजामअल्ली व नानाफडनवीस मिळून पंचवीसहजार फौज घेऊन या पर्जन्यकाळांतच जाऊन उत्तरेकडचा टिपूचा मुलूख घ्यावा; त्यानंतर पर्जन्यकाळ गेल्यावर त्या तिघांहीं मिळून होईल तितकें लष्कर जमा करून टिपूचा सर्व मुलूख घ्यावा. त्या कामास इंग्लिशांहीं दोनपलटणें मराठ्यांस द्यावीं, व दोन निजामास द्यावीं; त्या पलटणांचा खर्च त्या उभयतांहीं द्यावा.

३ त्यामुलखांत जेथें या तिघांतील कोणा एकाचेंही पूर्वीचें स्वामित्व नाहीं असा जो मुलूख असेल तो तिघांहीं वांटून घ्यावा; याशिवाय कोणी पेशव्यांकडील किंवा निजामाकडील पाळेगार अथवा जमेदार हैदरानें घालवून दिलेला असेल त्या स त्याचे जागीं स्थापून त्याजपासून कांहीं द्रव्य नजर घ्यावें, तें तिघांहीं वांटून घ्यावें; आणि या तिघांतील ज्या कोणाचा मुलूख पूर्वीचा असेल त्याचें स्वामित्व त्याणें करावें. असा नेम ठरल्यावर इंग्लिशांचें लष्कर मद्रासेकडून निघालें, आणि मुंबईकडून दोन पलटणें व सहा तोफा निघाल्या, त्या आंबे घांटानें वर चढून

नासगांवा जवळ जून महिन्याचे अठरावे तारिखेस पोहोंचल्या. त्यांचा मुख्य कप्तान लिट्ल नामें साहेब होता, त्याबरोबर मराठ्यांहीं आपला कार कून संगमेश्वरापासून दिला होता, त्या णें त्या साहेबाच्या जाण्यास कांहीं युक्ति करून अनेक प्रकारें विलंब लाविला; आणि टिपूचा वकील पुण्याहून अद्यापि गेला नाहीं असें त्या साहेबास वर्तमान कळले; यावरून त्या साहेबाला कांहीं चमत्कार वाटला. जेव्हां तो नासगांवास पोहंचला तेव्हां तेथें मराठ्यांच्या स्वारांची तयारी त्यांहीं ह्मटल्या प्रमाणें नाहींशी पाहून तो समजला कीं, कारकुनानें विलंब लाविल्याचें कारण हेंच. तो तेथेंपोंहचला तेव्हां मराठ्यांचे स्वार दोन हजार मात्र जमले होते. मग ती तयारी मोडण्याचें कारण शोधितां इंग्लिशांस असा ठिकाण लागला कीं, मुराठे टिपूस ह्मणतात कीं, आम्ही व निजाम अल्ली व इंग्लिश एकमत झालों आहोंत, तर तुम्ही आम्हांस कांहीं द्रव्य द्यालतर आम्ही तें मोडून तुमचा पक्ष स्वीकारूं, असें त्याशीं बोलणें मात्र करून त्या टिपूपासून द्रव्य घेतल्या नंतर त्यावर उलटून त्यास बुडवावयाच्या मसलतींत ते आहेत, इतकें इंग्लिशांस समजलें. ते मराठे टिपूकडून द्रव्य येईल ह्मणून फार दिवस वाट पहात होते, परंतु तें सिद्धीस जातना हींसें पाहून मग लांहीं आगष्ट महिन्याचे पांचवे तारखेस त्यावकिल्याला निरोप दिला.

यानंतर परशुराम भाऊयास पुण्याहून निघून कृष्णातटगवयास आगष्टाची अकरावी तारीख लागली, त्याबरोबर पांचहजार स्वार व दीडहजार पायदळ होतें. त्यानंतर थोडकेच दिवसांत प्रतिनिधि कांहीं स्वारां सहित येऊन त्या परशुराम भाऊस

मिळाला. याशिवाय विजयदुर्गचे बंदराच्या कामावर धोंडोपंत गोखला नामें होता तो एकहजार स्वारांसहित येऊन त्या भाईला मिळाला. त्या धोंडोपंतानें इंग्लिशांचे आझेंत वागावें असें परशुराम भाऊच्या मनांत आलें, परंतु तीमसलत कांहीं कारणा मुळें सिद्धीस नगेली, तथापि त्या दिवसापासून इंग्लिश व गोखले यांचा परिचय झाला. मग त्या इंग्लिशांच्या द्वारें त्या धोंडोपंनाचा पुतण्या बापू गोखला तो पुण्याचे दरबारीं मोठी योग्यता पावला. नंतर कालेंकरून त्याशीं व इंग्लिशांशीं द्वेष पडला, तें प्रकरण पुढें लिहिण्यांत येईल.

४ यानंतर पंचविसावे तारिखेस मराठ्यांहीं टिपूचा ला हानसा कोटाचा गांव घेतला, त्यापासून परस्परें युद्धचालू झालें; आणि मराठ्यांचें लश्कर तेथून पुढें चालतां चालतां टिपूच्या मुलूखचे रयत लोक ही टिपूचे शिबंदीस घालवून मराठ्यांकडे मिळावयास सिद्ध जाले. मग ते शिबंदी लोक आपल्या धणीकोण हा विचार मनांत न आणितां त्या परशुराम भाऊची चाकरी धरून मुलखाची बाकी घेण्यास त्याला सहाय्य झाले. नंतर थोडक्याच वेळांत आणखी मराठे लोक थोडे थोडे येऊन त्या परशुराम भाऊस मिळतां मिळतां इंग्लिशांचीं दोनपलटणें खेरीज करून मराठ्यांचें लश्कर सुमारें दहाहजार स्वार व तीन हजार पायदळ जमलें. मग त्या लश्करासहित तो परशुराम भाऊ सप्टेंबराचे अठरावे तारिखेस धारवाडाजवळ जाऊन तो किल्ला घ्यावयाचा उद्योग करूं लागला. त्यांत दिवसास दुरून तोफांचे गोळे त्या किल्ल्यास मारावे, आणि रात्रीस त्या तोफा माघाऱ्या नेऊन तोफखान्यांतठेवाव्या; असें निरुपयोगी आणि उपहास होण्याजोगें युद्ध दीडमहि

नापर्यंत त्या परशुराम भाऊनें चालविलें. मग तो कांहीं साउपयोगी चालीनें वर्तला; तो असा, कितीएक लोक त्या किल्ल्यांतून बाहेर येऊन युद्धाविषयीं राहिले होते, त्यांवर हल्ला करून त्यांस किल्ल्यांत घालवून त्यांच्या तीन तोफा घेतल्या; तेसमयीं इंग्लिशांचीं पलटणें उपयोगी पडलीं. त्यांहीं मराठ्यांच्या साह्याविना न त्या किल्ल्याची पेंठ शिडीलावून घेतली, तेसमयीं त्या पलटणांचा लिटल् साहेब व दुसरा कोणीयेक साहेब हे दोघे सर्वांच्या पुढें त्या भिंतीवर चढले, तेव्हां त्या दोघांस ही जखमा लागल्या, आणि त्या पलटणांतील शिपाई लोक मेले व जखमी मिळून बासष्ट पडले. मग ती घेतलेली पेंठ इंग्लिशांनीं परशुराम भाऊचा पुत्र आपासाहेब याच्या स्वाधीन करून आपण आपल्या छावणीस गेले. तेव्हां त्या पेंठेंत मराठ्यांवर आंतले किल्लेकरीचालून येऊन त्या उभयतांचें मोठ्या निकराचें युद्ध झालें, तेसमयीं मराठे मेले व जखमी मिळून पांचशें पडले. त्यापेक्षां त्या किल्लेकरांचा अधिक नाश झाला, आणि ते माघारे गेले. असें असतांही तो आपासाहेब तेथून निघून आपल्या लोकांसहित माघारा लष्करांत गेला, तेव्हां तीपेंठ त्या किल्लेकरांच्या स्वाधीन सहज झाली. नंतर उभयपक्षींच्या मेलेल्या लोकांस जाळावयासाठीं कांहीं दिवसांचा सल्ला झाला. असें त्या युद्धाच्या आरंभ दिवसापासून मराठ्यांहीं तीन महिने कष्टी मसलतीनें घालविले; नंतर पुनः तीपेंठ घ्यावयाचा अभिमान धरून लाजेनें इंग्लिशांची कुमक न घेतां मराठ्यांहीं झटून लढून तीपेंठ घेतली. या पुढें मराठे व इंग्लिश त्या किल्ल्यासीं लढतां लढतां तेथच्या किल्लेदारानें मोठ्या शौर्यें करून किल्ला साडेसहा महिने संभाळिला, शेवटीं

निरुपाय होऊन संनस त्राशें नवरांच्या एप्रेलाचे त्रवथे तारिखेस त्याणें तो मराठ्यांच्या स्वाधीन केला.

५ असें धारवाडाचें वर्तमान असतां इंग्लिशांचें लश्कर मद्रासेहून निघालें तें दक्षिणेकडून टिपूच्या मुलखांत शिरून कारूळ व दिंडीगाळ व कुविंबतूर व पालघाट इतका मुलूख जानेवारीचे समाप्तीपर्यंत हस्तगत करून तेथोक माघारे मद्रासेस गेले. इतक्यांत मुंबईकडून फौज निघून समुद्रकांठीं कालीकट नामक बंदरराजवळ टिपूचें कांहीं लश्कर होतें त्याचा पराभव प्रथमकरून टिपूचे लोक मलबारांतून घालवून तो मुलूख घेतला.

६ इकडे मद्रासेस पहिलें लश्कर माघारें आल्यावरचि लंबन करितां लाटकान वालिस नामें साहेब आपले बरोबर लश्कर घेऊन पुनः टिपूच्या मुलखास चालिला, तो बिलोरावरून बंगलोरास गेला. तेथें जाऊन त्याणें मार्च्याचे पांचवे तारिखेस बंगलोरास घेरा घालून युद्ध करून तेंशहर घेतलें. तेसमयीं मोंगलांचें लश्कर मद्रासेच्या दोहोंपलटणांच्या साहाय्यें करून कोपाळाशीं लढत होतें, मग इंग्लिशांहीं तेंशहर घेतलेंसें ऐकून तो किल्लेदार अधीर होऊन निजामास किल्ला देता झाला.

७ त्यापूर्वी पुण्याहून जानेवारीचे पहिले तारिखेस पंचवीस हजार स्वार व पांचहजार पायदळ घेऊन हरीपंत फडका पंढरपुराकडून भीमाबकृष्णा यांच्या संगमापाशीं पार उतरून गेंडावकापर्यंत गेला. मग तेथून आपले दोनहजार लश्कर खेरीज करून बाकी सर्व लश्करानें करनोळा पर्यंत चालावें अशीआज्ञा देऊन आपण त्या दोनहजार लश्करासहित निघाला, तो नि-

जामअल्ली आपल्या मुलखाचे मर्यादेवरील पांगल गांवीं होता, तो तेथून आपल्या लश्कराची वर्तणूक चांगली करितो असें दाखवीत होत्साता तेथें मुकाम करून राहिला असे, त्याच्या भेटी स गेला. त्या भेटींत असें ठरलें कीं, इंग्लिशांशीं तहा प्रमाणेंच वागावें, परंतु टिपूचा समूळ नाश न करावा. त्यानंतर हरीपंत फडका याणें लाटकान वालिस याचे कुमकेस दहाहजार फौज पाठविली; ते लोक अनंतपुरास पोंहचले तेव्हां त्यांस कळ लें कीं, मोंगलांची दहाहजार फौज त्यालाटाच्या कुमकेस जात असतां वाटेंत टिपूचा कोणी कुतुभआदीन नामें सरदार आद ळला त्यास जिंकून मगलाटास मिळून ते सर्व श्रीरंगपट्टणास गेले, यास्तव आपलें तिकडे जाण्याचें प्रयोजन नाहीं असें समजू न ते लोक हरीपंताची मार्गप्रतीक्षा करीत तेथें मुकाम करून राहिले.

८ तो लाटकान वालिस श्रीरंगपट्टणावर निघाला असतां टिपूनें त्या आपल्या राजधानीपासून लाटाच्या लश्करापर्यंत मुलू खजाळून उद्ध्वस्त करून शत्रूच्या लश्करास घांस दाणा मिळेनासें करून ठेविलें होतें. मग तें लश्कर त्या श्रीरंगपट्टणाजवळ येऊन पोंहचलें असतां टिपू युद्धास उभा राहिला. तेसमयीं तो पराभव पावला ह्मणून त्यास श्रीरंगपट्टणाच्या आंत पळून जाणें प्राप्त झा-ले. तेव्हां लाटकान वालिस साहेब याणें श्रीरंगपट्टणाजवळ मेम हिन्याचे एकोणिसावे तारिखेस डेरे दिले. तेसमयीं पर्जन्यकाळ जवळ आला आणि त्याच्या लश्करास वाटेनें अन्नतृणादि मिळा लें नव्हतें त्यायोगें लोक बहुत हैराण झाले. याजमुळें त्यासाहेबा स वाटलें कीं, हें कार्य शेवटास जात नाहीं. याशिवाय मराठ्यांचें ल-

श्कर साहा ध्यास येणार होतें त्याचें ही कांहीं वर्तमान कळत
नाहीं, हा सर्व विचार मनांत आणून त्यालाटानें मुंबईहून ल
श्कर येत होतें त्यास आज्ञा केलीकीं, यावेळेस तुह्मी माघारें
जावें आणि आपण आपल्या मोठ्या मोठ्या तोफा नासून टाकू
न तें युद्धाचें काम सोडून तेथून निघून मेलगोदाची पहिली
मजल करावयाच्या बेतानें तिकडे चालिला; तो तेथें पोंहच
ला नाहीं तोंच त्याचे दृष्टीस पडलेंकीं, मोठ्या मोठ्या स्वारांच्या
टोळ्या आपल्या कडे चोहींकडून येतात, तेव्हां त्यास वाटलें
कीं, हे आपल्यावर कोणी शत्रूचे लोक चालून आले, म्हणून
त्याणें युद्धा विषयीं तयारी केली. मग त्यास समजलेंकीं, हें
लढकर आपल्या कुमकेस परशुरामभाऊ व नाना फडणवी
स यांचें आलें. त्यांत परशुराम भाऊचें लश्कर धारवाडा कडू
न आलें, आणि नानाकडून ही येऊंन पोंहचलें, तीं दोनीं ल
श्करें चोविसावे तारिखेस एकत्र मिळून त्यांची व लाटाची दु
सरे दिवशी पंचविसावे तारिखेस गांठ पडली. तीकुमक आप
णास येते असें लाटास पूर्वी नसमजण्याचें कारण असें कीं, को
णी टिपूकडचे पेंढारीलोक व बेरडलोक होते त्यांहीं बऊत चातु
र्यें करून जे त्या लाटास बातमी पोंहचविणारे जासूद होते ते
वाटेंतच मारून टाकिले, यास्तव त्यास वाटलेंकीं, आपणास
कोणी कुमक येतना हीं. म्हणून त्याणें नें काम सोडिलें. आणि
तेथून निघाला. नंतर ती कुमक पोंहचल्यावर त्या लाटकान
वालिसास पश्चात्ताप झालाकीं, आपण श्रीरंगपट्टणास घेरा
घातलेला उठवून निघालों हें दैवगतीनें विसंगत पडलें. मग
त्या लाटास म्हराठ्यांच्या लश्करी बाजारांत धान्यतृणादि सर्व सा-

मग्री मिळेलसें वाटून फार संतोष झाला.

९ त्यानंतर असें ठरलें कीं, तिघांहीं मिळून बारामहाल हस्तगत करावे; तें कार्य लाटकानवाल्यास याणें सिद्धीस नेलें, आणि मराठे व मोंगल यांहीं आणखी कांहीं किल्ले घेतले. नंतर दिसेंबराच्या शेवटास त्यासाहेबानें फिरून त्या श्रीरंग पट्टणावर जावयाची तयारी केली, परंतु परशुरामभाऊ आपल्या कांहीं लाभसाधनास चित्रदुर्गापाशीं गुंतून राहिल्यास लाटाकडे जाववेना, आणि मोंगलांचें लश्कर गरमकोंडया जवळ छावणी करून होतें, त्याच्याही येण्याची त्वरा दिसेना. हरीपंत फडका तर त्यालाटाच्या जवळच होता, परंतु त्याणें आपल्या लाभासाठीं युद्धाचें निमित्तकरून मुलखाचा वसूल जमा करावयास जागोजाग लश्कर पाठवून आपले बहुतेक लोक गुंतविले होते; अशा या अडचणीमुळें तें श्रीरंग पट्टण घेण्याचें काम तसेंच ठेवून तिकडे जावयाच्या मार्गांतील किल्ले घ्यावयाचा उद्योग आरंभिला.

१० मग त्याणें पांच किल्ले हस्तगत केल्यावर संनसवाशें ब्याण्णवांच्या जानेवारीचे पंचविसावे तारिखेस तो उत्तरदुर्ग-किल्ल्याजवळ गेला असतां तेथें मोंगलाचें लश्कर येऊन यास मिळालें, इतक्यांत हरीपंतफडक्याचें ही लश्कर येऊन त्याला यास मिळालें. नेझां तो लाटकानवालीस व हरीपंत फडका व निजाम अल्लीचापुत्र शिरवंदरजा हे तिघे मिळून फेब्रुवारीचे पांचवे तारिखेस श्रीरंगपट्टणाजवळ जाऊन पोंहचले. मग दुसरे दिवशीं टिपूचेलोक त्यापट्टणाच्या तटाबाहेर जे होते त्यांवर हल्ला करून ते माघारे कोटांत घालविले, आणि त्याशह

रास घेरा घालावयाची तयारी केली. नंतर मुंबईसरकारचेंल श्कर सोळावे तारिखेस येऊन पोंहचलें, तें त्या घेरा घालण्याच्या कामास फार उपयोगीं पडलें; आणि बेविसावे तारिखेस टिपू नें त्यांवर आंतून मोठी स्वारी घातली असतां त्यांहीं आपल्या बं दोबस्त नीटराखून त्यास मागें हटविलें.

११ त्याचे पूर्वीपासूनच टिपूनें तहाचें बोलणें लाविलें होतें, परंतु नें त्या लाटाच्या मनास येईना; शेवटीं टिपूनें त्या मुंबईचे टोळीवर हल्ला केला तोव्यर्थ झाल्यावर दुसरें दिवशीं टिपू त्या लाटाच्या मनास येईसा तह करिना झाला. तो प्रकार असा, त्यायुद्धप्रसंगाच्या पूर्वी जितका मुल्लूख टिपूचा होता त्यापैकीं निमे त्यानिघांजणांस असावा, आणि एककोटि पांमष्टलक्षरुपये रोकड तूर्तध्यावे, नंतर एकावर्षांत आणखी तिनकेंद्रव्य तीन हप्तांनीं त्याणें द्यावें; याप्रमाणें भरणा पुरता होईतों पर्यंत टिपूनें आपले दोघे पुत्र ओलीस द्यावे. असें झाल्यावर त्या टिपूकडून आलेलें द्रव्य त्यातिघांहीं वांटून घेतलें, आणि त्यापासून घेतलेल्या मुलखाची वांटणी करून घेत असतां एकेकास चाळीस चाळीस लक्षांचा विभाग आला. त्यांत मराठ्यांस विभाग-वरदानदी व कृष्णा यादोहींच्या मधला बऊतेक मुलूख आणि बिलोरी पाशीं सोंडूर नामें खोरें आहे नीजमीन आली. निजामाच्या वांटणीस घुटी व खंबरघा यादोन जागा व त्यांच्या मधला मुल्लूख आला; त्याची पश्चिममर्यादा मुद्दल व कनकगि

+ यामर्यादेमध्यें आनागोंदी संबंधें थोडकासा मुल्लूख आहे तो टिपूनें आपल्याकडे ठेविला.

री व कोपाळ. इंग्लिशांस वांटणी आलीती बारामहाल व कुर्ग व मलबार.

यानंतर मार्च्याच्या शेवटास ते तिघेही मुख्य एकमेकांचा परस्परें संमान करून एकमेकांची आज्ञा घेऊन आपआपल्याठि काणास गेले.

१२ परशुरामभाऊ तोनद्र होईपर्यंत त्याश्रीरंगपट्टणास लश्कर सुद्धां पोंहचला नव्हता. त्यास कितीएक वेळां हरीपंतफडका यांणें तेथें येण्याविषयीं बोलावणें केलें, आणि त्यास व्हाट कान वालीस याची मसलत ही कळली होती, परंतु तेसमयीं तो समजला कीं, या वेळेस आपल्याजवळ इंग्लिशांचीं पलटणें आहेत या योगें बेदनूर हस्तगत होईल, अशा अर्थी तो श्रीरंगपट्टणाकडे न जातां बेदनुराकडे चालिला. तेव्हां त्यास वाटें त होळी आनेर नामें किल्ला लागला, तो त्या पलटणांहीं घेतला. मग तो परशुरामभाऊ तेथून पुढें तुंगेच्या कांठानें चालत असतां त्यास शिमोगा नामें दुसरा किल्ला लागला, त्याच्यावयाचा नेम केला. तेव्हां त्या किल्ल्याचे निर्कृती दिशेस दोन कोसांवर एक मोठ्या झाडीचा मुलूख होता, त्यांत टिपूचा कोणी भाऊबंद सालहजारपायदळ व आठशें स्वार व दहा तोफा इतक्यांसहित ठाणें धरून राहिला असे; त्यास जिंकावयाकरितां परशुरामभाऊनें आपला पुत्र आपासाहेब त्याजबरोबर स्वार देऊन पाठविला, आणि त्यापलटणांतील आठकंपनी आपल्या लश्कराच्या तळावर ठेऊन बाकी लोकांसहित त्या लिट्ल साहेबास ही त्याच्या साह्यास बरोबर नेमिलें. तीशाचूची जागा स्वारांनीं आंत जावयास फार कठीण होती म्हणून त्या लिट्ल साहेबास आपल्याजवळ आ-

ठशें लोक मात्र असतांही त्या युद्धाचा सर्वभार संभाळावा लाग ला. तेव्हां फारवेळ परमशौर्य करून अतूट उद्योग केल्यानें त्यास नीजागा प्राप्त झाली, मग थोडक्याच वेळानें तो किल्ला ह स्तगत झाला. नंतर परशुराम भाऊ त्याराव्याचे वाटेनें बेदनुरास जाऊन त्या किल्ल्याला घेरा घालणार होता, परंतु त्यास वाटेंत च वर्तमान कळलें कीं. आपणावर टिपूचा कोणी मोठा सरदार श्रीरंगपट्टणाकडून येतो आहे, म्हणून तो बेदनूर घेण्याचें काम टाकून श्रीरंगपट्टणास जाऊन लाटकानवालीस याला मिळाव यास चालिला, तो तें तहाचें काम पुर्तें झाल्यावर तेथें पोंहच ला.

१३ नंतर ते श्रीरंगपट्टण घेणारे तिघेही आपआपल्या ठिकाणास जाऊंलागले तेव्हां मराठ्यांचें तोफखाना वगैरे जड सामान व इंग्लिशांहीं मराठ्यांस मोठ्या मोठ्या सत्रा तोफा दि ल्या होत्या त्या हें सर्व त्या परशुरामभाऊला पुण्यास पोंहचवाव याचें काम पडलें, त्यामुळें तो वाटेनें हळू हळू जात असतां ना टिपूशीं व मराठ्यांशीं तह झालेला असूनही त्या भाऊला टि पूकडचे पेंढारी व बेरड यांचा बहूत उपद्रव लागला, आणि तो परशुराम भाऊ पूर्वी तिकडे गेला तेव्हां त्याच्या लोकांहीं त्या वाटेचा मुलूख उद्ध्वस्त केला होता त्यणून तो त्या श्रीरंगप ट्टणाहून तुंगभद्रेस पोंहोचे पर्यंत असा बेजार झाला कीं, त्याम माणें मराठ्यांचे हाल कधींही न झाले.

भागसत्ता विसावा.

संनसत्राशेंव्याण्णवांपासून पंचाण्णव पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ महादजी शिंदा हिंदुस्थानांत असतां त्याचे साह्याला आलेले होळकर व अल्लीबहादर हे त्याच्या कामास नादर्श न झटले त्यायोगें त्याशीं व त्यांशीं मात्सर्य करून कलह होई; ते समयीं तो महादजी त्यांस म्हणे कीं, मी अंगें पुण्यास जाऊन तुम्हांस माघारें बोलावणें करीन. असें बोले, परंतु त्या दोघांसही ऊक होतें कीं, नानाच्या मनांत शिंदा फार वाढूं देऊं नये, आणि हा शिंदा इनके लांब यादिल्लीहून पुण्यापर्यंत जाई तों पर्यंत इकडचा बंदोबस्त विस्कटेल, म्हणून याला तिकडे जावयास अवकाश होणार नाहीं, हें समजून शिंद्याचें नें भाषण लक्ष्यांतआणीनात. मग तो उज्जनीस जाऊन तेथून पुण्यास जावयास निघाला नेहमीं त्यांस नें सत्य वाटलें, आणि या जाण्यांत कांहीं मोठी मसलत आहे तो कोणती असेल असा विचार करितां त्यांच्या मनांत आलें कीं, पुण्यांत व हैदराबादेंत इंग्लिशांचें प्राबल्य होईल त्याच्या निवारणार्थ हा जातो. कदाचित् आपण जो हिंदुस्थानांत संपादिलेला मुलूख यांत यांस किमपि भाग नद्या वा असेंही असेल. ते अशा कल्पना करूं लागले, परंतु घास्तविक पाहिलें असतां पुण्यांतील ब्राह्मणांचा बंदोबस्त राखून पेशव्याजवळ आपण मुख्यत्वें वागावयाच्या मसलतीनें तो निघाला. ते समयीं त्याणें लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, पूर्वी विकील मुतलख नामें पदवी बादशाहापासून आली पेशव्यांचे नामें सं-

पाडिली त्याचा अभिषेक पेशवे यांस करावया करितां बादशा हाचे आज्ञेनें पुण्यास जातों. त्यासनदेचे बरोबरच त्याणें बा दशाहापासून मोंगलांच्या सर्वमुलखांत इतःपरगोवधनछा वा अशाबंदोबस्ताची दुसरी सनद घेतली होती नीही मराठे लोक यांस दारवबावया करितां आपल्या बरोबर नेली.

तो महादजी शिंदा पुण्यास येतो असें वर्तमान नानाफ डनविसास कळलें तें त्याणें प्रथम सत्य मानिलें नाहीं. मग जेव्हां खचीत समजलें कीं, तो शिंदा पुण्यास येतो खरा, तेव्हां त्या नानानें लाटकानवालिसास लिहिलेंकीं, पूर्वी लिहिल्साहे ब आपल्या पलटणांसहित मजपाशीं होता तो हल्ली श्रीरंगपट्ट णची मोहीम करून मुंबईस गेला आहे, त्यास त्यापलटणांसह वर्तमान यासमयीं जर मजकडे पाठवाल तर मी त्याचा खर्च चालवीन, आणि तो तुमचा मजवर मोठा उपकार होईल. असें नानाफडनविसाचें लिहिलेंगेलें असतां त्यावेळेस तो लाट कानवालीस त्याचे कुमकेस तीं पलटणें पाठवीना.

तो नानाफडनवीस आपणास इंग्लिशांपासून कुमक आ णील आणि ती आपणास बाधक होईल असें समजून तो म- हादजी शिंदा नानाफडनविसास इंग्लिशांपाशीं कुमक मागाव याचें काम नपडावें म्हणून आपल्या बरोबर एकपलटण मात्र घे ऊन पुण्यास गेला. तो तेथें मुळा व मुठा या नद्यांच्या संगमा जव ळ संनसत्राशें ब्याण्णवांच्या जून महिन्याचे अकरावे तारिखेस डे रे देऊन उतरला.

२ मग तो महादजी शिंदा आपला उद्योग चालवूं लागला तेव्हां तें पदपेशव्यानें नस्वीकारावें या विषयीं नानानें श्रीमंतांस

असें समजा विलेंकीं, या सनदेमध्यें जे महाराज आदिराज असें लिहिलें आहे हेंपद आपल्या पेशवाईसयोग्य नव्हे. या प्रमाणें तो सांगत होता, परंतु शिंदा तो उद्योग टाकीना*. शेवटीं त्याणें त्या अभिषेका विषयीं साताऱ्याच्या राजाची आज्ञा घेऊनसा कार्याची सिद्धता केली.

३ महादजी शिंदा पुण्यास आल्यावर नवां दिवसांनीं ना ना फडनवीस त्याच्या भेटीस गेला. तेव्हां तो शिंदा मोठ्या संमानानें त्यास भेटून त्या देखतां आपण गादीवर बसला नाहीं, अशी त्याची मर्यादा रक्षिली. नंतर दुसरें दिवशीं महादजी शिंदा पेशव्यांचे भेटीस गेला, ते समयीं त्याणें हिंदुस्थानचे कितीएक चमत्कारीक पदार्थ श्रीमंतांच्या भेटीस दिले; आणि त्यावेळेसच उद्यांव कील मुनलरवू पदवीचा अभिषेक श्रीमंतांस करावा असा नेम ठरविला. नंतर त्या अभिषेकाच्या थाटास असा समारंभ केला कीं, त्याणें आपल्या तळा पासून जवळच फार चांगल्या चांगल्या मोठ्या मोठ्या राजडेऱ्यांची पंगत उभी केली. त्या सर्वडेऱ्यांच्या मागच्या एक डेरा मुख्य होता, त्या मध्यें मोंगलांच्या बादशाहाच्या तक्तासारिखें एक आसन करून ठेविलें, त्यावर ती बादशाही सनद व त्या पदवी संबंधें बादशाहा कडील वस्त्रालंकारादि पदार्थ मांडिले. नंतर पेशवा मोठ्या समारंभाच्या स्वारीनें तेथें येऊन मग त्याडेऱ्यां त त्यागादी समोर आला असतां त्या आसनास तीनवेळां नमस्का

---

* तो उद्योग न सोडण्याचें कारण असें कीं, त्या वकील मुतलरवीच्या सनदेंत पेशव्याचें नाममात्र होतें, परंतु तत्संबंधें सर्वकारभार महादजी आपण पेशव्याचा हितैषक होऊन करणार.

र करून मग त्यावर एकशें एक मोहरा ठेविल्या, आणि तें आस न उजवें घेऊन त्याचे डावे बाजूस बसला. नेक्षां शिंद्याजवळकोणी फारशी लिहिणारा मुख्य होता त्याणें ती वकीलमुत्तन्नरची अधिकाराची सनद वाचून सर्वांस ऐकविली, आणि गोवध न होण्याविषयीं बंदोबस्ताची जी सनद होती तीही वाचून दाखविली. नंतर ते वस्त्रालंकारादि पदार्थ पेशव्यानें घेतले; त्यांत वस्त्रें नऊ आणि जडावाचे अलंकार पांच होते, त्यांत शिरपेंच दोन व तुरा एक आणि बाजू भूषण जोड एक व पोहोंच्या जोड एक. याशिवाय कंठी, कुडक्या, भिकबाली, व कडीं तोडे, असे अलंकार होते; आणि एक कलमदान व एक दौत व एक मोरनब व दोन मोरचेलें, आणखी एक ढाल व तरवार; याखेरीज एक घोडा व एक हत्ती; त्याशिवाय बादशाही झेंड्याचे हत्तीसहा व एक नालखी व एक पालखी, याप्रमाणें होतें. त्यांतील वस्त्रें व अलंकार तेथून दुमड्याडेऱ्यांत नेऊन मग ते अलंकार आंगावर घालून आणि तीं वस्त्रें नेसून पेशवा पुनः पहिल्या जाग्यावर येऊन बसला. तेक्षां महादजी शिंदा व नाना फडनवीस वगैरे कारभारी मंडळी पैकीं जे त्यासभेंट होते त्यांहीं श्रीमंतांस नजर+ दिल्या. मग पेशवा तेथून माघारा पुण्यांत येऊं लागला, तेसमयीं हरीपंतफडका व महादजी शिंदा हे दोघे नीं दोन मोर्चेलें त्यावर उडवीत त्या नालकी पर्यंत गेले; मग तो त्या नालकींत बसून पुण्यास मोठ्या समारंभानें आला.

+ नजरा दिल्या त्यावेळेस जे कोणी आपणास साताऱ्याच्या राजाचे पुरातन चाकर म्हणविणारे शिलेदार व मानकरी होते त्यांस तीपदवी पेशव्यांस प्राप्त झाल्याचें सहन न होऊन कितीएकांहीं नजरा दिल्याच नाहींत व कितीएक त्या डेऱ्यांत गेले नाहींत.

ती स्वारी पहावयास नागरिक लोकांची फार दाटी झाली. तेलोक अनेकप्रकारें जयशब्दउच्चारीत असतां सहस्रावधी वाद्यांचा ध्वनि व बंदुका आणि तोफा यांच्या सरबत्या हे सर्व ध्वनि मिळून मोठा गजर झाला. तो असा थाट होतांकीं, त्या पूर्वी पुण्यांतील लोक यांहीं कधींही तसा समारंभ पाहिला नाहीं.

पेशव्यास बादशाहाकडची वकील मुतलखी अधिकाराची सनद आली त्यांतच असें लिहिलें होतेंकीं, दिल्लीमध्यें पेशव्यांचा हस्तक महादजी शिंदा व त्याचा कोणी वंश्य असावा, त्यावरून पेशवा महादजी शिंद्याच्या डेऱ्यांत तो अभिषेक समारंभ होऊन आपल्या वाड्यांत येतांच त्याणें त्यास तो अधिकार दिला. त्यावेळेस शिंद्यास मोठी योग्यता मिळाली असतां तो मोठ्या नावास चढला असूनही त्या सभेंत बोलिलाकीं, मी श्रीमंतांचा जोडाउचलणारा चाकर आहें, त्या मला पाटील या नावा पेक्षां दुसरें मोठें नाव योग्य नाहीं. असें बोलून त्याणें आपली लीनता† दाखविली, तेणेंकरून लोक वश झाले, परंतु त्या सभेस जे गृहस्थ होते ते त्याच्या हलक्या बोलण्याचा अतिशय झालासा समजून त्यांचीं मनें तादृश प्रसन्न न झालीं. कांकीं, हा मुळचा कसा होता, आणि या वेळेस किती योग्यतेस चढला आहे, अणखी भाषणतर केवळ दीनासारिखें करितो. तस्मात् हा सरळ पुरुष नव्हे असें त्यांस दिसलें.

---

† तेसमयीं व्यवहारांतमागून चालत आलेली शिंद्याची नावें तीन प्रकारची होतीं ती अशीं, एक राजमहाराज माधवराव शिंदा, दुसरें महाराजमहाम. तिसरे अलीजाबहादूर.

मग शिंदा आपले तळावर आला नेहमीं त्याच्या सरदा
रांहीं त्यास नजरा दिल्या, परंतु दुसरे सर्व मराठे आपणास अ
निष्ठ आहेत असें त्या महादजीला समजलें; त्यावरून त्याणें
मनांत निश्चय केला कीं, इतःपर आपली मसलत परमसा
धपणें शेवटास न्यावी. त्यानंतर पेशव्यास आपण नानाफ
डनविसापेक्षां प्रियहोण्याविषयीं तो महादजी शिंदा त्या श्रीमं
तास गोड गोड गोष्टी सांगून युक्तीनें त्यास शिकारीचें व्यसन
लाऊन आपल्या बरोबर स्वारीस नेऊं लागला. तो त्या शिंद्याचा
मतलब समजून नानाफडनविसानें त्याशीं व श्रीमंतांशीं ब-
ऱ्हुधा एकांत न होण्याविषयीं यत्न चालविला. तो माधवराव पेश
वा नरउत्तम स्वभावाचा होता, त्यास वाटे कीं, नाना बोलतो तेंहि
खरें हा, आणि तो विश्वासूहीरवरा, परंतु त्याचें वागणें शिंद्यापेक्षां
क्रूर तेचें दिसे, आणि तो कधींही आनंदित नसे, शिंदा तर पाह-
ण्यांत व भाषणांत व वागणुकींत ही उत्साहकारक होता, म्हणू
नत्याश्रीमंतांचें मन शिंद्याकडे लागे.

४ दरबारांत शिंद्याचें काम बऱ्हुधा हिंदुस्थान संबंधें हो
तें; तो महादजी शिंदा नानाफडनविसास म्हणे कीं, मी मोठीरव
टपट करून पेशव्यांचा मान वाढविला, आणि मराठेही मोठ्या
योग्यतेस चढविले, त्याम जो मी खर्च केला तो तुह्मी सरकारांतू
न द्यावा. या गोष्टीस नानाफडणवीस किमपि मान्य होईना; तो
म्हणे कीं, तुह्मी जो मुलूख घेतला त्याचा वसूल होऊन त्यांपैकीं
जें उरेलें अमलतें आह्मास द्या. अशी पुष्कळ खटपट होत अस
तां ही नाना व शिंदा हे दोघे एकमेकाचा मान राखून बागण्यांत अं
तर करीत नव्हते. शेवटीं हिंदुस्थानांत नानाच्या पक्षाचा तुकोजी

होळकर याचीं व शिंद्याचा दिबायन नामें सरदार याचीं रजपूतलो कांच्या राज्यांतील कांहीं लुटीचे वांटणी संबंधें कलह उत्पन्न होऊन मोठें युद्ध झालें; त्यांत होळकराचीं नवीं चारपलटणें ठेविलेलीं होतीं त्यांचा शिंद्याच्या पलटणांहीं अंगदीं पराभव केला व त्यांच्या अडतीस तोफा दिबायना कडे गेल्या. तो सूड घ्यावयास त्या होळकरानें शिंद्याची राजधानी उज्जनी तेथें जाऊन नें शहर लुटलें.

५ असें वर्तमान पुण्यास आल्यावर नाना फडनवीस व शिंदे यांच्या परस्पर मर्यादेंन अंतर पडलें; तेव्हां नानानें आपणास कोणे समयीं दगा होईलसें समजून परशुराम भाऊ पटवर्धन यास फौजे सुद्धां आपणा कडे बोलाविलें. तो दोन हजार स्वारां-सहित आला, तें पाहून शिंदा आपणास फौज आणावयास निमित्त चांगलें झालें असा हर्ष पाऊन एक बृगेद पलटणें आणविलीं. नंतर त्याणें नानाशीं विपरीत वागणूक केल्यानें व पेशवा प्रसिद्धपणें आपणा कडे झावासा उद्योग केल्यानें त्याशीं व नानाशीं असा द्वेष पडला कीं, तो हरीपंत फडक्यानें महा प्रयासें करून मिटविला नाहीं तर मोठा अनर्थ होता. त्यानंतर ते दोघेही आपआपल्या जवळ फौज असतां युद्धापेक्षां पेशाव्याच्या मध्यस्थीनें आपआपलें कार्य साधावें असें इच्छीत होते.

६ कोणे एके समयीं शिंदा पेशाव्याशीं कांहीं एकांत करीत असतां तीं भाषणें ऐकून कोणी नानास कळविलीं, तेव्हां त्यास कांहीं भीति उत्पन्न होऊन त्या नानानें मनांत विचार केला कीं, पेशाव्यास एकांतीं स्पष्ट पुसावें कीं, तुमी त्याजकडे आहांत किंवा मजकडे आहांत नें सांगा. या प्रमाणें विचार केल्यावर तो नाना फडनवीस पेशाव्याजवळ जाऊन एकांतीं बोलिला कीं, आजपर्यंत

मी तुमची सेवा विश्वासूपणें कोणे रीनीची कशी केली तो अर्थ मनांत आणून शिंद्याचें वागणें कोणेरीतीचें आणि त्याणें आपल्या लश्करांत परदेशी लोक चाकरीस ठेवून त्यांच्या रीती प्रमाणें नवेच कायदे केले, आणि तो ब्राह्मणास अगदी बुडवून सर्व मराठी राज्यांत आपण मुख्यत्वें वागावें असा त्याचा मनोरथ आहे, ऐशीयास मला तुमची अनुकूलता असल्यावांचून त्याची बरोबरी करितां येत नाहीं, त्यास हा सर्व विचार मनांत आणून माझ्या मसलतीनें वागावयाचें असल्यास तशी आज्ञा द्यावी, नाहींतर मला काशीस जाण्याचा निरोप द्यावा. असें बोलतांना त्याना नाच्या नेत्रांस पाणी आलें, आणि श्रीमंतजर शिंद्याचे मसलतीनें वागूं लागले तर राज्य बुडेल म्हणून खेद करूं लागला. हें पाहून त्या माधवरावाचें मन फारच द्रवलें, आणि तो ही अगदी होऊन बोलिला कीं, तुह्मी गेल्या गोष्टी मनांत आणूं नये, इतःपरती विचारें च वागेन, आपण कांकाशीस जातां. असा नानाचा विचार श्रीमंतांच्या मनांत भरून मानूक्यान त्या नानाची मुख्यता ठरली.

७ असें असतांही त्या शिंद्याच्या युक्तीपुढें थोडक्याच दिवसांत नानाचें कांहीं चालेनासें झालें असतें, परंतु तो शिंदा आपल्या मतलबास फारजपून असतांही थोडक्याच दिवसांत त्यास मोठा ज्वर होऊन तो पुण्याजवळ वानवडी गांव आहे तेथें संनस त्राशें चवज्याण्णवांच्या फेब्रुवारीचे बारावे तारिखेस मृत्यु पावला.

८ तो महादजी शिंदा फार योग्यतेस चढला होता त्यायोगें त्याचा मृत्यु सर्व हिंदूलोकांत कितीएकांस हितावह आणि कितीएकांस दुःखदायक झाला. त्या महादजीच्या मनांत होतें कीं,

आपण मुख्यत्वें वागावें, असें असतां त्याची इच्छा असे कीं, समय विशेषीं बाहेरच्या शत्रूस मारावया करितां मानकरीलोक सबळ असावे; ब्राह्मणाची मुख्यता त्यास अगदीं प्रिय नव्हती. तो योग्यतेस चढत असतां दोहों ब्राह्मणाच्या कलहांत शिरून त्यांनीं एकाचा पक्ष स्वीकारून त्यास वाढविलें; तथापि तो महादजी शिंदा आपण वाढविलेल्या नानास आपण च बुडवावयाचा उद्योग करिता झाला. तो शिंदा ज्यासमयीं कांहीं कार्यवशें करून पुण्याहून दूर राहूं लागला आणि माळव्या मध्यें त्याचें लश्कर इंग्लिशांहीं जिंकिलें तेच समयीं ब्राह्मणांनीं इंग्लिश गाडुसा हेब वश केला होता, तेव्हां दिसण्या मध्यें असें झालें कीं, महादजी शिंदा ब्राह्मणापेक्षां न्यून बळ आहे; परंतु साल्ब्याच्या तहांत इंग्लिशांहीं ठरविलें होतें कीं, महादजी शिंदा स्वतंत्र; आणि त्या पुढें तो मराठ्यांस व इंग्लिशांस तहाचें द्वार झाला. तेव्हां त्याची न्यूनबळता जाऊन योग्यतेस चढत चढत स्वतंत्रपणा करून आपल्या इच्छेस येईतसें वागावयाची त्यास शक्ति आली. तो सूक्ष्मबुद्धीचा आणि राजनीतींत कुशल असे, तसाच कुटिळ व स्वराज्यवृद्धी विषयीं उत्कंठित आणि वीर्यद्वेषी होता. त्याचें मुख पाहिलें असतां असें वाटे कीं, हा सदा आनंदी आणि सुबुद्धी पुरुष आहे; तो शरीरानें पुष्ट आणि देखणा होता; त्याचा रंग काळा असे; त्याच्या पायास पानपतचे लढाईंत जखम लागल्यामुळें तो लंगडत चालत असे; त्याचे सेवक त्याजवर प्रीतीकरीत होते; तो आपल्या लोकांस परभारां गावांवर देणें द्यावयास तत्पर होता, परंतु स्वजी न्यांतून किंवा स्वासगी घेकीं देण्यास जड असे हातर मराठ्यांचा प्रायः जातिस्व[illegible]

आहे. मराठीलोकांत कोणी अक्षर वाचणारे व कोणी लिहिणारे असतात, परंतु वाचणें व लिहिणें व जमाबंदीचें कौशल्य व हिशेबीं निपुणता इतके गुण एकत्र असा पुरुष मराठ्यांत दुर्लभ आहे, असें असतां महादजी शिंद्यांत हे सर्व गुण होते.

९ तो महादजी शिंदा मेला तेव्हां त्यास पुत्र संतती नव्हती. त्या महादजी-चा सरखा भाऊ तुकोजी शिंदा तो पानपत-च्या लढाईत मेला होता, त्याचे तिघे पुत्र, एक केदारजी, व एक रोंढोजी, व एक आनंदराव. ते महादजी शिंद्यानें आपल्या लष्करांत ठेविले, त्यांतील केदारजी तो महादजी असतांनाच मृत्यु पावला होता, त्यास संतती नव्हती. रोंढोजीस दोन पुत्र होते, आणि आनंदरावास एक पुत्र दवलतराव नामें होता; तो त्या तिघां भावांतील कनिष्ठाचा पुत्र असें असतांही महादजीनें नेमकेला होताकीं, मी या दवलतरावासच दत्त घेईन, परंतु तो प्रकार त्याच्या मृत्युसमयीं शेवटास गेला नाहीं. तरी ती गोष्ट त्याच्या जवळच्या लोकांत प्रसिद्ध होती, त्यणून तो निवर्तल्यावर त्या दवलतरावाची स्थापना महादजीच्या जागीं होन असतां लक्ष्मीबाई महादजीची स्त्री ती आपल्या शक्ती प्रमाणें त्या कार्यास अडथळा करूं लागली, तथापि तें पद दवलतरावास प्राप्त झालें, त्यावेळेस तो पंधरा वर्षांचा होता.

१० महादजी शिंद्याच्या अंतकाळीं नागपुरीं व बडोद्यांत कायकाय वर्तमानें होत आलीं तीं अशीं; तेसमयीं नागपुरामध्यें रघूजीभोंसला राज्यकरीत असे; त्याचा बाप संन सत्राशें अठ्याय शींत मेला, तेसमयीं रघूजीपेक्षां धाकटे त्याचे पुत्र खंडोजी व व्यं

काजी हे दोघे होते, त्या व्यंकाजीस मन्या बापू ही म्हणत.

त्यांत खंडोजीस बापानें आयत्या राज्याचा उत्तर भाग दिला, आणि व्यंकाजीच्या स्वाधीन दक्षिण भाग केला. रघूजी भोंसला तो त्याचा ज्येष्ठ पुत्र यास जानोजी भोंसला चुलता याची मराठी राज्यांतील सेनासाहेबसुभा पदवी प्राप्त झाली होती, परंतु तो त्याचा बाप असतां त्याजकडे वराड ची मुख्यता न झती.

ज्या वेळेस टिपूच्या नाशा विषयीं मराठे व निजाम व इंग्लिश यांचे ऐक्य झालें, ते समयीं पेशव्यांच्या आदराच्या बोलाव ण्या वरून त्यार घूजी भोंसल्याला पुण्यासजावें लागलें. तो तेथें असतां त्या मोहिमेस नजावेसें त्याच्या मनांत होतें, यास्तव त्याणें पेशवा स्वयें त्या कामासजात नाहीं हें निमित्त जमेस धरू न मलाही तिकडे जाणें आवश्यक नाहीं, असें युक्तीनें समजा विले; परंतु तो आपला मनोरथ शेवटास जात नाहीं सा समजू न श्रीमंतापाशीं एकांतीं बोलिला कीं, जरमी इतका दूर टिपूच्या मुलखां गेलों तर माझा भाऊ खंडोजी माझें राज्य आटोपील; त्या वरून पेशव्यानें त्या मोहिमेच्या खर्चा बद्दल दहा लक्ष रुपये घेऊन त्यास माघारें जावयाची आज्ञा दिली. मग तो नागपुरीं यों होचल्यावर थोडक्याच दिवसांहीं त्याचा भाऊ खंडोजी मृत्यु पा वला. तो त्या रघोजीस मोठें शल्य होतें तें निवारण जाल्यावर त्याणें आपला दुसरा भाऊ व्यंकाजी यास चांदा व छत्तीसगड याची जहागीर दिली.

११ बडोद्या मध्यें फत्तेसिंग गाइकवाड राज्य करीत हो ता तो सन सत्राशें एकुणनवदांच्या दिसेंबराचे एकविसावे ता

रिवेस मार्डावरून पडून मृत्यु पावला. त्यावेळेस त्याचा धाकटा भाऊ मानाजीराव याणें सयाजीला आपले स्वाधीन ठेवून राज्य चालविलें. तेव्हां सयाजी व तो मानाजीराव गाइकवाड याचा मधला भाऊ गोविंदराव तो अनधिकारी होत्साता पुण्या जवळ एक खेडेगांवीं रहात होता, त्याणें तो फत्तेसिंगमल्याचें वर्तमान ऐकून पेशव्यास अर्ज करीत असे कीं, तेंराज्य माझेंमला असावें. त्याप्रमाणें करण्यास तो अधिकारीच होता, परंतु मानाजीराव याणें पेशव्यास तेव्हेनी सलक्ष तेराहजार एकरुपया नजर केला, आणि फत्तेसिंगाकडे छत्तीस लक्ष रुपये खंडणीची बाकी राहिलेली होती ती देतों असें कबूल केलें, त्यावरून नानाफडनविसानें त्याराज्याविषयीं पेशव्याची सनद त्या मानाजीरावास देवविली; तेव्हां गोविंदराव याणें महादजी शिंदा पुण्यास आल्यावर त्याचे द्वारें आपल्यास त्या राज्याची सनद संपादिली. तेसमयीं मानाजीराव इंग्लिशांस कुमक मागत असतां इंग्लिशांहीं त्याची समजूत पाडावयाविषयींना नाशीं बोलणें लाविलें, इतक्यांत मानाजीराव मृत्यु पावला, तेव्हां तो तंटा सहजच नाहींसा होऊन गोविंदराव गाइकवाड आपल्या अधिकारावर जावयास सिद्ध झाला, परंतु नानाफडनवीस वगैरे कारभारी त्यास पूर्वील देणें जें ठरलें होतें त्याची कबूलात करून घेतल्यावांचून जाऊं देईनात, आणि तापीचे दक्षिणेकडचा मुलूख त्याणें पेशव्यास द्यावा, याप्रमाणें त्या गोविंदरावास मागत होते, परंतु ती गोष्ट त्याणें इंग्लिशांस कळविली, तेव्हां त्या इंग्लिशांहीं सालप्याच्या तहा विपरीत ही गोष्ट करतां अर्से समजावून दिल्यावर नानानें तें सोडिलें. नंतर तो गोविंदराव संन

सत्राशें ब्याण्णवांच्या दिसेंबराचे एकोणिसावे तारिखेस आपल्या अधिकारावर जावयास निघाला. असें महादजी शिंद्याच्या मरण समयीं वराडांत आणि बडोद्यांत वर्तमान झालें.

१२ कोंकणांत तुळाजी आंग्र्या इंग्लिशांशीं फार चांचे पणा करीत असतां त्यांहीं तो संनसत्राशें छ्याण्णांत अगदीं हीनबळ केला.

कुलाबकर मानाजी आंग्र्या संनसत्राशें एकुण साठांत मृत्यु पावला होता, त्याचा पुत्र रघुजी आंग्र्या तो आपल्या बापा प्रमाणेंच आपणास पेशाव्याचा चाकर म्हणवी, आणि कांहीं त्याची आज्ञा झाली असतां मान्य करावयाचें कारण पडलेंतर मानीत असे. तो रघूजी संनसत्राशें त्र्याण्णवांत मृत्यु पावला, ते समयीं त्याचा कोणी भाऊबंद जयशिंग आंग्र्या यानें पुण्याची आज्ञा न घेतां त्या रघूजीचा पुत्र मानाजी यास रघूजीच्या जागीं बसवून कारभार चालविला, त्या योगें पुण्याचे दरबारी लोक तो जयशिंग आंग्र्या व तो मूल मानाजी यांचा द्वेष करूं लागले.

जंजीऱ्याचा शिद्दी याच्या ही राज्यांत कांहीं प्रकार झाला तो असा, त्या राज्यांत शिद्दी इब्राहीम नामें होता तो त्या संवींत मुख्य असे, तो संनसत्राशें बासंष्टांत मृत्यु पावला, त्याच्या स्थानीं अबदुलरहीम नामें शिद्दी अधिकारी होता त्यास तो अधिकार प्राप्त न होतां शिद्दी याकूट नामें होता त्यानें तो अधिकार मिळविला. तेव्हां तो अबदुलरहीम तें आपलें पदच्यावयास कांहीं यत्न करीत असतां तो सिद्दीसजाईना तेव्हां तो पुण्यास जाऊन आश्रय पावला. शिद्दी याकुटानें तर त्यास पेशवा अनुकूळ न होण्या विषयीं पुण्यास लिहून समजूत केली की, तूर्त दंडाराजपूर

अब्दुलरहिमा सदेतों आणि मी मृत्युपावल्यावर जंजीराही त्याचाच आहे, त्या प्रमाणें मान्यता होऊन पुढें शिद्दीयाकूट मेल्यावर शिद्दी अब्दुलरहीम यास तें स्थान प्राप्त झालें. परंतु शिद्दीयाकूट याणें आपल्या मृत्युसमयीं लेख करून ठेविला होता कीं, हें राज्य अब्दुलरहीम याणें करावें, आणि याचे मागें याच्या दुसऱ्या पुत्रांनें करावें; नी लहान असतां माझा मित्र शिद्दी जोहर याणें नें काम संभाळावें.

यानंतर अब्दुलरहीम संनसत्राशें चवऱ्यांयशीं मध्यें मृत्युपावला, त्याणें तें शिद्दीयाकुटाचें पत्र न मानितां आपला वडील पुत्र अब्दुलकरीम, त्यास बाळूमियां म्हणत असत, त्याला आपले जागीं स्थापावें असा आपले मरणसमयीं नेम करून ठेविला. मग तो अब्दुलरहीम मेल्यावर याकुटाचा मित्रशिद्दीजोहर तो त्यारहीमाचे दोघे पुत्र आपले स्वाधीन करून घेण्या विषयीं उद्योग करीत असतां तो बाळूमियां आपल्या धाकट्या भावास घेऊन पुण्यास जाऊन नानाफडनविसाचे आश्रयानें राहिला. नंतर त्या वादा विषयीं इंग्लिश मराठ्यांशीं शिद्दीजोहर याचे पक्षीचें बोलत असतां नानाफडनविस सरकार आशा होती कीं, हें लहानसें राज्य आपणास असावें, त्यास बऱ्हुत वेळ पर्यंत इंग्लिशांची अनुकूळता होईना; मग ज्या वेळेस टिपूच्या नाशा करितां मराठे व निजाम व इंग्लिशांचें ऐक्य झालें त्यावेळेस असा नेम ठरला कीं, तो बाळूमियां व त्याचा भाऊ यांस मुरते जवळ पाऊणलक्ष रुपये वर्षास जमा होतसा मुलूख द्यावा; आणि एकदांचाळीस हजार रुपये देऊन तो आंग्र्याचा मुलूख पेशवे यांहीं घ्यावा, असें करार पत्र संन

सवाशें एक्याण्णवांच्या जून महिन्याचे सहावे तारिखेस सिद्ध झालें; आणि तें राज्य लहान असें असतांही हस्तगत कराव यास पेशव्यांना फावलेंच नाहीं म्हणून तें अद्यापि राहिलें, आणि पेशव्यांचें गेलें. यास दृष्टांत, जसें नदीच्या कांठीं लढा ठे असतांत ते मोठें पाणी आलें तरी लवून राहतात, आणि मोठे मोठे वृक्ष त्या पाण्याच्या नेटानें उपटून वाहून जातात.

१३ मालवणा कडील व सांवताचे वाडी कडील वर्तमान असें, मालवणकर व सावंत वाडीकर यांहीं चांचे पणा करून इंग्लिशांस बहून उपद्रव केला असतां इंग्लिशांहीं लढाऊ जहाजें पाठवून कोल्हापूरकरांचें मालवण व सांवतांचा रेडी किल्ला संनसवाशें छपन्नांत घेतला. नंतर दुसरे वर्षी कोल्हापूरकरां पासून तीन लक्ष्यांपशीं हजार रुपये घेऊन मालवण किल्ला त्यांस माघारा दिला; आणि तेच वर्षी वाडीकरां पासून दोन लक्ष रुपये घ्यावयाचा करार करून त्यांचा रेडी किल्ला त्यांस माघारा देत होते, ते समयीं वाडीच्या दरबारांत फार अव्यवस्था झाली होती, त्या योगें तो दोन लक्षांचा भरणा व्हावयास वेंगुर्ले परगण्याचा वसूल तेरा वर्षे पर्यंत गहाण ठेविल्या वांचून दुसरा कांहीं उपाय दिसेना सा झाला. मग कोणी कुमठे नामें गृहस्थ मध्यस्थ झाल्यावरून त्या वाडीकरांचे दोन जामीन घेऊन त्यांस तेरा वर्षे पर्यंत वेंगुर्ल्याच्या किल्ल्या मध्यें ठेऊन त्यांच्या बंदोबस्तास व वसुलाचे कामास त्यांणीं आपल्या कडील शिपाई त्या वेंगुर्ल्यांत ठेवून तेथें इंग्लिशांहीं आपला झेंडा लाविला. ते व्हां त्या मध्यस्थानें इंग्लिशांस दोन लाख रुपये एकदांच दिले, ते समयीं इंग्लिशांहीं रेडी किल्ला सांवतास माघारा दिला.

त्यानंतर थोडक्याच वेळानें ते दोघेही जामीन पळून गेले, तेव्हां त्या कुमठ्यास वाडीचे लोक वसूल घेऊं देईनात, आणि छापा घालून तो वेंगुर्ले किल्ला ही त्यांहीं घेतला. त्यांचें पारिपत्य इंग्लिशांहीं करावें, परंतु ते कांहीं देशाच्या कामास गुंतले म्हणून नें तसेंच राहिलें; त्यावरून कोल्हापूरकरही पुनः चांचेपणा करूं लागला. मग कितीएक वर्षे तो उपद्रव सोसून इंग्लिशांहीं शेवटीं त्याच्या पारिपत्यास मुंबईमध्यें लश्कर तयार केलें, तेव्हां त्यांहीं इंग्लिशांस कांहीं पेका देऊन माळ्यांन कोठी करावयास जागा दिली, त्या योगें तें काम तसेंच राहिलें. असा इंग्लिशांहीं अर्धवट उपाय केल्या मुळें पुढें ही मंन अठराशें बारांपर्यंत तो त्या वाडीकरांचा व कोल्हापूर करांचा व जंजीरे करांचा व पेशव्यांचा ही चांचेपणा कांहीं कां हीं होत होता.

१४ एथपर्यंत (संनसत्राशें चवऱ्याण्णव सुमारें) मराठी लोक युद्धाविषयीं कुशळ असून धैर्यें करून लढत असत, परंतु यासमयीं ते लोक पायदळ व तोफखाना यांच्या भरंवशा वर लढूं लागले, त्या योगें पूर्वीं सारिखें त्यांच्या स्वारांहीं मोठ्या धट्टपणें जाऊन छापा घालून एकाएकीं शत्रूचा नाश करावा आणि मागें पळावें नें होईना; पायदळ पुढें करून स्वारांनीं त्या स पाठबळ द्यावें अशी चाल पडली. याच पद्धतीनें पानपतच्या लढाईंत स्वारांस पायदळ व तोफखाना सोडून पळतां येईना म्हणून जय होईल अथवा न होईल असा संशय असतांही त्या मराठी लोकांस नेसमयीं युद्ध करावें लागलें. पूर्वीं अ शी चाल होतीकीं, जय होईलच असा निश्चय असल्यास युद्धा

सउभें रहावें.

त्यानंतर पुढें कधीं मराठीलोकांत पलटणें चाकरीस ठेवावयाची कल्पना निघाली असतां सरदार म्हणत कीं, हें मराठ्यांच्या उपयोगीं नाहीं; कांकीं, जे लोक त्यांपांशीं कवाईत शिकलेले ने त्यां प्रमाणें कायलढतील? त्यास जर आपलाजय झाला. पाहिजे तर पूर्वीच्या प्रकारानें लढल्यास होईल, आणि त्या लोकांच्या चालीनें लढल्यास हिंदू अगदीं बुडतील.

१५ हा अर्थ मनांत धरून होळकरानें बहूत दिवसपर्यंत आपल्या लश्करांत पलटणें बाळगलीं नाहींत, परंतु ज्या वेळेस शिंद्यानें रजपुतांचे किल्ले घेतले तेवेळेस तो समजला कीं, जरहीं पलटणें याजवळ नसतीं तर हें काम होनें चना. म्हणून त्या होळकरानें एक फ्रेंच्याचा सरदार चार पलटणां सहित चाकरीस ठेविला. नीं पलटणें लखेरी जवळ शिंद्याच्या पलटणांशीं लढून नाश पावलीं, तथापि त्यांहीं फार चांगलें युद्ध केलें म्हणून होळकरानें त्या सरदारास पुनः तयारी करावी म्हणून सांगितलें.

अशी मराठी लोकांत पलटणें ठेऊन लढाईची चाल पडली होती. परंतु रघोजी भोंसला याणें पलटणें इतके दिवस चाकरीस ठेविलीं नाहींत.

१६ महादजी शिंदा जिवंत असतां मराठ्यांची मसलत होती कीं, निजाम अलीकडे चौथ व सरदेशमुखी या बाबद बहुतां दिवसांची बाकी राहिली आहे ती मागून घ्यावी. यावर कोणी कल्पना करील कीं, ते समयीं मराठी लोकांत वैमनस्यें पड-

ली असतां त्या कामासाठीं सारे एकमतकसे झाले, तर असें समजावेंकीं, निजामाकडील कांहीं खास झालें असतां तें साऱ्यांहीं वांटून घ्यावें असें पूर्वीपासून चालत आलेलें त्या सर्वांस ठाऊक होतें. मग महादजी शिंदा मृत्यु पावल्यावर तो सर्व बंदोबस्त नानाफडनविसास करावा लागला. तेसमयीं इंग्लिशांहीं नानास व निजामास सांगितलें कीं, या समयीं आम्ही कोणाचाही पक्ष स्वीकारीत नाहीं.

हैदराबादेस पेशाच्या कडचे गोविंदरावकाछे व गोविंदरावपिंगळे यांनामें दोघे वकील नानानें पाठविले, त्यांशीं व निजामाशीं त्या मागण्या प्रकरणीं बोलणें झाल्यानंतर त्याणें त्या वकीलांजवळ, मराठ्यांहीं बळेंच आमच्या मुलुखाचा व सूल घेतला, व जो वसूल आपल्या मुलखांतून अद्यास द्यावयाचा तो दिला नाहीं, व आह्मांस पेंढाऱ्यांचा फार उपद्रव लागला, इत्यादि चोविसां कलमांची याद देऊन ते पेशाच्या कडे पाठविले. त्या कलमांचीं उत्तरें नानानें फार चातुर्यें करून त्वरित लिहिलीं, आणि त्या बरोबरच दुसरी अठ्ठावीस कलमांचीयादत्यावर तयार करून पाठविली. त्यांत असें दर्शविलेंकीं, दोनकोटी तीनलक्षरुपये पेशाच्यांचे निजामावर आहेत. त्या जवरून निजामाचा मशीरउल्मुलुख नामें कारभारी याचा आणि ते दोघे पेशाच्याचे वकील यांचा बऊत वाद झाला, शेवटीं तो मशीरउल्मुलुख त्या वकिलांस सभेमध्यें बोलिला कीं, हिशेबांत निपुण आणि अतिकुटिल असा जो तुमचा धणी त्याणें आंगें येऊन या दरबारांत आपल्या कलमांचा अर्थ सांगितल्यावांचून कोणाच्याही ध्यानांत येणार नाहीं. त्यावर त्या वकीलांनीं

उत्तर केलें कीं, आमच्या नानास कामें बहुत आहेत, त्यामुळेंस्वें एथें येणें घडतें कसें? त्यावर त्या मशीरउल्मुलुखानें प्रतिउत्तर दिलें कीं, त्याचें येणें येथें कसें होईल तें तुह्मांला दाखवावया सउशीर नाहीं. या धमकीच्या बोलण्यानें मराठ्यांहीं युद्धाचें आकरण मानिलें, आणि उभयपक्षीं लढाईची तयारी होऊं लागली. तरी तें वाद मिटवावयाचें बोलणें आरंभिलेलें होतें तें शेवट पर्यंत चालत गेलें.

मोंगलाच्या रयतेंत ती युद्धाची कल्पना उत्पन्न झाल्यापासून मोठ्या हर्षानें तें घडावेंच असें इछीत होते. मग निजामानें बेदरास मोठें लश्कर स्वयें जमा केलें; तेथें अनेक प्रकारें युद्धाचें साहित्य फार मना पासून तयार होत आहे असें दिसून आलें, परंतु त्या लश्करचे शिपाई अव्यवस्थित असून आपल्या सरदाराचे आज्ञांत नव्हते. आणि युद्धाचे उपयोगी शस्त्रास्त्रादि पदार्थ व सरंजाम यथास्थित नव्हता. तरी त्या लोकांमध्यें उग्याच पोकळ गोष्टी होत होत्या कीं, आतां पुण्यास जाऊन तें शहर लुटून जाळून टाकूं. अशाच त्या लश्करांतील कळवांतिणी ही त्या बोलण्याच्या आकारा प्रमाणेंच त्या लश्कराचें वर्णन व मराठ्यांचें राज्य बुडवावयाच्या गोष्टी गाण्यांत आणून गात होत्या. तो मुख्य कारभारी मशीरउल्मुलुख ही त्या दरबारांत सभेमध्यें बोलिला कीं, इतःपर मोंगल मराठ्यांच्या तगाद्यांतून मुक्त झाले; आणि विजापूर वरखानदेश ही आतां मराठ्यांपासून मोंगल घेतील; तें कार्य न झालें तर पेशव्याचें सर्वस्व घेऊन त्यास लंगोटी लावून एक भोंपळा पाण्यास हातीं देऊन त्याला स्नानसंध्या करावया करितां काशीस पाठवून दिल्यावां

चून सल्ला झाव याचा नाहीं. .

नाना फडन विसास तें वर्तमान कळतांच त्याणें थोडक्या च वेळांत मोठें लश्कर जमा केलें. ते समयीं दवलतराव शिंदा व तुकोजी होळकर हे दोघे लश्कर सुद्धां पुण्यास च होते, आ· णि गोविंदराव गाइकवाडानें ही कांहीं लश्कर पाठविलें; त्या शिवाय वराडचा राजा ही लश्कर सुद्धां यावयास निघाला; आ· णि दक्षिणे कडचे मोठे मोठे जहागीरदार पटवर्धन, व रास्ते , व विंचूरकर, व मालेगांवकर, व प्रतिनिधि, व पंतसचीव, व मराठे मानकरी लोक, व निंबाळकर, व घाटगे, व चव्हाण, व डफळे, व पवांर, व थोरात, व पाटणकर वगैरे यांस पेश· व्याचें बोलावणें गेलें, त्यावरून ते सर्व आप आपल्या सेने सहित पुण्यावर येऊन पोंहचले. मराव्यांची अशी तयारी होत आहे तों निजामाचें लश्कर आधींच छावणी सोडून दि सेंबर महिन्यांत बाहेर निघालें.

तो निजाम बेदराहून निघून मांजरा नदीचे कांठानें ह ळू हळू मराव्यांच्या मुलखाचे मर्यादे कडे चालूं लागला. मग एका महिन्यानें संनसवाशें पंचाण्णवांच्या जानेवारींत पेशवा पुण्याहून लश्कर सुद्धां निघून मोंगलांवर चालिला. तें लश्क र फार मोठें झणून त्यास धान्य तृण इत्यादिकांच्या सोईसाठीं त्या लश्कराचे कांहीं विभाग करून अनेक वाटांनीं चालूं लाग ला. ते समयीं तें मराठी लश्कर स्वार व पायदळ मिळून एकल क्ष तीस हजारांवर जमलें होतें; आणि त्या खेरीज दहा हजार पेंढारी मिळाले असत. या एवढ्या समुदायांत दवलतरावशिं द्याचा जमाव फार मोठा होता; त्याचें बऱ्हाणपूर लश्कर माळव्यां

त व हिंदुस्थानांत असतांही पंचवीस हजार सैन्यासहित पेश-
व्याकडे आला, त्यांत दहा हजार पलटणीलोक असत. रघूजी
भोंसला याचें लश्कर स्वार व पायदळ मिळून पंधरा हजार हो
तें. तुकोजी होळकर याचे लोक दहा हजार होते, त्यांत दोन ह
जार पलटणीलोक असत. परशुराम भाऊ पटवर्धन याचेलो
क सात हजार मात्र होते, परंतु त्या सर्व सरदारांहीं मिळू
न त्या सर्वलश्कराची मुख्त्यारी दिली होती. तेव्हां त्याणें स
र्व पेंढारी व त्यांजबरोबर कितीएक स्वार देऊन त्यांना पुढें
पाठवून मोंगलांच्या आसमंतात् भागच्या मुलखाचा नाश
करावया विषयीं आज्ञा दिली; नंतर आपण त्या सर्वलश्क
रासहित दीड शें तोफा बरोबर घेऊन निजामावर चालिला.
तिकडे त्या निजामाचेंही लश्कर एक लक्ष दहा हजार होतें.

तो निजाम त्या सैन्यासहित खरड्यावर येत होता तो मो
री घाट उतरत असतां पेशव्यांच्या लश्करची जी खासगत फो
जेची टोळी होती तींत हरीपंत फडक्याचा पुत्र बाबूराव फडका
मुख्य होता, त्याणें तेथें जाऊन त्या मुसलमानांवर एकाएकीं ह
ल्ला केला, तेसमयीं त्याचा कांहींसां नाश होऊन त्या फडक्यास
मागें हटावें लागलें. त्यावरून तो निजाम अल्ली समजला कीं,
आतां आपला जय आहे, म्हणून तेदिवशीं (मार्चाचे अकरावे
तारिखेस) अस्तमानीं त्याणें आपलें मोठें दरबार भरवून जय
झाला या आनंदाच्या नजरा घेतल्या. मग दुसरें दिवशीं मोंगलां
चें लश्कर त्या खर्ड्याहून निघून परिंड्याकडे जात असतां उज
वे बाजूस फार मोठें मराठ्यांचें लश्कर जमून आलेलें पाहिलें.
तेव्हां त्या निजाम अल्लीनें तेथेंच आपला हत्ती उभा करून आधी

आपल्या लश्कराचें सर्व बुणगें डावे बाजूस केलें, मग आस-
नरखान नामें आपल्या स्वारांचा सरदार याजबरोबर सहा हजा
र पलटणी लोक देऊन मराठ्यांवर हल्ला करावयास नेमिला. ते
वेळेस परशुराम भाऊनेंही आपल्या लश्कराचा बंदोबस्त केला.
तो प्रकार असा, पेशव्याचे व होळकराचे लोक आपल्या जवळ
घेऊन आपण त्या लश्कराच्या मध्यभागीं उभाराहून रघूजीभों
सल्याचें लश्कर उजवे बाजूस करून डावे बाजूस दत्तलराव
शिंदा लश्कर मुद्दां उभा केला. या प्रमाणें बंदोबस्त करून आपण
हरीपंत फडक्याचा पुत्र बाबूराव व तुकोजी होळकराचा पुत्र का
शीराव हे दोघे व कांहीं लोक बराबर घेऊन शत्रु कशाबेलानें आ
पणावर चालून येतो तें पहावयास पुढें निघाला. तो थोडका सा
दूर गेल्यावर मोंगलांच्या लश्करांतील एक पठाणांची टोळी त्या
परशुराम भाऊवर पडली, त्यामध्यें उत्तर मुलखांच्या बलुचि
स्थानचा लालखान नामें मुख्य सरदार होता त्याणें मोठा पराक्र
म करून आपल्या हातें बहुत शिपाई मारून त्या परशुराम भाऊ
सही जखमा करून तो घोडयावरून खालीं पाडिला; ते समयीं
त्या भाऊचा ज्येष्ठ पुत्र हरीपंत बाबा पटवर्धन तो बापाची अशी
अवस्था पाहून तात्काळ जाऊन त्या लालखानावर फार झट
न पडला, आणि त्यास तेथेंच जिवें मारून टाकिलें; परंतु त्याचे
पठाण होनेने तो मेल्यानंतरी लढतांना राहीनात आणि त्यांचे मदती
स कर्नाळ्याच्या नवाबाचा पुत्र व इलिचपूरच्या नवाबाचा पुत्र हे
दोघे आलेने असे लटले कीं, ते वेळेस मराठ्यांची अव्यवस्था हो
ऊन त्यांस मागें हटावें लागलें. तेव्हां ते आपल्या लश्करांत माघा
रे जाऊन पोंहचले तोंपर्यंत त्यांची अशी घालमेल झाली कीं, कां

हीं कारणा वांचून त्या लश्कराच्या मोठ्या भागाचे ही लोक हजारों भिऊन उगीच पळूं लागले. ते समयीं बाबूराव फडक्या याचे स्वाधीन जरीपटका होता, तो ही शत्रूस पाठ दाखवून पळाव यास सिद्ध झाला, तें पाहून जिउबाबक्षी नामें दक्षिणेतील दुसरा घोड्या वेगानें पिटवून त्या बाबूरावा जवळ गेला, आणि त्यास शिव्या देऊन बोलिला कीं, अरे भित्र्या तुलाजर निर्भय जागा पाहिजे तर शिंद्यांच्या लश्कराचे पाठीमागें जाऊन स्वस्थ रहा, तेथें तो बाबूराव मोठे धैर्य धरून तेथें च राहिला.

इतक्यांत त्या दोहीं लश्करांतील पलटणें आप आपल्या गोळीच्या टप्यांत येऊन पोंहचलीं, तेथें मोंगलाकडील पलटणांचे पाठीवर स्वार बऊन बंदोबस्तानें येताहे तसें दिसलें, ते समयीं रघूजी भोंसल्यानें त्या स्वारांवर बाणांची सरबत्ती केली; याशिवाय येरण नामें फ्रेंच जातीचा कोणी शिंद्याचा पलटणी लोकांचा मुख्य सरदार होता त्यानेंही एकाटेंकडीवर छत्तीस तोफा चढवून तेचक्षणीं त्या तोफांचा भडमार त्या स्वारांवर केला, तेथें त्यांस ते दोन मार सोसेनातसें होऊन ते मागें पळाले: तेथें निजामाकडील पलटणें आपल्या पाठीचे स्वार पळून गेले असें पहात असतां ही तेलोक मागें न हटले, आणि त्यांहीं शिंद्याच्या पलटणांशीं झटून कांहीं सा जयही मिळविला; परंतु ते समयीं तो निजाम अल्ली खरडयाकडे जावयास मागें हटूं लागला, आणि त्या पलटणी लोकांस ही मागें फिरावया विषयीं वारंवार निकराचे निरोप पाठवूं लागला, हणून त्यांसही तें युद्ध टाकून मागें फिरणें प्राप्त झालें. नंतर तो निजाम मागें फिरल्याचें वर्तमान त्या

च्या सर्वलश्करास विदित होतांच तेसारेच लोक मागें हटले. इतक्यांत सूर्य मावळला त्यायोगें आंधार पडून त्या लश्कराची अशी अव्यवस्था झाली कीं, त्यांतील पलटणी लोक मात्र खेरीज करून बाकीच्या लोकांस आपआपलीं ठिकाणेंही सांपडेनाशीं झालीं. मग फार रात्र होई तों पर्यंत त्या दोहीं लश्करां न जागोजाग राहून राहून बंदुकांचे बार होत होते; शेवटीं त्या उभयपक्षींच्या लश्करांत एकमेकांस हाकामार मारून इकडे तिकडे धांवतां धावतां ते लोक फारश्रमी होऊन जागोजाग जेथेंजेथें पडले तेथें तेथें निजूनराहिले. नंतर बऊतेक रात्र गेल्यावर सर्वत्र स्थिरता झाली, तेव्हां मराठ्यांचे दहा बारास्वार आपल्या घोडयांस पाणी पाजावया करितां पाण्याचें ठिकाण शोधीत दैवगतीनें मोंगलांच्या लश्कराची एक टोळी पडली होती तेथेंच पोंहचले, त्यांस पहातांच त्या मोंगलांच्या लोकांनीं शत्रु आला असें जाणून बंदुकांचे बार केले, तेवेळेस त्यांचे पलटणीलोकही त्यांपासून जवळच होते, त्यांच्या पाहारेकऱ्यांहीं तो आवाज ऐकून आपणही बार केले, तेणें करून ते पलटणीलोक निजले होते ते एकाएकीं घाबरेहोऊन उठले, आणि त्यांपाशीं बंदुका भरलेल्या होत्या त्यांचा भडमार उगाच विचार न करितां मोठ्या खरेनें वारंवार करिते झाले, तो मोठा शब्द ऐकून मोंगलांचे सर्वलोक जागे होऊन हें काय होतें तें मनास न आणितां घाबरे होऊन बऊतेक पळाले. मग पूर्व दिवशी संध्याकाळीं जीगर्दी झाली होती त्यापेक्षांही मोठी गर्दी होऊन त्या सर्वलश्कराची अव्यवस्था झाली, आणि त्या पलटणांचीही तारंबळ होऊन त्यांतील कितीएक लोक पळाले. इतक्यांत चंद्रोदय झाला,

तेव्हां तो निजामअल्ली आपल्या लश्कराची अव्यवस्था झाले ली पाहून फार भयभीत होत्साता जाऊन खरड्याच्या लढाई शा किल्ल्याचे आंत शिरून आश्रय धरून राहिला. ते समयीं त्याच्या रक्षणार्थ त्या बरोबरजे लोक धांवले ते त्याच्या लश्क राचा दशांश होते, ते त्या किल्ल्याच्या सभोंवते राहिले, आणि वरकड सर्व आपलेंच बुणगें लुटून आपल्या शक्तीप्र माणें दूर पळून गेले. हें वर्तमान मराठ्यांचे पेंढारीलोक यांस कळतांच ते त्यां मागून धांवून त्यांहीं नेलेली ती सर्व लूट पा डवून आणिते झाले.

मग सूर्योदयानंतर मराठेलोक युद्धें चालूं लागले तों त्यां हीं भोंगलाच्या लश्कराच्या तळावर जागोजाग तोफा वगैरे ना ना प्रकारचें युद्धसाहित्य पडलेलें पाहून त्यांस मोठा चमत्कार वाटला, आणि ते त्या खरड्याच्या किल्ल्याजवळ गेले तेव्हां निजामअ- ल्ली त्या किल्ल्यांत आपणच आपणास कोंडून घेऊन राहिला आहे, आणि त्याच्या लाख फौजेंतील दशांश लोक मात्र त्या किल्ल्यास भोंवते आहेत, असें पाहून त्यांस फारच हर्ष झाला. हें हर्षचिं वर्तमान मराठ्यांच्या लश्करी टोळ्या ज्या मागें होत्या त्यां स लवकर समजून ते लोकही भोंगलांस लुटाया करितां मो ठ्या त्वरेनें धांवून आले, आणि किल्ल्यासभोंवते जे लोक होते त्यांस त्यांहीं घेरा घातला, मग दुसरे दिवशीं जागोजाग मोर्चे उ भे करून त्या भोंगलांच्या लोकांवर तोफांचा मार करून तो कि ल्ला घ्यावयाचा उद्योग चालविला; तेव्हां तो मार निजाम अल्ली नें दोन दिवस पर्यंत सहन करून तिसरे दिवशीं (मार्चचे पंध रावे तारिखेस) त्याणें आंतून सांगून पाठविलेंकीं, आतां मा-

रुंनका, इतःपर तुमचा व आमचा तह असावा. मग मराठेनें मान्य करून त्या निजामास लणालेकीं, तुमचा मशीरउल्मु लुख नामें मुख्य वजीर जो नानाची दरबारांत निंदा करून फा र अमर्याद बोलिला त्याचा सूड उगवावयास आधींतो आम चे स्वाधीन करावा, आणि जो मुल्लूख सदाशिवराव भाऊनें सं नसत्राशें सासष्टांत घेतला होता तो तुह्मास पुनः दिला आहे तो सर्व आह्मास द्यावा, व तुमच्या मुलखाची मर्यादा परिंड्या यासून नार्पा पर्यंत आहे त्यांत आमचा कांहीं भाग असून त्यांतच दवलताबाद किल्ला आह्मास असावा; या शिवाय तीन कोटी रुपये आमचे तुह्माकडे बाकी आहेत ने आह्मास द्या व. व आजपर्यंत फौजेचा खर्च झाला तो तुह्मी द्यावा; या खेरी ज आमचा रघोजी भोंसला याचा गंगथडीमध्यें घांस दाण्याब द्दल बाकी एवज राहिला आहे ते एकुणतीस लक्ष रुपये द्यावे, आणि यापेंपुनः गंगथडींत घांस दाणा न मागावा याकरितां त्यास तीन लक्ष अठराहजार रुपये वर्षासि उत्पन्न होत असा मुलूख द्यावा, आणि वराडांत जो तुमचा भाग आहे त्याचा वसू ल पहिल्याचाली प्रमाणें तुह्मी घेत जावा.

असें त्या मराठ्यांचें मागणें त्या निजामास कठीण वाटलें नाहीं. परंतु तो वजीर मात्र त्यांचे स्वाधीन करावयाचें अवघ डु पडलें. अशा संकट समयीं तो मशीरउल्मुलुख त्या निजा मास बोलिला कीं, या तहांत मराठ्यांहीं बहुत सें मागितलें नाहीं, आणि मला ही देण्या विषयीं आपण श्रमी होऊं नये, मी त्याला राजी आहें. नेहमीं निजामानें दोनशें मरामराठे त्यावजीरा स त्याचा वया करितां आले होते त्यांच्या स्वाधीन तो मशीरउल्मु

लुख केला. जेव्हां त्या मराठ्यांहीं तो आपल्या लश्करांत नेला
ते समयीं पेशवा मोठ्या समारंभानें आपल्या तळावरून उ
ठून पुढें जाऊन त्यास भेटला. नंतर मराठे आपल्या लश्करां
त मोठ्या आनंदें करून उत्साह करिते झाले कीं, आज आम्हीं
मोठा जय संपादिला.

त्या मशीरउल्मुलुखाची व पेशव्यांची भेट झाली ते समयीं पेशव्याचें मुख म्लान झालें, नें पाहून मग त्या उत्साह समयीं नानानें श्रीमंतांस विचारिलें कीं, आपणास त्याचे नेदी समयीं श्रम होण्याचें कारण काय? त्यावर पेशव्यानें उत्तर केलें कीं, मोंगलांहीं भित्रेपणानें आपली एवढी अमर्यादा करून घेत ली, आणि आमचे लोक यत्नावांचून जय पावले असतां आपणास आपण च विजयी असें मानितात, तस्मात् त्यास मयीं उभय पक्षींचे पुरुष अप्रयोजक पाडून माझें मन फा र खिन्न झालें. हें पेशव्याचें उत्तर परम योग्य पडलें. कांकीं. त्या प्रसंगीं उभय पक्षीं लक्षलक्ष संख्यवर सैन्यें असून केव- ळ युद्धें करून च पाहिलें असतां दोन्हीं लश्करें मिळून दोनशें ही मनुष्य पडलें असें झालें नाहीं, आणि रात्रीस पाळेपणानें अव्यवस्था होऊन व त्या किल्ल्यास त्यांहीं घेरा घालून मोरचे बांधून तोफा चालविल्या त्या योगें करून मोंगल फार मेले गे ले, तरी युद्ध करून पडले असें म्हणतां येत नाहीं.

या प्रमाणें खरड्याची लढाई झाली असतां मग ढा शिलेदा रलोक त्यांत न होते ते त्या दिवसापासून ती गोष्ट निघाल्यास आ ली त्या प्रसंगीं केवढा मान पावलों, त्या युद्धाविषयीं यशस्वी [illegible] अशी प्रशंसा अद्यापि करितात.

१७ नंतर पेशवा पुण्यास आला, आणि नाना फडनवीस त्या संपादिलेल्या मुलखाची व्यवस्था करावयास गुंतला; परशुराम भाऊ पटवर्धन व रघोजी भोंसले हे पुण्याबाहेर डेरे देऊन राहिले; होळकर जेजोरीस उतरला; शिंदा जामगांवा पाशीं राहिला. असें असतां पुण्यास वर्तमान आलें कीं, निजाम अल्लीचा पुत्र अल्लीजहां तो हैदराबाद सोडून बाहेर जाऊन आपल्या बापाचें स्थान आपण घ्यावयासाठीं मोठें बंड करून राहिला आहे. हें वर्तमान ऐकून होळकर व शिंदे पुण्यास आले, त्यावरून त्या वेळेचे मुसलमान लोक बोलत कीं, हे सर्व मराठे त्या बंडास अनुकूळ आहेत, परंतु याचा कांहीं ताळा पडत नाहीं. निजामाचा कोणी पलटणी सरदार त्या अल्लीजहांचे पाठीस लागून त्यास धरून हैदराबादेस घेऊन जात होता, तेव्हां तो आपल्या वडिलाचे समूर जावयाचे लाजेस्तव वाटेंतच विष खाऊन मृत्युपावला.

१८ यानंतर दवलतराव हिंदुस्थानांत गेला; परशुरामभाऊ तासगावांस गेला; होळकर पुण्यांत होता; आणि रघोजीभोंसला दवलतराव गेल्यावर एक महिना पुण्यास राहून मग त्याला नर्मदेचे दक्षिणेकडच्या कितीएक मुलुखाच्या सनदा पेशव्यानें दिल्या त्या घेऊन तेथें मोठा संमान पावून अकटोंबर महिन्यांत तेथून आपले मुलुखीं जावयास निघाला. इतके दिवस नानानें जेंजें कार्य केलें तेंतें सिद्धीस गेलें, आणि तो आपल्या पराक्रमाची परमसीमा पावला कांकीं, त्यास दवलतराव शिंदा आदिकरून सर्व सरदार लोक वश्य होते त्या योगें असें दिसूं लागलें कीं, जसें माधवराव पेशव्याचे वेळेस मराठ्यांचें राज्य

योग्यतेस चढलें होतें तसें आतांही चढेल, परंतु त्या नानास आपली आज्ञा सर्वत्र चालावी, कोठेंही कुंठित न व्हावी; अशी फार आवड होती; आणि दुसरा कोणी आपणास प्रतिपक्षी होईल असें भयही होतें, त्यामुळें शेवटीं त्याचा सर्व पराक्रम नष्ट होऊन त्याच दुःखानें पुढें तो मरण पावला.

भागअष्टाविसावा.

संनसत्राशें पंचाण्णवांपासून नव्याण्णव पर्यंत झालेली वर्तमानें.

१ सवाई माधवराव पेशवा यास नाना फडनविसानें त्याच्या लहानपणा पासून आपल्या हातीं फार बेतानें ठेविलें होतें. तो एकवीस वर्षांचा मोठा झाला तरी त्याच्या बंदोबस्तांत किंमपि न्यून पडूं दिलें नाहीं, आणि त्या समयीं जे कोणी कांहीं राज्यकारणास्तव बंदीस पडले होते त्यांस द्वेषबुद्धीनें फार च जपूं लागला. तो प्रकार असा, साताऱ्याचा राजा बंदींत होता त्याच्या खर्चासजी नेमणूक केलेली होती ती कमी केली, आणि त्याचे भाऊबंद सोयरे धायरे यांस त्याची भेट न होईसें केलें.

रघुनाथराव यांचें कुटुंब कोंपरगांवास संनसत्राशें च्याण्णवपर्यंत होतें, मग त्या रघुनाथरावाची स्त्री आनंदीबाई हिच्या प्रतीस कांहीं आजार झाला म्हणून तिच्या परिवारासह वर्तमान नाशिकास जवळ आनंदवल्लीस नेऊन ठेविली, ती तेथें संनस

सशें ब्याण्णवांच्या एप्रेल महिन्यांत मृत्यु पावली; नंतर निजा मअल्लीचा युद्धप्रकार उत्पन्न होईतों पर्यंत तिचा पुत्रआदिक रून सर्व परिवार तेथेंच होता, मग कांहीं बंडन झालें या साठीं तो परिवार शिवनेरीच्या किल्ल्यांत नेऊन ठेविला; त्यांत अमृ तराव नामें रघुनाथरावाचा दत्तपुत्र व दोघे औरसपुत्र, त्यां तवडील बाजीराव, धाकटा चिमणाजी आपा, हे तिघे होते, मग तें निजाम अल्लीशीं व मराठ्यांशीं युद्ध होऊन लोगवग वा उरकल्यावर ही त्यांस मोकळें नसोडितां राघोपंत गोड बोले व बळवंतराव नागनाथ हे दोघे आपले कारकून त्यां जवळ ठेवून पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त केला.

ते तिघेही स्वरूपानें चांगले आणि तरुण व उत्तम स्व भावाचे होते, त्यांस नानाफडनवीस असा उपद्रव देत असे कीं, तें पाहून तो बऊतलोकांचे मनांतून उतरला. कांकीं, त्यां पासून किमपि उपद्रव न होतां त्यांस अति बंदोबस्तांत ठेवणें हात्या नानाचा क्रूरपणा स्पष्ट दिसून आला. या खेरीज जे लो- क पहिले रघुनाथरावाच्या पक्षाचे होते ते त्या नानाचें असें आ चरण पाहून त्याची निंदा करीत, आणि तिघे रघुनाथरावाचे पुत्र यांची प्रशंसा करीत. याप्रमाणें त्या गृहस्थ मंडळीची वृत्तिजा णून नानाफडनवीस आपल्या वृद्धदशेमुळें अधीरपणें त्यांचा बंदोबस्त अधिकच करूं लागला; त्यांत रघुनाथरावाचा थोरला औरस पुत्र बाजीराव या विषयीं तर भयें करून फारच द्वेष करूं लागला

२ बाजीराव तारुण्यें करून युक्त होता, आणि त्याचा आं गलोट फार निटस असे, व मुख श्रीतर अशी दिव्य होती कीं, ज्या

चें तोंड पहातांच माणसाचें मन त्याकडे लागावें, आणि त्याच्या बोलण्यांत असा कांहीं रस असेकीं, त्याचें भाषण ऐकून मनुष्यानें मोहित व्हावें. तेवेळ त्याच्या वयास एकोणीस वर्षें होतीं, आणि घोड्यावर बसणें व तलवार धरणें व शिरंदाजी करणें याकामांत तो परम कुशल असे, त्यासारिखा भाला खेळणारा साऱ्या गंगथडींत दुसरा कोणी नव्हता, याशिवाय तो शास्त्र निपुण असून याज्ञिक कर्मांतही फार सुज्ञ होता. तो माधवराव नारायण पेशवा याचा चुलतचुलता होय, त्याची प्रशंसा ऐकून माधवराव पेशवा बऊत संतुष्ट होऊन त्याला मोकळें करून त्यास भेटावया विषयीं फार इच्छीत असे; हे ऐकून त्या विषयीं माधवरावानें नानाफडनविसाजवळ कधींतीं गोष्ट काढिली असतां तो आपल्या अति सावधपणानें पेशव्यास समजावी कीं, तो कितीजरी चांगला असला तरी तुमचा शत्रु असें समजा; त्याचा बाप रघुनाथराव व आनंदीबाई त्याची आई हें स्मरण धरून असावें. असें अनेकप्रकारें नाना पेशव्यास समजावीत असतां तें सर्व व्यर्थ गेलें, कांकीं, तो जोंजों त्यास विपरीत समजावी तों तों त्यास बाजीरावाच्या भेटीची इच्छा अधिकच उत्पन्न होई. परंतु त्या पेशव्यानें कांहीं एरवादी गोष्ट आपले मतें केलीतर तें वर्तमान आपणास कळविणारे आपले चाकर नानानें गुप्तपणें त्याजवळ ठेविले होते, आणि बाजीरावनर त्याचे बंदींत असे, त्यामुळें परस्परें त्या दोघांची मैत्री साधेना. असें असतांही आपणावर पेशवा प्रीति करितो, हें वर्तमान ऐकून त्या बाजीरावानें आपणाजवळ नानाफडनविसानें ठेविलेला कारकून बळवंतराव नागनाथ यास आपला सखा करून

त्याचे मुखानें माधवराव पेशव्यास निरोप पाठविला कीं, सांप्रत मी शिवनेरी किल्ला येथें नानाचे बंदींत आहें, आणि आपण आपल्या गादीवर असून त्याच्या बंदोबस्तामुळें हल्लीं मजसारिखे च आहांत, ऐशीयास त्याचा बंदोबस्त देहापुरताच आहे, मना चा बंदोबस्त त्याच्या हातीं नाहीं, त्यास तुमचा व आमचा स्नेह मात्र असावा, इतक्यानें जसे आपले उभयतांचे वडील पूर्वी नामांकित झाले तसेच आपण ही समय विशेषीं होऊं; यावरून पुढें त्या दोघां मध्यें त्या बळवंतराव नागनाथाचे द्वारें एकमेकांचीं पत्रें एकमेकांस पोंहोचूं लागलीं. तेंवर्तमान कांहीं अवकाशें करून नानास कळतांच त्यास असा राग आला कीं, तो पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. त्या नानानें प्रथम बळवंतराव नागनाथ याच्या पायांत विडी घालून तो किल्ल्यावर टाकिला, आणि बाजीरावा भोंवता पहिल्यापेक्षां विशेष बंदोबस्त ठेवून माधवराव पेशवा याची बहूत निर्भर्त्सना केली.

२ तो माधवराव पेशवा नाना फडनविसाच्या सूत्रानें वागण्यास आधींच कंटाळला होता, आणि त्याचा मित्र बाजीराव यास अधिक उपद्रव झालेला ऐकिल्यानें फारच कष्टी झाला. मग त्याणें आपली बसायाची खोली सोडून बाहेर जाणें अगदीं टाकिलें. तो कधीं दरबारास येईना, त्यावरून लोकांत असें समजि झालें कीं, श्रीमंतास ज्वर येतो म्हणून ते दरबारास येत नाहीं त. त्यावर्षी (संनसत्रावें पंचाण्णवांत) दसरा अकटोंबराचे बेविसावे तारिखेस पडला, त्याचा समारंभ फारच चांगला केला होता. ते दिवशीं माधवराव पेशवा सीमोल्लंघनास बाहेर निघून संध्याकाळीं वाड्यांत आल्यावर त्याणें आपल्या रीती प्र-

माणें सर्वमानकरीलोकांच्या भेटी घेतल्या, तेसमयीं तो कोणासही अजारीसा दिसला नाहीं, परंतु त्याचें मन सर्वप्रकारें उदास झालें होतें, इतक्यानेंच त्याणें मराचयाच्या संकल्पानें त्याचे शरीरीं कांहीं विकारनसून एकाएकीं पंचविसाव्यातारिखेस माडीवरून खालीं कारंज्यावर उडीटाकिली, तेव्हां त्याचे हातपायमोडून त्याकारंज्याच्या नळीची जरवम त्याचे मांडीस फारलागून तो तिसरे दिवशीं मृत्यु पावला. त्याणें मरते समयीं फार आग्रहें करून सांगितलें कीं, माझे पाठीमागें गादीवर बाजीरावाची स्थापनाकरा; असें बोलून त्याचा परम मित्र हरीपंत फडक्याचा पुत्र बाबूरावफडका याच्या अंगावर पडला, मग बाबूराव याणें त्यास धरून बसविलें असतां तो त्याच्या अंगावर टेंकलेला असतांच मृत्यु पावला.

४ हें माधवरावाचें मरण नानाफडनवीस ऐकून फार कष्टी झाला, परंतु न झाला. त्याचें कारण असें, तो पुर्तें समजला होता कीं, त्याच्या मरणें करून आपल्या मोठेपणास धक्का आहे, म्हणून तें दुःख एकीकडे ठेवून तो आपल्याच दुःखांत गुंतला. त्याणें प्रथम असा उपाय केला, जें माधवरावानें फार आग्रहें करून सांगितलें कीं, बाजीराव गादीचा धणी करा, तें गुप्त राखून ठेविलें. कांकीं, बाजीराव यास स्थापिलें असतां केवळ आपल्या मोठेपणासच हानि होईल असें नाहीं, कदाचित् प्राणासही धक्का पोंहचेल. हें भय मानून त्याणें माधवरावपेशव्याच्या उडीचें वर्तमान ऐकतांच अगोधर परशुराम भाऊपटवर्धन यास सांगून पाठविलें कीं, त्या वेळेस तुम्हाजवळ जितकी फौज असेल तितकी व दुसरी लवकर मिळेल तितकी घेऊन

खरितपुण्यास या. नंतर पेशव्याच्या मृत्यूचे दुसरे दिवशीं रघूजी भोंसला व दवलतराव शिंदा यांस नानाफडनविसानें पुण्यास माघारें बोलाविलेंकीं, आतां धणी कोण करावा तो विचार करावयास लवकर या. तेवेळेस तुकोजी होळकर पुण्यास च होता, त्यास नानानें बऊत गोष्टी सांगितल्याकीं, पहिल्यापासून रघुनाथरावयाणें इंग्लिशांशीं संबंध ठेविला, तसाच हल्लीं बाजीराव धणी झाला असतां जर इंग्लिशांशीं स्नेह करील तर फारनाश होईल. इतकें त्यास समजावून शिंदा व भोंसला यांचें मन आपणाकडे लावून घेतलें, आणि आपला मनलब त्यांस सांगितला कीं, यशोदाबाई माधवरावाची स्त्री तीजरी लहान आहे तरी तिच्या मांडीवर दत्तक बसवून त्याच्या नावानें राज्य यथास्थित चालवावें. हें ऐकून सर्व मराठेसरदार मान्य झाले, त्यांत बाळोबा ताया नामें शिंद्याचा मोठा कारभारी होता तो मात्र प्रतिकूळ बोलिला, तेव्हां जिउबा बक्षीना में शिंद्याचा मोठा दुसरा सरदार होता तो बोलिला कीं, सध्यां आपला धणी शिंदा तो तरुण आहे यास्तव त्याचें सांगणें उपयोगीं नाहीं, वरकडजे भोंसले वगैरे पुरातन वृद्ध मोठे मोठे सरदार आहेत ते सांगतील तें योग्य. नंतर सर्वांशें शाहाणवंत्या जानेवारींत नानाच्या मसलतीप्रमाणें त्या सर्व सरदारांची मान्यता होऊन त्यापत्रावर शिक्का झाला. नंतर ते सारे सरदार आपआपल्या ठिकाणास जाऊन कारभार चालविते झाले.

५ त्या पुढें कोणी दत्तक शोधून आणून स्थापावा एवढें मात्र राहिलें; परंतु हें सारें वर्तमान बाजीरावास कळलें होतें, आणि तो बाळोबा ताया आपल्या पक्षाचा आहे असें समजून त्याणें

त्याजकडे कागदपत्राची वहिवाट करून थोडक्याच महिन्यां
त तो वश केला. त्याच सुमारें जिउबाबक्षीयाचे शरीरीं समाधा
न नाहींसें होऊन तो केवळ आसन्न मरण झाला असतां दवल
तराव शिंद्यास जवळ बोलावून आपल्या पलंगावर बसवू
न घेऊन बोलिला कीं, बाळाजी विश्वनाथाचा प्रत्यक्ष वंश
असतां दत्तक घेण्या विषयीं मी अनुमोदन दिलें हें मला मो
ठें खेदास्पद झालें. असें त्याचें भाषण झाल्या नंतर तो जिउबा
बक्षी मृत्यु पावला. तें वर्तमान बाजीराव यास समजतांच
हें आपणास हितावह आहे असें जाणून त्याणें दवलतराव
शिंद्याकडे बोलणें लाविलें. तेव्हां असें ठरलें कीं, बाजीरावा
नें चारलक्षांचा मुलूख शिंद्यास द्यावा, आणि शिंद्याला जो बा
जीरावास गादीवर बसविण्याबद्दल फौजेस खर्च लागेल तो
ही बाजीरावानें द्यावा, म्हणजे बाजीरावास पेशवें पदवी प्रा
प्त होईल. हें वर्तमान तत्काळ नानाला कळलें तेव्हां तो फारभि
ऊन त्याणें परशुराम भाऊ पटवर्धन तासगांवास होता त्यास
आपल्या जवळ मोठ्या त्वरेनें बोलाविलें. तो आपले स्वार जमा
करून घेऊन तासगांव सोडिल्या पासून दोन दिवसांत पुण्या
स येऊन पोंहचला. मग त्याचें व नानाचें बोलणें झालें तेव्हां अ
सें ठरलें कीं, शिंदाजें करणार तें आपणच प्रथम करावें हें उत्त
म. त्या नंतर लागलेंच परशुराम भाऊनें शिवनेरी किल्ल्यास जा
ऊन ती गोष्ट बाजीरावास विदित केली, तेव्हां त्या बाजीरावाचा
भाऊ अमृतराव तो बाजीरावास म्हणूं लागला कीं, हें काम शिं
द्याच्या हातून होऊं द्यावें, याची त्वरा करूं नये. तेव्हां त्या परशुरा
मभाऊनें बाजीरावास अनेक प्रकारें ममतेच्या गोष्टी सांगून शे

वटीं त्यास विश्वासार्थ गायीचें शेपूट हातांत धरून शपथ दिली, तेव्हां तो बाजीराव आपला धाकटा भाऊ चिमाजी आपाया सुद्धां त्या किल्ल्या वरून उतरून पुण्यास गेला, आणि त्याचा वडील भाऊ अमृतराव तो तेथेंच राहिला.

मग बाजीराव व नाना फडनवीस यांची भेट होऊन परस्परें नेमठरलाकीं, या पूर्वी उभयपक्षीं ज्या अनुचित गोष्टी झाल्या असतील त्या कोणीच मनांत आणूं नये, इतःपर जेंकरणें तें एक विचारें करावें. असें झाल्यावर त्यांचा बेत ठरलाकीं, बाजीराव धनी करून त्याचें राज्य नानानें मुख्यत्वें करून चालवावें, या प्रमाणें करारपत्रही झालें. ही झालेली गोष्ट बाळोबा तात्यास कळल्यावर त्यास ती संमत असतांही त्यास सोडून झाली त्यणून त्याला मोठा राग येऊन त्याणें मनांत निश्चय धरिलाकीं, नानाची मसलत शेवटास जाऊंदेणार नाहीं, अगदीं पाडून टाकीन. तो अर्थ सिद्धीस न्यावया करितां त्याणें आपला धणी शिंदे त्यावेळेस गोदावरीचे कांठीं होता तो वश करून त्याचें सैन्य पुण्यावर चालतें केलें.

६ नाना फडनवीस मसलती विषयीं बळकट होता, परंतु आंग धटाई विषयीं तो नादरा शूर नव्हता. शिंद्याचें लश्कर आपल्या लश्करापेक्षां प्रबळ, आणि बाजिरावाचाही विश्वास येईनाहीं, व आपण जर बाळोबाच्या हातीं सांपडलों तर प्राणा सही भय आहे, असें समजून तो नाना बाजीरावास परशुरामभाऊच्या स्वाधीन करून आपण तेथून निघून पुरंदरावरून साताऱ्यास गेला. बाळोबा तात्या व बाजीराव यांची पुण्यांत भेट झाली, तेव्हेळेस हे दोघे परम स्नेही आहेत असें दाखविलें असतां बाजी

रावाचें अविश्वासू आचरण त्या बाळोबा ताल्याच्या स्मरणांत आहेसें लोकांस भासलें. नंतर तो बाळोबा ताल्या आपल्या मनांत बहुत विचार करून ठरविता झालाकीं, बाजीराव धणी नकरावा, जो आपल्या चित्तास येईल तो धणीकरावा, आणि नाना फडनविसा खेरीज कारभारीही दुसराच करावा. मग त्याणें परशुराम भाऊस सुचविलेंकीं, माधवरावाची स्त्री आहे तिचे मांडीवर त्रिमणाजी आपा यास बसवून बाजीरावास बंदींत ठेवून सर्वकारभार तुम्ही संभाळावा, अशी माझी मसलत आहे, त्यास तुमच्या विचारांस कसें येतें. तेवेळेस परशुराम-भाऊ नाना आंग धटाईपणांत कमीसा जाणून त्याची कांहीं-शी अवगणना करीत असे; तथापि तो नाना फारशा हुषा मसलती आहेसें समजून याचा विचार पक्का ध्यानास आणि-ल्यावांचून त्याणें त्यास उत्तर दिलें नाहीं. नानाची मसलत झाली कीं, यागोष्टीस अनुमोदन द्यावें, परंतु बाजीराव आपल्या बंदींत ठेवावा. नंतर त्याप्रमाणें ठरलें; मग बाळोबानें त्या नानास दर्शविलें कीं, तुमची व आमची मैत्री असावी, त्याप्रमाणें नानाही मान्य झाला.

७ बाजीराव आपल्या बंदींत असावा ही हितकारक नानानें दिलेली मसलत परशुराम भाऊला उपयोगी नाहींशी वाटून तो उत्तर देते समयीं त्याविषयीं कांहींच बोलिला नाहीं, त्यावरून बाजीराव शिंद्याचें स्वाधीन राहिला. हें वर्तमान नानाला बाईहून पुण्यास जावयास निघते समयीं समजलें. ते झांतालाळ त्याचें ध्यानांत आलेंकीं, हें सर्वकृत्य माझा दगा करावयाचें आहे, त्यास त्या समयीं पुण्यास जाऊंनये. मग तो नाना बाईस

राहून त्याणें अगोधरच साताऱ्याच्या राजापासून नव्या पेशव्यां वीं वस्त्रें आपल्या जवळ घेऊन ठेविलीं होतीं तीं पुण्यास पाठ वून दिलीं.

त्या वेळेस परशुराम भाऊ व शिंदा आपला केव्हांतरी घा तकरितील असें बाजीरावाच्या मनांत नआलें, परंतु त्याचा त्यय कोणें प्रकारें त्यांस आला, तें समजलें पाहिजे, म्हणजे तेवेळेस पुण्याचे दरबारची रीत कशी होती ती त्यावरून समजे ल, आणि त्या पुढें ही चाल तशीच पडत आली तें ध्यानांत येई ल.

प्रथम शिंद्यानें बाजीराव आपल्या लश्करांत यावा म्हणून अशी युक्ति केलीकीं, त्यास गादीचा धणी करावयाच्या कामाच इल कांहीं खर्च लागल्याचें निमित्त करून त्यास पेका मागित ला, तेव्हां तो बाजीराव बोलिलाकीं, आम्हास देववत नाहीं; त्यावर शिंदा आग्रहाचें बोलणें करीत असतां कांहींसा वाद होतां होतां शिंद्यानें दर्शविलेंकीं, बाजीरावाच्या कठोर शब्दें करून आपलें मन दुखावलें, म्हणून त्यास निरोप पाठविला कीं, मी माघारा हिंदुस्थानांत जातों त्यास कृपा करून मला आ ज्ञा झाली पाहिजे. त्यावरून बाजीराव शिंद्याच्या कल्पने प्रमा णेंच तात्काळ त्याच्या लश्करांत जाऊन त्याशीं एकांत करूंला गला, तेव्हां शिंद्यानें अस्तमान होईतों पर्यंत युक्तीनें त्यागोष्टी लांबविल्या. इतक्यांत एकाएकीं असें वर्तमान आलेंकीं, पर शुराम भाऊ त्रिमणाजी आपास घेऊन पळाला, परंतु कोठें घेऊ न गेला तें कळत नाहीं; त्याला साताऱ्यास घेऊन गेले अशी शह रांत वदंलामाच आहे. तेव्हां बाजीराव अत्यंत भयभीत होऊन

शिंद्यास म्हणूं लागलाकीं, तूं पाठीमागून जाऊन त्यास धरून आण, त्यावर त्याणें उत्तर दिलेंकीं, तो कोठें गेला तें पक्कें कळत नाहीं, व रात्रीचें धांवणें ही उपयोगीं नाहीं. असें त्याचें बोलणें ऐकून बाजीराव बोलिलाकीं, असें आहे त्यापक्षीं मी आजची रात्र एथेंच रहातों. असें ऐकतांच शिंद्यानें तें अवश्य मानून त्यास ठेवून घेतलें. मग दुसरे दिवशीं शिंद्याचेला क त्या बाजीरावास म्हणूं लागलेकीं, आपण येथेंच स्वस्थ रहावें, एथून दुसरे जागीं गेला असतां नाश आहे. त्यावरून तो स मजलाकीं, घात झाला.

त्रिमणाजी आपाला परशुराम भाऊ व बाबूराव फडके यांणीं पळविलें खरें, परंतु त्यास पुण्यांतच लपवून ठेविलें. नंतर त्याला ते सांगूं लागलेकीं, तुला आम्ही गादीचा अधिकारी करितों, परंतु तो आपल्या भावा खेरीज आपण धणी होईना. शेवटीं त्यांनीं बळेंच त्याला पेशवा करून त्रिमणाजी माधवराव असें त्याचें नांव ठेविलें. ही गोष्ट संनसवाशें शाण्णवांच्या मे महिन्याचे सत्रिसाव्या तारिखेस घडली. दुसरे दिवशीं परशुरामभाऊनें नानास लिहून पाठविलेंकीं, तुम्ही पुण्यास येऊन बाळोबातात्याच्या स्नेहांत अंतर पडलें आहे तें नीट करून मुलखाचे कामावर रहावें; आम्ही लश्कराचें काम संभाळितों. त्यावर नानानें परशुराम भाऊंस उत्तर लिहिलेंकीं, कांहीं बोलणें झालयाचें आहे त्यास तुमचा पुत्र हरीपंत यास आधीं इकडे पाठवून द्यावें. त्या प्रमाणें हरीपंत ही नाना कडे गेला, परंतु केवळ वकीला सारिखा एकटा गेला नाहीं; त्याजबरोबर चारपांच हजार निवडक स्वार होते; आणि तेसमयीं बाबूराव फडके यांचें

नानास गुप्तपत्र आलेंकीं, आपण क्षणमात्र विलंब न करितां आपल्या रक्षणाचा उपाय करावा; त्यावरून नाना वांई सोडून पगड किल्ल्या मध्यें शिबंदी नवी वाढवून कोंकणांत महाडास गेला; तेथेंही त्याणें रायगडाची बंदोबस्ती फार चांगली केली.

बाळोबाता त्याच्या मनांत होतें कीं, अकस्मात् जाऊन नानास धरावें, यास्तव आपला धणी शिंदा याचे पलटणीलोक त्याकामास नेमणार होता, परंतु नानाच्या पक्षाचे कोणीलोक होते ते परशुराम भाऊशीं कांहीं बोलल्यावरून परशुरामभाऊही बोलिला कीं, बलात्काराचाउपाय त्यासमयीं करूंनये, ते झांतें तसेंच राहिलें. परंतु परशुराम भाऊ त्या नानास प्रतिकूळ नव्हता असें नसमजावें; कांकीं, थोडके दिवस झाल्यानंतर त्याणें नानाच्या जहागिरीचा मुलूख होता तो शिंद्यास दिला, आणि त्याचा वाडा पुण्यांत होता तेथें आपण राहून जें त्याचें द्रव्य सांपडलें त्याचा व्यय करूं लागला.

त्यासमयीं नानाचें द्रव्य अपार आहे अशीलोकांतअवाई होती; व कोणी म्हणत कीं, पेशव्यांच्या बऊतां पिढ्यांचें द्रव्य जमलेलें होतें तें सर्व नानाबरोबर घेऊन गेला; त्यांत नानानें द्रव्य बहुत नेलें हें खरें, परंतु तें पेशव्याचें नसेल, कांकीं, सवाईमाधवराव पेशवा होई तों पर्यंत पेशवे कर्जभरूहोते. त्याणें त्या नेलेल्या द्रव्याचा बंदोबस्त कोणेंप्रकारें केला व कोण कोणत्या सावकारांकडे ठेविलें, त्याचा अद्यापि ठिकाणनाहीं, म्हणून सर्व मराठेलोक आश्चर्यकरितात.

परशुराम भाऊ पुण्यांत पेशव्याचा कारभारी झाला ते समयीं शिंदा यास लश्करी खर्चाचा फार तोटा पडला होता म्हणून

परशुराम भाऊनें त्यास वचन दिलेंकीं, मीपुष्कळ द्रव्य उत्पन्न करून देतों; यास्तव तो परशुराम भाऊ मशीरउल् मुलुख यास बोलिलाकीं, तुमच्या धण्याकडे आमचे सरकारी रुपये तीन कोटी येणें आहेत त्यापैकीं त्यापासून यावेळेस कांहींअंश देविल्यावर तुह्मास त्याकडे जावयाची मुक्तता केली जाईल. त्यावर त्या मशीरउल् मुलुखानें उत्तर दिलेंकीं, मी याकामाचा उद्योग यथाशक्ति करीन. असें त्याचें वचन झाल्यावर तो पुण्याजवळ डेरा देऊन रहावयाची आज्ञा पावला. नंतर थोडक्याच वेळानें तो आपल्या त्या तळावर पुष्कळ लोक घेऊन तेथें मोठ्या समारंभानें राहिला.

८ याप्रकारें पुण्याच्या दरबारांत कारभारी मंडळीनें झाल्यानें बाजीराव व नानाफडनवीस यांचा परस्परें स्नेहद्वेषिंगत होऊंलागला; मग ते एकमेकास कागदपत्रें पाठवूं लागले. त्याकामांत कोणी शूद्र बाळोजी कुंजर नामें शिलेदार मध्यस्थ होता, तो महाडास जाऊन नानास बाजीरावाच्या हिताविषयीं आग्रहानें कितीएक गोष्टी सांगता झाला, त्या योगें नानाचें मन पहिलें बाजीरावाकडे होतें तें अधिकच झालें. मग त्या नानानें कांहीं युक्तीकरून पेशव्याची खासगी फौज बाबूराव फडकायाचे स्वाधीन होती, तीत्याफडक्या सुद्धां वश्य केली, आणि तुकोजी होळकर ही आपल्या सर्वलोकांसुद्धां वश्य होऊन त्या नानाच्या खुणेची मात्रवाट पहात होता. या खेरीज त्या नानानें रायाजी पाटील नामें कोणी शूद्र बाळो बा नात्याचा द्वेषी होता, त्याचे द्वारें शिंद्याशीं बाजीरावाच्या कार्याचें बोलणें केलें. तो प्रकार असा, नानानें शिंद्यास निरोप पाठविलाकीं,

जर तुम्ही बाळोबा नात्या संबंधीं त घालून बाजीरावास गादी वर बसवाल तर तुम्हास हिंदुस्थानांत जाते समयीं परशुराम भाऊची सर्वजहागीर व आहमदनगर किल्ला व दहा लक्षरुप ये वर्षासउत्पन्न होतसा मुलूख देऊं.

याशिवाय नाना नें नें कार्य सिद्धीस न्यावया करितां णीक एक मसलत योजिली; तो प्रकार असा, सरवाराम घाडगा नामें कोणी शूद्र कागल करांच्या वंशींचा होता तो मोठा चतुर आणि उमेदवार असे, यामुळें रायाजी पाटलाची त्याव र प्रीति बसली होती, आणि दवलतराव शिंदाही त्यावरप्रस न्न होता, कांकीं, त्याची कन्या अतिसुंदर असे, ती आपलीस्त्री करावी असें तो शिंदा इच्छीत असे. यास्तव नानानें तो सरवारा म घाडगा वश्करून शिंदाआपणास अनुकूळ करावया वि षयीं तेंही एक साधन करून ठेविलें.

९ असे दोघे सहाय करून नानानें त्यांचे द्वारें तो शिंदा वश्केला. हें वर्तमान बाबूराव फडके वगैरे जे नानाचे पक्ष पाती होते त्यांस कळलें, तें त्यांना तादृशगुप्त रक्षितां आलें ना हीं, त्या मुळें बाळोबा तात्यास तो सर्व वृत्तांत विदित होऊन त्याणें तात्काळ बाबूराव फडक्यास बंदींत घातलें; आणि नीलकंठराव पर भू व मालोजी घोरपडे यांस धरावया करितां लोक पाठविले; परंतु ते अगोदरच सावध होऊन त्यांहीं बा जीरावाच्या कार्याकरितां लोक ठेविले होते त्यांस घेऊन त्या धरणारांशीं लढून वांईकडे निघून गेले. तेथें मानाजी फांकडा होता, तो त्यांच्या कुमकेस देऊन नानानें त्यांस कांहीं द्रव्य दिलें; आणि ते सातप्याच्या घाटास पाठविले. तेथें नानाचा कोणी इष्ट

बजाबा शिरोळकर होता त्याचीही त्यास कुमक मिळून दहा हजार फौजजमा झाली. मग यांहीं आपण बाजीरावाचे पक्षपाती असें प्रसिद्ध केलें.

१० नानानें एवढे लांबलांब पल्ले बांधलेले पुण्यांतबाबोबाता त्यासकळले नाहींत, त्यास हें दहा हजार फौजेचें मात्र बाजीरावाचें कृत्यसें वाटलें. त्यावरून त्याबाळोबानात्यानें कल्पनाकेलीकीं, बाजीरावासच हिंदुस्थानांत पाठविलेंह्मणजे त्याची मसलत मोडेल. असें मनांत ठरवून त्यानें सखाराम घाडगा यास कांहीं फौजेसहित बाजीरावाबरोबर देऊन तो हिंदुस्थानाकडेला विला; तो प्रवरा नदीचे कांठीं जाईतोंपर्यंत बाजिरावानें तो घाटगा वश केला, तेव्हां त्याणें निश्चित सांगितलेंकीं, तुमचें हिंदुस्थानांत जाणेंचन व्हावें, आणि शिंद्यानें तुह्मांस गादीवर बसवावें, या कार्यासाठीं मी आपली कन्या दवलतरावास देऊन आणीकही यथाशक्ति उद्योग करीन, परंतु हें काम झालें असतां कागल गांव मला इनाम करून द्यावें; आणि शिंद्याचा कारभार मुख्यत्वें माझे स्वाधीन असावा; या शिवाय मद्यः दोन कोटि रुपये शिंद्यास देऊं केले पाहिजेत; इतक्याही गोष्टी बाजिरावानें मान्य केल्या. नंतर आपल्या शरीर प्रकृतीस बरें नाहींसें निमित्त करून त्या प्रवरा नदीचे तीरींच मुक्काम केला.

इतके होईतों पर्यंत नानानें आपल्या नव्या नव्या मसलती मोठ्या दक्षतेनें चालविल्या होत्या. तो प्रकार असा, मशीरउल्मुलुखाचे द्वारें नानानें गुप्तपणें निजाम अल्ली वश केला, तसाच रघोजी भोंसलाही कांहीं बोलणें करून अनुकूळ

करून घेतला, आणि परशुराम भाऊचा मुलूख लुटावयाविषयीं कोल्हापूरकरांस बुद्धि दिली.

असें असतां पुण्यांत वर्तमान उठलें होतेंकीं, सातऱ्याच्या घाटाजवळ बाजीरावांची दहाहजार फौज जमा झाली आहे, तेंबंड मोडावयाचें मिष करून परशुराम भाऊची आज्ञा घेऊन मशीरउल्मुलुख नानाच्या हितार्थ फौजजमाकरूंलागला.

११ याप्रमाणेंच तेवेळेस शिंदा व होळकर यांहीं बाळोबातात्या व परशुराम भाऊ यांस ठकवावयाचे मसलतीनें तेंबंड मोडावयाचेंच मिष करून कांहींलोक सातऱ्याकडे पाठवून कांहीं नानाफडनविसास धरावयाचें निमित्त करून रायगडाकडे योजिले. मगती बाजीरावाची गोष्ट नानाच्या पक्षपातीलोकांहीं इंग्लिशांस कळविली असतां तेहीमान्य झाले. या प्रमाणें सर्वसिद्धता झाल्यावर अकटोंबराचे सत्ताविसावे तारिखेस शिंद्यानें बाळोबातात्यास कैद केलें, आणि मशीरउल्मुलुखाची व आपली फौज एकत्र करून परशुराम भाऊ पटवर्धनास धरावयाकरितां पाठविली. तेव्हां तो परशुरामभाऊ सावध होऊन बरोबर चिमणाजी आपास घेऊन कांहीं लोकानिशीं शिवनेरी किल्ल्यास गेला, परंतु त्याचे पाठीस लोक लागले होते त्यांस थोडक्या दिवसांतच सांपडला तो आनंदरावरास्त्याच्या स्वाधीन ठेविला.

१२ इतक्यांत बाजीरावास भीमेच्या कांठीं कोरेगांवीं आणिलें आणि अमृतराव व बाबूराव फडके हे दोघे केंदेंत होते तेमुक्त केले. तेसमयीं नानाफडनवीस सातऱ्याच्या लश्करांत मिळून घुण्यास जात होता, त्यास वाटेंत कांहीं बाजीरावाकडचें

लिहिलें आलें, त्यावरून त्यास कांहीं भीति उत्पन्न होऊन तो तेथेंच राहून त्याणें बाजीरावास लिहिलें कीं, जर तुमचें मला अभय असेल तर मी येथून पुढें पुण्यास येईन, नाहींतर असाच माघारा जाईन. त्यावरून बाजीरावानें त्या नाना ला अभय देऊन आज्ञा दिली कीं, तुमच्या मर्जीस आलें तर चाकरी करावी, नाहींतर नकरावी. तेसमयीं शिंदा व निजाम अल्ली यांमध्येंही बाजीरावास आसनावर बसवावयाचा बेत होऊन मुख्य कारभारी नाना असावा असें ठरलें. नंतर नाना फडनवीस पुण्यास जाऊन नवेंबराचे पंचविसावे तारिखेस पुनः आपलें काम करूं लागला. त्या पुढें दिसेंबराचे सत्ताविसावे तारिखेस साताऱ्याहून वस्त्रें येऊन बाजीरावाची गादीवर स्थापना झाली. तेसमयीं सभेमध्यें मोठे मोठे पंडित बसवून त्यांकडून बोलविलें कीं, माधवराव नारायण मृत्यु पावला, आणि रघुनाथरावाचे पुत्र आहेत, असें असतां केवळ भाऊबंदकी संबंधें माधवरावाचे स्त्रीनें दत्तक घ्यावा हें अशास्त्र ह्मणून होणार नाहीं, आणि चिमणाजी आपा याचा वडीलभाऊ असतां याला बलात्कारें राज्यावर बसविलें नेंही अयोग्य कर्म झालें, यास्तव त्यास कांहीं प्रायश्चित्त पाहिजे. असें ह्मणून त्याला कांहीं हलकेंसें प्रायश्चित्त देऊन तो गुजराथचा अधिकारी केला; परंतु तो तिकडे नजातां नाव मात्र त्याचें केलें. आणि आबा शेलूकर नामें त्या कामावर कारभारी पाठविला.

१३ नानाफडनवीस आपलें काम पुनः चालवूं लागला तेव्हां त्याणें आपल्या साहाय्यास विंचुरकरावर चुरा यास घेतलें, आणि नारोपंत चक्रदेव यास सेनेचें काम सांगितलें. शिंद्यास आह

मद्दनगर किल्ला देऊं केला होता त्याप्रमाणें त्याच्या स्वाधीन करून परशुराम भाऊ पटवर्धन याची जहागीर हातीं लागेल तशी घ्यावी म्हणून आज्ञा देवविली. रघूजी भोंसला ही नानानें कबूल केल्या प्रमाणें सर्व पावून संनसवाशें सत्याण्णवांच्या जुलईम ह्मिन्यांत नागपुरास गेला. परंतु नानानें निजाम अल्लीशीं तह केला होता त्याप्रमाणें बाजीराव ऐकेना, त्यावरून मशीरउल् मुल्क खास राग येऊन तो पेशव्यांची आज्ञा न घेतां हैदराबादेस रुसून गेला. त्या मुळें नाना फडनवीस आपण मोठ्या यत्नेंकरून संपूर्ण बंदोबस्ता विषयीं मसलत केली होती तींत अंतर पडलें असे समजला. त्यावेळेस निजामाचे दरबारीं पेशव्या चा कोणी वकील नव्हता; गोविंदराव पिंगळा तो पुण्यास होता, परंतु त्याचा कारभारी सदाशीव माणकेश्वर नामें तेथें आकबरनवीशीचें काम करून राहिला असे,. तो मशीरउल्मुलुखाचें वैमनस्य नीट करण्या विषयीं उपयोगी पडला.

१४ बाजीरावास तर त्याबंदोबस्ताच्या न्यूनतें करून अवघड वाटलें नाहीं; कांकीं, त्याच्या मनांत नानाचें तेज कमी पडावेसें होतें; आणि तेसमयीं ८ आगस्त महिन्याचे पंधरावे तारिखेस, तुकोजी होळकर मृत्युपावला, तेंही बाजीरावाच्या मनोद्यानुरूप झालें. तो प्रकार असा, तुकोजी निवर्तला तेसमयीं त्याचे दोघे औरस पुत्र, काशीराव व मल्हारराव, आणि दोघे दासीपुत्र यशवंतराव व विठोजी असे चवघे होते; त्यांत काशीराव तो बुद्धीनें आणि शरीरेंकरून अप्रयोजक होता, मल्हारराव शूर आणि सुज्ञ असे. मग थोडक्याच दिवसांत त्या दोघां भावांमध्यें कलह उत्पन्न झाला, तेव्हां ते दोघे दासीपुत्र मल्हार

रावाचे पक्षपाती झाले. नंतर मल्हारराव आपल्या बापाचा तळ सोडून पुण्याजवळ भांबवडें गांव आहे तेथें थोड्क्या शा लोकांनिशीं जाऊन राहिला. त्यास गुप्तपणें नाना अनुकू ळ होता. काशीराव आपल्या भावास जिंकावयाकरितां शिं द्यास शरण जाऊन कुमक मागूं लागला, तो शिंदा नर त्यागो ष्टीची वाटच पहात होता, त्यास हें समजतांच मोठ्या हर्षा नें तो मल्हारराव होळकर यास धरावयाकरितां फौज देता झाला. तेव्हां मल्हारराव होळकर आपल्या भावाचे स्वाधीनन होतां युद्धकरून मृत्युपावला. तेव्हां यशवंतराव व विठोजी हे दोघे राहिले, त्यांत यशवंतराव तर नागपुरास गेला, आणि वि ठोजी तो कोल्हापुरास गेला, तेव्हां बापाचा सर्व अधिकार का शीरावास प्राप्त झाला. तेवेळेस मल्हाररावाचे लोक बहुतेक त्या युद्धांत मृत्युपावले, त्यांत एकलोणीकर रविराव शिंदा ना में मोठाशूर होता तो मेला त्याच्या मृत्यूचें वर्तमान त्याच्या स्त्रीचे कानीं पडतांच ती उभी होती तशीच पडून प्राण सोडिती झा ली.

अमा अप्रयोजक काशीराव होळकर शिंद्याच्या बगलेंत शिरल्यामुळें होळकराचें कूळ यास शिंद्याच्या हानाखालीं वा गावें लागलें; तेणेंकरून नानास होळकराचें बळ होतें तें शिंद्यास जाऊन नानाचे योग्यतेचा समूळ नाश झाला, आणि शिंदा पुण्या च्या कारभारांत शिरून स्वतंत्रपणें धण्या सारिखा वागूं लागला. तेव्हांकांहीं वेळां त्याणें असा जुलूम केलाकीं, त्या पूर्वी पेशव्याचे दरबारीं कधीं ही तसें घडलें नव्हतें. त्यांत कुलाबकर मानाजी आंग्र्यास बंदींत घालून कुलाबा किल्ला बलात्कारें घेऊन

बाबूराव आंगज्यानामें कोणी, आपला आप्त यास दिला. इतकें झा लेंतरी बाजीरावास तत्संबंधीं कोणी दूषण लाविलें नाहीं. कांकीं, त्यावर पूर्वी पासून लोकांची प्रीति बसली होती.

१५ बाजीराव तर आपल्या कार्यासाठी शिंद्यास स्वतंत्र पणें वागावया करितां गुप्तरूपें अनुकूळ होता, परंतु त्याच्या मनांत असेकीं, शिंदा वंहोळकर यादोघांतून एकासही नलागतां आपण निराळें असावें. दुसरें त्याच्या मनांत होतेंकीं, शिंदाको णे समयींतरी आपल्या हिंदुस्थानांत जाईल तेव्हां सहज त्याचा उपद्रव नाहींसा होईल, परंतु नानाजवळचे जे रहाणारे त्यां च्या उपद्रवाचा आधीं बंदोबस्त केला पाहिजे. ही मनांतील गोष्ट बाजीरावानें अमृतराव आपला बंधु व गोविंदरावका ळे आदिकरून स्वपक्षपाती मंडळीस विदित केली, परंतु त्याचा परम विश्वास घाडग्यावर होता. ज्या घाडग्यानें बाजी रावाच्या कार्यासाठीं दवलतरावास आपली कन्या देऊंकेलीहो ती त्याच्या नावास सर्जेराव असें पदजोडिलें होतें, त्यास बाजी रावानें समजाविलें कीं, तुलीमुख्यत्वें शिंद्याचा कारभार कर णार त्यास नाना अडथळा करितो, यास कायकरावें. अशायु क्तीं करून त्याशीं व नानाशीं द्वेष पाडिला. नंतर बाजीराव आ णि तो घाडगायांची मसलत झालीकीं, आधीं नानाला अवश्य बंदींत घातलें पाहिजे. मग दिसेंबरांचे एकविसावे तारिखेस नाना शिंद्यास परत भेट करावया करितां कांहींशा बंदोबस्तानें शिंद्याक डे गेला, तेव्हां तेथें शिंद्याच्या पलटणीलोकांचा कोणी सरदार होता त्याणें नानास केद केलें. ते समयीं त्याबरोबर सुमारें हजार स्वारी चे लोक होते, त्यांतून कितीएक मारून पिटून लावून दिले. त्या

वेळेस नानाबरोबर आबाशेलूकर व बजाबा शिरोळकर व नारोपंतवैद्य वगैरे बंदींत सांपडले. तेव्हवेळेस सर्जेरावघाडगा याणें आपले शिपाई नानाफडनवीस व त्याचे पक्षपाती गृहस्थयांचीं घरें लुटावयास पाठविले. तेसमयीं जसा कोणी शत्रु एखाद्या किल्ल्यास घेरा घालून फारलदून मग त्या किल्ल्यां तशिरला म्हणजे मोठा अनर्थ करितो, तशी त्यांणीं पुण्यांत गर्दी केली. तो प्रकार असा, एकदांच चहूंकडे सर्वशहरांत नाकेबंदी होऊन लुटालूट होऊं लागली, आणि मोठी गलबल होऊन किनीएक ठिकाणीं तोडातोडीही झाली; तसेच एकराव एक दिवस बंदुकांचे बार होत राहिले. तेसमयीं शहरचे लोक आप आपले दरवाजे लावून माडीवर चढून खिडक्यांतून बंदुकांचे बार करून त्या लुटारू लोकांशीं लढत होते; आणि कोणा स बाहेर पडणेंतर दहा वीस जमून दा ल तरवारा हातीं घेऊन बाहेर पडत. अशी तेव्हेळीं पुण्यांत मोठी धामधूम झाली.

१६ जेसमयीं शिंद्याच्या तळावर नाना धरला गेला, नेवेळेस बाजीरावानें नानाच्या पक्षीचे जेकार भारी होते ते कांहीं कामाच्या निमित्तें बोलाऊन आणून कैद करून बंदीस घातले. त्यांत मुख्य बाबूराव फडके व आपा बळवंत व नारोपंत चक्रदेव व नारोनीलकंठ मजीमदार व गोविंदराव पिंगळे इतके होते. शिंद्यानें नाना फडनवीस कैद केला, तो अहमदनगरच्या किल्ल्यांत पाठविला. नंतर बाजीरावानें आपला भाऊ अमृतराव तो मुख्य कारभारी करून गोविंदराव काळे व शिवराम नारायण यांचे हे दोघे त्याचे हस्तक केले, आणि बाळाजीपंत पटवर्धन तो लढकरी कामांत केवळ अनाडी असें असतांही मर्जीस्तवनो

लश्कराचा मुखत्यार केला. त्या प्रमाणें बाजीरावानें आयत्या मतें नाना अगदीं नष्ट केला सा जाणून मग शिंद्यास आपणा पासून दूर करावयाची योजना आरंभिली. तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, शिंदा व पाडगा यांशीं जो पहिला करार केला आहे त्या प्रमाणें दिल्यावांचून हे दूर जाणार नाहींत, परंतु सांप्रत तदनुसार वागावयाची शक्ति नाहीं, त्यास सावकाशपणें तें काम करितां करितां कांहीं युक्तीनें तोडघोग सिद्धीस न्यावा, असें मनांत आणिलें.

१७ शिंद्यानें त्या घाडग्याची कन्या (संनसत्राशें अठ्याण्णवांच्या मार्च महिन्यांत) वरिली, तो मोठाच समारंभ केला, त्यास खर्चही बहुत लागला; आणि त्याचें लश्कर पुण्यांत होनें त्यास दरमहा वीस लक्षांवर खर्च लागत असे, त्या मुळें खर्चास तोटा पडून थोडक्याच दिवसांत शिंद्याजवळ द्रव्याविषयीं फारच अडचण पडली. त्यासमयीं तो बाजीरावास पहिले घाडग्यानें गुप्त कबूल केलेले दोन कोटी रुपये मोठ्या निकडीनें मागूं लागला, तेव्हां बाजीरावानें त्यास उत्तर केलें कीं, सांप्रत आम्हांस एवढी शक्ति नाहीं, परंतु तुम्ही जर घाडग्यास आपला मुख्य कारभारी कराल तर तो आणि बाळोजी कुंजर मिळून माहितगारीनें पुण्यांतील द्रव्य उत्पन्न करून तुम्हांस देतील. त्यास शिंद्यानें ही अनुमोदन दिलें. नंतर तेउभयतां बाजीरावाचे वाड्यांत जे नानाचे पक्षींचे बंदींत घातले होते तेबाहेर काढून त्यांस द्रव्यासाठीं मारूं लागले. नंतर मोठे मोठे पुण्यांतील सावकार व कोणी द्रव्यवंत गृहस्थ होते त्यांस धरून नानाप्रकारें दुःखदेते झाले. त्यांतून कितीएकांहीं द्रव्य ही देऊन त्या दुःखानें —

प्राणसोडिले. त्यांत गंगाधरपंतभानूनामें कोणी नानाचा भाऊबंद होता त्यास तापविलेल्या तोफेवर बांधिलें, तें समयीं तो तसा तेथेंच मृत्यु पावला. या प्रमाणें सर्जेराव घाडगा आपल्या जांवायाचा दिवाण होऊन लोकांस नानाप्रकारें दुःख देता झाला; आणि बाजीराव ही त्यास अनुकूळ होऊन आपली प्रजा फार कष्टविता झाला.

तो सर्जेराव घाडगा एवढा दुष्टपणा करील सें बाजीरावाचे कल्पनेंत आलें नसेल, परंतु त्या अनर्थाचें कारण तो बाजीरावच झाला. मग त्या सर्जेरावाच्या क्रूरपणा विषयीं बाजीराव शिंद्याजवळ बोलून त्याच्या उपद्रवाची मनाई करीत असतां, शिंदानें कांहीं ऐकेना. त्यास वाटलें कीं, बाजीराव केवळ लोभिकार्थ दांभिकपणें बोलतो.

१८ बाजीरावानें पूर्वी शिंद्याशीं गुप्त बोलणें करून दोन कोटी रुपये त्यास देऊं केले होते व तुटें लोकांस मारून पैका घ्यावयाची मसलत झाली, तें अमृतरावास किमपि ठावूक नव्हतें. म्हणून तो सर्जेराव घाडग्या विषयीं फार क्रुद्ध झाला, आणि त्याणें असें पाहिलें कीं, सर्वप्रजा शिंद्यास कंटाळली, त्यावरून तो बाजीरावाजवळ बोलिला कीं, एकाएकीं शिंद्यास धरून केदकरावें. त्या गोष्टीसही बाजीराव अनुकूळ होऊन तो अर्थ सिद्धीस न्यावया विषयीं संधीपाहूं लागला. असें असतां अमृतराव याणें आबा काळे नामें कोणी पेशव्यांच्या पलटणी लोकांचा सरदार होता त्यास सांगितलें कीं, शिंदा आमचे भेटीस आला म्हणजे आतली तुला कांहीं खूण करूं नये वेळेस तुम्हीं गर्दी करून शिंदा धरून केद करावा. मग बाजीराव पेशवा याणें कांहीं

कामासाठीं अवश्य यावें म्हणून शिंद्यास आज्ञा पाठविली. मग तो आल्यावर त्यास बाजीराव बोलिला कीं, तुमच्या आचरणाचा शोध करावया विषयीं तुह्मांस बोलाविलें. इतकें म्हणून एकाएकीं धनीपण्याचे नात्यानें डोळे वटारून शिंद्यास स्पष्ट विचारिता झाला कीं, या राज्याचा धणी मी किंवा तूं नें सांग. तेव्हां शिंदा बाजीरावाचें असें भाषण ऐकून अत्यंत विस्मित होत्साता नम्रतेनें उत्तर करिता झाला कीं, मी पेशव्यांचा चाकर, पेशवे आज्ञा करितील त्या प्रमाणें वागणुकेंत अंतर करणार नाहीं. त्यावर बाजीराव बोलिला कीं, तूं माझ्या रयतेस व माझ्या चाकर लोकांस केवढी पीडा केलीस, आणि माझ्या शहरांत व माझ्या वाड्यांत माझा फार अनादर केलास, या पुढें मला हें सहन होणार नाहीं, यास्तव तूं याचे छेस एथून निघून जा बगांवास जा. त्यावर ही दवलतरावानें शांतपणें उत्तर दिलें कीं, मी तुमच्या आज्ञेप्रमाणें च वागावयास इच्छितों, परंतु मला माझ्या फौजेचें देणें फार झालें आहे त्यामुळें माझें एथून जाणें कसें होईल. मला तुह्मांस गादीवर बसवावया करितां बहुत खर्च लागून मी लोकांचा ऋणी झालों, तें द्रव्य मला कृपा करून द्या म्हणजे हे वेळेस च मी पुणें सोडून जातों. असें त्या शिंद्याचें उत्तर होतांच अमृतरावानें भावास खुणेनें विचारिलें कीं, मी आतां आबाकाळ्यास खून करूं कीं काय? तेव्हां बाजीराव भित्रेपणानें त्यास खून कर असें म्हणेना. हें त्याचें स्वाभाविक अधीरपण त्याच्या पक्षपाती लोकांस प्रथमसमजून आलें. त्या पुढें त्याचा तो दुर्गुण बहुत वेळां प्रसिद्धीस आला. मग शिंदा त्या पासून उठून दिसण्यांत केवळ गरीबपणानें आपल्या

ठिकाणीं गेला, परंतु त्याच्या मनांत बाजीरावाचा अविश्वास आणि राग भरला होता.

यावरूनच बाजीरावाचा केवढा अभयोजकपणा होता तो विदित होतो, परंतु त्यानंतर कोणे एकेवेळेस बाजीरावाची शिंद्याची गांठ पडली, तेव्हां अमृतरावानें शिंद्यास धरून काय काय करावयाची मसलत केली होती ती संपूर्ण बाजीरावानें शिंद्यास कळवून यापुढें तुम्ही सावध रहा असें समजाविलें.

१९ त्यावेळेस शिंद्यास लश्कराच्या खर्चाचें जसें संकट पडलें होतें तसेंच पेशव्यासही पडलें. असें असतां साताऱ्यास कांहीं कामा निमित्त लश्करास जाणें प्राप्त झालें, परंतु रोजमुरा थकल्यामुळें ते सरदार पुणें सोडीनात, त्यायोगें पुण्यांत मोठी धामधूम झाली, तिचें निवारण बाळाजी पंत पटवर्धनास करतां येईना. तेसमयीं बाळोजीकुंजर तो पेशव्याच्या प्रीतींतला ह्मणून फारगर्वास चढून त्यास वाटलें कीं, आपण या गोष्टीचा बंदोबस्त सहज करूं; यास्तव तो शिपाईलोकांत जाऊन कांहीं अमर्यादबोलूं लागला, तेव्हां त्यांहीं त्याचा उपहास करून त्याची अनेक प्रकारें अमर्यादा करून शेवटीं त्याच्या पागोट्यावर धबला मारून पागोटें रस्त्यांत पाडून शिपाईलोक लाथांलाथांनीं तें एकमेकांच्या आंगावर उडवूं लागले.

अशी पुण्यांत धुंदाई झाली तेसमयीं गोविंदरावपिंगळ्या बंदींत असतां त्याणें बाजीरावास निरोप पाठविला कीं, यावेळेसजर नारोपंतचक्रदेव यास मुक्त केलें तर हा सर्व बंदोबस्त होईल, नाहींतर फारच अनर्थ पडेल. ती गोष्ट बाजीरावाच्या मनास येऊन त्याणें नारोपंतचक्रदेव यास मुक्त करून गोविंदरावास

ही सोडिलें. त्यानारोपंत चक्रदेवाची शिपाईलोकांत मोठी मान्यता होती, त्याणेंबंदींतून मुक्त होतांच एकादिवसांत संपूर्ण बंदोबस्त केला, परंतु नेंलश्कर साताऱ्यास गेलें नाहीं; कांकीं, नारोपंतचक्रदेवास बाजीरावाचा विश्वास वाटेना, यास्तव तो फौजेस आपल्यापासून दूर करावयास इच्छित नव्हता; आणि पुण्यांत ही शिपाईलोकांची गरज होती, यामुळें लश्कराची साताऱ्यास योजना झाली नाहीं. त्यावरून पुढें परशुरामभाऊपटवर्धनाच्यासुटकेचाही योग घडला. नेपकरण असें, बाजीराव ज्यावेळेंसंगादीवर बसावयाचे योजनेंत होता त्यावेळेस त्याणें साताऱ्याच्याराजाशीं मसलत केलीकीं, नानाचा ठेवणाईत तुलांजवळ बाबूरावकृष्ण आहे तो बंदीस घालून किल्ला आपले स्वाधीन ठेवावा. आणि मला पुण्याच्या गादीचा अधिकार प्राप्त झाला असतां मी पहिल्या बाजीरावा प्रमाणें वागेन, तें तात्काळ मान्य करून राजानें तो बाबूराव केदकरून किल्ला आपले स्वाधीन केला. नंतर नानाफडनवीस भ्रष्ट झाल्यावर बाजीरावानें शिवरामनारायण थत्ते यास साताऱ्याच्या राजाकडे किल्ला मागावयास पाठविलें, तेव्हां राजानें उत्तर दिलेंकीं, मी किल्ला संभाळितों, आणि पेशव्यानें आपल्या वचनाप्रमाणें वागावें. हें वर्तमान ऐकून बाजीराव आपल्या कृत्रिमाचा परिणाम नीट न झाला असें समजून भययुक्त होऊन माधवरावरास्ता यास बोलिलाकीं, साताऱ्याच्या राजापासून किल्ला माझे सत्तेंत येईसाकरा. तेव्हां तो माधवराव साताऱ्यास गेला, तेथेंवेळेस राजा आपल्या सरव्या सोयऱ्याच्या मसलतीनें रास्त्याची नम्रतेची गोष्ट व धमकीची गोष्ट ही मानीना. असें बाजीरावाचें आचरण शिंद्यास विदित होऊन तो स-

मजला कीं, बाजीराव मजशींही कुटिलमार्गानें वागतो; म्हणून त्या
पें साताऱ्याच्याराजास गुप्तमसलत दिलीकीं, तुम्हीं किल्ला देऊंनका;
आम्ही आपल्हीं पांच पळठणें तोफांसुद्धां तुम्हांस पाठवून देऊं; तु
म्ही ब्राह्मणांच्या उपद्रवापासून मुक्त असावें हेंच योग्य. असें
झाल्यावर तो राजा फौजठेऊं लागला, त्यास माधवरावरास्ताअ
डथळा करावयासउद्युक्त झाला असतां राजाच्या लोकांहीं सा-
ताऱ्यांतून पिटून तो माधवराव मालगांवापर्यंत घालविला. असें
असतां त्या माधवरावाचा बाप आनंदरावरास्तायाचे स्वाधीन परशु
रामभाऊ पटवर्धन होता त्याणें आनंदरावास सुचविलेंकीं, मला
जर आज्ञाहोईल तर मी लोक ठेवून साताऱ्याचे धामधुमीचा बं-
दोबस्त करीन. नीगोष्ट आनंदरावानें बाजीरावास कळवून
परशुरामभाऊस सोडवून त्याचे आज्ञेनें आनंदरावरास्ता व परशु
रामभाऊ यादोघांहीं बांई जवळ फौज जमा केली. इतके होई
तों साताऱ्याच्या राजाचे लोक त्या शहरांत स्वस्थ राहिले होते;
कांकीं, तेसमयीं पर्जन्य प्रबळ होता म्हणून तेसमजले कीं, या
वेळेस वेणा नदीउतरून लश्कर येणार नाहीं, परंतु परशुराम-
भाऊला एकउताराची जागा सांपडली तेव्हां तो कोणास कळूं
न देतां दहाहजार फौजेसहित वेणानदीउतरून अकस्मात्
साताऱ्याजवळ जाऊन पोहोंचला. तेसमयीं तेराजाचे लोक
असे असावध होतेकीं, त्यांहीं कोणी येईल तें वर्तमान कळा
वयास नाक्यां नाक्यांनीं टोळ्या ठेवाव्या त्याही ठेवित्या नव्हत्या.
मग ते परशुराम भाऊचे लोक शहराजवळ भिडले असतां रा
जाची फौज तेवेळेस अडीच हजार सुमारें शहरांत होती, तेलोक
पळूं लागले. तेव्हां राजाचा भाऊ चतुरसिंग म्हणून होता तो राजा

च्या मसलत दरांत मुख्य होता, तो व त्याचे सोयरे धायरे एलोजी मोहिते व सेनाजी मोहिते वगैरे होते ते त्या पळणारांची थोपाथोपी करून परशुराम भाऊच्या लश्कराचे तोंडावर गेले. इतक्यांत राजाला आपल्या माणसांसुद्धां किल्ल्यावर चढावयाकरितां अवसर सांपडला, तो वर गेला. इकडे जे लोक परशुराम भाऊच्या तोंडावर गेले होते ते वेगें करून कांहींसे पुढें जाऊन युद्ध करिते झाले, परंतु त्यांचा उपाय चालेना. त्यांतील एलोजी मोहिता ठार पडला, आणि कुशाबा राजा महारीक व दुर्गाजीराजा महारीक हे फार जरब मी झाले. तेव्हां चतुरसिंगाच्या आज्ञेनें राजाचे लोक मागें फिरले, तरी सेनाजी मोहिता शत्रूस पाठ दाखवीना. त्याणें चहूंकडे पाहिल्लें तों माधवराव रास्ता त्याचे दृष्टीस पडला. त्या सभोंवते त्याचे लोक असतांही तो त्यावर एकटाच धांवला, तेव्हां त्या रास्त्याच्या लोकांहीं त्याचे तोडतोडून तुकडे तुकडे केले.

यानंतर परशुराम भाऊचे लोक साताऱ्यांत शिरून लुटालूट करूं लागले, तेव्हां चतुरसिंग आपल्या बरोबर कांहींसे लोक घेऊन सातारा सोडून निंघाला. ते समयीं परशुराम भाऊचे कांहीं लोक त्याचे पाठीस लागले असतांही तो कोल्हापुरच्या राजास जाऊन मिळाला.

इकडे राजाला साताऱ्यावर खावयास मिळेनासें होऊन तो परशुराम भाऊच्या स्वाधीन झाला. या प्रमाणें तें कार्य सिद्धीस गेल्यावर परशुराम भाऊला आज्ञा झाली कीं, आता फौजेस निरोप द्यावा; त्यावर परशुराम भाऊनें उत्तर केलें कीं, ही गोष्ट सांप्रत होत नाहीं; कां कीं, या लोकांचें मला बहुत देणें झालें आहे;

मज विषयीं स्वामींनीं शंका धरूंनये, मी सरकारचा विश्वासू चाकर आहें. त्यावरून बाजीरावानें त्यापासून दहा लक्ष रुपये गुंडेगारी घेऊन त्याच्या पहिल्या अन्यायांची क्षमा केली.

भाग एकुणतिसावा.

संनसत्राशें अठ्याण्णवांपासून अठराशें पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ पुण्यामध्यें शिंद्याची दुर्दशा होतगेली तिच्या वृद्धीचें कारण असें उद्भवलें कीं, तें शिंद्याचे कल्पनेंतच आलें नव्हतें.

महादजी शिंदा मेला तेसमयीं त्याच्या तिघी स्त्रिया होत्या, त्यांत धाकटी भागीरथीबाई नी रूपवती आणि तरुण असे.

पुढें दवलतराव शिंदा त्यागादीचा अधिकारी झाला, तेव्हां त्याणें निश्चय केला कीं, मी यातिघीं बायांचा मान चांगला राक्षीन. नंतर त्या दवलतरावानें त्या तिघींस आपल्या जवळ ठेवून त्यांचा खर्च चालविला, परंतु त्या खर्चाचा नेम बांधिला नव्हता. त्यावरून थोडक्याच वेळानें असें झालें कीं, त्याबायांस कांहीं पदार्थाचें अगत्य पडलें असतां तो त्यांना प्राप्त झाला नाहीं, तेव्हां त्याबायांहीं तो बोभाट शिंद्यापर्यंत जाऊं नदेतां, त्यांत वडीलजी होती तिणें लोकांत असें उठविलें कीं, हा दवलतराव शिंदा आत्मापेक्षां जी धाकटी बाई तिशीं बलात्कारें संग करूं इच्छितो; आणि दुसरें बोलूं लागलीकीं, जो असा

नात्रागमनी पुरुष तोउत्पन्न होण्यास शुद्ध बीज नसतें. नेक्कां स रजेराव घाडग्यानें दवलतराव शिंद्याचा पक्ष स्वीकारून त्या बा यांशीं बोलणें करावयास इच्छिलें, परंतु त्या बाया त्यास आप ले जवळ येऊं देईनात. नेक्कां तो दुष्ट बळेंच त्यांच्या रावटींत शि रून त्या बायांस हातीं धरून बाहेर ओढून कोरड्यांचा मार देता झाला; या प्रकारें त्या बायांचा त्याणें अपमान केला.

२ त्या महादजी शिंद्याच्या राज्यांत मुख्य कारभारी शेण वी होते ते व त्यांचे कितीएक सोयरे धायरे यांहीं त्या सर्जेराव-ची योग्यता हद्दिंगत झालेली पाहून आधींच त्याशीं द्वेष आरंभिला होता, त्यावर त्याचें हें अनुचित कर्म पाहून त्या बायांचे पक्षांत शिरू न त्या सर्जेरावाशीं बहुत वादविवाद केला; आणि शेवटीं ठरविलें कीं, शिंद्यानें बायांच्या खर्चाचा बंदोबस्त त्यांच्या माना प्रमाणें करू न द्यावा, आणि बायांनीं एथून जाऊन बऱ्हाणपुरीं स्वस्थ असा वें. याप्रमाणें नेम ठरल्यावर त्या बायांचे बरोबर कांहीं से स्वार देऊन संनसत्राशें अठ्याण्णवांच्या मे महिन्याचे चवदावे तारिखे स त्या बाया पुण्याहून शिंद्यानें रवाना केल्या. त्या भीमेचे कांठीं कोरेगांवीं पोंहचतात तों पुण्यामध्यें त्या शेणवी मंडळीस वर्तमान क ळलें कीं, शिंद्यानें एथून त्या बाया बऱ्हाणपुरीं पोंहचवावया चें निमित्त करून काढिल्या त्या अहंमद नगरच्या किल्ल्यांत बंदीस घालावया करितां नेल्या. नेक्कां त्यांहीं तात्काळ एक आप ला पक्षपाती केलेला शिंद्याजवळ हिंदुस्थानी स्वारांचा सरदार मु-जफिरखान नामें पठाण होता, तो त्या बायांना सोडवून आणाव याकरितां पाठविला. तो तेथें त्वरेनें जाऊन त्याणें त्या बाया सोडवू न पुण्या जवळ माघाऱ्या आणिल्या. नंतर त्या मुजफिरखानाच्या

पारिपत्या विषयीं सर्जेराव्यानें शिंद्यांजवळ फार आग्रह धरिला, तेव्हां त्या घाडग्यास त्या पठाणावर जावयाची आज्ञा झाली. हें वर्तमान समजून त्याणें बाजीरावाचा भाऊ अमृतराव याचा तळ जुन्नरचे वाटेस भीमेचे कांठीं होता तेथें त्याबाया नेऊन मोठ्या बंदोबस्तांत ठेविल्या. ते समयीं तो घाडगा स्वयें त्या पठाणाचे पाठीस लागलेला होता, त्यावर तो पठाण माघारा उलटून त्याचा पराभव करून मोठ्या मानानें त्या बायांकडे पुनः गेला. त्यादिवसा पासून पुढें जून महिन्याचे सातवे तारिखे पर्यंत त्या बाया व तो मुजफिरखान स्वस्थ तेथेंच होतीं. त्यारात्रीं अमृतरायाच्या तळावर छापा घालावया करितां शिंद्यांचीं पांच पलटणें येऊन पोंहचलीं, परंतु तेलश्करीलोक सावध होऊन त्यांहीं त्या पलटणी लोकांस मागें फिरविलें.

३ त्यानंतर शिंदा याणें पुनः त्या शेणची मंडळाशीं कबूल केलेंकीं, त्या बायांच्या मर्जीस येईल तेथें त्यांहीं रहावें, मी त्यांच्या मानाप्रमाणें त्यांचाखर्च चालवितों. असें दुसऱ्यानें त्याबायांचें आणि शिंद्याचें ऐक्य झालें. तेव्हां तो शिंदा पुनः घात करील असें नजाणून अमृतराव त्या बायांस घेऊन लश्कर सुद्धां खडकीच्या पुला जवळ येऊन राहिला. तो कितीएक दिवस तेथें होता, त्यास शिंद्याचा पुरता भरंवसा वाटल्यावर ज्या दिवशीं त्या अमृतरावाच्या लश्करचे मुसलमान लोक ताबूत पाण्यांत बुडवायास सिद्ध झाले त्यादिवशीं सर्जेराव घाडगा शिंद्यानें व अमृतरावाचेलश्कर यांचा तंटा नव्हावा म्हणून त्यांच्या बंदोबस्ताच्या मिषें करून आपल्या बरोबर तोफा व पलटणी लोकांचे दोन बृगेद घेऊन त्या लश्कराजवळ नदीचे कांठीं जाऊन पोंहोंचला. तेव्हां अमृतराव

चे लश्करी लोक यांस त्या शिंद्याचें कृत्य किमपि विदित नव्हतें म्हणून ते विश्वासें करून स्वस्थ राहिले असतां एकाएकीं त्या घाडग्यानें त्यांवर पंचवीस तोफांचा मारच चालविला, आणि पलटणीलोक तुटें घालवून हल्ला करून त्यांची अगदीं उधळा उधळी होऊन त्यांचा तळ लुटला. त्या वेळेस त्या बाया अमृतरावाचें लश्कर सोडून अंगोधरच विठ्ठलवाडी गांवीं जाऊन राहिल्या होत्या, त्यायोगें तें युद्ध बायां संबंधें झालेंसें दिसलें नाहीं, पेशवे व शिंदे हे आपआपल्याच आकसानें लढले असा अर्थ झाला. त्या दिवसापासून शिंदे व पेशवे यांचीं युद्धें निःसंशयपणें चालू झालीं, असें दिसण्यांत आलें. तेव्हां काशीराव होळकर अमृतरावयास मिळाला, आणि मोठे मोठे मानकरीही त्या अमृतरावाच्या पक्षासच अनुसरले. नंतर पेशवे व निजाम यांचें ऐक्य झालें. असें असतां शिंद्यास मोठी भीति उत्पन्न होऊन त्यास वाटलें कीं, आतां कसेंही करून आपल्या हिंदुस्थानांत जावें, परंतु शिपाईलोकांचे देणें त्यास फार झालें होतें, त्यामुळें पुण्याहून त्याचें निघणें होईना; म्हणून पेशव्यांहीं जसा निजामाशीं स्नेह केला तसाच त्या शिंद्यानेंही बाजीरावास भय उत्पन्न व्हावया करितां टिपूशीं स्नेह करावा म्हणून वकील पाठविला; तें समजून बाजीरावानेंही त्या टिपूकडे आपला वकील पाठविला. नंतर दवलतरावानें बाजीरावास भय व्हावया साठीं नाना फडनविसास सोडावें, हेंच उत्तम असें जाणून नानाशीं बोलणें लाविलें. शेवटीं ठरलें कीं, दहा लक्ष रुपये नानानें दिले असतां त्याची मुक्तता होईल, तें मान्य करून नाना त्या आहमद नगराहून सुटून निघाला. ही गोष्ट बाजीरावास अनिष्ट तथापि अगोधरच त्यास समजलें होतें

कीं, नानाफडनविसास शिंदा सोडील.

४ तो नानासुठतांच्व बाजीरावपेशावा याणें निजामाशीं नव्ह केलेला टाकून शिंद्याशीं व नानाशीं तहाचें बोलणें लाविलें, त्यादिवसापासून बाजीराव व शिंदा यांची मैत्री वाढूं लागली. त्यामैत्रीचे वृद्धीस एक कारणउपयोगीं पडलें तें असें, सर्जेराव घाडगा फकीरजी गाढवे नामें कोणी एक मराठा अनुकूळ करून प्रजेस अनेकप्रकारें उपद्रव देत होता, त्याचें निवारण शिंद्यास ही होईना. तो घाडगा क्रूरपणा करितां करितां त्यास त्या दुष्कर्माचा असा अभ्यास झाला होताकीं, त्याच्या निर्दयपणास अंतचना ही; त्याणें कोणे एकेवेळेस शिंद्याच्या लश्करचे चार सरदार धरून त्यांतील तिघे ते बायांचे पक्षपाती असें निमित्त करून तोफांचे तोडीं देऊन उडविले, आणि चवथ्याच्या डोकीवर मेख ठोकून त्यास जिवें मारिलें. असा त्याचा निःसीम दुष्टपणा पाहून शिंदा त्यावर कोपला, आणि त्या घाडग्याला फकीरजी गाढ्या सुध्दां बंदींत घालावयाची आज्ञा देता झाला. त्या प्रमाणें ते कैद झाल्यावर शिंद्याशीं व बाजीरावाशीं स्नेह होण्यास पूर्वीचिं नें एक द्वेषाचें कारण नाहींसें झालें.

५ या खेरीज त्यावेळेस कलकत्त्याच्या मुख्याची बदली होऊन त्याचे जागीं लार्ड माणिंटन नामें साहेब आला, त्यास मार्क्वीस वेल्झली असें ही म्हणत, त्यालाटानें पहिल्या इंग्लिशांच्या रीतींत कांहीं अंतर केलें, तें असें. त्यांची अगोधरचाल होतीकीं, नादरा अडचण पडल्याखेरीज परक्याच्या मसलतींत शिरूंनये, नें सोडून त्यासाहेबानें हैदराबाद व पुणें या दोहों दरबारांशींस्नेह करावायाचा उद्योग पुनः आरंभिला. कांकीं, त्यास असें भय हो

तें कीं, टिपूकेंचांचें साहाय्य संपादून निजाम व शिंदा यांशीं स्नेहक रून इंग्लिशांस बाधक होईल. त्यावरून त्यासाहेबाची मसलत होतीकीं, शिंद्यास निजामअल्ली व टिपू यांपासून दूर हिंदुस्था नांत घालवावें, म्हणून त्या शिंद्यास असें समजाविलेंकीं, आ-फगाण लोक हिंदुस्थानांत तुम्हांवर येताहेत; आणि बाजीरा-वास कळविलेंकीं, शिंदा हिंदुस्थानांत गेला म्हणजे तुमच्या राज्याच्या बंदोबस्ता करितां आम्ही आपली फोज तुमचे चाक रीस पाठवून देऊं.

६, हें काम बाजीराव या पूर्वी इंग्लिशांस सांगत होता, ते व्हां ते त्यास अनुकूळ होईनात, त्यावरून त्या बाजीरावाच्या मनांत आलेंकीं, एकाएकीं आपणास इंग्लिश अनुकूळ झाला यांत कांहीं नानानें दग्याची मसलत केली असेल; तो असेंन समजलाकीं, विलायतेहून नवासाहेब येऊन पहिल्या चालीं त अंतर पडलें. बाजीराव असा नाना विषयीं शंकित होऊन शिंद्यास हिंदुस्थानांत जावयाचा निरोप झाल्यावर तो तिकडे जातो असें ठरलें, आणि बाजीरावाचा व नानाचा स्नेह झाला असें लोकांत प्रसिद्ध झालें असतांही, शिंद्यास हिंदुस्थानींनजा ण्या विषयीं बाजीरावानें गुप्त सांगून पाठविलेंकीं, त्या समयीं तुम्हीं पुणें सोडून जाऊं नये, कांकीं, नाना इंग्लिशांस आणून दगा क रील. असें शिंद्याशीं बोलणें होत असतां बाजीराव नानाफडन विसास म्हणत असेंकीं, तुम्ही शिंद्याचा तळ सोडून शहरांत ये ऊन आपलें काम संभाळाल तर मोठा उपकार होईल. त्यावरू न नाना पुण्यांत येऊन राहिला, परंतु त्याणें असा आग्रह धरिला कीं, तुला पासून माझ्या शरीरास आणि इज्जास भय होणार नाहीं

असें निजाम आणि इंग्लिश यांचें खातरीचे सांगणें पाहिजे, तेव्हां मी तुमच्या कारभारांत शिरेन; आणि हें घडलें असतां मला आधीं शिंदा हिंदुस्थानांत लाऊन द्यावा लागेल.

नंतर नानानें शिंदा हिंदुस्थानांत जावयासाठीं आपल्या जवळचे पंधरालक्ष रुपये त्यास दिले व दहालक्ष रुपये आपल्या मुक्ततेविषयीं देऊंकेले होते ते त्या शिंद्यास पूर्वी दिलेच होते. नंतर बाजीराव पेशवा समजला कीं, शिंदा खचितजाणार आहे, यास्तव त्याच्या मनांत आलें कीं, कोणास न कळतां एकांतीं नानाची गांठ घालून त्यास समजावावें कीं, मी तुमचें कांहीं वांकडें केलें नाहीं, अशायुक्तीनें तोवश करावा. त्याव रून त्याणें आपल्या बरोबर एक मनुष्य घेऊन मध्यरात्रीं नाना चे घरीं जाऊन त्याची भेट घेतली. तो बाजीराव बोलण्या मध्यें पक्का मायावी होता, त्याणें शिंद्यास सांगून नानास उपद्रव दिला होता तें नानाचे मनांतलें जावें म्हणूनजें केलेंतें शिंद्या नें केलें त्यांत माझी कांही किमपि नाहीं, असें समजावून बोलिला कीं, तुमचे कारभारी यांस मी आपल्या बंदींत ठेविलें हें ही त्यांच्या हितार्थच केलें; कांकीं, त्यांस शिंद्याचा उपद्रव न लागावा. शेवटीं आपलें सांगणें नानास खरें वाटलें असें निश्चित जाणून तो बाजीराव नानाच्या पायांवर डोकें ठेऊन बोलिला कीं, तुमच्या पायांची च शपथ, मी इतःपर तुम्हास आपल्या बापा प्रमाणें मानीन, आणि तुमच्या सांगण्या वांचून कांहीं करणार नाहीं. इतकें बोलून तात्काळ डोळ्यांत पाणी आणून म्हणूं लागला कीं, या समयीं ब्राह्मणाच्या राज्यास अपायकारक दोन कारणें झालीं आहेत; त्यांत एक तर आमच्या मराठ्यांत परस्परें चें मनस्यें

पडलीं, आणि दुसरें इंग्लिश लोकांस याराज्या विषयीं लोभउत्प न झाला. यास्तव यावेळेस तुम्ही आपल्या बुद्धि कौशल्यें क रून या सर्व गोष्टीचा बंदोबस्त केला पाहिजे.

असें बाजीराव पेशवा चें कृत्रिम असतां नानाफडनविसास सत्यवादून तो प्रथम निजामअल्ली व इंग्लिश यांची जामिनकी मागत होता तें सोडून संनसत्राशें नव्याण्णवांच्या अकटोंबरा चे पंधरावे तारिखेस निःसंशयपणें कारभार चालवूं लागला. त्यांतच त्याची बुद्धि चकली. कांकीं, तो आपलें काम करूं लागतां च त्यास यशवंतराव घोरपडा याणें जाऊन सांगितलें कीं, हल्लीं तुह्यास बंदींत घालावया विषयीं बाजीराव पुनःशिंद्याकडे आग्रहाचे निरोप पाठवितो. ही गोष्ट नानानें शिंद्यास विचारून खरीही मानिली. तेव्हां तो नानाफडनवीस लागलाच बाजीरा वाकडे जाऊन त्यास बोलिला कीं, तुम्ही मला मोठा विश्वास देऊन दगा करावयास कसे प्रवृत्त झालां, मी आपल्या दुष्टपणा नें व दुर्दशेनें मृतप्राय झालों, त्या माझ्या प्राणांचा नाश कां चिंतितां? मी तुमच्या कारभारांत आपल्या महत्वा साठीं शिरलों नाहीं, केवळ सरकारचे हितासाठीं या कामाचा स्वीकार मी केला, त्यास जर तुम्हाला माझें भय वाटत असेल तर अगदीं जेथें दरबारी कारभार नाहीं अशा रिकामे जागीं जावयास मलासांगा, मी तेथें स्वस्थ राहीन. त्यावर बाजीरावानें उत्तर केलें कीं, यांतील कांहीं एक मला ठाऊक नाहीं, आणि मजपासून कदापि असें घडावया चें नाहीं. असें असतां ज्याणें तुम्हास माझें नाव सांगितलें असेल तो मला दाखवा. हें वर्तमान शिंद्यास कळतांच त्याणें बाजी रावाचे मुख्य कारभारी गोविंदराव काळे व शिवराम नारायण

थत्थे हे उभयतां धरून कैद केले. कांकीं, बाजीरावानें आपल्या वरला शब्द उडविला तो त्यांवर आला, त्या योगें ते बंदींत पडून त्यांचें सर्वस्व गेलें. तथापि त्यांहीं बाजीरावाचें नाव सांगितलें नाहीं. हा एक मराठी लोकांचा जातिस्वभावच आहे कीं, कसेंही संकट मास झालें असतां तें सहन करून आपल्या साहेबावर शब्द येऊं देऊं नये. तें बाजीरावाचें कृत्य त्या दोघांकार भाऱ्यांहीं आपल्यावर घेतलें, यास्तव नानाफडनविसास कांहीं सांविश्वास वाटून त्याणें कारभार चालविला. या पूर्वी सन सत्राशें अठ्याण्णवांच्या सप्टेंबर महिन्यांत निजामाशीं आणि इंग्लिशांशीं असा तह झाला होता कीं, निजामानें आपल्या जवळचीं फ्रेंच लोकांहीं शिकविलेलीं पलटणें दूर करावीं, आणि फ्रेंच लोक चाकरीस न ठेवावे. याबद्दल एक एका पलटणा स हजार हजार लोक अशीं इंग्लिशांकडचीं सहा पलटणें चाकरीस ठेवावीं. यामध्येंच इंग्लिशांहीं सुचविलें कीं, पेशाव्याशीं वतुम्याशीं कांहीं एक संबंधें वाद पडला असतां आम्ही तो कलह तोडावयाचा उद्योग करूं. याप्रकारेंच तह इंग्लिशांहीं पेशाव्यास दर्शविला, परंतु बाजीरावास त्यांचा विश्वास वाटेना म्हणून तो तह त्याच्या मनास आला नाहीं. असें असतां नानाची मसलत ऐकून त्याणें उत्तर दिलें कीं, हा तह माझ्या मनोदयानुरूप न झाला, तथापि आजपर्यंत तुम्याशीं व आम्याशीं जो तह झाला आहे त्यांत मजकडून अंतर पडावयाचें नाहीं. कदाचित् टिपूशीं आणि तुम्याशीं युद्ध झालें तर मी तुमचें साहाय्य करीन. असें बाजीरावानें इंग्लिशांस उत्तर दिलें तें योग्य दिसलें, परंतु त्याचे आंगीं खरें धैर्य व प्रामाण्य नव्हतें. नानानें त्यावेळेस ही बाजीरावा

समांगितलें कीं, इंग्लिशांशीं प्रामाणिकपणेंच वागावें, तेंनके न्यास नाशच होईल.

७ यानंतर इंग्लिशांहीं टिपूशीं युद्ध आरंभिलें असतां नानानें इंग्लिशांच्या कुमकेस मराठी लश्कर पाठवावयाचीयो जनाकेली, परंतु बाजीराव दवलतराव शिंद्याच्या मसलतीनें चाले म्हणून नें घडलेंनाहीं. बाजीराव याणें आपले मनांतकल्पनाकेलीकीं, टिपू व इंग्लिश या दोघांत एकाचा जय होईतों पर्यंत दोघांशीं समान स्नेह ठेवून शेवटीं जो जयवंत होईल त्याम आपण मिळावें; परंतु त्यावेंलस इंग्लिशांपेक्षां टिपूकडे विशेष असे.त्याणें नानाफडनविसास नकळतां टिपूपासून नेगलक्षमपर्यंत घेनले होने; याशिवाय त्याणें शिंद्याशीं मसलत केली होतीकीं, समय विशेषीं आपण दोघांहीं मिळून निजामाचे मुलखीं जाऊन त्याचा पराभव करून लोकांत असें प्रसिद्ध करावें कीं, आपण टिपूचेच सहाय इंग्लिशांचे नव्हों. अशी पुण्यांत बाजीराव पेशवा व दवलतराव शिंदा हे दोघे मसलत करीत असतां अकस्मात वर्तमान आलें कीं, इंग्लिश व टिपू यांचें युद्ध होऊन टिपूचीराजधानी श्रीरंगपट्टण सुद्धां तें सर्वराज्य इंग्लिशांचे हातीं लागलें. त्याप्रसंगीं टिपूही मृत्यु पावला हें वर्तमान मोठें आश्चर्यकारक ऐकून शिंदा आणि बाजीराव हे तात्काळ मोठा हर्ष पावल्याप्रमाणें दर्शऊं लागले; व आपणआपले लोक इंग्लिशांच्या साहाय्यास न पाठविले तो दोष नानाकडून न घडला असें ठरवून तात्काळ धोंडोपंत गोखला करनाटकचा सरसुभेदार तो इंग्लिशांचे साहाय्यास पाठविला.तो तिकडे जाऊन पोंहचतांच त्याणें टिपूचा मुलूख इंग्लिशां कडे गेला होता

तो कांहीं कांहीं लुटला. याशिवाय कांहीं उपयोगी असें त्याणें क काम केलें नें असें, कोणी धोंडीवाघ नामें त्या मुलखींचा लुटारू श्रीरंगपट्टणाकडून पळालेला असे, तो रयनेस फार उपद्रव देत होता, त्यावरया धोंडोपंतानें छापा घालून त्याच्या लोकांचा बेतवि सकटून दाणादाण केली. त्यानंतर तो धोंडीवाघ तेथून निघू न कोल्हापुरचा राजा पेशव्याशीं लढत असतां त्याचे चाकरीस जाऊन राहिला.

दवलतराव शिंदा याणें टिपूच्या नाशाचें वर्तमान ऐकून ता त्काळ श्रीरंगपट्टणास लोक पाठवून त्यास आज्ञा दिली की, को णी टिपूचे पक्षपाती असतील त्यांस अभय देऊन पुनः युद्धाची तयारी करवावी. असें असतां कर्णेलपाल्मेर नामें साहेब इंग्लिशांचा वकील तो पुण्यांत होता त्यास शिंद्यानें निरोप पाठविला की, तुम्ही मोठे जयवंत झालां त्या योगें आम्ही अत्यंत हर्ष पावलों.

८ टिपूचा मुलूख इंग्लिश आणि निजामअल्ली या दोघांहीं मिळून घेतला असतां त्याच्या वांटणी विषयीं निजामअल्लीनें कि मपि चवकशी न करितां केवळ इंग्लिशांच्याच कलीवर विश्वास ठेविला, तेव्हां मारक्वीसवेलस्ली साहेब याणें त्या वाटणी प्रकरणीं बंदोबस्त केला. तो प्रकार असा, म्हैसूरचा राजा तो हैदरअल्ली नें जिंकिला होता त्याच्या वंशीच्या पुरुषाचा शोध करून त्यास त्या चे गादीवर बसविलें, तेसमयीं टिपूच्या मुलखाचा वसूल तीसल क्ष चाळीस हजार होन उत्पन्न होत होता, त्यापैकीं त्याराजास तेरा लक्ष साठ हजार होननेमिले, आणि निजामअल्लीस पांच लक्ष नी स हजार देऊन आपणास पांच लक्ष सदतीस हजार ठेविले; आणि हैदर व टिपू यांच्या परिवारास होन लक्ष चाळीस हजार देऊन ने

दोघे आपले स्वाधीन ठेविले होते; आणि टिपूचा कोणी सरदार कमरूद्दिन नामें होता तो व त्याचा परिवार निजामअल्लीच्या स्वाधीन असे,त्यास सत्तर हजार होन नेमिले. सर्व मिळून सत्तावीस लक्ष सदतीस हजार होन झाले, बाकी तीन लक्ष तीन हजार होन राहिले. तेव्हां निजामअल्ली आणि इंग्लिश या दोघांचे मतें ठरलें कीं, पेशवा आपल्या करारा प्रमाणें कामास आला नाहीं, तथापि तुमच्या व आमच्या तहामध्यें यासमयीं मिळत असल्यास तें उरलेलें इच्य त्यास द्यावें,नाहींतर त्याचे तीन भाग करून त्यांतील दोन निजामानें घ्यावे व तिसरा इंग्लिशां हीं घ्यावा.

९ नंतर बऱ्हुतेक वाद विवाद होऊन पेशवे व इंग्लिशयां चा तह होईना,तेव्हां तो उरलेला भाग पाहिल्या नेमा प्रमाणें इंग्लिश व निजाम यांणीं वांटून घेतला. ते समयीं निजाम व इंग्लिश यांचा दुसरा कांहीं तह झाला,त्यांत असें झालें कीं, इंग्लिशांहीं निजामाचे मुलखाचे रक्षणार्थ आणीक दोन पलटणें दिलीं, आणि नेमकेला कीं, जो कोणीं निजामाच्या राज्यास अन्यायें करून उपद्रव करील तो इंग्लिशांहीं आपला शत्रुसा जाणून त्यास जिंकावें. यालश्कराच्या खर्चास निजाम अल्लीनें म्हैसूर प्रांताचा सर्व आपले घांटणीचा विभाग इंग्लिशांस लाऊन दिला असे

१० या प्रमाणें निजामाकडचें व इंग्लिशांचें वर्तमान असतां शिंद्याच्या राज्यांत फार अव्यवस्था होऊं लागली ती अशी, सर्जेराव घाडगा याणें दुष्टपणें इंग्याचा छापा अमृतरायावर घातल्या नंतर त्याचाया विठ्ठलवाडीकून निघून कोल्हापूरच्या राजा

वे आश्रयास गेल्या; त्या वेळेस तो राजा पेशव्याशीं लढत होता, त्यापाशीं त्या बाया जाऊन राहिल्या. नंतर शिंद्याजवळचा नारायणराव बक्षी व कितीएक शेणवी मंडळ त्या शिंद्याचें लश्कर सोडून कोल्हापूरकरास जाऊन मिळालें, त्यामागून कितीएक स्वारही जाऊन मिळाले. मग त्याजवळ फार फौजजमल्यावर तो तेथून निघून कृष्णेच्या उत्तरेस गोदावरी पर्यंत शिंद्याचे गांव लुटीत गेला; मग पुण्यासही येऊन कितीएक वाटा बंद करून तेथें शिंद्याच्या तळास उपद्रव देऊं लागला. तेवेळेस शिंद्याचे स्वार त्याशीं लढावयास अशक्त होते, पण त्याचे पलटणीलोकमात्र त्या राजास अडथळा करीत. त्यापासून मुलुखांत फार अव्यवस्था होऊन सर्वत्र हत्यारबंद स्वारजमा होऊन रयतेस उपद्रव होतां होतां तो दंगा हिंदुस्थानपर्यंत पोंहचला. तेथें लखबादादा शेणवी म्हणून कोणी होता तो बाळोबा ना त्याचा इष्ट म्हणून शिंद्यानें तो विश्वासास योग्य नव्हे सें जाणून त्यास पालखिलें होतें, तो शिंद्याच्या शत्रूस मिळून त्याणें कितीएक वेळां आपणास धरावयाकरितां शिंद्याचे लोक आलेले जिंकून उज्जनीपासून सरोंज पर्यंत मुलूख हस्तगत केला. याशिवाय यशवंतराव होळकर तो नागपुरास गेला होता, त्यास नागपूरकरांहीं शिंद्याच्या सांगण्यावरून बंदींत घातलें होतें; तो त्याबंदींतून पळून जाऊन माळव्यांत शिरून लुटालूट करूं लागला. तेवेळेस शिंद्याच्या पलटणांचा मुख्य सरदार दिबायन तो विलायतेस गेला, त्याचे जागीं मुख्त्यार पेरण नामें फ्रेंच असे, तो आग्रें नामें किल्ला घ्यावयाकरितां युद्ध करीत होता, त्या आग्र्यामध्यें लखबादादा आश्रयकरून राहिला होता, त्यणून तो पेरण फ्रेंच शिंद्याजवळ कुमक माग

त असे.

असें असतां शिंद्यानें त्याबायांशीं पुनः तह करावयाचा बेत केला, परंतु त्याबाया आपण मुख्यत्वें राज्य करणार, आणि त्या शिंद्यास कारभाऱ्याच्यांनात्यानें वागविणार, या शिवाय दुसरेंकां हीं ऐकेनात. अशा संकट समयीं शिंद्यानें आपले दोघे नवे मुख्य कारभारी केलेले रायाजीपाटील व आबा चिटनीस यांस मसलत विचारिली असतां त्यांहीं फार चातुर्यें करून प्रामाणिकपणें स्वहितनयहातां त्यास उत्तर दिलें कीं, बाळोबातात्यास सोडून जर तो मुख्य कारभारी केला तरच हा बंदोबस्त होईल. नेझां त्या शिंद्यानें त्या प्रमाणें नं शेवटास नेतांच नेबंड करणारे बंड सोडून त्याबाळोबाना त्यास जाऊन मिळाले, आणि त्याबा याही त्याबाळोबाच्याच द्वारें वऱ्हाणपूर व अकराल खांचीज हागीर घेऊन स्वस्थ रहावयास सिद्ध झाल्या. तो लखबा दादा त्या आग्र्या मध्यें युद्ध करीत असे, तोही नलढावा असें सिद्ध झाले. इकडे त्याबाया विश्वासानें पुण्यास जातांना जेजोरीस पोंहचल्या, इतक्यांत त्याबायांच्या पक्षाचा कोणी होता तो शिंद्याच्या लोकांहीं मारिला, हें वर्तमान त्याबायांहीं ऐकून त्या तेथूनच फिरल्या, त्या माघाऱ्या पंढरपुरास गेल्या, आणि तो सर्व बंदोबस्त मोडून तो तंटा पुनः उत्पन्न झाला.

११ पेशवे व कोल्हापूरकर हे युद्ध करीत असतां कोल्हापूरकरांस चतुरशिंगाची कुमक मिळाल्यानें तें युद्ध वाढलें. त्या चतुरशिंगास पूर्वी साताऱ्याच्या लढाईचे समयीं रास्ते व प्रतिनिधी यांच्या शिपाई लोकांहीं कोल्हापूरकराच्या मुलखांत हांकून लाविलें, आणि ते लोक वारणा नदीचे कांठीं उतरले. ते समयीं

साताऱ्याकून पळालेले पांचशेंसुमारेंलोक एकेजागीं जमूनस्यां हीं चतुरशिंगास ते वारणानदीचे कांठीं शत्रूचेलोक उतरल्याचें वर्तमानकळविलें, तेव्हां त्याचतुरशिंगानें तें वर्तमान कळविणा रेलोक यांस लपून रहावयास सांगून आपण कोल्हापूर करांक डून कुमक आणून ते व ते पांचशेलोक एकच करून रास्ते व प्रतिनिधीयांच्या लोकांवर एकाएकी असा छापा घातला कीं, त्यां तील एखादा दुसरा वांचला असेल. त्यानंतर परशुरामभाऊ चेहीलोक असावध याकून त्याचतुरशिंगाच्येलोकांहींयांवर जाऊ न त्यांस हांकून दिलें. त्यापुढें त्या चतुरशिंगास वर्तमान कळलें कीं, रास्त्याची दोनतीन हजार फौज तोफांसुद्धां साताऱ्याजवळ डेरे देऊन उतरली आहे; तेव्हां तो आपल्या बरोबर सहाशें पा- यदळ घेऊन डोंगरचे वाटेनें पालीस गेला, त्यारात्रीं तेथेंराहून त्या देवाची पूजा केली, आणि त्या देवाचा भंडार कपाळीं लाऊन तेथून मोठ्यावेगानें धांवला, तो वेग असा कीं, त्यारास्त्याचे लोक सावध असतांही त्याणें त्यांच्या तोफा घेऊन नासून टाकिल्या, आणि त्यांचे कितीएकलोकही मारून निघाला, तोदुसरा कोणी त्याव र आला नाहीं तों मोठीत्वरा करून तो चतुरशिंग वारणानदीस जाऊन पोंहचला. त्याणें अशी मर्दुमी करून लढतां लढतां आप- ल्याजवळ बहुतलोक जमा केले. मगरास्त्याची फौज सहाहजा र होती तिला वारणा व शिराया दोहों नद्यामध्यें कधींही एकेठि काणीं स्वस्थ राहूं दिलें नाहीं. असें असतां कोणे एकेसमयीं त्या चतुरशिंगाजवळ पांचशें मनुष्य असतां त्यावर रास्त्याचे पांचह जार शिपाईलोक चालून गेले, आणि याची व त्यांची गाठ पडली तेव्हां त्या लोकांहीं त्यास आसमंतात वेष्टिलें असतां ही तो परम

शौर्य करून त्या वेढ्यांतून पार झाला. ते समयीं त्याचेलोक अर्धे अधिक मेले गेले.

असे रास्ते व चतुरशिंग राजा यांचे युद्ध प्रसंग होत असतां कोल्हापूरचा राजा याणें परशुराम भाऊचें मुख्य ठिकाण तासगांव तें लुटून तेथें बहुत द्रव्य खर्चून नवाबां धलेला त्या परशुराम भाऊचा वाडा होता तो जाळून टाकिला.

या खेरीज त्या राजानें करनाटकांत कितीएक ठिकाणची खंडणी घेतली. तेथें सरसुभेदार धोंडोपंत गोखला होता तो मोठ्या शौर्यानें मुलुख संभाळित असतांही त्याचा कितीएक वेळां पराभव केला. या प्रमाणें कोल्हापूर व तत्संबंधी मुलूखया मध्यें वर्तमान नाना फडनवीस कारभार करूं लागे तों पर्यंत झाले.

बाळोबा तात्या व नाना फडनवीस यांची पुनः मैत्री होऊन ते आप आपल्या धण्याच्या बोलण्या वरून इंग्लिश आणि निजाम यांशीं कसें वागावें तीमसलत एकांतीं करूं लागले. तेव्हे ढेस त्यांच्या मतें ठरलें कीं, प्रथम दक्षिणेचा बंदोबस्त अगत्य केला पाहिजे, त्यास पेशवे व शिंदे, व जहागीरदार मिळून तीस हजार फौजजमा झाली. म्हणजे दसरा होतांच परशुराम भाऊलाया कामास योजावें.

१२ ते समयीं तो परशुराम भाऊ कोल्हापूरकरांच्या द्वेषास्तव त्यांशीं पर्जन्यांतही युद्ध करीत होता, त्याणें घटप्रभा मलप्रभा नदीपर्यंत कोल्हापूरकरांचीं कितीएक ठाणीलुटविलीं; आणि आपण नानाकडील फौजेची वाट न पहातां एकटेंच कोल्हापुरास जाऊन तेंयुद्ध शेवटास न्यावें असा नेम बांधून तो परशु-

रामभाऊ गोकाकेहून कोल्हापुरावर जाऊं लागला, त्यास वाटेनें पटनकुंडी गांवा जवळ कोल्हापूरचा राजा व चतुरशिंग्या दोघां ची गांठ पडली, तेव्हां त्यांचें व याचें मोठें युद्ध होऊन त्या परशुरामभाऊचा अगदीं पराभव होऊन त्यास मोठ मोठ्या जखमा लागून तो परशुरामभाऊ शत्रूच्या हातीं सांपडून मृत्यु पावला.

असें झाल्यावर नानाफडनवीस व बाळोबातात्या यांहीं त्या परशुरामभाऊचा पुत्र आपासाहेब याजबरोबर पांच पलटणें आणि विंचूरकर व प्रतिनिधी यांचे लोक देऊन त्या राजास जिंकावया करितां कोल्हापुरास नेमिला. तेव्हां तो राजा पन्हाळ्या किल्ला याचे खालीं डेरे देऊन राहिला होता; तेथेंही आपासाहेबाचे लोक त्यावर जाऊन पडले, तेव्हां ते कितीएक पन्हाळ्यावर चढले, आणि बहुतेक कोल्हापुरांत शिरले. म्हणून त्या आपासाहेबानें कोल्हापुरास घेरा घालून कितीएक वेळां युद्ध केलें, तेव्हां तो किल्ला त्या आपासाहेबाचे हातीं लागत होता, परंतु तेवेळेस-च पुण्यांत असें नवेंच कांहीं कार्य उद्भवलें कीं, तें कोल्हापुराचें काम सोडून त्या आपासाहेबाला पुण्यास जावें लागलें, तेणें करून कोल्हापूरचें राज्य राहिलें तें अद्यापि त्या राजाचे स्वाधीन आहे.

भागतिसावा.

सन अठराशें पासून सन अठराशेंतीन पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ पुण्यांत मोठें कांहीं कार्य उत्पन्न झालें असें मागल्या भागांत लिहिलें, त्यांत प्रथम नानाफडनविसाचा मृत्यु, दुसरें शिंद्यानें मसलत केलीकीं, सर्व पटवर्धनांची जहागीर आपणास घ्यावी. हें वर्तमान ऐकून आपासाहेब पटवर्धन याणें कोल्हापूरचा घेरा उठवून आपल्याबरोबर धोंडोपंत गोखल्यास घेऊन आपण करनाटकांत गेला. या गोष्टीचा विस्तार लिहिल्याचे पूर्वी नानाफडनविसाच्या कांहीं एक दोन गोष्टी समजल्या पाहिजेत त्या लिहितों.

तो नाना सन अठराशेंच्या मार्चाचे तेरावे तारिखेस मृत्यु पावला, त्याबरोबरच मराठी लोकांचें राज्यकारणीं कौशल्य गेलें. तो नाना राजनीतींत परम दक्ष होता, त्याचें बाळपणापासून सर्ववय राजकारभारांत गेलें. तो आपल्या प्रजेची वहिवाट व मुलखाचा वसूल घेणें आदिकरून सर्व कामें माधवराव बल्लाळ पेशवा याचे रीतीप्रमाणें चालविणार होता, परंतु मोठमोठ्या कामांचे अडचणीमुळें त्यास अवसर सांपडला नाहीं; आणि तादृश मुलखाची पाहणीही होत नसे; त्या योगें चवकशीची मंदीफार पडली होती. याविषयीं एक गोष्ट आहे, ती अशी, पुण्यामध्यें त्यावेळेस घासीराम नामें कन्होजा ब्राह्मण हिंदुस्थानचा राहणारा कोतवाल होता, त्यास मोठी योग्यता प्राप्त झाली असतां तो अंतःकरणास भयकारक असें हत्याकर्म

करी; असें असतां कितीएक गृहस्थ अकस्मात् कांहीं कारणा वांचून नाहींसे झाल्यावर त्यांच्या घाताचा संशय त्या घाशिरा मा विषयीं उत्पन्न झाला. मग ती गोष्ट नानाफडनविसाच्या कानावर पडली असतां तोत्क्षणेकीं, अंसें दुष्कर्म करणाराया एथ्थीवर कोणी नसेल. त्यानंतर असें एके दिवशीं वर्तमान उठलेंकीं, घाशीराम कोतवाल कोणा एका गृहस्थास कोंडून ठेवून त्यास अन्नोदका वांचून उपाशीं मारितो आहे, तेव्हां मानाजी फांकडाया नें आपल्या बरोबर कांहीं शहरचे लोक घेऊन तेथें जाऊन तें बंद केलेलें दार फोडून तेथून उपोषणांनीं मृतप्राय झालेला एक ब्राह्मण होता तो मुक्त केला. त्या दिवसापासून त्या कोतवालाचें पापकर्म असें प्रसिद्धीस येत गेलेंकीं, शेवटीं त्यास शहरच्या लो कांहीं त्याच्या घरांतून त्याला बाहेर काढून दगडमार करून जिवें मारून टाकिलें.

नानाफडनवीस याची आकृति उंच आणि सडपातळ अ से आणि त्याचा वर्ण काळसर होता, व तो प्रकृतीनें सर्वदा रु ग्ण सारिखा दिसे, परंतु त्याचे नेत्र पाहिले असतां तो मोठा धूर्त सा भासे; आणखी तो आपल्यी कुळांत प्रामाणिकपणें व सद्- य अंतःकरणें करून वागे. तो राज्याची आशा ठेवी, परंतु आ- पल्या मंडळींत सर्वपदार्थी विषयीं थोडक्यानेंच तृप्त असे. तो दिवसामध्यें असा कार भार आटोपी कीं, ती गोष्ट कोणास ही सां गितली असतां आश्चर्य वाटेल. तो स्मरणाचा फार धड होता. तो नानामेला तेसमयीं त्याची एकस्त्री फार लहान होती, आणि त्यास संतती नव्हती.

तो नानाफडनवीस मरण पावल्यानंतर, पेशवा व शिंदा

यांमध्यें कलह उत्पन्न होण्याचें एककारण असेंजालें कीं, त्या दोघांसही नानाचें इच्यबद्दुत असेल तें आपणास असावें अ शी इच्छा उत्पन्न झाली. त्यावरून शिंदा याणें नानाकडे आपले कोटिरुपयें येणें आहेत असें निमित्त करून त्याची सर्व जहा गीर जप्त केली, आणि बाजिरावाच्या द्वेषास्तव त्या शिंद्यानें नानाफडनविसाचे स्त्रीस दत्तपुत्र घ्यावयास अनुमोदन दि लें.

२ असा शिंदा बाजिरावा विषयीं विपरीत वर्तन करूंला गला. त्याणें तेंच कृत्य विशेष नकरितां बाळोबा ताल्याच्या द्वारें लरवबा दादाचें बंड मोडिलें, तो त्या आपल्या कारभाऱ्याच्या नाशास प्रवृत्त झाला तो असा,त्याणें आपला सासरा सखाराम घाडगा याचे मसलतीनें त्या बाळोबास धरून आहंमदनगरच्या किल्ल्यांत कैद केलें. तो तेथें थोडक्याच दिवसांत आपल्या मृत्यूनेंच मरण पावला. त्या बरोबरच बंदीस घातलेले त्याचे दोघे भाऊ होते त्यांचें तसें प्रारब्ध नव्हतें कीं, त्यांहीं आपल्या मृत्यूनेंच मरावें. त्यांत एक धोंडीबा नामें होता तो तर तोफेच्या तोडीं देऊन उडविला; दुसरा नारायणराव बक्षी होता तो त्या दुष्ट घाड ग्याचे कल्पने प्रमाणें त्याच्या हातां पायांस बाण बांधून आगला वून उडविला. तेव्हां तो त्या बाणांच्या नेटानें इकडे तिकडे उलथा पालथा वांकडा तिकडा होऊन बहुत पीडा पावून मेला.

यानंतर बाजीराव पेशवा नानाफडनविसाचे पक्षपाती लोक यांच्या नाशा विषयीं आणि परशुराम भाऊ पटवर्धन याची जहागीर घ्यावया विषयीं उद्युक्त झाला. यासाठीं नानाफडन विसाचे स्त्रीस दत्तक घ्यावयाचें अनुमोदन देतों असें मिष करू

न त्याणें त्या मंडळीस तो विचार करावयाचे निमित्तें आपल्या वाड्यांत बोलाविलें, नंतर ते सारे एकेजागीं जमा झाल्यावर त्या सर्वांस असा दोष ठेविला कीं, तुम्ही नाना फडनविसास दत्तक देऊन तो मला प्रतिबंधकरणार यास्तव त्या तुम्हांस शिक्षा असावी; असा त्या मंडळीस दोष लावून ते सारे कैद करून कित्यावर टाकिले. त्या गोष्टीस शिंदाही अनुकूळ झाला; कां कीं, पेशवा पूर्वी शिंद्याच्या हितार्थ शेणव्यांच्या नाशास मदत झाला होता.

३ या प्रमाणेंच पटवर्धनाच्या नाशाविषयीं शिंदा पेशाव्यास अनुकूळ झाला. त्या शिंद्याचा कारभारी सरजेराव घाडगा, त्याणें कोल्हापूरच्या राजाकडे जाऊन तो राजा पटवर्धनाच्या नाशा विषयीं शिंद्यास अनुकूळ होय असें केलें. नेहां त्या शिंद्याचीं कितीएक पलटणें शिधोजीराव निंबाळकर निपाणीचा देसाई याचे स्वाधीन होऊन पटवर्धनाचा मुलूख घ्यावयास निघालीं; तीं पलटणें फारवेळ त्याजवळ नराहिलीं, परंतु त्या शिधोजीच्या स्वारांहीं मिरजे पासून विजापूर पर्यंत मुलूख उद्ध्वस्त केला. अशी दक्षिणेंत धामधूम झाली.

४ ते समयीं संपूर्ण दक्षिणेंत धामधूम झाली त्यांत धोंडीवाघ कोल्हापुरच्या राजाची चाकरी सोडून निघाला, तो इंग्लिशांहीं संपादिलेल्या मुलखांत जाऊन लुटालूट करून पेशव्याच्याही कर्नाटक मुलखीं कितीएक ठिकाणची खंडणी घेता झाला; त्यावरून इंग्लिशांहीं पेशव्याची आज्ञा घेऊन त्याच्या पारिपत्यास आपली फौज नेमिली. त्या पूर्वीच त्या धोंडीवाघानें कर्नाटकांत धोंडोपंत गोखल्या आपला शत्रु आला आहे असें सम

जून शपथ केली कीं, त्या धोंडोपंताच्या काळजाचें रक्त काढून त्यारक्तानें आपल्या मिशा रंगवीन. त्या वाघानें तो धोंडोपंतगोखला जेथें होता नेथून जवळच कोणे एके झाडी मध्यें लपून राहून त्याच्या प्राण हरणार्थ छापा घालावयाचा बेत करून त्या धोंडोपंताजवळ अगदीं थोडे लोक आहेत अशी संधी पाहून त्यावर अकस्मात् छापा घालून त्या धोंडोपंत गोखल्यास ठार मारिलें; आणि आपल्या शपथे प्रमाणें त्याच्या काळजाचें रक्त काढून आपल्या मिशांस लाविलें. त्या छाप्यामध्यें च धोंडोपंत गोखल्याजवळ त्याचे दोघे पुतणे होते, त्यामध्यें थोरला मारिला गेला, आणि धाकटा तो बापू गोखला, त्याच्याडाव्या डोळ्यास मोठी जखम लागली.

त्यानंतर इंग्लिशांहीं त्या धोंडीवाघाच्या पारिपत्यास फौज पाठविली ती त्यावर पडून त्याच्या लोकांचा अगदीं पराभव होऊन तो धोंडीवाघही मेला गेला. हे वर्तमान सन अठराशेंच्या सप्टेंबर महिन्याचे दहावे तारिखेस घडलें.

५. शिंदा पुण्यामध्यें राहिला असतां त्याच्या मुलूखीं माळवा व हिंदुस्थान यांच्या बंदोबस्तांत अव्यवस्था जाली होती; ती अशी, यशवंतराव होळकर नागपुराकून पळून धारेस जाऊन तेथें आनंदराव पंवार याच्या आश्रयास कांहीं दिवस राहिला; नंतर त्या आनंदरावानें शिंद्याच्या भयास्तव त्या होळकरास कांहीं द्रव्य व कितीएक घोडे देऊन त्याला तेथून पुढें मार्गस्थ केलें. तो होळकर तितक्याच द्रव्यसाधनानें आपल्याजवळ कांहींलोक जमा करून मग कोणीएक अमीरखान नामें पठाण मुलखांतस्वांच्या घालीत होता त्याला जाऊन मिळाला. आणि त्या यो

गें मोठी योग्यता पावून लोकांत असें प्रसिद्ध केलें कीं, आपण रवंडेराव होळकर याचा पुतण्या. नंतर जितके होळकर पक्षी चें मंडळ होतें तितकें बोलाविलें, तें कितीएक जमा झाल्यावर होळकराच्या कुळास शिंद्याच्या हातून सोडवावयाकरितां त्यासहित निघाला. नंतर शिंद्याचे मुलखीं नर्मदातीरीं जाऊन कितीएक शिंद्याचे गांव लुटूं लागला. तेव्हां काशीराव होळकराचें पलटण कोणी एक फ्रेंचजातीचा सरदार त्याचे स्वाधीन असे तो त्याणें त्यांवर पाठविला, त्याचा त्या यशवंतरावानें पराभव केला. मग तो फ्रेंच यशवंतरावाचा पक्षपाती होऊन आपले पलटणीलोक व तोफा घेऊन त्यास मिळाला. तेव्हां त्या यशवंतरावास हा रवंडेरावाचा ठेवणाईत असें लोक मानूं लागले; आणि तो मोठया राजा प्रमाणें वागूं लागला.

६ असें झाल्यावर शिंदा याणें लश्कर सुद्धां ताप्तीकाठ तिकडे जाऊन आपल्या मुलखाचा बंदोबस्त करावा, परंतु तेसमयीं त्याचे कारभारी मंडळींत वैमनस्यें पडलीं होतीं त्यामुळें तो प्रकार घडेना. कांकीं, त्याकारभारी मंडळीनें होळकरास कोणे एके वेळीं धमकीची गोष्ट सांगावी ककोणे एकेसमयीं प्रार्थनाही करावी असें होऊं लागलें. नंतर तेकारभारीलोक काशिरावाच्या नाशाविषयीं होळकरास मिळाले. त्या यशवंतरावानें काशिरावापासून आपणास भय नव्हावें यासाठीं शिंदा अनुकूळ करून घेतला, आणि त्याबद्दल शिंद्याच्या बायांस धरून केदकरावयाचा नेम केला. त्या पूर्वी होळकरानें त्या बायांशीं मैत्रीचें बोलणें लावून समजाविलें होतें की, मीतुमच्यापक्षपाती आहें, तथापि यासमयीं तो नेम सोडून होळकर त्या बायांच्या लश्करा

वर पडून त्या बायांना तेथून पिटून बऱ्हाणपुरीं लावून दिलें, आणि त्या शहरासभोंवता घेरा घातला. परंतु त्या बाया तेथून सुटून पळाल्या असतां त्या शिंद्यास वाटलें कीं, होळकराच्या कृत्रिमानेंच पळाल्या, त्यास आपण हिंदुस्थानीं जाऊन बंदो बस्त केल्यावांचून राज्य टिकणार नाहीं. असा त्या शिंद्यानें मनांत निश्चय करून पुणें मुकामीं पांच पलटणें व दहाहजार स्वार तयार केले, आणि त्यांस सरजेराव घाडगा याचे स्वाधीन करून पेशव्याचे चाकरीस ठेविलें; आणि आपण तेथून निघाला. ते समयीं त्याणें बाजीराव पेशव्या पासून सत्तेचाळीस लक्षांच्या झुंडया घेतल्या.

७ तो शिंदा हळूहळू तेथून निघून बऱ्हाणपुरीं जाऊन राहिला, तों पर्यंत होळकर माळव्या मध्यें स्वांच्या घालून तेथचीखंडणी घेत असे, आणि कुठेकुठे लुटीत ही असे. त्या शिंद्याचें सैन्य फार मोठें आणि तो केवळ समीप आला असें समजून त्या होळकरानें आपले सर्वलोक उज्जनीपाशीं मोठ्या त्वरेनें जमा केले, कांकीं, त्याचा मनसोबा असा होता कीं, शिंदा येऊन पोंहचला नाहीं तोंच उज्जनी लुटावी. हें वर्तमान त्या शिंद्यास कळलें तेव्हां त्याणें आपलीं चार पलटणें कोणीएक करणेल हेशिंगनामें आपला सरदार याचे स्वाधीन करून त्यास बऱ्हाणपुरा हून पुढें त्वरित पाठविलें. नंतर त्याचे मदतीस दुसरा एक सरदार व दोन पलटणांवर अधिक कांहीं पायदळ लोक पाठविले. तेव्हां होळकरानें उज्जनी जवळ पुढें आलेल्या लोकांशीं युद्धाचा आरंभ आपल्या थोडक्या शा लोकां निशीं केला, आणि त्यास न कळतां त्याचे पाठीमागें आपल्या लश्करांचा मोठा भाग नेऊन जे

लोक त्याच्या मदतीस मागून येत होते ते जिंकून ते लोक पुनः युद्धा स उभे नरहातील असें केलें. नंतर आपले लोक त्यांशीं लढून धैर्यवंत झालेले माघारे आणून त्या हेशिंगाच्या चार पलटणावर एकाएकीं हल्ला केला. ते समयीं तें युद्ध फार निकराचें झालें त्यांत त्या पलटणीलोकांतून एक वांटा राहिले व चार वांटे जखमी व मेले मिळून पंडुले. त्यांत त्याचे सरदार देहा साहेब लोक हो— ते त्यांतून सात मेले गेले व तीन साहेब त्या शत्रूच्या हातीं सांपड ले, आणि एकटा हेशिंग मात्र राहिला. असा त्या होळकराचा जय सन अठराशें एकाच्या जून महिन्यांत झाल्यावर त्याणें त्या उज्जनी ची मोठी खंडणी घेतली. नंतर त्या शिंद्याचा तोफखाना नर्मदा उतरून पलीकडे गेला होता त्याचे रक्षणार्थ शिंद्याचे कितीएक स्वार व चार पलटणें होतीं त्यांवर जाऊन तो तोफखाना पाडाव करून घ्यावयास होळकरानें मोठा उद्योग केला, परंतु त्याचा उपायचालेना. तेव्हां त्या शिंद्यास कांहीं धैर्य उत्पन्न होऊन तो आपलें लश्कर बव्हाण पुरा हून उठवून नर्मदापार जावयास फार प्रयत्न करूं लागला.

इकडे पुण्यामध्यें शिंदानि घून गेल्यावर बाजीराव जेको णी मोठमोठे थोरकुलीन लोक, जांहीं आपणा विषयीं किंवा आ पला बाप रघुनाथराव याविषयीं विपरीत आचरण केलें होतें, त्यांचा सूड उगवावयास उद्युक्त झाला. तेव्हां प्रथम त्याणें रास्त्यां च्या कुळांतील माधवराव रास्ता यास स्नेहानें भेटीस बोलावून तो आपल्या वाड्यांत आल्यावर त्यास धरून तो रायगडास पाठविला, या शिवाय जे कोणी त्याचे हातीं सांपडले ते अनेक प्रकारें नागवि ले. त्याणें इतकी रास्त्याची अमर्यादा अन्याया विषेणं केली त्यावरू

न तो बाजीराव लोकांचे मनांतून उतरला, यायोगें त्याचा कोणा सही विश्वास येईना, आणि मुलखांत जागोजाग बंडें उत्पन्न झालीं. त्या बंडाच्या एके टोळींत बाळकृष्ण गंगा धर मुख्य होता, आणि विठोजी होळकरही त्यास मिळाला असे. त्या टोळीचा पराभव गणपतराव पानशा याणें केला, तेव्हां तो विठोजी होळकर यशवंतराव होळकराचा भाऊ तो धरल्या गेला; त्यावेळेस बाजीराव पेशवा याणें त्यास जिवें मारून टाकावयाचा नेमकेला, कांकीं, तो बंडांत सांपडला, तस्मात् तो प्राणांत दंड करावयाचा अपराधी खरा, परंतु तेवेळेस मराठी लोकांत चाल होती कीं, जो अत्यंत क्रूरपणें हिंसाकर्मच करील त्यास मात्र प्राणांत दंड करावा, केवळ स्वांच्या घालून लूट करणारास तसा दंड नाहीं; असें असतां, आणि त्याचा बाप तुकोजी होळकर त्याएवढ्या थोरा चा नातु त्यास मारावें हेंही योग्य दिसत नव्हतें, परंतु बाजीरावाच्या मनांत आलें कीं, हा नानाच्या परम मित्राचा पुत्र म्हणून त्याणें त्यास जिवें मारविलें, तो प्रकार असा, आपण (बाजीराव पेशवा) व आपला मित्र (बाळोजी कुंजर) हे दोघे खिडकींत बसून आपल्या समोर अंगणामध्यें हत्ती आणून त्या विठोजी होळकराला हत्तीच्या पायांस बांधविलें, तेसमयीं त्याणें आपल्या प्राणरक्षणाविषयीं बाजीरावाची प्रार्थना केली, परंतु त्या बाजीसबास त्या विठोजीविषयीं किंमपि दया नयेतां तो स्वस्थ बसून पाहूं लागला. मग तो हत्ती तें सारें अंगणभर फिरला तितक्यानें त्याचा प्राण गेला नाहीं, तेव्हां तो हत्ती तेथून बाहेर नेवविला, नंतर त्या बाहेरच्या मैदानांत तो हत्ती फिरतांना त्या विठोजीचे प्राण निघून गेले.

८ दवलतराव शिंदा आपल्या लश्कराचें सामर्थ्य न्यून असें समजून पुण्यांत सर्जेराव घाडगा पूर्वी पेशव्याच्या चाकरीस ठेविलेला असतांही त्याला हिंदुस्थानांत आपल्याजवळ बोलाविलें. तो निकडे जाऊन त्या शिंद्याजवळ पोंहचल्याव र त्या दवलतरावानें त्याजबरोबर दहा हजार स्वार व चवदा पलटणें देऊन आपली राजधानीउज्जनी होळकरानेंलुटलीहोती. तोसूड उगवावयास इंदूरनामें जी त्या होळकराची राजधानी ती लुंटावंयास तो पाठविला. त्याचेळेस त्या होळकराबरोबर गोरे सरदारांवांचून कांहीं पलटणें व पंचवीस हजार स्वार व पलटणी लोकांखेरीज पांच हजार पायदळ इतकें सैन्य होतें, त्यासहित तो यशवंतराव त्या आपल्या इंदुराच्या संरक्षणास आला. नंतर कांहीं दिवस त्या दोहींलस्करांचें युद्ध हलकें हलकें होत होतें. मग त्या होळकरानें एकाएकीं त्या शिंद्याच्या लश्करावर हल्लाकरावयाची कांहीं एक चांगली कल्पना काढिली होती, परंतु त्यांतील कांहींबेत विसरकटून शेवटीं तो होळकर त्या युद्धांत पराभव पावला. तेसमयीं त्याच्या अठ्याण्णव तोफा सरजेराव घाड ग्याच्या हातीं लागल्या, आणि त्याची राजधानी इंदूर तेंही त्या घाडग्यानें अगदीं लुटून टाकिलें. तेसमयीं त्यादुष्टानें आपल्या क्रूरपणाची पराकाष्ठा केली.

त्याची पुणें सोडून गेल्याचे पूर्वीची त्याच्या धूर्तपणाविषयींकांहीं गोष्ट आहे ती अशी, त्या सर्जे राव घाडग्यानें बाजीराव पेशवा याचा मित्र बाळोजी कुंजर याचे घरीं इष्ट्या निमित्त धरणें बसवून नवरकडजे दरबारी लोक होते त्यांचा फार अनादर आरंभिला तेव्हां बाळोजी कुंजर याणें आपल्या मनांत विचार केलाकीं, तो

घाड़गा आपणाकडे आला असतां त्याचा मोठा संमान करून तो जें म्हणेल त्यास राजी झाल्या सारिखा आकार दाखवून मग त्यास युक्तीनें धरून बंदींत ठेवावें, अथवा जिवें मारून टाकावें. अशी योजना करून आपल्या लोकांस सांगून ठेविलेंकीं, तो सरजेराव घाडगा आणि मी एकांतीं बोलत बसलों असतां जेव्हां मी तेथून उठून बाहेर येईन तेव्हां तुम्ही त्यास युक्तीनें धरा अथवा मारून टाका. अशी तयारी करून ठेविल्यावर तो सरजेराव आपले घरीं आला असतां तो आणि आपण उभयतां खोलींत एकांतीं बोलत बसले, तेव्हां बोलतां बोलतां तो बाळो जी कुंजर तेथून उठून बोलिलाकीं, मी येक्याच्या डुंड्या आणावितों, इतकें म्हणून त्या खोलींतून बाहेर निघूंलागला, तेव्हांच तो सरजेराव मनांत समजलाकीं, ही कांहीं आपणास द्ग्याची खूण आहे, यावरून तो सरजेराव आपण एक हात त्या बाळीजी कुंजराच्या मानेवर टाकून दुसऱ्या हातांत तरवार घेऊन त्यास गचांड्या देत त्या खोलींतून बाहेर काढून तेथून तसाच दरवाज्या पर्यंत धक्के देत नेऊन मग दरवाज्या बाहेर रस्त्यांत जातांच तेथें आपल्या घोड्यावर पट्कर उडी मारून बसला, आणि तेथून त्वरेनें पळत पळत आपल्या लोकांत जाऊन मिळाला.

९ हिंदुस्थानांत होळकर पराभव पावल्या नंतर त्यास बंडावांचून दुसरा उपाय दिसेनासा झाला. असें असतांही त्याचें धूर्तपण व स्वाभाविक शौर्य पाहून शिपाई लोकांचें मन त्याकडे लागे, म्हणून त्या शिंद्याचे कितीएक शिपाई लोक त्याचा राव होळकरास मिळाले. असें झाल्यावर त्या होळकरानें मसलत केलीकीं, हा मुलूख सोडून पुण्याचे आसमंतात संचार

कराव्या. तेव्हां शिंद्यास निकडे गुंतवावयासाठीं आपलीं पलट णें महेश्वरास ठेऊन आपणउत्तरेचा मार्ग धरिला, कांकीं, त्या शिं द्यास ती आपली दक्षिणेस जाण्याची मसलत कळूंनये; याकरि तांच फत्तेशिंग मान्याबरोबर मात्र कांहीं स्वार देऊन पुण्याकडे पाठविला. तो मान्या गोदावरीच्या तीरीं येऊन कितीएक गांव लुटून त्या मुलखीं कितीएका ठिकाणचीं खंडणी घेऊं लागला. इतक्यांत तो होळकर स्वयें महेश्वरास येऊन तेथून आपलीं पलटणें बरोबर घेऊन शिंद्याचा मुलूख खानदेशांत जाऊन मोडया क्रोधानें तो मुलूख उद्ध्वस्त करूं लागला. इतकें होईतों पर्यंत त्याणें शाहाआमेदखान नामें कोणी त्याचा सरदार होता तो पुण्याच्या आसमंतात लुटालूट करावयास पुढें नेमिला. त्याच्या पारिपत्या करितां पेशव्याचा सरदार नरसिंह खंडेराव नामें विंचूरचा जहागीरदार तो पंधराशें स्वारांनिशीं त्यावर चालून गेला; त्याचा त्या शाहाआमेदखानानें असा पराभव केला-कीं, त्या विंचूरकरांच्या पंधराशें स्वारांतील थोडकेच वांचले असतील. हें वर्तमान बाजीराव पेशवा यास कळतांच तो फारभ्याला, आणि त्याणें इंग्लिशांच्या सरकाराशीं आपल्या कुमके विषयीं बोलणें लाविलें; परंतु तेवेळेस तो बाजीराव इंग्लिशांस आपल्या मुलुखांत फौजेसहित रहावयास अनुमोदन देईना, आणि इंग्लिश व निजामअली यांची मैत्री झाली होती त्यांतील ही कितीएक गोष्टी स्वीकारिना, झणून तो अर्थ शेवटास गेला नाहीं. नंतर पेशव्यानें होळकर गोदावरी उतरून आलीकडे न यावा झणून त्याशीं बहुत प्रकारें तहाचें बोलणें लाविलें, तेव्हां त्याणें उत्तर दिलेंकीं, माझा भाऊ लढाई मारिला तोंवर तुमच्याचें मला

देववत नाहीं, परंतु त्याचा पुत्र खंडेराव तो बंदींत घातला आहे तो सोडून द्यावा, आणि जितका आमच्या होळकर मंडळीचामु लूख आपणाकडे आहे तो सर्व सोडावा; इतकें झालें असतां आपण म्हणतां ही गोष्ट कदाचित् घडेल. त्या गोष्टीस बाजी राव याणें मान्य केल्या प्रमाणें दारवविलें, आणि होळकरास — निश्चित सांगून पाठविलें कीं, आम्ही तुमच्या खंडेरावास सो डावयाची आज्ञा दिली. असें असतां इकडे त्या खंडेरावाला आग्नीरगडावर पक्क्या बंदोबस्तांत ठेवावें असें सांगून पा ठविलें, आणि तेंचवेळेस दवलतराव शिंदा याकडून सदा शिवराव भास्कर नामें सरदार दहापलटणें व कांहीं स्वार घेऊ न येत होता त्यास निरोप पाठविला कीं, या समयीं आम्ही होळ कराशीं कांहीं तहाचें बोलणें करून तो स्थिर केला आहे, अशा संधीस तुम्ही त्वरा करून आपला अर्थ साधावा.

१० यानंतर बाजीरावयेशाच्या कडून पांडोजी कुंजर निघाला तो कांहीं लोकां सहित गारदौंडेस जाऊन होळकराकडचा फत्तेशिं गमान्या यावर हल्ला करिता झाला, त्यांत तो पांडोजी पराभव पाव ला. ते समयीं त्या मान्यानें मोठी त्वरा करून बारामतीस जाऊन तेथें येशाच्याच्या फौजेचा तळ होता त्यांत नानापुरंदरे व गणपत रावपानशे मुख्यत्वें असत, त्यांवर पडून त्याणें त्यांचाही पराभ व केला, व तेथचा तोफखानाही त्यामान्यानें घेतला. बाजीरा वानें पूर्वी आपले सरदार रास्ते यांचा अपमान केला यास्तव पट वर्धन व वरकडजे दक्षिणेंतील जहागीरदार यांहीं त्या पांडो जी कुंजराचे व फत्तेशिंगमान्याचे लढाईंत मन घातलें नाहीं; ज रते मनावर घेते तर एवढा अनर्थ न होता. तेंवेळेस सर्व पट -

वर्धनापैकीं एकटा चिंतामणराव मात्र बाजीरावाचा पक्षपाती होता, परंतु तोही थोडक्याच वेळांत श्रीमंताचा पक्ष सोडिला झाला.

होळकर लश्करसुद्धां ऐलीबेला खेंडे कडे चालिला अ सतां शिंद्याकडचा सदाशिवराव भास्कर लश्करासहित या होळकराची वाट सोडून जालनें व भीरयावाटेनें पुण्यास ये ऊन पेशव्याच्या लोकांत मिळाला. नंतर ते पेशव्याचे लोक व शिंद्याचे लोक मिळून ऐलीबेल्या पाशीं त्या होळकराच्या तों डावर गेले. तें वर्तमान समजून होळकर आहंमदनगरचे वाटेनें जेजोरीस जाऊन फत्तेसिंग मान्यास मिळून तेथून संन अठरा शें दोहोंच्या अकटोंबराचे तेविसावे तारिखेस राजवाडीचा घा ट उतरून पुण्याजवळ लोणी व हडप्सर या दोहों मध्यें उतर ला. तेवेळेस पेशवे व शिंदे यांचें लश्कर त्या ऐलीबेल्याहून निघून माघारें पुण्यास येऊन गारपिरावर राहिलें. असें अस तां उभयपक्षीं दोन दिवस तहाचें बोलणें झालें, त्यांत पेशवे बा जीराव ते होळकरास म्हणतकीं, तुला आमच्यराज धानीवर शत्रूसारिखें फौज घेऊन चालून येण्याचें प्रयोजन नाहीं, त्यास तूं एथून निघून जा; त्यावर त्या होळकरानें उत्तर केलें कीं, मी स्वामीच्या आज्ञेंत अंतर करावयाचा मनुष्य नव्हें, परंतु आम च्या धण्याची आज्ञा शिंदा मानीत नाहीं, त्याला स्वामींनी खं डेरावास सोडायाची आज्ञा दिली असतां त्याणें त्याचा बंदोबस्त पहिल्यापेक्षां अधिक केला; याशिवाय मीच माझे धणी पेशवे तुम्हीं हे आपण उभयतां एकमतेंच वागणार होतों, परंतु शिं दा मजबरोबर युद्धास सिद्ध झाला, यास्तव यासमयीं मी शिंद्याचें

पारिपत्य करून आपल्या स्वामीचा मान रक्षीन. याप्रमाणें त्या होळकरानें व बाजीरावाचें बोलणें दोन दिवस होऊन अकटोंबराचे पंचविसावे तारिखेस प्रातःकाळीं उभयपक्षीं लश्करें तयार झालीं. तेवेळेस त्या होळकराकडे चवदा पलटणें होतीं, त्यांत एक कार्नेल व दोन मेजर असे तिघे मुख्य साहेबलोक होते, व त्या पलटणां खेरीज पांच हजार पायदळ होतें व पंचवीस हजार स्वार होते. शिंद्याकडे पलटणें होतीं, परंतु त्यांचा बंदोबस्त होळकराच्या पलटणांपेक्षां कमी व त्यांची संख्याही कमी असे, वरकड स्वार व पायदळ त्या होळकराच्या बरोबरीनें होते. याप्रमाणें त्या दोहीं कडची सेना उभीरा हिली असतां एक प्रहर दिवसानंतर उभयपक्षीं तोफांचा मारचाल्ह झाला, तो सहा घटिकापर्यंत एक सारखा चालत होता. नंतर त्या होळकराच्या पठाणी स्वारांची ठोळी पेशव्याकडचा सरदार विंचूरकर याच्या स्वारांवर पडून यशा यावली, परंतु तेचवेळेस फत्तेसिंग मान्यानें पेशव्याचे डुब्बूर पागेवर हल्ला केला असतां त्यामान्याचा बहूत नाश होऊन त्या पाग्यांचा जय झाला. हें पाहून शिंद्याचे वरकड जे स्वार होते त्यांस विशेष अवसान येऊन त्यांहीं होळकराच्या स्वारांवर हल्ला केला, तेव्हां होळकराच्या स्वारांचा पराभव होईलसा दिसून आला. ते समयीं होळकर आपल्या सर्व सैन्या पाठी मागें होता. त्याणें तो सुमार पाहिला, आणि तात्काळ आपल्या घोड्यावर बसून मोठा शब्द करून बोलिला कीं, या समयीं जे कोणी माझे असतील त्यांहीं मजबरोबर यावें, यापुढें उपयोग नाहीं, असें सांगून जे तेथून पळणारे लोक होते त्यांस मोठें धैर्य देऊन निवडक स्वारां सहित स्वयें पुढें सरून त्या शिंद्याचे स्वार मागें हटविले. इतकें

होई तों पर्यंत ज्यांत इंग्लिश सरदार नाहींत अशीं शिंद्याचीं सहा पलटणें होतीं त्यांच्यानें त्याहोळकराच्या पलटणांसमोर उभें रहावेना, परंतु त्या शिवाय त्या शिंद्याचीं चार पलटणें दिबायन साहेबाच्या हातचीं तयार झालेलीं पुरातन होतीं त्यांत मुख्य सरदार चवघे साहेब असत, त्या पलटणांहीं मात्र आपली जागा न सोडितां परम शौर्य करून युद्ध केलें. शेवटीं त्या होळकरानें त्या शिंद्याच्या सर्व स्वारांचा पराभव करून त्यांतील तोफांचे सर्व गोलंदाज मारून मग त्या आपल्या संपूर्ण लश्करी समुदाया सुद्धां त्या चार पलटणांवर मोठ्या वेगानें किलीएक वेळां हल्ला केला. त्या योगेंकरून त्यांतील कोणी साहेब नउरतां त्या पलटणांचा बहुत नाश होऊन तें युद्ध समाप्त झालें. तेव्हां त्या शिंद्याच्या साऱ्या तोफा व बुणगें होळकराच्या हातीं लागलें. त्याचा असाजय झाल्यावर त्यायशवंतरावानें पुणें शहरचा नाश नकरावा म्हणून आपल्या सर्व लश्करास तेथून मागें फिरावयाची आज्ञा दिली. त्यांतील कोणासही तो शहरांत जाऊं देईना, तेव्हां त्यांतील कोणीलोक त्याहोळकराची आज्ञा नमानितां त्या शहरांत शिरूं लागले, त्यांवर त्याणें तोफांचा मार चालू करून त्यांस मागें फिरविलें. असें पेशव्याकडचे सरदार त्याहोळकराशीं युद्ध करीत असतां बाजीराव पेशवा निःसंशय आपला जय होईल असा समजून जिकडे युद्ध समारंभ होता तिकडे जावयास आपल्या वाडयांतून बाहेर निघाला, परंतु तोफांच्या आवाजास भिऊन शहरा बाहेर दक्षिणेच्या आंगीं दूर उभा राहून तेथूनच त्या युद्धाच्या परिणामाची वाट पहात राहिला; मग आपला पराभव झालासा समजून सात हजार लोकांसहित तेथून निघून सिंह

गडास गेला. नंतर त्याणें तेथून कर्णेल क्लोस नामें साहेब इंग्लिशांचा वकील तेसमयीं पुण्यांत होता, त्यास निरोप पाठविला कीं, इंग्लिशांहीं या समयीं आमचें साहाय्य केल्यास सहा पलटणां सहित त्यांहीं आमच्या मुलखीं रहावें.

पुण्याच्या लढाईंत यशवंतराव होळकर जय पावल्यावर त्याणें तेथें संगमावर कर्णेल क्लोस साहेब इंग्लिशांचा वकील रहात होता, त्यास दुसरे दिवशीं आपल्या भेटीस बोलाविलें. त्या युद्धांत होळकर व पेशवे याउभयपक्षींच्या लश्करचे स्वार त्या कर्णेल क्लोस साहेब याच्या बंगल्या जवळच लढले तथापि त्यास कांहींउपद्रव न लागला. मग दुसरे दिवशीं तो साहेब होळकराचे भेटीस गेला, तेव्हां त्याणें त्या होळकराचा जसा डोल पाहिला त्याप्रमाणें लिहिलें आहे तें असें, तो यशवंतराव होळकर विजयी झाला असून घोंटया इतक्या चिखलांत एक लहान शी राऊटी उभारलेली होती त्यांत त्या साहेबानें त्यास पाहिलें, त्या होळकराच्या अंगास एक भाल्याची जखम लागलेली होती, आणि त्याचे मस्तकीं एक तलवारेचा वार लागलेला असे. त्यास भेटावयाचे वेळेस तो होळकर त्या साहेबाशीं बहुत नम्रतेनें वागला, आणि त्याचें बोलणें केवढ मोकळ्या मनाचें होतें, त्यास त्या साहेबानें त्याच्या जखमांची गोष्ट काढिली असतां तें दुःख त्याच्या गणनेंतच नाहींसें दिसलें, आणि शिंदे व पेशवे यांशीं व त्या होळकराशींजें वैमनस्य होतें तें मिटावया विषयीं यशवंतराव इंग्लिशांची मध्यस्थी इछीत होता, आणि तेवेळेस त्या साहेबापाशीं तशा गोष्टीही निघाल्या.

११ होळकर प्रथम पेशव्याशीं बहुत नम्रतेनें वागे, वत्या

स पुण्यांत बोलावीत असतां तो बाजीराव ऐकेना. मग तो पेशवा तीन दिवस त्या सिंहगडीं राहून तेथून पुढें रायगडीं[+] गेला. तेथेंही कितीएक दिवस राहून मग पुढें महाडास जाऊन तेथून त्याणें मुंबई सरकारास पत्र पाठविलेंकीं, तुम्ही कांहीं गलबतें पाठवून मी व माझे बरोबरचे लोक यांस आपल्याकडे घेऊन जावें, असें लिहिलें असतां त्याचें उत्तर यावयाचे पूर्वीच सुईचा सरसुभेदार खंडेराव रास्ता नो महाडामध्यें बाजीरावास येऊन मिळाला. त्याच्या पाठीस लागलेले यशवंतराव होळकराचेलोक ते जवळ आले असें बाजीरावास कळतांच तो तेथून पळून सुवर्णदुर्गासि गेला; तेथेंही आपला टिकाव निघणार नाहीं असें समजून तें स्थळ टाकून रेवदंड्यास गेला, त्या ठिकाणीं इंग्लिशांचीं जहाजें येऊन त्या खंडेराव रास्ता सुद्धां बाजीरावास दिसेंबराचे सहाव्या तारिखेस वसईंत नेऊन पोंहचविलें. त्या पुढें त्या वसईमध्यें इंग्लिश व बाजीराव यांचा विशेष तह झाला, त्याचें मूळ तेंच. तो विस्तार लिहावयाचे पूर्वी बडोद्यामध्यें सन्सत्राशें त्र्याण्णवां पासून जींवर्तमानें झालीं तो प्रकार समजाला पाहिजे तो लिहितों.

१२ संनसत्राशें त्र्याण्णवांत गोविंदराव गाइकवाड यास बडोद्याचा अधिकार प्राप्त झाला असें पूर्वीं लिहिलें आहे, आणि आबाशेल्लूकर तो नाना फडनविसा सरोबर बंदींत पडला असें लिहिलें आहे. त्या आबाशेल्लूकरानें पुढें संनसत्रा-

---

+ रायगडीं माधवरावरास्ता बंदींत होता त्यास मुक्तकरून त्याची जहागीर त्यास माघारी देऊन आपल्याकडे नवेलोक ठेवावयाचे कामावर बाजीरावानें त्यास नेमिलें.

झें अडुसष्णावांत रवलतराव शिंद्यास दहा लक्ष रुपयांचे करार पत्र देऊन आपली मुक्तता करून घेतली, आणि तेथून अमदाबादेस जाऊन तेथचा कारभार चालविला; परंतु तो आबा नाना चा पक्षपाती यास्तव बाजीरावानें गोविंदराव गाइकवाड या सगुत्पणें अनेक प्रकारें शिकवून त्याशीं व आबाशेलूकराशीं वैमनस्य पाडिलें, त्या पासून लवकरच त्या दोघांचा युद्धप्रसंग होऊन तेउभयतां एकमेकाच्या नाशा विषयीं अनेक प्रकारें एकमेकास उपद्रव देऊं लागले. सांत प्रथम आबाशेलूकराचें प्राबल्यसें दिसलें मग दुसरे वर्षी (संनसत्राशें नव्याण्णावांत) सुरतेचा नवाब मृत्युपावला, ते समयीं त्याच्या भावास तो अधिकार द्यावयाचा तत्संबंधें कांहीं बंदोबस्ता विषयीं डंकनसाहेब नामें मुंबईचा गवरनर सुरतेस गेला. तेवेळेस गोविंदराव गाइकवाड याचे दोघे वकील त्यासाहेबाच्या बहुमानास्तव सामोरे गेले. तेव्हां तो समय आपल्याकार्यसाधनाच्या उपयोगीसा जाणून त्यासाहेबानें सुरतेंत चवथाई भाग गाइकवाडाचा होता तो व त्यालगत चवच्यांशीं नामें एकपरगणा आहे तो मागितला, तेव्हां ती गोष्ट गोविंदरावानें तात्काळ कबूल केली. त्यावरून असें दिसून आलें कीं, या समयीं इंग्लिशांस गाइकवाडानें इतका मुलूख उगाच दिला, परंतु असें नसमजलें कीं, त्याणें थोड्क्याच दिवसांनीं न्या आबाशेलूकराच्या नाशा विषयीं कुमक मागावयाच्या मसलतीनें दिला.

संन अडुसष्णांत तो गोविंदराव गाइकवाड मृत्युपावला, ते समयीं त्याचे औरस पुत्र चवघे व दासीपुत्र सात होते; याशिवाय कांहीं कन्याही होत्या. त्या चवघा पुत्रांत वडील आनंदराव

त्यास मुख्य मानकरी आपला धनी असें मानीत, परंतु त्या आनंद रावाच्या ज्ञानांत कांहीं कमीपणा होता म्हणून कितीएक त्या राज्यां तील मंडळ आपलें महत्व स्थापावयाविषयीं उद्युक्त झालें. त्या गोविंदरावाचा दुसरा पुत्र काझोजी तो कोंहीं बंड करील अशा अटकळीनें गोविंदरावानें त्यास बंदींत ठेविलें होतें. मग तो गो विंदराव मेल्यावर त्याका झोजीनें आनंदरावास बहूत नम्रते- च्या गोष्टी सांगून आणि लश्करीलोक यांस मध्यस्थ करून आ- पली बंदींतून सुटका केली. नंतर तो तेथचा मुख्य कार भारी झा ला, परंतु इतक्यानेंच त्यास तृप्ति नसे, यास्तव तो सर्वत्र अनेक प्रका रें राजा प्रमाणें सत्ता करूं लागला. असे चार महिने गेल्यावर कोणी एक रावजी आपा नामें गोविंदराव गाइकवाडाचा मुख्य कारभा री होता, तो प्रबळ होऊन त्याणें त्याका झोजीला पदच्युत केलें. तेव्हां तो काझोजी व तो रावजी आपा परभू आपणांस इंग्लिशांची कुमक मागत होते; त्यांत रावजी परभू इंग्लिशांस अशी आशा दाखवी कीं, गोविंदराव याणें तुम्हांशीं जो करार केला तो मी शेवटास नेईन; आणि काझोजी ही इंग्लिशांस तेंच सांगून त्या खेरीज चिखली परगणा देतों म्हणून कबूल करिता झाला. त्या रावजी परभूचा भाऊ बाबाजी परभू तो बडोद्यांनील संपूर्णसां रांचा सरदार असे, त्याचे मदतीस त्या बडोदेशाहरांत सात हजार आरब होते ते त्यास अनुकूळ असत.

त्याकाझोजी गाइकवाडाचें साहाय्य करणारा मल्हारराव गाइकवाड, जो कडीच्या जहागीरदाराचा पुत्र, तो शूर आणि मोठा दक्ष होता; त्याणें लश्कर जमा करून त्या आनंदरावाचे कितीएक किल्ले व जिनकीं ठाणीं होतीं तिनकीं घेतलीं. तेव्हांता

आनंदरावाचा मुख्य कारभारी रावजीयाणें विलंब न करितां मुंब
ईस सरकारास अर्जी केलीकीं, आत्मांस यासमयीं मल्हारराव-
च्या उपद्रवाचे नाशार्थ पांच पलटणें पाठविलीं पाहिजेत; आ-
म्ही त्यांची चाकरी येऊन रोज मुराद देत जाऊं. ते समयीं मुंबईसर
कारास ही गोष्ट उत्तम शी वाटली, आणि त्यांत आपलें हित आ
हे सें समजलें; परंतु कलकत्त्याचा मुख्य साहेब याची आज्ञा झा
ल्यावांचून त्या मुंबईच्या साहेबास त्या गाइकवाडाला ताहश
अनुकूळ होतां येईना, ह्मणून तें पत्र येतांच त्यांहीं सोळाशेंलो
क मात्र त्याचे कुमकेस पाठविले; त्यांत मेजर वाकर साहेब नामें
मुख्य केला होता, तो सन अठराशेंच्या फेब्रूआरीचे अखेरीस त्या
लोकांसहित गाइकवाडाच्या लश्करांत मिळून तो कडीवर चालि
ला नेट्कां तो मल्हारराव गाइकवाड याणें आत्मापासून चूक
झाली असें बोलून जी ठाणीं घेतलीं आहेत तीं माघारीं देतों अ
सें कबूल करून त्याशीं तह करावयाचा आकार घातला, परंतु
त्याची मसलत समय पाहून घातकरावयाची होती. त्या प्रमाणें
त्याणें कोणे एके समयीं त्यावर छापा घातला, तो इंग्लिशांच्या बं-
दोबस्तामुळें शेवटास न गेला; परंतु थोडक्याच दिवसांत असें
दिसून आलें कीं, त्याणें गाइकवाडाचे बहुतेक लोक वश केले.
असें असतां मेजर वाकर साहेब याचा कांहीं उपाय चालेना;
त्याणें कडीपाशींराहून आपलें संरक्षण मात्र केलें, आणि आप
ल्या पुष्टी करितां मुंबईसरकारास फौज मागून तिची मार्गप्रती
क्षा करीत राहिला. मग एप्रेलाचे तेविसाव्या तारिखेस मुंबईहू
न नवे लोक येऊन त्या कडी किल्ल्याच्या तटा खालीं उतरून आप-
ल्या समूर खंदक करून त्याच मातीचे जागोजाग तटा प्रमाणें ढीग

करून तेथें बळ धरून राहिले होते. नंतर गाइकवाडाचे व इंग्लिशांचे लोक त्यावर जाऊन जय पावले. त्या युद्धांत इंग्लिशांचे लोक मेले व जखमी मिळून एकशेंचे सष्ट पडले.

यानंतर मल्हारराव तें युद्ध टाकून इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. तेसमयीं तो कडीचा किल्ला गाइकवाडाचे स्वाधीन झाला. तेव्हां मल्हाररावास प्रतिवर्षी सवालक्ष रुपये निर्याद्याच्या वसुलापेकीं देऊंकरून तेथें त्याणें रहावेंसें केलें.

हें काम झाल्यावर कोणी गणपतराव नामें गाइकवाडाचा भाऊबंद होता तो बडोद्यापाशीं संकेगनामें किल्ला आहे तेथें मल्हाररावाच्या पक्षानें लढत असून तो किल्ला देईना, तेव्हां तें स्थान इंग्लिशांहीं बलात्कारें करून घेतलें. तेसमयीं त्या गणपतराव जवळ सुरारराव नामें आनंदरावाचा दासीपुत्र होता, ते दोघे तेथून निघून धारेस जाऊन तेथच्या पंवाराचा आश्रय पावले.

त्या पुढें अणीक एक मोठें काम राहिलें होतें तें थोड्याच वेळांत शेवटास गेलें, तें असें, बडोद्यामध्यें आरब लोक होते ते आपला रोजखुरा थकल्याचे निमित्तें आनंदराव गाइकवाड यास कैद करून त्या शहरांत सत्ता करूं लागले आणि कान्हो जीस बंदींतून सोडून देते झाले. ही अव्यवस्था दृष्टिगत नक्की वी त्यणून त्या लोकांस मेजर वाकर साहेब याणें चहूंस प्रकारें सांगितलें, परंतु त्यासांगण्याचा उपयोग नाहीं सा पाहून त्यासाहेबानें बडोद्या सभोंवता घेरा घातला. तेव्हां ते आरब आंतून दहा दिवस पर्यंत लढले. त्या लढाईंत किनीएक साहेब मारदार मेले गेले. नंतर तसेंच युद्ध चाललें असतां इंग्लिशांचा मोर्चा

लागू होऊन त्या किल्ल्याची भिंत ढांसळून मोठें खेंडार पडतांच ते आरबलोक युद्ध टाकून न हाचें बोलणें करूं लागले. तेव्हां गाइकवाडानें त्या आरबलोकांची वाजबी बाकी साडेसत्रालाख रुपये राहिली होती ती देऊन त्यांही आपल्याराज्याचे मर्यादेबा हेर जावें असें कबूल करवून त्यांस तेथून बाहेर घालविलें. ते बहुतेक आपल्या बोलीप्रमाणें निघून गेले; त्यांतीलएक आबूजमादार नामें होता तो मात्र त्याकरारा प्रमाणें न चालतां, आपले बहुतेक लोक बरोबर घेऊन राजपिंपळीस जाऊन काझोजीला मिळाला.

तो काझोजी कितीएक लोक जमाकरून जागोजागमुलूखलु टीत असें, आणि खंडणीही घेतअसे. तेव्हां (संनअठराशेंनिही मध्यें) मेजर होमस्‌ नामें साहेब एक टोळी घेऊन आला त्याची व त्याकाझोजीची लढाई होऊन इंग्लिश जय पावल्यावर त्यां हीं काझोजीच्या पाठीस लागून कापूरवंजेस त्याला गांठून त्या च्या सर्वलोकांची दाणादाण केली, तेव्हां तो काझोजी तेथून पळू न उज्जनीस जाऊन राहिला.

भाग एकतिसावा.

सन अठराशें दोहों पासून सन अठराशें आठपर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ बाजीराव वसईत आश्रय पावला, इतक्यांत पुण्यास
जें काय काय वर्तमान झालें तें प्रकरण असें. होळकरानें आ
पल्या लोकांपासून पुणें शहरास उपद्रव न लागावा म्हणून फार
बंदोबस्त ठेविला, तो केवळ तेथील लोकांच्याच हितासाठीं के
ला नव्हता, त्यांत अशी मसलत होतीकीं, आपला भलेपणा
दून बाजीराव आपल्या हातीं सांपडावा. नंतर ती मसलत सि
द्धीस जात नाहीं असें समजून त्याणें अमृतराव पेशवा जुन्न-
रास होता त्यास पुण्याचें राज्य चालवावयाकरितां बोलाविलें,
तेव्हां तो कितीएक दिवस मान्य होईना. शेवटीं सन अठराशें दो
होंच्या नवेंबराचे बारावे तारिखेस पुण्यांत येऊन आपला डेरा
भांबवडयास देऊन तेथेंच त्याणें राज्यकारभार मोरोबा फडनवी
स व बाबूराव फडके वगैरे नाना फडनविसाचे पक्षपाती होते
त्यांच्या साह्यानें करून चालविला.

२ नंतर होळकर याणें त्या अमृतरावास गादीवर बसू
न राज्य करावयाची मसलत दिली असतां तो ऐकेना, म्हणून
त्याच्या पुत्रास तो गादीवर बसविणार होता, तेंही त्याणें न ऐकि
लें. परंतु त्यास जेव्हां समजलें कीं, बाजीराव पेशवा याणें इं-
ग्लिशांचा आश्रय धरिला तेणें करूनच तो पेशवेपणास मुक
ला, तेव्हां त्या अमृतरावानें होळकराचें बोलणें मान्य केलें. नं
तर त्या अमृतरावाचा पुत्र विनायकराव यास पेशवे पदवीचीं

वस्त्रें प्राप्त झालीं. तीं वस्त्रें सातारचा राजा त्यास प्रथम देत नव्हता, मग त्या राजाचा भाऊ चतुरसिंग राजा तो त्या होळकराचा पक्षपाती झाला असे, त्याच्या सांगण्यावरून राजानें विनायकरावास तें पद दिलें. याप्रमाणें त्या होळकराची मसलत सिद्धीस गेल्यानंतर त्याणें आपल्या दुष्ट स्वभावासारिखें कृत्य आरंभिलें. त्यांत प्रथमतः दोघे बाजीरावाचे कारभारी चिंतोपंत देशमुख व वैजनाथ भटमामा भागवत यांस हानावयाची घेतलें, तेव्हां त्यांहीं त्यास लश्करीखर्चा साठीं शहरच्या लोकांस पुढें होळकराचा उपद्रव न लागावा म्हणून त्या सर्वांकडून खंडणी सारिखें द्रव्य देवविलें. नंतर ते असें उत्तम कार्य करणारे जे पुरुष त्यांसच कैद करून आपल्या जवळचे अत्यंत क्रूर हरीपंतभावे व हरिनाथ या नामें दोघे ब्राह्मण होते त्यांचे स्वाधीन त्या दोघांजणास करून सांगितलें कीं, तुह्मांस कळेल तसें यांस छळून द्रव्य घ्यावें. तेव्हां त्यांहीं त्या दोघांस व त्या शिवाय दुसरेही कितीएक त्या शहरचे थोर कुलीन लोक होते त्यांस अनिर्वाच्य दुःख देऊन त्यांचें सर्वस्व हरण केलें.

बाजीराव पेशवा ज्यादिवशीं वसईत पोंहचला तेच दिवशीं कर्णेल क्लोस साहेब नेथें अगोदरच पुण्याहून जाऊन राहिला होता, त्याची व बाजीरावाची दिसेंबराचे सहाव्या तारिखेस भेट झाली. तेव्हां त्या कर्णेल क्लोस साहेबानें बाजीरावास पूर्वीचि तहावा प्रकार लिहून पाठविला होता ती गोष्ट तो साहेब बोलतांच बाजीराव त्यास मान्य झाला. नंतर आणखी कांहीं त्या उभयतांचें बोलणें होऊन एकविसावे तारिखेस तो तह करला, तो असाकीं, पेशवे व इंग्लिश यांहीं परस्परें एकमेकां

च्या बजे आपले सहाय असतील त्यांच्या संरक्षणाकरितां बा हेरचा शत्रु जिंकावा. त्याकामास इंग्लिशांचे सहाहजार पलटणीलोक व त्या बेताप्रमाणें गोरे गोलंदाजांसहित तोफखाना आपल्या राज्यांत पेशाव्यांहीं राहूं द्यावा; त्यांतील दोन हजार लोक नेहेमीं पेशाव्याजवळ असावे. यारखेरीज पेशाव्याकडचे दहाहजार स्वार व सहाहजार पायदळलोक याप्रमाणें कुठेही युद्धप्रसंग पडल्यास हजर असावे; आणि विलायतेंतज्या कोणे मुलखवीं इंग्लिशांचे द्वेष्टे राहातात त्या मुलुखचा कोणी पेशाव्यानें आपल्या चाकरीस ठेवूं नये. या शिवाय इंग्लिशांच्या लश्करी खर्चास बाजीरावानें विसांलक्षांचा मुलूख द्यावा, आणि पेशवे पूर्वी सुरतेंत आपला कांहीं हक्क घेत होते तो न मागावा; आणि निजाम व गाइकवाड यांपासून पेशवे बाकी ऐवज घेणार होते तो इंग्लिशांच्या हारें द्यावा. याप्रमाणें बाजिरावानें मान्य करून दुसरें ही कबूल केलें कीं, पूर्वी निजामाशीं महाडचा तह ठरला होता त्यास आम्ही मान्य आहों; आणखवीं नुकताच आनंदराव गाइकवाडानें इंग्लिशांशीं तह केला आहे त्यासही कबूल आहों; यारखेरीज दुसऱ्या कोणाशीं तह करणेंतर तोही इंग्लिशांचे मसलतीवांचून करणार नाहीं:

४ याप्रमाणें वसईत बाजीराव मोठया अडचणीमुळें इंग्लिशांहीं म्हटल्याप्रमाणें तह करून पुरतेपणें इंग्लिशांस मिळाला असें झालें; परंतु तो एका बुद्धीचा मनुष्य नव्हे, त्याचा स्वभाव असा होता कीं, कोणाहीं निष्कपटपणें स्नेह न करितां दुसऱ्यास फसवावें. यास्तव नुकताच तो तह ठरून तें कशारपन

होऊन त्यावर मोर्तब होत आहे तोंच त्याच्या मनांत आलें कीं, शिंदा व रघुजी भोंसला यांस होळकराच्या पारिपत्याचे मिषें करून पुण्यास बोलावून आणून मग त्यांकडून इंग्लिशांस घालवून द्यावें. त्यांतच दुसरें त्याच्या मनांत आलें कीं, तें युद्ध होऊन कदाचित् इंग्लिशजय पावले तर आपणयांशीं स्नेहकेला आहे हाच दृष्टिगत करूं. असें मनांत आणून त्याणें शिंद्याकडे बाळोजी कुंजर आणि रघूजी भोंसला याकडे नाराय णराव वैद्य पाठविला. तो प्रकार दिसण्यांत असा केला होता कीं, इंग्लिशांशीं वआपल्याशींनहे झाल्यासेंवर्तमान कळवावया करितां हे दोघे वकील त्याउभयतांकडे पाठविले; परंतु आंतून सूचनार्थ असा कीं, मी ब्रह्मुत अडचणीमुळें इंग्लिशांशीं तहकेला या गोष्टीचा राग मनांत न धरितां लवकर माझ्या कार्यास यावें. हें वर्तमान त्याउभयतांस कळतांच ते दोघे एक मत होऊन त्यांचे विचारें ठरलें कीं, हा तह आम्हा सर्व मराठ्यां स बाधक होईल, त्यास तो सिद्धीस जाऊं देऊं नये.

५ नंतर कलकत्त्याचा गवरनर जनरल साहेब याणेंबा जिरावानें केलेला तह शिंदे व रघूजी भोसले यांच्या मनास कदाचित् येणार नाहीं असें समजून आपले वकील त्यांकडे पाठविले कीं, बाजीराव पेशवा यांचा व आमचा परस्परें एकमेकांचीं राज्यें संभाळावया करितां तह झाला आहे, तसेंच तुमचें व आमचें ऐक्य एकमेकाच्या राज्यरक्षणार्थ मात्र असावें. त्या वेळेस शिंदा मोठी फौज घेऊन बऱ्हाणपुरीं होता, त्याणें तें इंग्लिशांच्या वकिलाचें बोलणें ऐकून उत्तर केलें कीं. या समयीं ही गोष्ट माझ्या मनास येत नाहीं, तथापि मजकडून इंग्लि-

शांशीं किमपि द्वेष नाहीं, असें निश्चित समजावें. या प्रमाणें त्याचें बोलणें होऊन पुढें समजण्यांत आलेंकीं, त्याणें व रघूजी भोंसल्यानें इंग्लिशांशीं युद्धा विषयीं मोठी तयारी आरंभिली; आणि दुसरें ही विदित झालेंकीं, या समयीं बाजीराव व शिंदा व रघूजी भोंसला यांचें त्या विषयीं अन्योन्य पत्र द्वारें ऐक्य झालें आहे. त्या पुढें इंग्लिशांहीं बाजीराव पेशवा याज बरोबर ज्या मध्यें बाराशें गोरे लोक होते असें दोन हजार तीनशें सैन्य देऊन त्यास पुण्यास आणवून सन अठराशें तिहींच्या मे महिन्याचे तेरावे तारिखेस मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें. त्यापूर्वी कलकत्त्याच्या गवरनर जनरालानें आपली फौज हैदराबाद देस होती ती आणि मद्रासेची आणून निजामाची व दक्षिणेंतीजहागीरदार यांज कडची सेना घेऊन होळकरास दक्षिणेंतून घालवून राज्याचा बंदोबस्त केला होता; तसा अगोधरच अमृतराव ही पुणें सोडून गेला असे. तेव्हां त्याणें जातांना प्रथम संगमनेर गांव लुटून तेथून ती वाट सोडून वांकडा नाशिकास जाऊन तेथेंही पुण्या प्रमाणेंच लोकांस बहूत दुःख देऊन तें सेच लुटलें, तसेच वाटेनें सर्व गांव लुटीत गेला. त्यानंतर त्याणें लिहावया जोगें कृत्य केलें नाहीं. आणखी त्याशीं व बाजीरावाशीं ऐक्य होईना म्हणून तो कितीएक स्वारांसहित कांहीं वर्षें इंग्लिशांच्या चाकरीस जाऊन राहिला, त्यानंतर इंग्लिशांहीं प्रतिवर्षी त्यास आठलक्ष रुपये देऊन काशींत ठेविलें. त्याचा पुत्र विनायकराव तो अद्यापि तेथें आहे.

६ रघूजी भोंसले व शिंदे यांहीं इंग्लिशांस दक्षिणेंतून

घालवावयाच्या मसलतींत होळकरास घ्यावें या विषयीं त्याशीं फार बोलणें लाविलें, तेव्हां त्याणें प्रथम मीतुल्यास अनुकूळ होत नाहीं असें त्यांस न भासवितां त्यांकडे आपला माळवा मुलूख पुरातन जहागीर जप्त होता तो सोडवून घेतला, आणि बाजीराव पेशवा याच्या कैदेंत खंडेराव होळकर नामें आपला पुतण्या असे तोही मुक्त करून घेतला. मग आपणास अवश्य हिंदुस्थानांत जावयाचें कांहीं काम आहे असें निमित्त करून त्यांस न मिळतां माळव्यास जाऊन राहिला.

यानंतर इंग्लिशांचा मुख्य गवरनरजनराल साहेब यास शिंदे व भोंसले हे दोघे मोठमोठीं सैन्यें घेऊन निजामाच्या मुलखाचे मर्यादे समीप एकमेकाचे जवळजवळ राहिले असें विदित झालें, तेव्हां त्याणें त्याउभयतांस विचारिलें कीं, तुमच्या मनांत काय असेल तें स्पष्ट सांगा. त्यावेळेस च त्यासाहेबानें आपली फौज आहमदनगराचीं आणून ठेविली होती. तेव्हां त्यांणीं काल हरणार्थ माच तुल्यांशीं आमचें कांहीं वांकडें नाहीं असें बहुत वेळ उत्तर दिलें असतां शेवटीं त्यासाहेबाचे फौजेचा मुख्य जनराल वेलसली नामें साहेब होता त्याणें त्याउभयतांस सांगितलें कीं, जर तुम्ही म्हणतां हें सत्य आहे तर तुम्ही दोघे आपआपली फौज घेऊन एथूनजा. आम्हीही आपली फौज माघारी नेऊं. असें बोलतां बोलतां कितीएक दिवस गेल्यावर त्या दोघांहीं इंग्लिशाच्या वकीलास विपरीत उत्तर केलें, तेव्हां तो वकील त्यांपासून निघून गेला, तीच उभयपक्षीं युद्धाची तयारी करावयास खूण झाली. असें सन अठराशें तिहींच्या आगष्टचे तिसऱ्या तारिखेस घडलें.

७ तेसमयीं त्या युद्धाविषयीं इंग्लिशांजवळ सुमारें पन्नास हजार फोजेची तयारी झाली होती, त्यांतील साडेसहा हजार लोक हिंदुस्थानांत नेमिले, त्यांचा मुख्य जनराल लेकसाहेब केला, बाकी फोज गुजराथेंत व दक्षिणेंत होती. त्यासर्वांचा एक मुख्य जनराल वेल्सली साहेब होता, त्याणें सुमारें साडेसात हजार लोक गुजराथेंत ठेवून किती एक पुण्याच्या रक्षणास व हैदराबादच्या बंदोबस्तास नेमून एक भाग कृष्णा व तुंगभद्रा नदी या दोहींच्या मध्यभागीं ठेवून सुमारें सत्रा हजार फौज आपल्या बरोबर सर्वत्र फिरण्याकरितां घेतली.

दवलतराव शिंदा व रघूजी भोंसला या उभयतांची मिळून एक लक्ष सुमारें सेना होती. त्यांत शिंद्याचे गोरे सरदारांसहित पलटणीलोक नीस हजारांवर असत, आणि स्वार सुमारें पन्नास हजार होते, बाकी कितीएक तोडग्याचे बंदुकवाले व कितीएक बाणदार, आणि गोरे सरदारांविरहित अर्धवट कवाईत शिकविलेले रघूजी भोंसल्याचे पलटणीलोक असत. त्या दोहींलष्करांचा तोफखाना मिळून दोनशें तोफा होत्या, त्यांत शिंद्याचे गोलंदाज फारचतुर होते. त्या शिंद्याच्या पलटणांतील सत्रा हजार सुमारें पायदळ व आठ हजार सुमारें स्वार हिंदुस्थानांत शिंद्याचा मुलूख रक्षित असत.

या शिवाय इंग्लिशांस प्रतिकूळ असा आपणास पेशव्यांचा पक्षपाती म्हणविणारा कोणीएक समशेरबहादर नामें बारा हजार लष्करा सहित बुंदेल खंडांत होता.

इंग्लिशांचा मुख्य सरदार वेलसली साहेब तो समजला कीं, या समयीं युद्धाशिवाय दुसरा उपाय नाहीं, तेव्हां त्याणें

आहमदनगर घ्यावयास कांहीं लश्कर पाठविलें. त्या आहमद नगरच्या किल्ल्याची बांधणी चिरेबंदी आणि त्यास भोंवता मोठा खंदक आहे, त्यावरून पूर्वी चांदबिबी नामें बादशाहाची स्त्री होती तिच्या वहिवाटीपासून तें स्थळ मोठें अजिंक असेंलोक मानीत होते. त्या किल्ल्यापासून पेंठ निराळी आहे, तिच्या सभों वता मातीचा तट आहे. त्या पेठेंत तेवेळेस आरबलोक यांचा एकसमुदाय व शिद्यांचें एकपलटण होतें, आणि किल्ल्यांत सुमारें पंधराशांवर शिपाईलोक असत. याशिवाय तो किल्ला व ती पेंठ यांच्या मध्य भागीं एक खांरांचाजमाव होता. असें अस तां इंग्लिशाचे लोक त्या पेंठे जवळजाऊन त्यांहीं विलंब नकरि-ता तत्काळ शिडयाळाऊन त्या भिंतींवर चढून आंत उतरून ती पेंठ हस्तगत केली. नंतर मोठे मोठे मोर्चे लावून किल्ल्याच्यातटा स खेंडार पाडिलें, तें पाहातांच तेथचा किल्लेदार भयभीत हो-ऊन आपल्यालोकांसुद्धां निघून जावयास मार्गमात्र मागून किल्ला त्यांस देता झाला.

८ त्यानंतर जनराल वेलसलीसाहेब आपल्या ल श्करचे लोक त्याकिल्ल्यांत ठेऊन आपल्या बरोबरचेलोक आठ हजार सुमारें मुलखांत फिरावयाच्या बेतानें दुसऱ्या कोणा सरदाराच्या स्वाधीन करून बाकी लोकांसहित आप ण आगष्ट महिन्याचे एकोणतिसावे तारिखेस औरंगाबादे स गेला. इतक्यांत मराठ्यांचें लश्कर अंजिंठ्याच्या घाटानें जाऊन जालन्यास उतरलें; भगलेथून उठून अग्नायी दिशे स चालिलें, त्यावरून तें हैदराबादेस जाईल अशी बदंता उठली, यास्तव वेलसली साहेब औरंगाबाद सोडून गोदा-

बरीकडे चालिला. तें वर्तमान ऐकून मराठे तीवाट सोडून तेथून उत्तरेस निघाले. त्या लश्करांत युद्धाविषयीं बंदोबस्त ठीक नव्हता, कांकीं, दवलतराव शिंदे व रघूजी भोंसले हे दोघेही युद्धाविषयीं निपुण नसून दोघांचें वाग्णें एकमताचें नव्हतें.

यानंतर जनराल वेल्सली साहेब याणें मुलखांत संचार करावयाकरितां जो आपल्या लश्कराचा भाग वेगळा केला होता तो व त्याबरोबरचें लश्कर सप्तेंबराचे एकविसावे तारिखेस एकत्र मिळालें. ते समयीं वर्तमान आलें कीं, मराठ्यांचें लश्कर जाफराबादेपाशीं बोरवरद्दनामें गांव आहे तेथें येऊन उतरलें, त्यावरून त्या साहेबाच्या विचारास आलें कीं, पुनः दोहोंचा भाग निरनिराळे करून वेगळ्या वेगळ्या वाटांनीं जाऊन एकाएकीं त्यावर हल्ला करावा. मग तेविसावे तारिखेस तो साहेब तेथून उठला. नंतर दुसरे दिवशीं मुकाम करते वेळेस त्या साहेबास कळलें कीं, आपणापासून जवळ तीनकोसांवर शत्रूचें लश्कर आहे, तेव्हां त्याणें आपल्या लश्करचें बुणगें तेथेंच ठेविलें, आणि त्याच्या रक्षणास एक पलटण ठेवून बाकीचे लोक बरोबर घेऊन आपल्या लश्कराच्या दुसऱ्या भागाची वाट न पाहतां त्वरेनें आपण शत्रूवर चालिला. तो कांहींसा तिकडे गेला असतां शत्रूचें लश्कर सुमारें पन्नास हजार शंभर तोफांसहित खेळणा नदीच्या पलीकडच्या कांठीं जुवा नदीचे संगमाजवळ उतरलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. तेथें त्या लश्कराचे डावे बाजूस आसाय नामें एक भुइकोटाचा गांव पाहिला. ते समयीं त्या साहेबाजवळ सुमारें साडेचार हजार सैन्य होतें, आणि त्याबरोबर पेशवे व म्हैसूरचा राजा यांकडचे कांहीं स्वारही होते

परंतु इंग्लिशास त्यांचा विश्वास येईना म्हणून त्यांपासून युद्धाचा उपयोग विशेष होऊं दिला नाहीं; आणि आपली रोखीतर शत्रूच्या सैन्यापेक्षां फारलहान म्हणून व शत्रूचा तोफखाना प्रथम हालीं लागल्यास मोठा उपयोग होईल असें जाणून त्याच्या तोंडावर समूर नजातां डावे बाजूस जेथें त्याचा तोफखाना होता त्याचर त्यांणीं चालकेली, तेव्हां मराठ्यांहीं आपला तोफखाना सुरूकरून प्रथम इंग्लिशाच्या पायदळाचा नाश बहुत केला. शेवटीं इंग्लिशाचे गोरे स्वार वेगेंकरून त्यांवर चालून गेले नेवेळेस मराठ्यांचे स्वार व पायदळ यांस त्यांपुढें उभें राहवेना, आणि इतक्यांत त्या गोरे लोकांचे कुमकेस मद्रासचे पलटणी स्वार येऊन पोंहचले, तेव्हां तें मराठ्यांचें पायदळ मागें हटलें. त्यांस जाग्याच्या संकोच्या मुळें नेलोक एकीमागें एक अशा दोन ओळी धरून उभे होते, त्यांतील पुढची ओळ इंग्लिशांच्या नेटानें मागचे ओळीस मिळून त्यांचा बंदोबस्त विसकटलासा पाहून इंग्लिश त्यांवर जाऊन पडले, तेव्हां मराठ्यांच्या लोकांस इंग्लिशांहीं जूवान दींत घालविलें. त्यांतूनजे ती नदीउतरून पळूं लागले, त्यांतल्या कितीएक लोकांस इंग्लिशांच्या स्वारांहीं मारिलें.

रघूजी भोंसलातर त्या युद्धाच्या आरंभींच पळाला, आणि शिंदाही थोडक्याशा वेळानें तरोंच करिता झाला. त्या युद्धांत सर्व मराठी सैन्यापैकीं शिंद्याचीं कितीएक पलटणें व त्यांचेंगोलंदाज यांणीं मात्र उत्तमप्रकारें युद्धकेलें. तेव्हां मराठ्यांचेलोक बहुतेक जरवमी झाले, आणि बाराशें ठार पडले; त्यांत शिंद्याचा प्रधान यादवराव भास्करनामें होता तोही मेला गेला. असा मराठ्यांचा मोड होऊन त्यांच्या अव्याणव तोफा इंग्लिशाच्या

हातीं लागल्या. या प्रमाणें आसाथी जवळच्या युद्धांत इंग्लिशां-हीं विजयी होऊन मोठा मान संपादिला. ते समयीं इंग्लिशाच्या समुदायांतील लोक मेले व जखमी झाले मिळून तिसऱ्याचांट्यावर सुमारें पडले. त्या युद्धांत एक विशेष झाला तो असा, मराठ्यांहीं आपल्या जवळ इंग्लीश येऊन भिडले असें पाहतांच भूमीवर वेडींवांकडीं आंगें टाकूंन अगदीं मृतप्राय पडून त्यांस आपल्या आंगावरून पुढें जाऊं दिलें, आणि एकाएकीं उठून त्यांच्या मागून तोफांचा मार केला.

९ स्याहेबानें आपल्या लश्कराचा भाग वेगळा केला होता त्यास वाटेनें कांहीं अडचण पडल्यामुळें तो दुसरे दिवशीं संध्याकाळपर्यंत येऊन पोंहचला नाहीं, मग तो येऊनमिळाल्यावर वेलसली साहेबानें नर्मदेकडे शिंद्याचे पाठीस लाविला. तेव्हां शिंद्याची पलटणें त्याशीं लढावयास उभीरा हीनात, यास्तव त्यांमागून नर्मदापारजाऊन त्यालोकांच्या सरदारानें त्यांची पाठ सोडून शिंद्याचें ब्रह्मणपुर व आशीरगडनामें किल्ला घेतला.

असें दक्षिणेंत वर्तमान असतां आगष्ट माहिन्याचे एकुणतिसावे तारिखेस इंग्लिशांहीं गुजराथेंतील भडोंच घेतली. नंतर पवनगडनामें किल्ला आहे तेथें जाऊन तोही हल्ला करून घेतला.

१० हिंदुस्थानांत शिंद्याचा असीगर नामें मोठा बळकट किल्ला आहे तोही जनरल लेक साहेबानें मोठें युद्ध करून हस्तगत केला; या युद्धांत इंग्लिशांचे लोक मेले व जखमी झाले मिळून पावणे तीनशें सुमारें पडले, आणि मराठ्यां

देलोक खंदकांत पडून बुड़ाले व मेले वजरवमी मिळून दोन हजार सुमारें पडले. मग लेकसाहेबानें तो किल्ला सोडून दिल्ली पासून नीनकोसांच्या अंतरानें मुकाम केला तेथें नुकते डेरे उभे करतात तोंच शत्रु समूर दृष्टीस पडला. त्याचा शोध करितां असा ठिकाण लागलाकीं, शिंद्याकडचा कोणी पुरातन फ्रेंच सरदार सुमारें नऊ हजार पलटणीलोक व सुमारें पांच हजार स्वार व सत्तर तोफा इतकासरंजाम जमवून घेऊन त्यालेकसाहेबास जिंकावया करितां आला, तेव्हां त्यासाहेबानें तेथें आपल्या बुणग्याच्या रक्षणा पुरते लोक ठेवून बाकी उरलेले साडेचार हजार सुमारें होते तितक्यांसहित शत्रूशीं युद्ध करून जय मिळविला. त्यांत मराठ्यांचे सुमारें तीन हजार लोक पडले, आणि इंग्लिशांचे सहाशें पडले. तेव्हां दिल्लीवाहर इंग्लिशांस सहज प्राप्त होऊन तेथचा बादशाहही त्यांच्या हाती लागला.

११ यानंतर लेकसाहेब आग्रा किल्ला यावर चालून गेला, त्या किल्ल्यास भोंवतीं शिंद्याचीं कितीएक पलटणें होतीं, त्यांस तेथच्या किल्लेकऱ्यास त्यांचा विश्वास येईना यास्तव त्याणें आंत घेतलें नाहीं, मग इंग्लिशांहीं त्यांस जिंकतांच त्याकिल्लेदारानें इंग्लिशांस तो किल्ला दिला.

पुनः इंग्लिशांची व शिंद्याचीं पलटणें यांची लढाई लासवाशी गांवाजवळ झाली तोप्रकार असा, इंग्लीश शत्रूच्या पाठीस लागून रात्रीत बारातेरा कोसांची मजल करून गेले तों सूर्योदय समयीं शत्रूचीसेना त्यांच्या दृष्टीस पडली, तेव्हां त्यांस वाटलेंकीं, शत्रूवाटेनें चालतो आहे, म्हणून जे स्वार तेथें पोंहचले होते ते

पाठीं मागच्या लोकांची वाट न पाहतां त्वरा करून त्यावर जाऊं लागले, ते केवळ त्यांच्या समीप गेले, नेझां त्या इंग्लिशांस असें समजलेंकीं, ते शत्रूचेलोक मुद्दाम स्थान धरून राहिले आहेत; आणि असें दृष्टीस पडलेंकीं; पुढें एक तोफांची ओळ उभी केली आहे व त्या तोफा मांरवठीनें गुंतविलेल्या आहेत; नेझांने स्वार तो तोफखाना घ्यावयास उद्युक्त झाले, परंतु त्या तोफांच्या मारापुढें त्यांचा उपाय चालेना, यास्तव त्यांस आपल्या मागल्या स्वारांची व पायदळाची वाट पहावी लागली; ते येऊन पोंहचल्यावर इंग्लिशांहीं त्या तोफा घेऊन मराठ्यांचा पराभव केला. त्या युद्धांत शिंद्याकडे बऊनेक फ्रेंचजातीचे सरदार असून ते, आणि कितीएक दिबायनानें शिकविलेले पुरात न पलटणीलोक होते ते फार झटून लढले, व मागें नसरतां जे थें उभे होते तेथेंच पडले, नंतर थोडके राहिले नेझां त्यांणीं युद्ध टाकिलें. असें झालें त्यणून इंग्लिशांचेलोक सबा आठशें पडले. त्यांत बऊनेक मरण नाश पावले.

इंग्लिशांचा असा जय झाल्यावरून शिंद्याचीं हिंदुस्थानांतील सर्व पलटणें हीनबळ झालीं, आणि त्याचा बंबळा नदीचेउत्तरचा मुलूख होता तो इंग्लिशांच्या हातीं लागला.

१२ अमें हिंदुस्थानचें वर्तमान असतां कटाक व बुंदेलखंड या मुलखीं इंग्लिशांचें सैन्य जाऊन तीं ठिकाणें ही त्यांहीं हस्तगत केली.

ते समयीं दक्षिणेंत कायकाय वर्तमान झालें तो प्रकार असा, शिंदे वर घूजी भोंसले यांस वर्तमान कळलेंकीं, जनरल वेलस्ली साहेब दक्षिणेंत औरंगाबादेवर चालिला आणि

त्याच्या लश्कराचा एक भाग बऱ्हाणपुरास गेला, त्यावरून त्यांनीं त्यास अडथळा करावयाची सिद्धता केली; तेव्हां जनरल वेलस्ली साहेब फिरून उत्तरेस जाऊं लागला, हें समजून शिंदा आपल्या लोकांसहित ठिकाण धरून राहिला, आणि रघूजी भोंसला तो उत्तरेस अनकाटनक्याच्या घाटाकडे चालिला. तेव्हां तो रघूजी भोंसला निजामाचा मुलूख उद्दस्त करील, या शंकेनें जनरल वेलस्ली साहेब पुनः दक्षिणेस त्या मार्गें निघाला, तो त्याजवळ पोंहचल्यावर रावीस इंग्लिशांचा छापा आपणावर पडेल अशा भयास्तव आपल्या तळाची बदली दोहों दिवसांत पांचा जागीं केली, ते समयीं त्या दोहीं लश्करांचा युद्धप्रसंग पडला नाहीं; इतकें मात्र झालें कीं, रघूजी भोंसल्यानें पांचहजार स्वार इंग्लिशांचे चौदाहजार बैलदाणा भरून जात होते ते पाडून आणावयास पाठविले, त्याबैलांबरोबर इंग्लिशांचे पलटणी लोकांच्या नी कंपनी व पायदळ व म्हैसूरच्या राजाचे कांहीं स्वार होते त्यांची व त्यांची आंबेर गांवापाशीं गांठ पडली, तेव्हां त्या उभयतांचे बराबर युद्ध होऊन त्यांतील दोनशें बैल मात्र नेले, वरकड त्यांहीं सांभाळून इंग्लिशांच्या लश्करांत पोंहचविले.

रघूजी भोंसला आपल्या मुलखाकडे जाऊं लागला तेव्हां वेलस्ली साहेब आपल्या दुराव्या भागाचा सरदार गावेलगडास घेरा घालून लढत होता त्याचे कुमकेस गेला.

१३ इतकीं कामें होत तों पर्यंत शिंद्यानें किनीएक वेळां त्या साहेबाकडे वकील पाठविले. नंतर नवेंबराचे नेविसावे ना- शिरवेस (सन १८०३ यांत) शिंद्याचें व वेलस्ली साहेबाचें युद्ध लहान्या बोलण्यासाठीं कांहीं दिवस मनाइ झालें; परंतु रघूजी भों-

सल्याचा कोणी वकील न भाला ह्मणून तो वेलसली साहेब याणें आरगांवाजवळ भोंसल्याचें लश्कर होतें तेथें जाऊन त्यावरप डून त्याचा पराभव केला. नंतर भोंसल्यानें इंग्लिशांशीं दिसेंब राचे सत्रावे तारिखेस तह ठरविला, तो प्रकार असा, वरदान दीचे पश्चिमेस रघूजी भोंसल्याचा कांहीं हक्क व मुलूख होता तो, आणि नरनाला व गावेलगड हे दोनं किल्ले ज्या डोंगराचे धा रेवर दोहोंजागीं आहेत त्यासगळ्या पर्वताचे दक्षिणेच्या मुल-खांतील प्रतिवर्षी चारलक्षरुपये उत्पन्न होत असा मुलूख व दोड्डी किल्लेवेरीज करून बाकी सर्व मुलूख इंग्लीश व त्यांचे पक्षपाती यांजकडे असावा. या शिवाय कटाकप्रांत व बलसो रही इंग्लिशांकडेसच असावा; आणि निजामाचे मुलखवीं रघूजीभोंसला चौथ व घांसदाणा वगैरे जें घेत होता तें त्याणें इतःपर न मागावें, अणखी निजाम व सेनासाहेब सुभा (भों-सला) व पेशवे यांत कांहीं कलह उत्पन्न झाल्यास त्याचें नि वारण इंग्लिशांच्या मध्यस्थीनें व्हावें. यावर ही दुसरें ठरलेंकीं, इंग्लीश व भोंसले यांच्या दरबारांत परस्पराचे वकील असा वे. तेव्हां इंग्लिशांनीं आपला वकील एल्फिन्स्तन साहेबना में पाठविला, तो नागपुरीं जाऊन राहिला.

हा तह देवगांवीं झाला ह्मणून त्याचें देवगांवचा तह असें नाव पडलें. नंतर थोडक्याच दिवसांहीं सर्जीअंजिण गावीं शिं द्याचा ही तह ठरला. त्याणें भागीरथी व यमुना यादोहींमध्यें जो मुलूख आहे तो व जयपूर जोधपूर हे रजपूतांचे मुलूख, आणि गोहदचा राणा याच्या उत्तरेस जो मुलूख आहे तो ही, आणखी आहमदनगर व भडोंच किल्ला व तत्संबंधीं मुलूख इतकें इं-

ग्लिशांचे स्वाधीन करून अंजिंठ्याचा घाट व गोदावरी यांम-
ध्यें जो मुलूख त्याचा होता तोही त्यांस देऊन कबूल केलेंकी,
मोंगलांच्या बादशाहाकडे आम्ही बाकी मागणार नाहीं, व
जयपूर व जोतपूर व बुंडी व माचेरी वगैरे ज्यांहीं
इंग्लिशाचा पक्ष स्वीकारिला असेल त्यांस आमचा उपसर्ग
लागणार नाहीं, त्यांहीं स्वतंत्रपणें वागावें.

असा करार झाल्यावर इंग्लिशांहीं घेतलेलें बऱ्हाणपूर व आशीरगड व पवनगड व दोहद व तत्संबंधें मुलूख, आणि पूर्वी दिल्लीच्या बादशाहानें महादजी शिंद्यास टोळपूर-बारी व राजखेडा हे परगणे इनाम करून दिलेले होते ते सोडून दिले. याप्रमाणें तह झाल्यावर मेजर जान माल्कम साहेब हा शिंद्याजवळ वकील नेमिला, तो जाऊन त्याच्याल-कराबरोबर राहिला.

असा इंग्लीश व निजाम व पेशवे यांहीं एकमतें मुलूख संपादिला त्यांतील वरदानदीचे पश्चिमेचा व नरनाळगड व गावेलगड यांच्या डोंगराचे दक्षिणेस जो मुलूख तो निजा-माचा भाग ठरला. पेशवा आपल्या इच्छेप्रमाणें युद्धास झटला नाहीं, व त्यायुद्धें करून त्यास नाना प्रकारें उपयोग झाला होता म्हणून अहमदनगर किल्ला व तत्संबंधीं मुलू-ख व माव त्याचा भाग ठरून बाकी इंग्लिशांकडे राहिला.

याप्रमाणें वांटणी ठरल्यानंतर इंग्लिशांचे दक्षिणेंतील लष्करांचा एक भाग जाफराबादेस गेला, दुसरा पुण्यांत पेश-व्याच्या रक्षणास राहिला. तेवेळेस त्या मुलखीं लुटारूंचा दंगा बहुत होता.

१४ इंग्लिशाचें हिंदुस्थानांतील लश्कर यास होळकराचा विश्वास नडला म्हणून त्याचे चवकशीतलेंतयार राहिलें. त्याणें ही पूर्वी सांगितलेली युद्धें होत असतां माळव्यामध्यें शत्रूची व आपली प्रजा समान मानिली, आणि त्या सर्वांपासून अतिशयित खंडणी घेत ली . मग इंग्लिशांहीं शिंदे व भोंसले यांस विलंब नलावितां जिंकिलें, त्या योगें तो होळकर परम विस्मय पावला, आणि त्यास ह्रास काळही प्राप्त झाला, तथापि त्याच्या मनांत पहिल्या पासून इंग्लिशांस घालवावयाचा जो बेत होता तो सोडीना, या साठीं त्याणें उत्तरेस जाऊन भरतपूरचा राजा व रजपूतराजे व रोहिले व शीख लोक हे आपणास मिळवावयाचा उद्योग आरंभिला. या शिवाय इंग्लिशांचा व शिंद्याचा तह झाला होता तो मोडून शिंद्यासही आपल्याकडे घ्यावयास वकील पाठविला. याप्रमाणें आचरण करीत असतांही होळकर इंग्लिशांस मित्रत्व दारवीत असे, परंतु युद्धें थोडक्याच दिवसांहीं गवरनरजनराल साहेबास त्याचें कापट्य स्पष्ट कळून इंग्लिशांच्या पक्षपातीलोकांचे देश मर्यादेजवळ त्या होळकराचें लश्कर होतें त्यास तेथून दूर जावयास त्याणें जनरालले क साहेबाकडून पत्र पाठपाठविलें. त्यांतच सुचना केली कीं, जें तुमचें बोलणें असेल त्यास वकील पाठवावा नंतर तो येऊन असें मागणें करूं लागला कीं, त्या प्रमाणें साहेबास कबूल कर वेना; मग तें बहुतेक बोलणें होऊन होळकरानें दाचाची गोष्ट सांगितली असतां त्या जनरालले क साहेबानें उत्तर केलें कीं, तुझी जशी युद्धाची गोष्ट कुशारकीनें सांगतां तशी आमचीबाल

नाहीं, कदाचित तुर्त्यी युद्ध करूं लागलांतर आपल्या कल्पनेपेक्षां आपण अशक्त आहों अमें ध्यानास येईल.

यानंतर मंत अठराशें चोहोंच्या एप्रेलांत होळकर देवदर्शनाचें मिषकरून शिंद्याचें शहर अजमीर तेथें जाऊन तोकिल्ला घ्यावयास उद्युक्त झाला. परंतु तें साध्य झालें नाहीं, तेव्हां त्या गोष्टीचा राग शिंद्यास नयावा म्हणून त्याच्या वकीलाजवळ बोलिला कीं, आम्हीं किल्ला घ्यावयाचा यत्न केला तो केवळ स्वहितार्थच असा नव्हे; सर्व मराठ्यांहीं स्वतंत्रपणें वागावयाकरितां आरंभिला.

यावरून इंग्लिशाच्या मनें ठरलें कीं, अवश्य युद्धाचाउपाय चालवावा. तेव्हां एप्रेलाच्या महिन्यांत गुजराथ मध्यें कर्णेल मरे साहेब याजवळ इंग्लिशांची कांहीं फौज होती तीस होळकराचे मुलखावीं स्वारी घालावयाची आज्ञा झाली; तेवेळेस च जनराल लेक साहेब ही होळकराचे पाठीस लागला आणि शिंदाही कबूल झाला कीं, होळकराम बुडवावया विषयीं मी सहाय करीन.

१५ जनराल लेक साहेब होळकराचे पाठीस लागला असतां त्याणें पुनः तहाचें बोलणें लाविलें, परंतु साहेब ऐकेना, यास्तव तो मागें हटत हटत चंबळा नदी उतरून आपल्या मुलखीं गेला. तेव्हां तो साहेब पुढें पर्जन्यकाळ जवळ आला म्हणून त्याची पाठ सोडून तेथून माघारा आपल्या छावणीस गेला; आणि पांच पलटणें व तीन हजार मराठे स्वार इतकें सैन्य मुलखांत त्या होळकराचा उपसर्ग आपल्या कोणास लागूं देऊं नये म्हणून ने भिलें; त्याचा मुख्य कर्णेल मानसन साहेब

केला.

नंतर मुंबईचें लश्कर गुजराथेंतून येतें असें ऐसा साहेबास कळून त्याणें नेम केला कीं, तो मरे साहेब आणि आपण एकत्र मिळून होळकराशीं स्पर्द्धा चालवावी अशी कल्पना करून तो मुकिंद घाटाचे वाटेनें होळकराच्या मुलखांत शिरून चंबळा नदीकडे चालिल्ला; त्यास जुलई महिन्याचे सातवे तारिखेस वर्तमान कळलेकीं, होळकर आपलें पायदळ व स्वारव तोफांसुद्धां सर्व सैन्य घेऊन इंग्लिशांच्या नाशास येतो; आणि दुसरें वर्तमान आलेंकीं, कर्णेल मरे साहेब गुजराथेंतून लश्कर सुद्धां निघाला, त्याणें कांहीं कारणासुळें इकडे येण्याची मसलत टाकिली; अशा समयीं त्या साहेबाजवळ अन्नाची सामग्री दोन दिवस पुरेशी माच होती, त्या सर्व कारणासुळें त्यास पुढें जावया बा मोठा विचार पडला. तेव्हां त्याणें तसेंच धैर्य करून पुढें होऊन होळकराचें लश्कर चंबळा नदी उतरते समयीं त्यावर हल्ला करावा तें न होतां, त्याच्या दुर्दैवानें त्यास बुद्धि सुचलीकीं, यावेळेस आल्या वाटेनें मागें फिरावें; मग तसेंच केलें. तेव्हां तो तेथून निघून मुकिंद घाटास पोंहचिल्ला; तों त्याच्या पाठीमागें होळकराची फौज जवळ येऊन त्यास पत्र आलेंकीं, तुम्ही युद्ध टाकून आमचे स्वाधीन व्हावें, या खेरीज तुम्हास दुसरा उपाय नाहीं. तेव्हां तें त्याणें नमा निलें असतां होळकरानें आपल्या स्वारांच्या तीन टोळ्या करून एक त्याच्या समोर व दोहों बाजूंस दोन योजून हल्ला केला, तें युद्ध प्रातःकाळापासून अस्तमान पर्यंत झालें, तथापि त्या इंग्लिशांचा बंदोबस्त त्या स्वारांच्यानें मोडवला नाहीं. मग ते होळकराचे लोक युद्ध मोडून दोन कोस मागें जाऊन

उतरले. तेथें त्यांचें पायदळ व तोफा मागून येऊन पोंहच
ल्या म्हणजे तें सर्व सैन्य त्या मानसन्‌साहेबाच्या लश्करावर
पडून त्याचा अगदीं नाश करावा असा त्याचा बेत होता.
तें इंग्लिशांच्या सरदारास समजून दुसरे दिवशीं उजेडतां
तेथूनही तो मागें जाऊं लागला. त्यास शत्रूचा असा उपद्रव
असून पर्जन्यही बहुत लागत असतां तो गामच नामें चंब
ळेचा उतार आहे तेथपर्यंत पोंहचला, तेसमयीं मोठ्या पर्ज
न्यामुळें तो उतार मोडला होता, नंतर तें पाणी उतरल्यावर
तो मानसनसाहेब नदीपार गेला; त्यास तेथपावतों जावयास
विलंब लागला, आणि त्याच्या आसमंतात् गांवांतून अन्न
सां पडेना, म्हणून तो फार हैराण झाला, आणि मार्गांतील चि
खलामुळें त्याच्या तोफा चालेनात, तेव्हां त्यानशानच टाकून पुढें
चंबेलीनामें ओढा आहे तेथें पोंहचला, तो ओढा ही पाण्यानें
भरला होता, तें थून पारजावयास दहा दिवस खोळंबा झाला.
इतकें होईतों पर्यंत होळकराचे स्वार निरंतर हल्ला करीत हो
ते, आणि त्या साहेबाच्या लश्करास धान्या दिकांचा फार मो
ठा. त्या योगें त्याची मोठी दुर्दशा झाली, आणि तो ओढा पार
होतांना त्याचे किती एक शिपाई वाहून गेले, व बुणग्यांती-
ल लोक तो ओढा उतरून पलीकडे जाण्याची आपली पाळी
ये ईल म्हणून वाटपाहत असतां मागें राहिले ते होळकराक
डील भिल्ल यांणीं मारिले. इतकें झालेंतरी त्या पलटणांचा
बंदोबस्त होळकरांच्या स्वारांस मोडवेना. आणखी ते पल
टणीलोक त्या ओढ्याचे कांठीं असतां जुलाईचे एकविसावे
ना शिरवंत संध्याकाळीं ते होळकराच्या सैन्यांत शिरून त्यां

.....नं.....
जा. ३६९
ई. गे.

च्या किनीएक लोकांस मारून माघारे आपल्या ठिकाणास आले. नंतर आठादिवसांनीं रामपुरानामें किल्ला पूर्वीलेकसाहेबानें होळकराचे पाठीस लागतांना घेतला होता त्या ठिकाणास नेपोंहचले. तेथेंजनराललेकसाहेबाकडून त्याच्या कुमकेस दोनपलटणें व त्यांबरोबरकांहीं दाणा आला तो त्यांस प्राप्त झाला, मग त्याजागीं दीडपलटण ठेऊन तेथून पुढें बनासनामक नदीजवळ पोंहचले, तेथेंही उतार नाहींसा झाला होता, यास्तव ती नदी उतरून पलीकडे जाववयास उशीर लागला, तितक्यांत मराठ्यांच्या तोफा व घोडदळ येऊन पोंहचलें, इतक्यांत इंग्लिशांचे बहुतेक लोक नदी उतरून पलीकडे गेले, आणि बुणग्याच्या रक्षणास जे एक पलटणावर कांहीं सेलोक राहिले त्यांवर त्यांहीं तोफांचा मार चालवून हल्ला केला, तेसमयीं त्या पलटणांच्या साहेबानें वेगें करून त्यांवर चालून घेऊन एक क्षणभर त्या तोफा हस्तगत केल्या; परंतु होळकर आंगें मोठ्या सेनेसहित येऊन त्याणें त्या बहुतेकांस मारून टाकिलें, त्यांत बारा गोरेसाहेब सरदार पडले, बाकीजे त्या पलटणीचे शिपाई व सरदार राहिले ते नदीउतरून पलीकडे गेलेल्या आपल्या लोकांचा सिकडून मार चालू झाल्यानें वांचले.

या पुढें मानसन साहेब याणें शिंद्याचीं सहा पलटणें व एक वीस तोफा आपल्या कुमकेस कुशाळगड नामें जयपुरच्या राजाचें ठिकाण आहे तेथें येऊन त्यांची व आपली गांठ पडावयाचा नेम केला होता म्हणून तो तेथें गेला, परंतु त्याजागीं पोंहचला ती कुमक नाहींसें समजलें, तेव्हां आग्र्यापर्यंत जावयाची मसलत ठरली. मग तें ठिकाण सोडून निघाल्यावर वाटेंत मराठे

स्वार तोफांसुद्धां येऊन त्यांहीं त्या पलटणाचा नाश आरंभिला, परंतु त्यांचें बळ चालेना, कांकीं, ते स्वार जोपर्यंत त्या पलटणी लोकांचे बंदुकांच्या तोंडासरसे येऊन भिडत तोंपर्यंत त्यांहींचा रनकेले, मग ती सरबत्ती होतांच ते चहूंकडे उधळले, असें बहु तवेळां झालें, परंतु शेवटीं मराठ्यांच्या तोफांच्या मारानें व ते शिपाई निरंतर वाट चालून थकलेले होते त्या योगें एके रात्रीस फार आंधारामुळें त्या पलटणींत बुणगें शिरून बयाना नामें पर्वतांतील वाटेच्या अडचणी मुळें त्यांचा सर्वबेत विसकटला, तेव्हांते सारे शिपाई आपआपल्या सामर्थ्या प्रमाणें आग्र्यास जाऊन पोंहचले, तों पर्यंत त्यांतून कितीएक मराठ्यांहीं मारिले, परंतु त्यांच्या पाठीस लागलेले मराठे थोडके होते त्यणून ते बहुतेक वांचले.

१६ त्या वरून होळकर साठ हजार स्वार व पंधरा हजार पायदळ व एकशेंब्याण्णव तोफांसहित वाटेनें फार धामधूम करीत मथुरेस आला, परंतु जनरल लेक साहेबानें या गोष्टी चा बंदोबस्त अगोदरच केला होता त्या योगें इंग्लिशांहीं एका महिन्यांत मराठ्यांस नेथून पिटून आफण त्या मथुरेंत मुका मकेला तेव्हां होळकर तें स्थान सोडून गेला, तो दिल्ली घ्यावया चा उद्योग करूं लागला त्याणें तेथें सहा दिवस युद्ध करून तें काम सिद्धीस न नेतां जनरल लेक साहेब येतो असें त्यास स मजतांच तो भरतपूरचा राजा यास मिळावयाकरितां त्या रा जाचा दिगनामें किल्ला आहे तेथें गेला तेव्हां त्याचे पाठीस लाग लेले इंग्लीश येऊन पोंहचले, त्यांहीं त्यांवर हल्ला केला, तेसम यीं मराठ्यांचा पराभव होऊन त्यांच्या सत्त्यांयशी तोफा इंग्लिशां

च्या हातीं लागल्या, आणि तेहोळकराचे लोक त्या किल्ल्यांत आश्रय पावले. मग त्या लेकसाहेबानें भिंती पाडावयास जोग्या मोठ्या मोठ्या तोफा आग्र्याहून आणून तो किल्ला घ्यावयास आरंभकेला. त्यादिवसापासून दहावे दिवशीं त्या किल्ल्याचे बाहेरचा धाकटातट ढांसळून खेंडार पाडून मध्यरात्रीं इंग्लिशांहीं हल्ला करून तें ठिकाण हस्तगत केलें, तेव्हां दुसऱ्या दिवसाची रात्रीउजाडतां त्या किल्ल्यांतील शिबंदी व होळकराचे लोक तो किल्ला सोडून नेथून भरतपुरास जाऊन आश्रय पावले. तेवेळेस होळकराचे स्वार भरतपुरीं नजातां फरकाबादेस जाऊन पोंहचतों पर्यंत लेकसाहेबानें त्यांचे पाठीस लागून त्यांतील तीन हजार स्वार मारिले.

१७ इतकें होईतों पर्यंत मुंबईच्या फौजेंतील एकेठोकीनें गुजराथेंतून माळव्यांतजाऊन होळकराची राजधानी इंदूर हस्तगत केलें, आणि त्या माळवे प्रांतीं जे होळकराचे मोठे मोठे किल्ले होते ते सारे घेतले; याशिवाय दक्षिणेंतील ही त्याचे चांदोर वजालनें वगैरे किल्ले आणि त्याचा मुलूख हस्तगत केला. असें झालें असतां त्या होळकरास भरतपूरमात्र आश्रय उरला तो ही घ्यावयाची मसलत ठरली, म्हणून मुंबईच्या सैनेचा भाग हिंदुस्थानांत पाठविला तो कोटया पर्यंत पोंहचला होता, त्यास आज्ञा गेली कीं, बंगाल्याच्या लष्करास येऊन मिळावें.

१८ जनरल लेकसाहेब यांणें यापूर्वी जींजीं कामें आरंभिलीं तीं तीं सहज सिद्धीस गेलीं, म्हणून भरतपूर घ्यावयाचा बेत झाला. तेवेळेस त्याजवळ तोफखाना वगैरे कि

ला घ्यावयाचें साहित्य यथास्थित नसतांही तो त्वरेंकरून त्या कामास लागला. त्या भरतपूरचा घेरा साडेतीन चार कोसांचा, आणि त्यास फार बळकट असा मातीचा तट, व त्यास भोंवता मोठा खंदक पाण्यानें भरलेला; तें पाणी पुरतें भरल्यास एका पुरुषावर अधिक झावें. असें असतां त्या किल्ल्यास घेरा न घालितां एकेजागीं माच ठाणें बसवून तो लढूं लागला. लढतां लढतां त्या कोटास एक लहानसें खिंडार पडतांच हल्लाकेला, तो सिद्धीस गेला नाहीं. नंतर आणीकही तीन वेळां तशी च गर्दी केली, तरी कार्य सिद्धि झाली नाहीं.

नंतर त्या साहेबानें तसाच दम धरून आणीक सरंजाम आणविण्याचा बेत केला असतां नेथच्या राजानें होळकराची मसलत शेवटास जात नाहीं असें समजून आपल्या हितार्थ त्याचा पक्ष सोडून इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, वीस लक्ष रुपये त्या राजानें इंग्लिशांस द्यावे, आणि जे कोणी इंग्लिशांचे द्वेषी असतील त्यांचा पक्ष टाकावा; याशिवाय पूर्वीलिक साहेबानें त्या भरतपूरकराशीं तह केला होता त्यांतकांहीं त्याच्या हिताचीं कलमें होतीं तीं इतःपर नाहींत असें समजावें; आणि इंग्लिशांहीं वचन दिलें कीं, तुली कबुलाती प्रमाणें शुद्ध मार्गानें वागतां असें आमच्या मनांत येईल तेव्हां तुमचा दिग किल्ला तुम्हास माघारा देऊं.

१९ असा तह झाल्यानंतर शिंद्यानें आपल्या वकीलाबरोबर कांहीं स्वार व सर्व पेंढारी मंडळ त्या राजाचे कुमकेस पाठविलें, ते समयीं त्याणें त्या वकीलाची भेट न घेतां त्या बरोबर आलेल्या लोकांसहित त्याला मांघारें फिरविलें. त्या बरोबरच

होळकर आपले राहिलेले स्वार व बुंदल खंडांतून आलेला अमीरखान यांस आपल्या बरोबर घेऊन शिंद्याच्या लष्करांत गेला.

तेथें शिंद्यानें त्याचा मोठा सन्मान केला, आणि इंग्लिशां च्या वकीलाची समजूत केली कीं, याणें तुमचे मुलखीं जाऊनउ पद्रव नकरावा. यासाठीं आम्ही याचा मान राखितों, नें साहेबा चे मनास न आलें. (त्याजनरल लेक साहेबास ते समयीं वि लायतेहून लार्ड असें नवें पदभास झालें होतें) तेव्हां तो साहे ब भरतपुराहून शिंद्याकडे चालिला. तेवेळेस शिंदा व हो ळकर हे तो लाटजवळ आला असें समजून कोट्या पर्यंत गेले. ते समयीं पर्जन्यकाळ समीप आला होता म्हणून त्या साहेबानें नियमकेला कीं, यावेळेस यांचे पाठीस नलागतां छावणी करून राहावें. तेव्हां आपल्या बंगाल्याच्या लश्क राचा जो मोठा भाग तो आग्रें व मथुरा एथें ठेऊन मुंबईच्या लश्कराची टोळी रामपुरीं ठेविली. असें सन अठराशें पांचां त पर्जन्याच्या आरंभा पर्यंत झालें.

२० नंतर शिंदे व होळकर कोटा सोडून अजमीरच्या वाटेनें चालिले, ते समयीं शिंद्याचा मुख्य कारभारी सरजेराव घाडगा तो आणि होळकर एकमत होऊन इंग्लिशांशीं युद्ध करावें अशी त्यांची मसलत होतहोती, परंतु तो सरजेराव घा

+ भरतपूरच्या किल्ल्याची लढाई होत असतां होळकराच्या व इं ग्लिशांच्या स्वारांची युद्धें बाहेर होत असत, तेव्हां कोणे एके समयीं इंग्लीशजा ऊन होळकराच्या स्वारांवर छापा घालून आपलें एकही मनुष्य नपडूं देतां त्यांचें एक हजार मनुष्य मारून आपल्या ठिकाणास गेले.

डगा थोडक्याच दिवसांत पदच्युत होऊन अंबूजी इंगळ्यास नें नुरव्यत्व प्राप्त झालें. त्याची मसलत युक्तीनें काढ हरण करावयाची होती, व शिंद्याच्या मनांत येऊं लागलें कीं, आप्पी व होळकर दोघे मिळून ही इंग्लिशांस घालवून देऊं म्हटलें तरी नें घडत नाहीं. या शिवाय ले शिंदे व होळकर यांमध्येंच कांहीं ईर्षा उत्पन्न होऊन दोघांही आपआपले लश्कराचे तळ निरनिराळे केले. नंतर शिंद्यानें आपल्या हितार्थमात्र इंग्लिशांशीं तह करावयाची मसलत आरंभिली असतां होळकर अजमीर सोडून आपल्या बरोबर बाराहजार स्वार व तीनहजार पायदळ व तीस तोफा घेऊन शीख व आफगाणलोक यांची कुमक संपादन करावयास पंजाब मुलखीं गेला.

नंतर लार्ड्लेक साहेब त्याचे पाठीस लागला, आणि त्यास शीख लोकांची कुमक मिळाली नाहीं यामुळें तो होळकर फार संकटांत पडला. तेव्हां त्याणें बियास नदीचे कांठीं लाडाचें लश्कर होतें तेथें आपला वकील तहाचें बोलणें करावयास पाठविला.

२१ इतक्यांत शिंदा याणें तहाचें बोलणें आरंभिलें होतेंनें नवेंबराचे बेविसावे तारिखेस कर्णेल माल्कम साहेब व शिंद्याकडचा मुनशी काविलनेव या उभयतांचे विद्यमानें शेवगास गेलें.

या तहांतील मुख्य प्रकार इतकाच कीं, शिंद्याचे इनाम परगणे धोळपुर बारी व राजखेडा हे इंग्लिशांहीं घ्यावे, आणि मर्जी अंजिणगांवच्या महासंबंधें इंग्लीश प्रतिवर्षी शिंद्याचे किल्लीदक मानकरी व सरदार यांस पंधरा लक्ष रुपये देत

असत ते न द्यावे; व कंपनी आणि शिंदा यांच्या मुलखाची मर्यादा नवी असावी, ती अशी, त्या दोहों मुलखां मध्यें चंबळा नदी मर्यादा; पश्चिमेस कोट्यापर्यंत, तशीच पूर्वेस गोहदच्या राण्याचे मुलखाचे पलीकडचे सीमे पर्यंत मर्यादा.

इंग्लिशाहीं शिंद्याच्या खासगी खर्जीन्यास प्रतिवर्षी साडे चार लक्ष रुपये द्यावे, आणि त्याचे स्त्रीस व कन्येस आपल्या मुलुखीं जहागीर द्यावी, त्यांत दोन लक्षांचा मुलूख स्त्रीस आणि एक लक्षाचा कन्येस द्यावा. त्या शिवाय गोहदच्या राण्यास कांहीं मुलूख देऊन त्याकडून खालहेर किल्ला इंग्लिशांहीं शिंद्यास देववावा असा एकठराव झाला.

होळकराशीं व इंग्लिशांशीं सह झाला तो प्रकार असा, कोटारामपुरा व बुंदी व या बुंदीच्या डोंगराचे पारेच्या उत्तरेसजो मुलूख आहे तेथें होळकराची सत्ता नसावी, आणि इंग्लीशाव त्यांचे सहाय यांपाशीं त्यानें बाकी मागूं नये, व आपले चाकरी स गोरेलोक ठेवूं नये; या शिवाय सरजेराव घाडगा हा इंग्लिशांचा द्वेष्टा यास्तव त्याला आपल्या कारभारांत शिरूं देऊं नये; या खेरीज लाडलेक साहेबानें सांगितले वाटेनें माळव्यास जावें इंग्लिशांहीं कबूल केलें की, चंबळेच्या दक्षिणेस होळकराचा मुलूख आहे तेथल्या कारभारांत आम्ही शिरणार नाहीं; या खेरीज चांदोर किल्ला व आंबेर व शिवगांव इतके खेरीज करून वरकड दक्षिणेंनील जितके होळकराचे किल्ले व गांव असती

+ आंबेर वगैरे ठिकाणे खेरीज केलीं तीं पुढें होळकराची वर्तणूक कशी असल्यास माघारी द्यावी असे ठरलें होतें.

ल तितके आम्ही त्यास मा घारे देऊं.

२२. त्यानंतर होळकर पंजाबाकून आल्यावर कोणी उदय पूरचा राजा याचे कन्ये निमित्त जयपूरकर व जोनपूरकर या दो घां राजांचा कलह लागला होता तेव्हां त्या दोघांचे वकील शिंदा व होळकर यांकडे कुमक मागावयास आले, तेसमयीं शिंद्यानें त्या दोघांकडे सरजेराव घाडगा व बापूजी शिंदा यांजबरोबर पंधराहजार फोज देऊन पाठविले. होळकरानें अमीरखा न यास पठाणांसुद्धां जयपूरच्याराजाकडे ने मिलें. नंतर कि तीएक वेळ पर्यंत जयपूरच्या राजाचें प्राबल्य होतें, परंतु तो अमीरखान त्याराजाचा पक्ष सोडून केवळ स्वहितार्थ त्या दो घांच्याही मुलखांत लुटालूट करूं लागला. नंतर त्याणें जोन पूरच्याराजाचा अभिमान धरिला; शेवटीं त्या दोघां भांडणारां न आपण मध्यस्थ होऊन कितीएक मारेकरी घालून उभयपक्षीं दगे करून तो कलह शमविला.

इतकें होई तों पर्यंत होळकराचे बुद्धीस चळ झाल्या मुळेंत्या चे मुलस्थीलोक यांस त्याला प्रतिबंधांत ठेवावें लागलें. त्यास वेड लागल्याचे पूर्वी त्याचा पुतण्या खंडेराव होळकर यास कोणी फितुरीलोकमिळून तो मुख्यसामानून त्यांहीं त्याचा झेंडा उभा केला. तेव्हां त्या यशवंतरावानें तो फितूर मोडून त्या खंडेरा वास मारेकरी घालून मारून टाकिलें. परंतु त्या एकास च मारिल्यानें त्याचा राग शमेना म्हणून त्याणें आपला भाऊ का शीराव त्याच क्रोधानें तसाच मारविला, तेणेंकरून त्याचा रा ग शांत होऊन तो निर्भय झाला. त्या होळकरास खूळ लागल्या वर तो सन अठराशें आठां पासून अठराशें अकरा पर्यंत बं-

दोबस्तींत होता, मग त्यावर्षी अकटोंबराचे बेविसावे तारि खेस त्या वेडांतच तो मृत्यु पावला.

२३ तो होळकर मनाचा धीट आणि शरीरें करून सुदृढ असे; त्याचा जय झाला असतां तो आपल्या जातीच्या मराठ्यां प्रमाणें उत्संरवळ होई, परंतु विपत्ति समयीं घाब रा न होतां धैर्यें करून आपल्या अर्थसाधनाचा उपाय चालवीत असे; तो बोलण्यांत व आचरणांत केवळ साबडा होता, असें असून समयानुसार राजा प्रमाणें वागणें आणि दुसऱ्या पासून आपली मर्यादा ठेवविणें, या विषयीं परम सुज्ञ आणि विनोदी असे, यास्तव शिपाईलोक त्यावर प्रीति करीत. तो पुरुष इतरां मराठ्यां पेक्षां मोठा उद्योगी, त्याणें फारशी च मराठी याहोड्डी लिहिण्यांचा अभ्यास केला होता. त्याचे आंगींअसे गुण असून कितीएक गोष्टी विषयीं त्याचें वागणें लोभीपणा व निर्दयता व क्रूरपणा ईहीं करून युक्त होतें; याशिवाय तो समय विशेषीं मोठा उग्र स्वभाव ही होता. त्याची आकृति ठेंगणी आणि शरीर पुष्ट व रंग काळसर असे, व मुखश्री चांगली होती, त्या योगें तो कांहींसा हस्तमुख दिसे. त्याच्या हातांत बंदुक फुटून त्याचा एक नेत्र गेला असे, तथापि त्यावेंतोंड विशोभित दिसत नसे.

भाग बत्तिसावा.

सन अठराशें निहींपासून अठराशें सत्रांपर्यंत झालेली वर्तमानें.

१ रजपूत राजाचा कलह शांत झाल्यावर अमीरखान मोठ्या त्वरेनें रामपुरास आला, तेथें ठरलें कीं, राजकारभारचा लष्करास मंडळी नवी करावी त्यांत मुख्यत्वें अमीरखान असावा, परंतु बाल्यात्कारें यशवंतरावाची आवडती स्त्री तुळसाबाई नामें होती ती मुख्य केली. ती दुर्व्यसनी आणि मोठी खुनशी असें, यास्तव त्या एवढ्या कारभारास ती केवळ अयोग्य होती. तिणें यशवंतराव मृत्यु पावल्यावर आपल्यासवतीचा दौलतराव नामें चवदा वर्षांचा मूल आणून तो गादीवर बसवून त्याचे नावें कारभार चालविला. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं त्या अमीरखानानें बाईजवळ गफूरखान् नामें कोणी आपला भाऊबंद यास ठेवून आपण आपल्या पठाणांच्या हितार्थ रजपुतांचे मुलखीं गेला.

त्यापुढें होळकराच्या राज्य कारभाराची अशी अव्यवस्था झालीकीं, त्यायोगें प्रतिवर्षी मुलखाचा वसूल नियमा प्रमाणें उत्पन्न होईना; आणि त्या कारभारी मंडळांत कोणास अशी शक्ति नव्हती कीं, फौजेस फांटा देऊन खर्च तोडावा याशिवाय सरकार खर्जिन्यांत शिबंदीच्या खर्चास पुरेसें द्रव्य नव्हतें म्हणून त्या लष्करच्या वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून त्यांस सरदार देऊन कोण त्याही प्रकारें त्यांचा खर्च चालवावयाचे बेतानें त्यांस आपल्या मुलखांत जागोजाग पोट भरा-

वयास पाठविलें. त्यांतील कितीएक बंडास मिळाले, त्यांत एक महंमद अल्लीखानबंगष् नामें होता तो खानदेशचे बंजूनेक परगणे लुटून निजामाच्या मुलखांतून होळकराच्या अंबेरपरगण्यांतजाऊंलागला, परंतु पुणें व हैदराबाद यांमध्यें इंग्लिशांचीं पलटणें होतीं त्यांहीं त्यावर जाऊन त्याला धरून कैद करून तो मुंबईस पाठविला, तो नेथें बंदींत ठेविला.

२ शिंद्याचे मुलखीं होळकरापेक्षां कांहींसा बंदोबस्त विशेष होता. तेथेंही खर्चाच्या तोटयामुळें त्यास होळकराप्रमाणेंच मुलखांत फौज पाठवावी लागली. त्यापूर्वी त्याफौजा मुलूख भरपसरून युद्धादिकाच्या कामास गुंतल्या असत, त्यायोगें प्रजेसबहुत उपद्रव होत नसे, मग जेव्हां त्यारिकाम्या होऊन एकेजागीं फार जमूंलागल्या तेव्हां रयतेस असें दुःसह दुःख प्राप्त होऊं लागलेंकीं, ते लोक चांगल्या पेरण्या झालेलीं स्थळें टाकटाकून निघून गेले.

एवढी अनीति चालू झाली असतांही शिंदे व होळकर यांच्या सैन्यांत शत्रूचा उपाय चालेना, कांकीं, ते लोक युद्धा विषयीं कुशळ होते. असा च रघोजी भोंसल्याच्या राज्याचाही बेत कांहींसा विसकटला आणि त्याचे लोक तादृश युद्धांत निपुण नव्हते, म्हणून अमीरखान यांणें रजपुतांच्या मुलखांत आपली सत्ता स्थापून सन अठराशें नवांमध्यें वराडांत स्वारी केली; त्या बरोबर त्याच्या पठाणांखेरीज पेंढारी फार आले, मग त्या सर्वांहीं मुलूख लुटावयाचा आरंभकेला; परंतु इंग्लिशांचे लोक त्या मुलखा समीप होते त्यांहीं ते लोक निर्भयपणें यथेच्छ लूटकरितात हें नीट नव्हे असें समजून त्यांशीं युद्ध करून त्यांस

नर्मदा पार घालविलें.

३. पेंढारी लोकांच्या निर्दयपणास अंत नाहीं, ते पहिल्या पासून मराठी लश्कराच्या संगतीस असत, पुढें पहिला बाजीराव पेशवा हिंदुस्थानांतून पुण्यास येऊं लागला तेसमयीं ते माळव्यांत येऊन राहिले, नंतर कांहीं दिवसांनीं होळकर व शिंदे हे मोंगलाच्या मुलखांत जाऊं लागले असतां त्यांजबरोबरजात, आणि त्या दोघांतजाचा पक्ष ते धरीत त्याप्रमाणें आपणास शिंदेशाई किंवा होळकरशाई असें म्हणवीत. मग संनस त्रेशें चवऱ्याण्णवांत शिंद्यानें त्या पेंढाऱ्यांस नर्मदेजवळ कांहीं मुलूख दिला. त्या पुढें कोणी मोटा धूर्त खरीमखान होता,ज्याणें खरडयाचे लढाईत निजामास लुटून बहुत द्रव्य मिळविलें, तो त्या पेंढाऱ्यांचा मुख्य होऊन त्याणें अमीरखान पठाणाची सुप्रसन्नता संपादून सुजाअलपूर नामें परगणा त्या पासून मिळविला; या शिवाय त्याणें शिंद्याचे जहागीरदार यांचा माळव्यांतील मुलूख कांहीं युक्तीनें हातारवालीं घातला; अशी सर्व मिळून त्यास प्रतिवर्षी पंधरा लक्ष रुपये जमाबंदी होऊं लागली. तेव्हां शिंद्यास त्या विषयीं शंका उत्पन्न होऊन त्याणें कांहीं भुलथापीनें त्याला धरून ग्वाल्हेर किल्ल्यांत बंदीस घातलें. तो सन अठराशें दहापर्यंत तेथेंच होता, मग शिंद्यास बहुत द्रव्य देऊन त्या प्रतिबंधांतून सुटला. नंतर कोणी मझेंच चितू व दोस्तमहंमद व नामदारखान व शेरबदलू या नामें चवघे पेंढाऱ्यांचे मुख्य झालें होते. ते येऊन त्यास मिळाले. तेव्हां त्याचे पंचवीस हजार स्वार जमले. तेसमयीं त्याची मसलत होतीकीं, कांहीं पायदळ चाकरीस ठेऊन पुनः वराडांत जाऊन लुटालूट करावी, परंतु

रघोजी भोंसला याणें त्या चवघांतील चिंतूनामें मुख्य नोआ पत्याकडे करून घेऊन त्यास वांसंतेथून काढून दिलें. ते वेळस तो खरीम खान आपला पुरातन आश्रय भूत जो अमीर खान त्याजपाशीं आश्रयास गेला, तेथें त्याणें शिंद्याच्या मसलतीवरून त्यास बंदींत ठेविलें, तो सन अठराशें सोळा पर्यंत नसाच होता.

पेंढारी लोकांची अशी चाल होती कीं, प्रतिवर्षी दसऱ्याचे सुमारें आपला जो कोणी मुख्य असेल त्याचे मसलतीनें एखा दे ठिकाणीं बंदोबस्त ठीक नाहीं असें पाहून त्याजागीं चोरवा टांनीं जाऊन मिळावें, मग तेथें पोंहचल्यावर जसा पर्जन्य काळीं नदीस लोटां येतो त्यासारिख्या वेगानें एकाएकीं त्या मुलखावर पडावें, आणि तेथें वेगळ्या वेगळ्या टोळ्या करून त्या देशांतील सारीं ठिकाणें लुटून सर्व प्रकारें अनर्थ करावा, मग ती लूट घेऊन जेथें आपण लूट केली त्या ठिकाणापासून दूर दुसऱ्या एखाद्या संकेत स्थळीं जाऊन सर्वांहीं एकत्र मिळून आपल्या ठिकाणास जावें.

ते पेंढारी प्रथम माळवा व मारवाड व मेवाड व रजपुतानां व वराड इतक्या मुलखीं उपद्रव करीत होते, मग कधींकधीं निजामव पेशवे यांच्या मुलखांत शिरूं लागले.

४ इकडे पुण्या मध्यें बाजीराव यास इंग्लिशांहीं गादीव र बसविल्या नंतर थोड्याच दिवसांनीं त्याची कृतघ्नता व कुटिल वृत्ति इत्यादि दुर्गुण दिसून आले.

तो इंग्लिशांच्या द्वेषी मंडळाशीं पत्रादि द्वारा गुप्त स्नेह ठेवूं लागला. त्यांस अनुकूळ करून घेण्या विषयीं त्यांची अशीसम

जूत करीकीं. तुह्मी सारे दूर गेलां, आणि दक्षिण सीमेचे जहा गीरदार सारे फितले ले, यामुळें मी एकटा पडलों ह्मणून अडचणी करितां इंग्लिशांशीं तह केला. याशिवाय त्याणें असें केलें कीं, जेव्हां पटवर्धन सरदार जनराल वेलस्ली साहेबास मिळून त्याचे बरोबर फौजे सुद्धां युद्धास जाणार होता तेव्हां त्याणें कोल्हापुरच्या राजास त्याचे मुलखावीं स्वारी घालावयाची मसलत गुप्तपणें दिली, कांकीं, त्याणें त्याभयानें आपला मुलूख सोडून इंग्लिशांचे साह्यास न जावें.

याहूनही पासून त्या बाजीरावानें आपलीं दोन हितें कल्पिलीं होतीं, त्यांत एकतर शिंद्याचे शत्रु इंग्लीश यांच्या साह्यास पटवर्धन जाईनासा केल्यानें शिंद्याची आपणाविषयीं सुप्रसन्नता होईल. दुसरें असें, परशुरामभाऊ यांचें आणि आपलें वांकडें पडलें आहे यास्तव इंग्लिशांच्या साह्यास तो न गेला हेंच निमित्त करून साहेबलोकांस समजावावें कीं, तुमचा व आमचा तह झाला यास पटवर्धन अनुकूल नाहीं असें करून त्याची जहागीर आपण जप्त करावी.

बाजीराव यास राज्यकारभार चालवावयाविषयींकोणाएकाचाही विश्वास नसे, ह्मणून तो आपणच तीं सारीं कामें वहिवाटीत असे. तो आपणास सर्वगोष्टींत प्रवीण असें मानी परंतु इंग्लिशांचा वकील व आपण समक्ष भाषण करीत असतां त्याच्या व आपल्या विचारांत अंतर पडून कदाचित् बोलण्याचा बेत चुकून कलह उत्पन्न होईल ह्मणून नें काम दुसऱ्याचे हातून घ्यावें असा निश्चय करून

कोणी इंग्लिशांचा द्वेषी असा सदाशिवमाणकेश्वर तो इंग्लिशांच्या वकीलाशीं बोलण्याचे कामंस नेमिला.

तो सदाशिवमाणकेश्वर टेंबुर्णीगांवचा देशपांड्या, त्याणें प्रथम पुण्यामध्यें कांहीं दिवस कीर्तन करून निर्वाह केला; त्याचे आंगीं कवितांशक्ति चांगली, आणि तो वाद्यें वाजिवण्याविषयीं कुशल होता; पुढें हैदराबादेंत पेशाच्याचा वकील गोविंदराव पिंगळ्या याची त्याणें चाकरी धरिली, मग बाजीराव पेशवा व रवलनराव शिंदा हे ज्या समयीं एकमत होऊन इंग्लिशांस अगदीं बुडविणार होते तेव्हां त्याम सलतींत निजामासही घ्यावें याकरितां तो सदाशिवमाणकेश्वर त्याकडे पाठविला.

त्या बाजीरावाची अनीति कशी होती ती ध्यानांत यावयास एकदोन गोष्टी आहेत, त्यांत खंडेराव रास्ता याणें बाजीरावास विपत्तिसमयांत ही सोडिलें नाहीं, आणि तो बाजीराव पुनःपुढें गादीवर बसल्या नंतर दुसऱ्या वर्षी बाबूराव फडक्यानें मोठें बंड केलें होतें तें बहून युक्तीनें खंडेराव रास्तानें मोडिलें, असा तो परम विश्वासू चाकर त्याणें इंग्लिशांचा पक्ष धरून माणकेश्वराशीं वाद केला असें ऐकून त्याची चवकशी न करितांच वडग्याच निमित्तानें त्यास पदच्युत करून त्याची जहागीर ही बाजीरावानें जप्त केली. असेंच जे बहुत दिवस सेवा केलेले असून चाकर होते त्यांच्या उपजीविकेचा विचार नठेवितां त्यांचे स्मरण ही राकिलें तो बाजीराव असा दुर्दैवी असतां इंग्लिशांच्या साह्यामुळें त्याच्या राज्यांतील संपूर्ण बंडें मोडून लोक सुरवीसे दिसूं लागले आणि त्याची आज्ञा या राज्याच्या मर्यादेंत सर्वत्र

अकुंठित चालली झाली, त्यांत प्रतिनिधीच्या बंडा पर्यंत अंतर न पडलें.

५ त्या प्रतिनिधीच्या बंडाचा प्रकार असा, इंग्लीश व बाजीराव पेशवे यांचा स्नेह झाल्याचे पूर्वी पुण्यांत परशुराम, श्रीनिवास, यानामेंभवानूराव प्रतिनिधीचा पुत्र होता, त्यास बाजीरावानें धरून कैद करावयाची मसलत केली, ती सिद्धीस नजातां तो प्रतिनिधितेथून निघून आपली जहागीर कऱ्हाड तेथें जाऊन राहिला. ते समयीं त्याजहागिरीचो वहिवाट त्याची मातुश्री व बळवंतराव फडनवीस नामें त्याचा मुनाल्लीक यादोघांहीं चालविली होती; त्या प्रतिनिधीस तीव हिवाट आपण चालवावी असी इच्छा होऊन तो वाद बाजीराव कडेगेला. बाजीरावास पूर्वीच प्रतिनिधीला बळहीन करावें अशीवासना झाली होती, त्यावरून तो वाद उत्पन्न होतांच हा समयउत्तम असें जाणून तें काम बळवंतराव फडनविसा नें वहिवाटावें असाठराव केला, आणि त्याबरोबरच कांहीं फौजे सहित बापू गोरवला यास पाठवून त्या प्रतिनिधीलाध रून बंदीस घातलें. मग तो कलह मिटून त्या मुलखांत स्थिरता झाली असें पाहून तो गोरवला पुण्यास आला, तेव्हां लोकांहीं अटकळ केलीकीं, इतःपर प्रतिनिधिजन्मभर बंदींतच राही ल, परंतु त्याचा योग तसा नव्हता. पूर्वी त्याप्रतिनिधीची स्त्री महासाध्वी असतां तिजबरोबर त्याचा कांहीं कलह होऊन तिला दूर ठेवून त्याणें आपल्या जवळ एक तेलीण बाळगिली होती, तिणें त्या संकट समयीं कांहीं युक्तीनें वांसोटा किल्ला हस्तगत करून किती एक लोक चाकरीस ठेवून किल्लामसूर या नामें लढाण शागर्दीत प्रति

निधिबंदीस होता, त्या ठिकाणींजाऊन हल्ला करून त्यास तेथून मुक्त केलें. नंतर त्या प्रतिनिधीनें आपला झेंडा उभाकरून लोकांत प्रसिद्ध केलेंकीं, मी पंत प्रधानाचा अंकित नव्हें, माझा धनी साताऱ्याचा महाराज़. त्यावरून त्याच्या मुलखांतील शिपाईलोक व त्याचे कितीएक संबंधी मोठे मोठे कुलीन गृहस्थ त्याजकडे जाऊन राहिले, त्या योगें कदाचित् त्याचा मनोरथ सिद्धीस गेला असता, परंतु तो प्रतिनिधि कांहींसा शूर असून न त्याचा स्वभाव उग्र आणि अत्यंत तामसी असे, यामुळें त्यास त्याच्या आईच्या पक्षाचा अथवा त्या मुलाल्लिकाकडचा कोणी सांपडला असतां त्यावर दया न करितां त्या विषयीं अत्यंत क्रूरपणा करी, त्यावरून तो लोकांच्या मनांतून उतरला, आणि खर्चास द्रव्य जमा करावया साठीं प्रजेस पेंढाऱ्या प्रमाणें उपद्रव करूं लागला. असें झाल्यानंतर बापू गोखला पुनः फौजेसहित त्यावर जाऊन युद्ध झावें असें ठरलें. तेसमयीं त्याचे कोणी पुरातन विश्वासू चाकरलोक यांची मसलत होती कीं, यासमयीं गोखल्या समोर युद्धास उभें न राहतां डोंगरांत जाऊन तेथें रामोशी सहाय करून जेवेळेस आपला हात चालेल तेवेळेस युद्धप्रसंग करावा; ती मसलत न ऐकतां त्याणें वसंतगडाजवळ गोखल्याची वाट पाहिली, नंतर तो गोखला येऊन युद्ध होऊं लागलें असतां पहिल्याच हल्लामध्यें प्रतिनिधीचे बहुतेक लोक पळून गेले, बाकी थोडकेसे उरले, त्यांसहवर्तमान तो प्रतिनिधि जातीनें लढला, तेसमयीं त्याचा उजवा हात तुटून तोशावूच्या हातीं लागला; मग बाजीरावाच्या राज्याचे समाप्तीपर्यंत त्यास प्रतिबंध होता. त्याचा सर्व मुलूख बापू गोखल्या

नें वांसोदा किल्ला रवेरीज करून तात्काळ घेतला. नंतर त्या वांसोट्या मध्यें तेलीण होती ती आठ महिने लढून शेवटीं तेथच्या राण्याचे कोठीस आग लागल्या मुळें निरुपाय होऊन अपाप तो किल्ला देती झाली.

६ या प्रमाणें बाजीरावानें प्रतिनिधि अगदीं बुडविला. असतां त्या विषयीं लोकांचे मनांत आपण केवळ स्वहितार्थ च प्रतिनिधीचें सर्वस्व हरण केलें असें विषम न वाटावें यासा ठीं त्याचा मुलूख व त्याची वस्तवानी गोरवल्याचे हातीं लागली होती ती सरकारांत न घेतां त्याकडे सचरांडूंदिली. त्या योगें व त्याणें त्या मुलरवाची अमर्याद खंडणी घेतल्यानें तो बापू गोरवला इतर सरदारांपेक्षां थोडक्याच दिवसांत मोठा धनवं त झाला. असें सन अठराशें आठांन घडलें.

बाजीराव आपली निर्बाध सत्ता झाली असें समजून मग प्रतिनिधीचा मुलूख बापू गोरवल्याकडे होता तो सरकारांत मागूंलागला, आणि पूर्वापार्मून त्याचे मनांत संपूर्ण जहागीरदार यांचा सूड उगवावा या विषयीं फार मनीषा होती, तें कृत्य यथास्थित साधावयास उद्युक्त झाला; तेव्हां किती एक लहान लहान जहागीरदार होतें त्यांहीं आपली आज्ञान मानिली असें निमित्त ठेवून त्यांचीं संस्थानें आपल्याकडे जप्त ठेविलीं. याप्रमाणें सर्वांस बुडवावयाची त्यास वासना झाली, परंतु तें इंग्लिशांच्या मता वांचून घडेना; असें असतां ही तो आपल्या मनांतील अर्थ अनेक प्रकारें गोड बोलून लोकांस फसवून कधींकधीं शेवटास नेत असे. त्यांत माधवरावरास्त्या यास इंग्लिशांहीं आपल्या कांहीं कामाकरितां फौज पाठ

वादी ह्मणून आज्ञा केली, ती त्याणें नमा निली, त्या योगें तो अप राधीसा ठरवून त्यास शिक्षा झादी असें इंग्लिशांचे मनें झालें. तेझां बाजीरावानें त्यास मसलत दिली कीं, इंग्लिशास सांगूनतु झें पारिपत्य करणें मजकडे येऊंदे, ह्मणजे तुला तमा दंड होणा र नाहीं; या गोष्टीस तो माधवराव मान्य झाला. नंतर बाजीरा वानें त्याचा सर्व मुलूख घेऊन त्यास कांहीं उरूं दिलें नाहीं. अ सेंच आपा देसाईयास इंग्लिशांहीं कांहीं आज्ञा केली, अस तां त्यांत अंतर करावया विषयीं त्या बाजीरावानें गुप्त मस- लत दिली, आणि त्याचें हीपारिपत्य करावयाचें आपल्याक- डे घेऊन त्याच्या जहागिरीचा चतुर्थांश घेतला.

७ सदाशिव माणकेश्वर तो श्रीमंताच्या पक्षें करून इं ग्लिशांशीं वागत असतां त्याणें तेवेळेस कार्नेलक्लोस साहे ब याचा वकील पारशी जातीचा कुंवरूजी नामें होता त्यास च मोदीही ह्मणत, त्याला वश करून आपल्याकडे घेतला, तो च माणकेश्वर हे दोघे निरंतर एक विचारें वागत असतां बहुत वेळां त्यांहीं आपल्या कार्यसाधनासाठीं भलतीच गो ष्ट साहेबाच्या मनांत आणून देऊन स हित संपादावें. अ- सें कितीएक दिवस चालिलें, मग सन अठरासों अकरांत त्या- काम वर एलफिन्स्टन साहेब गेले, तेझां पासून त्या मोदीचें ते जवढुत कमीं पडलें, आणि तेच समयीं माणकेश्वर व मोदी यां च्याही स्नेहा मध्यें कांहीं अंतर आलें. इकडे त्या दोघाचें ऐक्य पाहून बाजीरावाच्या मनांत आलें कीं, हे दोघे आपल्या ऐक्या मुळें कदाचित् माझ्या उपयोगास पडले असतील, परंतु तेच जर विपरीत झाले तर त्यांचें तेंच ऐक्य माझ्या समूळ नाशास का

रण होईल, यास्तव हीच मसलत कीं, यादोघांत वांकडें पाडून मोदी आपणाकडे घ्यावा, असें मनांत ठरवून त्याणें मोदीस उत्तमपदवी करनाटकची सरसुभेदारी दिली. तेव्हां त्याणें बापूसाहेबानामें गृहस्थ आपल्या हातारवालीं घेऊन तोपेशाव्या कडील अधिकार व इंग्लिशांची चाकरी हीं दोहींकामें चालविली. असे कांहीं दिवस गेल्यावर सदाशीवमाणकेश्वराकडून मोदीस त्या अधिकार संबंधें अन्यायेंवर्तन केल्या प्रकरणीं बोभाट श्रीमंतांजवळ आला, तो ऐकून त्यास पुर्तें समजलें कीं, त्या दोघांत पक्कें बिनुष्ट पडलें. याशिवाय त्या बाजीरावानें आपणास दुसरा एकलाभ कल्पिलाकीं, मी मोदीस मोठा अधिकार देऊन तो आपलासा केला, परंतु त्या एल्फिन्स्टनसाहेबानें तो अर्थ सिद्धीस जाऊं दिला नाहीं, कांकीं, साहेबाचीचाकरी व बाजीरावाकडचा अधिकार हीं दोहींकामें एकानेंच करावीं हें योग्य नव्हे, असें त्याच्या मनांत येऊन त्या मोदीचें दुसरें कांहीं अयोग्य आचरण पाहून त्याणें त्यास दोहोंकामांतून एक काम टाकावयास सांगितलें असतां मोदीनें श्रीमंतांकडचा अधिकार टाकिला

नंतर तो मोदी पुण्याहून दूर घालवावा असें त्याचें कृत्य साहेबाच्या दृष्टीस येऊन त्याला गुजराथेंत वेतन देऊन स्वस्थ बसवावें असें त्यासाहेबानें केलें होतें, तेव्हां तो तेथून निघून तिकडे जावयास सिद्ध झाला, त्याच संधींत रात्रीमध्यें तो विषप्रयोगानेंमेला गेला तें विष त्याणें स्वयें घेतलें किंवा दुसऱ्याचे हातून घात झाला याचा शोध बहुत केला असतांही सिद्धांत झाला नाहीं.

८ करनाटक सरसुभा त्या मोदीनें टाकिल्यावर बाजीरा
वानें तें काम त्रिंबकजीडेंगळ्यास सांगितलें. नंतर तो मोदी
मृत्यु पावल्यावर कांहीं दिवसांनीं इंग्लिशांशीं बोलण्याचाल
ण्याचे वहिवाटीचें काम ही श्रीमंतानें त्या त्रिंबकजीसच दिलें.
तो त्रिंबकजी पूर्वी श्रीमंत महाडास पळून गेले ते वेळेस जा
सूदगिरी करीत असे. त्याणें पुढें बाजीरावाचें मन आपणा
कडे कितीलावून घेतलें तें पुढें एक गोष्ट लिहिली आहे त्या
वरून समजण्यांत येईल. शेवटीं तो अशी प्रतिष्ठा पावलाकीं,
पेशव्याच्या घरीं त्यावांचून कोणतेंही काम होऊंच नये. असेंअ
सतां एकेसमयीं कोणी सराफ मरवते दारास जामीन झाला
होता, त्या मरवते दारापासून सूरकार कामांत अंतर पडल्या
मुळें त्या त्रिंबकजी डेंगळ्यास मोठा राग येऊन त्या सराफास
ओढून आणिलें, तो येतांच त्याच्या डोक्यावर त्रिंबकजीनें स्व-
यें ठोंसरा मारिला, तेव्हां त्याच्या हातांत मोठमोठ्या सोन्याच्या
आंगठ्या व जोडवीं होतीं त्यांचा तडाखा मर्मीं लागून तो ब्राह्म
ण तेथेंच मृत्यु पावला. असा त्या दुष्टापासून अपराध झाला
तरी बाजीरावानें त्या विषयीं मनांत कांहींच खेद मानिला ना
हीं. तो बाजीराव आपलीं अनेक प्रकारच्या खर्चाचीं कामें
मरवत्यानें करवी, तशाच मामलती ही मरवत्यानेंच देत असे,
त्यावरून त्रिंबकजी तर मरवत्यांत अंतर पडल्यास जसें शास
न करीत असे, तसें चोरीस किंवा हत्यास करीत नव्हता.

९ असा कारभार चालत असतां बाजीरावानें पांचकोटि
रुपये आपल्याजवळ जमा केले होते. त्यास प्रतिवर्षी राज्यांत
उत्पन्न एककोटि वीसलक्ष रुपये जमा होत असत, त्यांतील

पन्नास लक्षरुपये मागें ठेवून बाकी खर्चकरी. तो याज्ञिक कर्मी त बद्धुत प्रीति ठेवून आपण आंगें त्याच्छ त्यांत शिरून आपल्यास विद्वान् म्हणवी, आणि त्याच्या बापानें नारायणरावास मारिलें म्हणून त्याउग्रइवाच्या शमनार्थ त्याणें पुण्यासभोंवतीं कितीएक लक्ष आंब्यांचीं झाडें लाविली, व पंढरपुरच्या देवास बद्धूनद्रव्य दिलें. 'या शिवाय त्याच्या गुरूनें त्यास सांगितलेंकीं, माझ्या स्वप्नांत नारायणराव प्रत्यक्ष येऊन बोलिलाकीं, बाजीरावानें लक्ष ब्राह्मण जेऊं घालावे, तें ऐकतांच तसें त्याणें केलें.

१० बाजीराव राज्य करीत असतां त्याणें सन अठराशेंच वर्षांमध्यें त्रिंबकजीच्या मसलतीवरून शिंदे व रघूजी भोंसले यांजकडे वकील पाठवून गुप्तरूपें तह केलाकीं, तुम्ही व आम्ही एकमत असून समयविशेषीं इंग्लिशांस कांदून देऊं. अमाच पेंढाऱ्यांच्या मुख्याकडेही आपला वकील निरंतर रहाव यास पाठविला. नंतर आपण कोंपरगांवीं जाऊन पेंढाऱ्याच्या कितीएकां मुख्यांशीं एकांत केला. ही गोष्ट दुसरे वर्षीं साहेबाच्या समजण्यांत आली, परंतु त्याचा पुर्तेपणें शोध करण्याविषयीं उद्योग न झाला म्हणून त्याबाजीरावास गादीवरूनउठविलें नाहीं.

११ त्यावेळेस इंग्लिशांस घालवून द्यावयाच्या बेतारेरीज दुसरीएक त्याची मसलत होती, ती अशीकीं, गुजराथेंत आपलें मुख्यत्व असावें. त्या ठिकाणीं गोविंदराव गाइकवाड अधिकारी झाल्यापासून त्यावेळे पावेतों गाइकवाड व पेशवे या दोघांच्या देण्या घेण्या संबंधीं हिशेब झाले नव्हते; नंतर बापूमेराव

यास त्याकामाकरितां गाइकवाडानें पुण्यास पाठविलें अस तां, त्यास बाजीरावानें एक कोटिसुमारें द्रव्य गाइकवाडस रकारांतून आमचें यावयाचें आहे असें समजाविलें. तेंदेणें नितकेंही झालें असेल, कांकीं, सन अठराशांच्या वर्षी अमदा बादचा मरवता ठरला; त्या खेरीज सन अठरासों चढूंमध्यें गु जराथेंतील दुसऱ्या कांहीं मुलखाचा मरवता साडेपांचलक्ष रुपये ठरण्यांत आला होता, परंतु बाजीरावाचा बाप रघुना थराव याचापक्ष स्वीकारिल्यानें बडोदेकरास विशेष ऋणझा लें होतें म्हणून त्या कोटींतून साठलक्ष रुपये पेशाव्यानें स्वसं तोषें करून त्यांस सोडावे असें कबूल केलें.

तो एवढया धार्मिकपणानें त्यागत असतां त्याचा उपकार मनांत न आणितां बडोदेकर त्याच्या मागणीस उत्तरे कडील भडोंजेचें उत्पन्न पेशवे घेत आले त्यापेकीं आमचा भाग राहि ला तो, व आबा शेलूकराचें बंड मोडिलें त्याकामास खर्चला गला तो, आणि गुजराथेंतील पेशाव्याच्या मुलखाच्या बंदोब स्तास नवी शिबंदी ठेविली, त्याखर्चाचा आकार झाला असेल तो, असे हे तिन्ही प्रकार मनांत आणून जें तुम्हाकडे फिरेल तें आमचें द्या, असें म्हणू लागले. त्यावरून ज्याचा उलगडा हो ऊंच नये असाउभय तांचा वाद वाढला. आणखी बाजीरावाच्या ही मनांत होतें कीं, हा कज्जा लवकर संपवूं नये, कांकीं, युक्ती नें इंग्लिशांशीं विपरीत वर्तन करावयाचें त्यांत गाइकवाडा स घ्यावयाचें त्याकामास वादावांचून जर वकीलांचे जाणें येणें घडलें तर इंग्लिशांस संशयवाटेल.

१२ अशीच हैदराबादच्या निजामाकडे हा आकांक्षि

ली होती, त्या निमित्तें करून तोही वाद त्या अर्थी लांबविला. त्या विषयीं इंग्लीश समज्दूत पाडीत असतां पेशवा ऐकेना. अशी बाजीरावाची कपटी वृत्ति बापूमेराळनामें महाकुलीन या सकळतांच पेशव्यानें बडोदेकरास लिहिलें कीं, हा वकील या कामास अयोग्य आहे, यास्तव दुसरा कोणी गृहस्थ लवकर पाठवून द्यावा. 'ते समयीं बडोद्यांत धनी असून राज्यकारभार चालविणारा फत्तेसिंग होता, त्याणें आपल्याजवळ खासगीच्या कामावर गंगाधरशास्त्रीपटवर्धननामें कारकून ठेविला होता, तो योग्यतेस चढत चढत त्याचें नाममात्र मुख्यत्वें झालें नव्हतें, बाकी सर्वकामाची वहिवाट तो करीत असे; त्याला पुण्यास पाठवावयाचा निश्चय ठरला. त्याफत्तेसिंगाच्या मनांत हिशेबाच्या गोष्टी खेरीज दुसरें काम करून घ्यावयाचें होतें कीं, गुजराथेंतील पेशव्यांचे महालजे आपण मरवल्यानें घेतले आहेत त्यांची मुदत भरली, यासाठीं पुनः कांहीं वर्षांचा मरवता कबूल करावा, या प्रमाणें नेम होऊन गंगाधरशास्त्री यावर त्रिंबकजीडेंगळ्या कडून एखादा अनर्थ न पडावा अशा अर्थें त्यागाइकवाडानें इंग्लिशांचें अभयवचन घेऊन शास्त्री बाबाला पुण्यास पाठविलें. नंतर त्यादोघी गोष्टींतून एकही सिद्धीस जात नाहीं, असें पाहून तो शास्त्रीबाबा याणें मनांत ठरविलें कीं, हीं दोघीं कार्यें साहेबास सोंपऊन आपण माघारें जावें. त्यावरून पेशवा व त्रिंबकजीडेंगळ्या उभयतांहीं शास्त्रीबाबाचा विशेष मान आरंभिला, कांकीं, तीं कामें जर साहेबाकडे जातील तर बडोदेकराशीं व आम्हांशीं बोलण्याचा प्रकार चालतो आहे तो बंद होईल. असें

समजून शास्त्रीबावा वश करावयाचे मसलतीनें प्रथम त्यांहीं तो माघारा जावयास जो मुहूर्त योजीत होता तो टाकवून दुसऱ्या मुहूर्तावर त्याचें जाणें झालें असें करून त्यास राहून घेतलें. मग ती वेळा येईतों पर्यंत त्रिंबकजीडेंगळ्यानें त्याची अशी स्तुती केलीकीं, तुम्ही याकामास बहूत योग्य आहांत, आणि श्रीमंतही तुमची योग्यता जाणून तुम्हांस मुख्यत्वें कारभार द्यावयास इछितात. असें त्रिंबकजीचें बोलणें त्याला सत्य वाटावें म्हणून बाजीरावही त्यास बोलूं लागला कीं, तुमच्या पुत्रास आमची मेहुणी पुंडरीकनाईकरास्ते यांची नात देणार.

अशायुक्तीनें शास्त्रीयाचें मन मोहित करून आपण पंढरीचे यात्रेला जातेसमयीं त्यासही बरोबर नेलें. तेवेळेस पुण्या मध्यें बापू मेराळ होता त्याणें त्यास नानाप्रकारें समजाविलेंकीं, या समयीं तुम्ही श्रीमंतां बरोबर यात्रेस जाऊं नका, ही माझी मसलत ऐकावी, नाहींतर मला आपल्या बरोबर न्यावें. असें त्या बापू मेराळानें म्हटलें असतां तो शास्त्री कालपाशानें बद्ध झाला होत्साता त्याचें तें हिताचें वाक्य एकही मानीना, शेवटीं तो श्रीमंतां बरोबर पंढरपुरास गेला. नंतर जुलाईचे चवदावे तारिखेस (सन १८१५ चे) त्या गंगाधरशास्त्र्यानें त्रिंबकजीडेंगळ्याशीं संकेत केलाकीं, आजरात्रीस आम्ही भोजन केल्यानंतर तुम्हांसहित देवदर्शनास जाऊं. या प्रमाणें सांगून पाठविल्यावर तेचरात्रीस श्रीमंताचे पंगतीस त्याचें भोजन होऊन तो देवदर्शनास जाणार होता, मग तो संकेत समयजवळ आला तों त्याच्या शरीरास कांहींसें असमाधान होऊन त्रिंबकजीडेंगळ्यास सांगून पाठविलेंकीं, या समयीं माझ्यानें येववत

नाहीं, परंतु त्यास त्रिंबकजीनें अन्यायानें करून बोला विलें म्हणून त्याच्या भिडेस्तव बरोबर हत्यार रहित, म्हणजे हत्यार बंद नव्हत, असे थोडकेसे लोक घेऊन देवास गेला. नंतर देवदर्शन करून त्रिंबकजीशीं कांहीं गोष्टी बोलून तेथेंच माडीवर श्रीमंत बसले होते त्यांज पाशीं गेला, जानोंचत्यां ची सुप्रसन्नता पाहून तो शास्त्री आणि नेपेशवा या उभय तांची आनंदाचीं भाषणें होऊन मोठ्या संतोषानें श्रीमंतां ची आज्ञा घेऊन तो गंगाधरशास्त्री तेथून निघून आपले घरीं जात असतां नीनशें साडेतीनशें पावलें चालून गेल्या वर रस्त्यामध्यें अकस्मात् कोणी हत्यारबंद असे मारेकरी येऊन त्यांणीं त्याचे तुकडे तुकडे केले.

१३ असें दुष्कर्म कोणी केलें तो शोध इंग्लिशांचा वकील करूं लागला असतां, बाजीराव व त्रिंबकजी डेंगळा हे दोघे ही आपल्या आंगीं लागूं देईनात, परंतु सर्वलोकांच्या मतें असें ठरलेंकीं, हें त्रिंबकजीचेंच कृत्य, आणि त्या मारेकऱ्यां नींही त्याचेंच नाव सांगितलें. नंतर तो त्रिंबकजी निःसंशय अन्यायीसा समजून साहेब बाजीरावास म्हणूं लागला कीं, त्या त्रिंबकजीला धरून आमच्या स्वाधीन करा. तें त्याणें

---

† बाजीरावानें गंगाधरशास्त्री मारविला असें पुर्तेपणें त्याकडे ला गू झालें नाहीं, परंतु तें कर्म झाल्यावर त्याच्या मनास वाईट वाटलें नाहीं, सांगलेंच वाटलें; आणि त्रिंबकजी डेंगळा ठाण्यांत बंदीस असतां तेथें पहाऱ्यास जे साहेब असत त्यांशीं भाषण करितां करितां त्याणें कितीएक वेळां सांगितलेंकीं, मी आपल्या धन्याचे आज्ञे प्रमाणें वागलों.

बद्दून वेळ पर्यंत ऐकिलें नाहीं, शेवटीं स्याम नदिलें तर युद्ध करावें लागेल, असें समजून सप्टेंबराचे पंचविसावे तारिखेस तो इंग्लिशांचें स्वाधीन केला. मग त्यांहीं तो मुंबईजवळ ठाण्याच्या किल्ल्यांत ठेविला. तो दुसऱ्या वर्षाचे सप्टेंबराचे बारावे तारिखेपर्यंत त्या बंदींतच राहिला, नंतर नेदिवशीं चार पांच घटकारात्र झाली असतां तो आपला वेष बदलून वाहेरत्याचे सोबती आलेहोते त्यांत मिसळून त्यांबरोबर पळून जाऊन नाशिक व संगमनेर प्रांतचे भिल्ल व गमोशी यांस मिळून आश्रय पावला. मग खानदेश व बागलाण व साताऱ्या जवळ शंभूमहादेवाचा डोंगर यांच्या आसमंतांत राहिला असे; परंतु ज्याज्या ठिकाणीं शिवाजीमहाराज यांणें महत्व संपादिलें होतें तेथें जावयास भीत असे. तिकडच्या लोकांस तेव्हांही शिवाजीच्या गुणाचें फार स्मरण असून त्याच्या वंशीं चा चतुरशिंग तो त्रिंबकजीनें धरून कैद केला तेंही ठावकें होतें, यास्तव जर तो तेथें जाता तर ताबडतोब मारिला गेला असता.

तो चतुरशिंग पुण्याची लढाई झाल्यानंतर होळकर व अमीरखान व रजपूत यांच्या आश्रयानें मुलखांत स्वांच्या घाली त असे; मग सन अठराशें बारांत तो खानदेशांतून आपल्या मुलखास येत असतां त्रिंबकजीनें त्याला भेटीस बोलावून कपटानें कैद करून कांगोरी किल्ल्यावर ठेविलें, तो सन अठराशें अठरांच्या एप्रेलांत मृत्यु पावला. त्याचा भाऊशाहूनामें असे तो त्याचे अगोधरच सन अठराशें आठांच्या मे महिन्याचे तिसरे तारिखेस साताऱ्यांत मेला, त्याचे जागीं त्या

चा पुत्र प्रतापसिंह नामें स्थापिला, तो अद्यापि तें राज्य करित आहे.

१४ त्रिंबकजी डेंगळा गेल्यावर पेशव्याचा कारभार सदाशिवभाऊ माणकेश्वर पुनः चालवूं लागला, त्यास मोरदीक्षित वसईकर व चिमणाजीनारायण हे दोघे सहायहोते. तेवेळेस पेशव्याचे दरबारीलोक व इंग्लिशांचा वकील यांशीं अतिस्नेह आहे असें लोकांस दिसून आलें, परंतु निश्चितार्थ पाहातां बाजीरावाच्या मनांत अनेक प्रकारें दगे करावयाची मसलत होती. त्यांत त्याणें होळकर व शिंदे व नागपूरकर भोंसले व पेंढारी यांशीं पत्रद्वारें ऐक्य ठेवून गुप्तपणें त्रिंबकजीला पैका पाठवून अनेक ठिकाणीं लोक ठेवावयाची आज्ञा दिली असे; आणि पुण्यामध्येंही आपण कांहीं नवी फौज ठेवूं लागला. हें सर्व वर्तमान साहेबास कळून तो त्या कारभारी लोकांस म्हणे कीं, तुमची दग्याची मसलत आहे, त्यावर ते उत्तर करीत कीं, दगा करणे ही गोष्ट किमपि नाही; आणि बाजीराव पेशव्यास तुकताच फुलगांव मुकामीं त्रिंबकजी येऊन भेटला असता तो सांगे कीं, आम्हांस त्रिंबकजीचा ठिकाणा नाहीं. असें त्याचें कुटिळ वर्तन बहुत वेळ चालिल्यानें ती मसलत सिद्धीस जाऊन कदाचित अनर्थ होईल असें पाहून साहेबानें बाजीरावास स्पष्ट सांगितलें कीं, आजपासून एका महिन्यांत त्रिंबकजी डेंगळ्यास आणून घालतर तुमचा व आमचा स्नेह राहील.

असें होऊन इंग्लिशांचें लश्कर जमूं लागलें, तें भयमानून बाजीरावानें त्रिंबकजी डेंगळ्यास धरून आणावयाविष

यीं जाहीरनामे लावून सिंहगड व पुरंदर व रायगड हे तीन कि
ल्ले डेंगळ्या येईतों पर्यंत इंग्लिशांच्या स्वाधीन त्यांणीं मागित
ल्या प्रमाणें ठेविले. याशिवाय पेशव्याचा व इंग्लिशांचा तेस
मयीं नवा तह झाला, त्यांत विशेष इतकाच कीं, पेशव्यानें इ
तःपर गाईकवाडास कांहीं मागूं नये, आणि जी बाकी राहिली
आहे ती बद्दल साडेचार लाख रुपये गाइकवाड प्रतिवर्षी दे
तील ते घेत जावे, व अमदाबादेच्या मरवत्याचे साडेचार लक्ष
रुपये पेशव्यानें गाइकवाडापासून घ्यावे; व वसईच्या तहांत
असें ठरलें होतें कीं, पांच हजार स्वार व तीन हजार पायदळ
इंग्लिशांच्या कामास बाजीरावानें ठेवावे, त्याबद्दल चवती
स लक्षांचा मुलूख पेशव्यानें इंग्लिशांस द्यावा. यांखेरीज आ
हमदनगर किल्ला व नरमदेच्या पलीकडची जितकी पेशव्या
ची प्राप्ति असेल तितकी इंग्लिशांहीं घ्यावी, आणि माधवरा
वरास्त्याची जहागीर बाजीरावानें उगीच जप्त केली होती ती त्या
स माघारी द्यावी.

असें पुण्यांत ठरल्यावर बडोद्याच्या गाइकवाडास पहि-
ल्यापेक्षां विशेष लाभ झाला. त्याचीं इंग्लिशांकडील वाकर सा
हेब याणें तह करून सन् अठराशे पांचांत ठरविलें होतें कीं, त्या
णें इंग्लिशांचीं तीन पलटणें व एक गोलंदाजाची कंपनी आप-
ल्या जवळ बाळगून त्यांचा खर्च आपण चालवावा, त्या शिवाय
या समयीं आणखी एक पलटण पायदळाचें व दोन पलटणें
स्वारांचीं नवीं ठेवावी असें ठरलें.

सन अठराशें पंधरांपर्यंत पेंढारीलोकांचा बहूतउपद्रव झाला†, व अमीरखानाचे पठाणही मुलखांत मोठा दंगा करीत असत, तेव्हां कलकत्त्याचा गवरनर जनराल साहेब यांणें निश्चय केला कीं, या सर्व अनर्थांचा उपशम करून दक्षिण मुलखीं बंदोबस्त नीट राखावा.

यासाठीं शिंदे व होळकर व नागपूरकर वगैरे हिंदूंच्या मुलखांतील सर्व मोठेमोठे संस्थानी यांस कळवावें कीं, आम्ही हें कार्य करितो यास तुमची मदत असावी, या प्रमाणें केल्यास जो मदतीस सिद्ध न होईल तोच या अनर्थाचा घटक व शत्रु असें जाणावें.

मग ही गोष्ट प्रसिद्ध करीत असतां मुंबईचें व मद्रासेचें व कलकत्त्याचें या तिहीं लश्करांची तयारी होऊन त्यांतील किती एकांहीं जाऊन ने बहुतेक पेंढारी मारिले. वरकड लश्कर त्या साहेबानें कार्याचे उपयोगीं कल्पिलेलीं ठिकाणें धरून त्याचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा करीत राहिलें

पुढें याउद्योगाचें असें सार्थक झालें कीं, नागपुरांत रघूजी भोंसला मृत्यु पावल्यावर तेथच्या कारभाराची वहिवाट व्यंकाजी

---

† पेंढारी यांचा उपद्रव इंग्लीश व निजाम यांचे मुलखीं विशेष होता, म्हणून बाजीरावाचें व पेंढारी यांचें ऐक्य आहे असा इंग्लिशांस संशय न-व्हावा याकरितां त्याणें आपल्या लश्कराचा एकभाग कोंकणांत पाठवून त्यांहीं आपणास पेंढारी असें म्हणून आपलाही मुलूख लुटावयाची आज्ञा दिली, त्यावरून त्या लोकांहीं तसेंच केलें.

---

‡ रघूजी भोंसला सन अठराशें सोळांचे मार्च महिन्याचे बेविसावे

मन्याबापूचा पुत्र मुधोजी याणें मुख्यत्वें चालविली, आणि इंग्लिशांस अनुसरून त्याणें आपल्या मुलखीं स्वांचीं पलटणें बाळगावयाचें कबूल केलें. तसाच भोपाळचा नवाबही इंग्लिशांचा सहाय झाला. शिंदा व अमीरखान हेही कलकत्त्याचा गवरनरजनरल साहेब याचे आज्ञे प्रमाणें वागूं लागले. तेव्हां बाल्यात्कारें ह्मिसणयांत आलें कीं, हा बंदोबस्त सिद्धीस जाईल, परंतु नागपूरकर व शिंदा यांचीं चित्तें आंतून बाजीरावाकडे होतीं, तें कपट साहेबास विदित झालें असतां त्याणें त्याचव कशींत अंतर केलें.

नारिखेस मृत्यु पावला. त्याचें पद त्याचा पुत्र परसाजी भोंसला यास प्राप्त झालें, परंतु तो अल्पबुद्धि यास्तव मन्याबापूचा पुत्र मुधोजी याणें तेथल्या कारभाराची वहिवाट मुख्यत्वें चालविली, त्यास आपासाहेब ह्मणत.

भागतेहतिसावा.

सन अठराशें सत्रांच्या आरंभापासून समाप्ती पर्यंत झालेलीं वर्तमानें.

१ सन अठराशें सत्रांच्या जुलाई महिन्यांत बाजीरावपंत वा पंढरपूरचे यात्रेस गेला, तो तेथून निघून कृष्णेचे कांठीं माकुली क्षेत्रीं येऊन त्याजागीं सप्टेंबराचे समाप्तीपर्यंत राहिला. त्याणें इंग्लिशांशीं विपरीत वागणूक करण्या विषयीं ज्याज्या

कल्पना केल्या होत्या त्या त्या सिद्धीस न्यावयाचा विचार त्याअवसरीं तो करीत होता. त्यांचे मसलतींत बापू गोखला मुख्य झाला असे, त्यास बाजीरावानें लिहून दिलें कीं, मी तुझ्या मसलती बाहेर चालणार नाहीं, आणि त्याच्या मनोदयानुरूप त्याचीं सर्वकामें शेवटास न्यावयाचेंही कबूल केलें. नंतर त्याउभयतांच्या मतें विचार ठरला कीं, आपली सर्व तयारी झाली म्हणजे प्रसिद्धपणें एकाएकीं इंग्लिशांवर हल्ला करावा. ही गोष्ट साताऱ्याचा राजा यास विदित करून त्याच्या परिवारासुद्धां त्याला वांसोट्या किल्ल्यावर ठेविलें. इतकेंहोईतों पर्यंत त्याणें आपल्या राज्यांतील बहुतेकां किल्ल्यांवरून संपूर्ण युद्धाचें साहित्य यथास्थित भरून सिद्धता केली. यारवे रीज शिंदे व होळकर व नागपूरवाले भोंसले यांजकडे वकील पाठविले. त्यानंतर त्यांवर्षी अकटोंबराचे एकोणिसावेतारिखेस दसरा पडला, त्याचा समारंभ फार उत्तम झाला, त्या दिवसापासून पुण्यामध्यें पेशव्याची फौज पुष्कळ जमा होऊं लागली, तेलोक गारपिरावर इंग्लिशांची छावणी होती तिच्या सभोंवते अगदीं जवळजवळ उतरले.

तेवेळेस इंग्लिशांच्या लश्कराचा मोठा भाग घोडनदीहून कांठें दूर गेला होता म्हणून पुणेमुकामीं इंग्लिशांचे लोक होते ते फार थोडे असें दिसून आलें, परंतु त्यांचे कुमकेस मुंबईहून एक गोरेलोकांचें पलटण पुण्यावर जावयास सिद्ध झाले होतें, तें वर्तमान पेशव्यास कळलें, त्याकाळीं त्याची मसलत होती कीं, तें पलटण येऊन पोंहचलें नाहीं तोंच कोणे एकेरात्रीस त्या इंग्लिशांच्या पलटणांवर अकस्मात् छापा घालावा. मग

अठ्ठाविसावे सारिखेस तोफांस बैल जुंपून स्वार व पायदळ सिद्ध होऊन मध्यरात्रीस पेशव्याचे आज्ञेनें पुण्याचे दक्षिणेस उभे राहिले होते, ते समयीं इंग्लिशांच्या छावणींतील कोणा एकास ही तें वर्तमान कळलें नाहीं, म्हणून ते सर्व लोक गाढ निद्रेंत निमग्न झाले होते; परंतु संगमावर एल्फिन्स्तन् साहेब हो ता त्यास तो सगळा वृत्तांत कळला. तेव्हां त्याणें आपल्या मा डीवरून कानवसा घेतला तों, त्यास त्या लोकांची मोठी गडबड आहे असें समजलें; तेव्हां प्रथम त्याच्या मनांत आलें कीं, आ पले लोक सावध करून आपणच त्यांवर एकाएकीं चालून जावें; मग दुसरें त्याच्या मनांत आलें कीं, युद्धाचा उपक्रम आ धीं बाजीरावाकडून व्हावा. इतक्यांत त्याच्या जासुदांनीं येऊन सांगितलें कीं, ते लोक कांहीं मसलतीस गुंतले आहेत, आणि ती गडबड ही काहींशी कमी झाली, असें त्या साहेबास वाटलें म्हणून त्याणें आपल्या छावणीच्या लोकांस सावध न करितां तीरात्रतशीच जाऊं दिली. नंतर दुसरे दिवशीं ते छावणी चे लोक सावध झाले सें समजून बापू गोखला तात्काळ छापा घालणार होता, परंतु बाजीरावानें पूर्वीपासून केलेली मसलत चालत आली होती कीं, ते छावणीचे पलटणीलोक ही कांहीं द्र व्य देऊन वश करावे, तो अर्थ पुरतेपणें सिद्धीस न्यावया करि तां त्याणें गोखल्यास आज्ञा द्यावया विषयीं विलंब केला, असें हो तां ती दुसरीही रात्रि गेली. मग तिसरें दिवशीं मुंबईहून नि घालेले गोरे लोक (ते पेशव्याच्या मतें अजून दूर असतील) त्यां हीं मोठमोठ्या मजला करून ते दिवशीं तिसरे प्रहरीं छावणीचें ठिकाण आटपलें. नंतर ती जागा शहराच्या जवळ अडचणीची

यास्तव आपल्या लोकांस सोईची नव्हे असें समजून तेलोक तें स्थान टाकून खडकीच्या पुला जवळ मोकळे जागीं जाऊन प्रशस्त पणेंउतरले. असें नवेंबराचे पहिले तारिखेस ति सरे प्रहरीं पेशव्याचे लोक शहरांतून बाहेर निघून युद्धास येऊं लागले. तेव्हां त्या शहरा जवळ जितक्या उंच जागा तितक्यां वरून पायदळांचा थाट जमला, आणि मैदा नांत जिकडे तिकडे स्वारांची दाटी झाली; तेसमयीं त्याशहरा कडे पाहिलें तों पाण्याचे धारे सारिखी तिकडून येणारां स्वारांची अतूट रव पडली होती. तेंसर्व वर्तमान इंग्लिशास विदित झालें, त्यावेळेस त्याजवळ सवा तीन हजार पायदळ मात्रअ सतां, त्याची मसलत ठरलीकीं, मराठे आपणावर येऊन प डले नाहींत तोंच आपण पुढें होऊन त्यांवर हल्ला करावा. तेव्हां ते आपल्या तळाच्या रक्षणार्थ सुमारें पांचशें लोक ठेवू न बाकीचे सर्व तें ठिकाण सोडून पुढें पाऊण कोस सरल्यावर

+ पूर्वी पेशव्यानें एका पलटणासहित फोर्ड साहेब नामें इंग्लीश आपले चाकरीस ठेविला, तो खडकीच्या पुला जवळ छावणी करून राहिला असें. तो युद्ध प्रसंगी इंग्लिशांस मिळाला तेव्हां सवा तीन हजार इंग्लिशाचें पायदळ जमलें.

र होहीं कडून युद्धास आरंभ झाला. तेसमयीं प्रथम मराठ्यां
चा तोफखाना व बाणांचा मार चालू झाला, मग गोरक्ल्यानेंआ
पले सहाहजार निवडक स्वार जरी पटक्या बरोबर ठेविलेले
होते त्यांस इंग्लीश उभे होते त्यांच्या डाव्या बाजूच्या पलटणाव
र जावयास आज्ञा दिली, तेवेळेस ते पलटणी लोक यांणीं पे
शव्याचे कोणी कवाईत शिकलेले पायदळ लोक होते त्यांव
र जाऊन त्यांस पिटून लाविलें. तेव्हां त्यांच्या बंदोबस्तांत कां
हीं न्यूनता झाली होती, तथापि ते आपणावर शत्रु मोठ्यावे
गानें येतो असें पाहून तात्काळ कांहींशा बंदोबस्तानें उभेराहि
ले. मग ती मराठ्यांची निवडक स्वारांची टोळी या इंग्लिशांचे
उजवे बाजूकडून वेगानें त्यांवर तिरकस चालून येतांना त्यां
चा व इंग्लिशांचा परस्परें भडमार होत असतां ते स्वार केवळ
समीप आले तेव्हां त्या पलटणी लोकांहीं त्यांवर एकदांच भड
मार केला व त्याजागीं दैवयोगेंकरून मोठा चिखलही होता
त्यामुळें घोड्यांस त्यांतून जावयाचें मोठें अवघड पडून एक
मेकांवर पडतपडत त्यांतील थोडकेसे मात्र त्या पलटणा पर्यं
त पोंहचले, व वरकड स्वारांची उधळाउधळी झाली. त्यांतील
कितीएक स्वार इंग्लिशांच्या पाठीमागून जाऊन त्यांच्या छावणी
कडे वळले, परंतु तेथें त्यांच्या मोठमोठ्या दोन तोफा होत्या त्यां
चा मार पाहातांच त्यांहीं तो बेत टाकिला. नंतर इंग्लीश त्याडून
पुढें सरले असतां पेशव्याचे लोक जे ठिकाण धरून उभे होतेत्यां
हीं तें युद्ध सोडून आपल्या तोफांस बैल जुंपून शहरा कडे चालके
ली, त्यांमागें इंग्लीश कांहींसे त्यांस घालवीत जाऊन मगरात्रीचा
अंधार पडूंलागला म्हणून त्यांची पाठ सोडून माघारे आपल्या

छावणीस आले.

तें युद्ध अगदीं हलकें झालें, याचें कारण असें असेल कीं, बाजी रावपेशवा व बापू गोखला यांहीं इंग्लिशांचे पलटणीलोक आप णास अनुकूळ आहेत ते एकही गोळी नमारितां मुकाट्यानें त्या युद्धसमयीं आम्हामध्यें येऊन मिळतील, असें आपल्या सर्वलो कांस सांगितलें होतें, मग त्यांचें विपरीत वर्तन पाहून ते परम विस्मय पावले. याखेरीज ते लोक युद्धास पुण्यांतून बाहेर प डतांना त्यांच्या जरीपटक्याची काठी कांहीं धक्का लागून मोडिली, तो त्यांस मुळींच अपशकुन झाला.

त्या प्रसंगीं पुण्यांत बाजीराव जवळ राहिलेल्या लोकांखे रीज मराठी लश्कर अठराहजार स्वार व आठहजार पायदळ हो तें, त्या पैकीं मेले व जखमी झाले मिळून सुमारें पांचशें पडले, आ णि इंग्लिशांचे मेले व जखमी मिळून शंभरशीं निरुपयोगी झा ले.

२ नंतर दुसरे दिवशीं प्रातःकाळीं घोडनदीकून इंग्लि शांचें एक पलटण व कितीएक स्वार येऊन पोंहचले, तेव्हां गो खला युद्धास पुनः उभा राहीनासा झाला. त्यावर आठां दिवसां नीं इंग्लिशांचे लश्कर जें जनराल स्मिथ साहेबा बरोबर दूर गेलें होतें तेंही येऊन मिळालें. नंतर तो साहेब दुसरे दिवशीं हल्लाकरणार होता, त्यावरून बाजीराव पेशवा पुणें सोडून सातार्‍याकडे पळाला, त्याचे पाठीस स्मिथ साहेब लागला अ सतां तो तेथून निघून पंढरपुराकडे गेला. तेव्हां त्याणें वांसोट्या कून साताऱ्याचा राजा ही आपल्या बरोबर पळवावयास आण- विला, तो त्या वाटेंतच येऊन त्यास मिळाला. नंतर पेशवा जुन-

राकडे जाऊन ब्राह्मणवाडयांत कांहीं दिवस राहिला असतां ते थें कितीएक लोकांसहित त्रिंबकजीडेंगळाही येऊन दाखल झाला. इतक्यांतउत्तरेकडे स्मिथसाहेब आला असें समजूनतो पेशवा आपल्या मंडळासुद्धां तेथून दक्षिणेकडे पळाला.

४ त्यावरून वर्तमान उठलें कीं, बाजीराव पुण्यावर हल्ला करावयास येणार; म्हणून कर्णेल बरसाहेब ते समयीं पुण्यांत मुख्य होता त्याणें घोडनदीकून पहिल्या रेजिमेंटाचें दुसरें पलटण आपल्या कुमकेस बोलाविलें (त्यापलटणास हल्लीं सेकंदयेनेदेर असें म्हणतात) तें पलटण पांचशें बंदुकांचें व त्याजबरोबर पंचवीस गोरे गोलंदाजसुद्धां दोन तोफा व नवेडे विलेले तीनशें मराठी स्वार होते, तिलक्यां सहित तें सैन्य अकराशें सत्रांच्या दिसेंबराच्या शेवटल्या दिवशीं रात्रीस आठवा जतां निघून सारीरात्र चालून सकाळीं दहा वाजतां भीमेच्या कांठीं कोरेगांवावर पोंहचलें. तेथें नदीपलीकडे पंचवीसहजार स्वार व पांचहजार पायदळ इतक्यांसहित पेशवा उतरला होता, त्यास पाहून त्या पलटणाचा मुख्य कपतान स्टांतन् साहेब याणें त्या ओसाड पडलेल्या कोरेगांवामध्यें आश्रय धरिला. तोपर्यंत बापूगोखला व आपादेसाई निपाणकर व त्रिंबकजीडेंगळा यांच्या मसलतीनें आरब व गोंसावी यांच्या तीन टोळ्या नदीउतरून तिहींकडून इंग्लिशांच्या नाशास त्या गावांवर जाऊं लागल्या, तो उद्योग शेवटास न्यावयाकरितां त्यांच्या कुमकेस दोन तोफा सुरूकरून बाणांचाही मार चालविला. नंतर त्या गांवच्या रस्त्यांत उभयपक्षी लोकांनी झटून मोठया निकरानें युद्ध केलें, तेसमयीं त्या कितीएका

रस्त्यांतून आरबांहीं इंग्लिशांचे लोकांस बाहेर घालविलें, तेव्हां त्या त्या चाटांनीं इंग्लिशांहीं नेटानें भांत शिरून त्या आरबांस ही बाहेर काढिलें. असें त्या गांवांत जागोजाग बऱ्हुत वेळां झालें, शेवटीं त्या गांवाचें मध्य भागीं एक गढी सारिखी जागा हो ती ती त्या साहेबास नकळतां रिकामी राहिली, तींत कितीएक.. आरब शिरले ते त्यांस बाहेर काढतां येईना. इतकें होईतों पर्यंत मराठ्यांचे सांर ही येऊन त्या गांवास भोंवते जमले, त्या मुळें नदीची वाट बंद होऊन इंग्लिशांच्या लोकांस पाणी मिळेना सें होऊन ते फार हैराण झाले. तों पर्यंत इंग्लिशांच्या दोन तोफा एके टेंकडीवर ठेविल्या होत्या त्या मोठ्या उपयोगीं पडल्या; परंतु त्यांचे साहेब सरदार व बऱ्हुतेक गोरे गोलंदाज मेले गेले, असें पाहून त्या आरबांनीं वेगानें चालकरून त्यांतील एक तोफ घेतली. ते समयीं त्या पलटणाचा मुख्य पेटीसनू नामें साहेब असे त्यांणें फार शौर्य केलें, त्याच्या उरास गोळी लागून पाठींतून पार गेली, त्या जखमेनें तो मूर्छित पडला असतां त्याणें तेंवर्तमान ऐकतांच आपल्या जवळचे लोक होते ते त्वरित जमा करून आपल्या हातीं उफराठी बंदूक घेऊन त्या आरबांमध्यें घुसून कितीएकांस बंदुकेच्या दस्त्यानेंच मार मारीत मारीत त्याणें ती तोफ माघारी घेतली. त्या संधींतच त्याचे छातींतून दुसरी गोळी पार होऊन तोहि रुपयुक्त होत्साता भूमीवर पडला. याप्रमाणें तें युद्ध अस्तमान पर्यंत झालें असतां रात्रीच्या आरंभीं मराठ्यांकडून कांहीं सैन्य हलकें पडलें, तेव्हां इंग्लिशांकडील लोकांस पाणी मिळावया जोगा अवसर सांपडला, मग नऊवाजतां मराठे अगदीं युद्ध सोडून गेले. दुसरे दिवशीं उजाडतांना मराठ्यांचें लश्कर दक्षिणे कडे नि

घूनजातें असें दृष्टीस पडलें, तेसमयीं शांतन् साहेबा नें त्यांवर आपल्या दोहों तोफांचा मार चालविला असतां त्यांतील कोणी माघारा न फिरतां ते सर्व निघून गेले. तेव्हां नो साहेब आपले पडलेले जखमी लोक आपल्या सामर्थ्या प्रमाणें नेववले तितके घेऊन त्या दोहीं तोफांसुद्धां माघारा घोडनदीस गेला. त्यालढाईंत इंग्लिशांचे मेले व जखमी झाले मिळून एकशें छप्पन शिपाई व वीस गोरे गोलंदाज पडले. इतकें होऊन ज्याच्याउरांतून दोन गोष्या पार झाल्या तो पेटीसन साहेब आपल्या तंबावर पोंहचल्या नंतर मरण पावला. या शिवाय दुसरे दोघे साहेब त्यालढाईंत मृत्यु पावले व दोन जखमी जाले. आणि नवे ठेविलेले तीनशें मराठी स्वार होते त्यापैकीं दीडशें उरले, व रकड कांहीं मेले व कांहीं जखमी झाले व कांहीं पळाले. मराठ्यां कडील सुमारें पांच सहाशें लोक पडले.

बाजीराव पेशवा याजवळ इतका बंदोबस्त असतां तो कोरेगांव सोडून गेला याचें कारण काय असें कोणी म्हणेल, तर समजावें कीं, जनरल स्मिथ साहेब जाऊन त्याजवळ पोंहचला म्हणून तो निघून गेला. मग तो पेशवा तेथून दक्षिणेस गेल्यावर तिकडचा ही मुलूख मद्रासेच्या लोकांहीं घेतला असें त्यास कळतांच तो सालप्याच्या घाटानें शोलापुरास जाऊन राहिला, आणि तेथची कांहीं खंडनीही घेतली. नंतर नागपूरकराचा गणपतराव सुभेदार ही त्यास मिळाल्यावर पंढरपुरास जावयाचा बेत झाला, तेव्हां पेशव्या बरोबर बापू गोखला ही होता.

५ असें असतां फेब्रूआरीचे एकोणिसावे तारिखेस त्या गोखल्या सुद्धां बाजीराव आष्टेगांवीं जाऊन उतरला असतां

जनरल स्मिथ साहेब एकाएकीं येऊन पोंहचला असें वर्तमान त्यास समजलें, तेव्हां त्याणें गोरवल्यास रोषें करून निरोप पाठविलाकीं, तुह्मी आमचें रक्षण कोणें प्रकारें करितां, व आम्हांवर छापा कसा आणा तें सांगा, तेव्हां गोरवल्यानें उत्तर दिलें कीं, या समयीं तुमची पाठ संभाळण्यांत चुकणार नाहीं. असें सांगितल्यावर त्याणें आपादेसाई निपाणकर याचे चारहजार स्वेच्छ आपल्या पाठी मागें रक्षणास ठेऊन आपण पांचशें स्वारां निशीं इंग्लिशांची वाट पहात राहिला.

ते समयीं त्या स्मिथ साहेबाजवळ तुरुक स्वारांचीं काळीं पलटणें होन व गोरें पलटण एक व घोडे जुंपिलेल्या कांहीं तोफा इतकेंच होतें, आणि पायदळ होतें तें मागें राहिलें होतें. मग त्या उभयपक्षीं लढाईची गांठ पडली असतां मराठ्यांहीं बंदुकांचा मार चालविला, आणि त्या गोरवल्याचे दृष्टीस पडलें कीं, ओटयाचे अडचणीनें इंग्लिशांचें पलटण बंदोबस्तावांचून येत आहे, म्हणून तो तीनशें लोकांनिशीं वेगेंकरून त्यांवर चालिला, त्यामुळें त्या पलटणाची कांहीं अव्यवस्था झाली, परंतु तेव्हां बेछूस गोरे पलटणाचे टोळीने त्या ऊभ्या पलटणाचे पाठी मागून मोठ्या वेगानें जाऊन एकीकडून त्या मराठ्यांमध्यें शिरून गोरवल्यास ठार मारिलें. नंतर इंग्लिश त्या लोकांचे पाठीस लागले असतां त्यांचें कितीएक सामान व कितीएक हत्ती व घोडेही त्यांस सांपडले. यांत विशेष इतकाच कीं, सातार्‍याचा राजा त्याच्या परिवारासुद्धां इंग्लिशांच्या हातीं लागला.

६ पुण्यांत बाजीराव पेशवा यानें इंग्लिशांशीं कृत्रिम युक्त स्नेह करून शेवटीं त्यांशीं युद्धही केलें, तें वर्तमान ऐकून नाग-

पूरकर इंग्लिशांजवळ त्यापेशाव्याची निंदा करूं लागला, परंतु त्याच महिन्याचे सत्ताविसावे तारिखेस तेथें इंग्लिशांचे लोक होते त्यांवर एकाएकी सेना पाठविली. तें त्याचें लश्कर नऊ हजार स्वारवसुमारें नऊहजार पायदळ इतकें होतें, त्यांत तीन चार हजार आरब कितीएकां तोफां सहित होते. तेसमयीं तेथें इंग्लिशांचे + चवदाशें पायदळ, व गोरे गोलंदाजां सहित चार तोफा होत्या, आणि दोनशें सुमारें बंगाली पलटणाचे स्वार असत.

७ तें युद्ध शिताबळ नदी नामक एक टेंकडी नागपूर शहराजवळ आहे तिच्या आसमंतात घडलें; त्याचा आरंभ अस्तमानीं होऊन दुसरे दिवशीं दोनप्रहर पर्यंत मोठ्या निकरानें तें चालिलें. त्यांत आरब व इंग्लीश यांहीं कोरे गांवचा लढाई प्रमाणेंच परम शौर्यकेलें. तसेंच इंग्लिशांकडे बंगाल रवा त्यांतील सहाव्या रेजमिंटाचे स्वार होते तेतर बहुतच उपयोगीं पडले, त्यांहीं नागपूरकराचे स्वारांच्या मोठ्यास मुद्दायांतवेगानें प्रवेशकरून त्यांची उपळाउधळी करून त्यांतील कितीएक पायदळही मारून त्यांच्या दोन तोफा हिरून आणिल्या, तोंपर्यंत इंग्लिशांच्या पायदळास जयाविषयींसंशय होता, मग हें कृत्य त्यांहीं टेंकडीवरून पहातांच त्यांस विशेषधैर्य उत्पन्न होऊन तेजेजेकारपुरःसर मोठा शब्द करून वेगानें पुढें सरतांच मराठ्यांचा मोडशाला. त्या प्रसंगीं इंग्लि

+ चवदाशें पायदळांत दोन कंपनी तेथें इंग्लिशांचा वकीलत्या चे खासगीच्या असत, बाकी सर्व मद्रासेचे होते.

शांचे मेले वजरवमी मिळून सवातीनशें पडले; तितकेंच मरा ठ्यांचे ही निरुपयुक्त झाले.

८ तो आपासाहेब नागपूरकर याणें दग्याचें आचरण केलें नें सिद्धीस नगेलें ह्मणून आपल्या वरचा अनर्थ टाळावा याकरितां इंग्लिशांस सांगून पाठविलें कीं, ही गोष्ट माझे आज्ञेनें झाली नाहीं, त्यांवर साहेबानें उत्तर केले कीं, तुमच्याज वल्चे सर्वलोक दूर केल्या शिवाय तुमचा व आमचा व्यवहार चालणार नाहीं. नंतर चडूंक डून त्या साहेबाच्या साह्यार्थ आणखी आणखी फौजा येऊं लागल्यावर दिसेंबराचे पंधरावे तारिखेस त्याणें त्या आपासाहेबास निरोप पाठविला कीं, तुह्मास आमचा स्नेह पाहिजे असल्यास आपली सर्व फौज दूर करून मुलखाच्या रक्षणाचें काम आह्मांकडे ठेवावें; आणि तुमचा दुसऱ्या कोणापासून दगा न होण्यास तुह्मी आमचे जवळ येऊन रहावें; यागोष्टीचें उत्तर करावयास तुह्माला यावेळेपासून पाहांटेची दोन घटका राव उरे तों पर्यंत अवकाश दिला आहे.

असें होऊन तीवेळ गेल्यानंतर इंग्लिशांचें लश्कर त्या नागपूरकरावर चालिलें. तें समजून तो आपासाहेब स्वयें निघून साहेबाचे भेटीस आला, तेव्हां इंग्लिशांचें लश्कर तेथेंच उभें राहिलें असतां त्याणें आपल्या तोफखान्यांतील संपूर्ण तोफा त्यांस आणवूं दिल्या, परंतु त्याच्या ज्या तोफा बाहेर होत्या त्या जेव्हां इंग्लीश हस्तगत करूं लागले तेव्हां त्याचे मराठेलोक तयार होऊन इंग्लिशांवर चालिले, तेसमयीं इंग्लिशांची फौज पुनः त्यांवर चालू होऊन मोठ्या बलात्कारानें त्या

तोफा घेतल्या.

शेवटीं त्याबाहेरच्या तोफा इंग्लिशांस न देणारे असे त्याना गपूरकराचे गणपतराव सुभेदार व मनभट्ट नामें दोघे सरदार होते, त्यांतील गणपतराव तो बाजीरावास जाऊन मिळाला, आणि मनभट्ट तो आपल्या आरबांसहित नागपूरच्या किल्ल्यांत बळ धरून राहिला. तें ठिकाण इंग्लीश शिडीलाऊन एकदांच घेणार होते तें सिद्धीस न जाऊन थोड्याच दिवसांनीं ते आरब आपल्या परिवारासुद्धां इंग्लिशांच्या अभयवचनानें निघून गेले असतां, तो मनभट्ट त्यांचे स्वाधीन झाला. त्या पुढें नागपूरकर व इंग्लीश यांचा तह ठरलाकीं, इंग्लिशांहीं नागपूरकराचा संपूर्ण मुलूख संभाळावा त्याबद्दल त्यांनां चोवीस लक्ष रुपये प्रतिवर्षी उत्पन्न होतसा मुलूख त्यास द्यावा.

९ याप्रमाणें दक्षिणेंत व पूर्वेस दंगा होत असतां माळव्यांत व हिंदुस्थानांत बंगाला व मद्रास यांच्या फौजा एकत्र मिळतांना त्यांहीं कितीएक जागीं पेंढाऱ्यांचा मोड केला होता, त्यांतील एक चितू नामें त्या पेंढाऱ्यांचा मुख्य असे त्याच्या पाठीस जनरल माल्कम साहेब लागला, तेव्हां त्या चितूला होळकरानें आपल्या लश्करांत घेतलें. याशिवाय अणखी कितीएक प्रकारांहीं होळकर आपला दुसमान झाला असें त्या माल्कम साहेबास विदित झालें. तेव्हां तो त्या चितूची पाठ सोडून माघारा मद्रासेच्या मुख्याची फौज होती तींतजाऊन मिळाला. नंतर तेथून होळकरास कांहीं वागणुकीचे प्रकार गवरनर जनरालाच्या कल्पनेंप्रमाणें सांगून पाठवि-

लें; त्याचें उत्तर अधींगीकारासदृश होळकराकडचे गफूरखा न वगैरे पठाणांचे सरदार यांहीं मल्हारराव होळकराचे नावें देऊन ऐक्य होईलसें किती एक वेळां दर्शविलें, परंतु तेचवेळेस त्यांचे स्वारांनीं जाऊन इंग्लिशांच्या कितीएक बुणग्याचा नाश करून म्हैसूरचा राजा तत्पक्षी म्हणून त्याच्याही स्वारांवर हल्ला केला, त्यावरून तेथें जो इंग्लिशांचा मुरव्वा होता त्याणें निश्चय केलाकीं, आतां या अनर्थाचा उपशम केलाच पाहिजे. तेसमयीं त्या पठाणांहीं आपल्यामंडळांत फितूरांच्या शंकेनें यशवंतराव होळकराची स्त्री तुळसाबाई तिला मारून टाकून तिचा मुख्य कारभारी गणपतराव नामें होता त्यास बंदींत घातलें. असें झालें असतां शिप्रानदीपलीकडे होळकराचा तळ होता, त्यावर इंग्लीश चालिला.

तेसमयीं होळकराचें लश्कर दहाहजार स्वार व दहाहजार पायदळ इतकें होतें. तें लश्कर त्या शिप्रा नदीच्या वळणानें कोंपऱ्यासारखी झालेली जागा ती निर्भय असें पाहून तेथें स्थान धरून राहिलें होतें. त्यालश्कराचे डावे बाजूस नदीची मोठी दरड आणि उजवे बाजूनें मोठा ओढा असे; आणखी त्या लोकांनीं आपल्या लश्कराचें तोंड नदीकडे करून त्या आंगीं आपल्या पुढून मोठमोठ्या सुमारें सत्तर तोफा ओळीनें ठेविल्या होत्या, तेथें इंग्लीश त्यांवर जाऊन पडल्याचे पूर्वी त्यांस ती नदी उतरावी लागली. तिच्या प्रवाहापासून आठशें साडे आठशें पाउलें होळकराच्या लश्करास अंतर होतें. तें स्थान असें दुर्गम आणि होळकराचे स्वार ही आपल्या समुदायांतून बाहेर निघून जिकडे तिकडे पसरून उत्तम प्रकारें लढत होते,

तथापि इंग्लीश मोठ्या नेटानें त्या नदीचा उतार पार झाले; नेट्कांच शत्रूवर जाऊन पडावयाचे पूर्वी आपल्या कवायतीलो कांचा बंदोबस्त राखणें त्यांस आवश्यक व त्यास कांहीं वेळ पाहिजे, आणि आपल्या तोफा होळकराच्या मोठ मोठ्या तोफांपुढें निरुपयोगी म्हणून ते त्याच ठिकाणीं उभेरा हिले असतां शत्रूकडील तोफांच्या भडमाराने त्यांतील कितीएक मेले गेले. त्यांची तयारी झाल्यावर जनरल् मालकम साहेबानें आपल्या लोकांसहित मोठ्या वेगानें त्यांवर चालकेली असतां त्यांपुढें शत्रूच्या पक्षाचें पायदळ व स्वार यांतील कोणी एकही टिकला नाहीं. त्याचे गोलंदाज मात्र आप आपल्या तोफांस टाकून जाईनांत, नेणेंकरून ते बऱ्हतेक त्या ठिकाणींच मेले गेले, इतरजे उधळून गेले होते त्यांचे पाठीस इंग्लिशांचे स्वार व पायदळही लागून त्यांचे तीन हजार लोक मारिले.

नेट्कां शत्रूनें आपल्या तोफांतील लहानलहान तोफास हामाच नेल्या, वरकड इंग्लिशांस प्राप्त झाल्या. त्या युद्धांत इंग्लिशांचें सैन्य पायदळ एकपलटण गोरे लोक व सातपलटणें काळे लोक आणि काळे स्वार चारपलटणें व गोरे स्वार सुमारें दोनशें व कितीएक साधे बारगीर याइतक्यांतून पावणें आठशें पायदळ होऊन निरुपयुक्त झाले. तें युद्ध मेहदपुर नामक गांवाजवळ झालें, म्हणून त्यास मेहदपुरची लढाई असें नाव पडलें. त्या युद्धांतून होळकराचें एक पलटण आपल्या बंदोबस्तानें रामपुरापर्यंत गेलें होतें तेथें बंगाल्याच्या लश्कराचे एकेटोळीची गांठ पडून त्यांची उधळाउधळी झाली.

१० असा जय झाल्यानंतर तो मालकम साहेब त्या शत्रू-

च्या पाठीस लागला असतां मंदीसुरास होळकराचा पुत्र मल्हारराव तो इंग्लिशांच्या स्वाधीन झाला. तेसमयीं इंग्लिशांचें दत्याचें ऐक्य होऊन ठरलेंकीं, अमीरखानानें पूर्वीजोतह होळकराच्या नावानें केला होता तो मान्य. त्याखेरीज त्या होळकरानें इंग्लिशांचा पक्षी कोट्याचा राणा यासही कितीएक परगणे दिले. व पूर्वी होळकर रजपुतां पासून खंडण्या घेत होता ती इंग्लिशांहीं घ्यावी, आणि बुंडी पर्वताचे उत्तरेकडे वसात पुड्याचे दक्षिणेकडे जे थेंजे थें त्याची सत्ता होती तो मुलूखही इंग्लिशांहीं घ्यावा. याखेरीज इंग्लिशांहीं होळकराच्या मुलखाचें रक्षण करावें, त्यां बरोबर त्याची तीन हजार फौज असावी.

मराठ्यांही मेहदपूरचे लढाईनंतर आपला अर्थ सिद्धीस जात नाहीं असें समजून तो उद्योग टाकिला. बाजीरावाज वळ मात्र थोडके सैलोक उरले असतां त्यास कर्तव्यार्थ सुचेना ह्मणून तो मुलखो मुलखीं पळत सुटला, त्यावर चढूंकडून इंग्लिशांच्या टोळ्या जात होत्या.

शिंद्यास मेहदपुरचें वर्तमान कळतांच तो इंग्लिशांच्या सूत्रानें वागूं लागला. त्याच्या कोणी सरदारांहीं बळ धरून इंग्लिशांस किल्ले द्यावयाचा अडथळा केला, त्यांवर फौजा पाठऊन थोड क्याच वेळानें इंग्लिशांहीं त्यांस जिंकिलें.

अमीरखान व पठाण लोक पूर्वीचि शिताबळदीचे लढाई पासून मराठ्यांचे बळ चालणार नाहीं असें समजून साहेबानें ठरविलेल्या नहा प्रमाणें वर्तूं लागले.

११ पेंढारी लोकांवर बंगाला व मद्रास व मुंबई येथील सैनेच्या टोळ्या जाऊन त्यांतील कितीएकां पेंढाऱ्यांस मारून

त्या लोकांहीं जेजे मुलूख घेतले होते तेते सोडवून ज्यांचे त्यांस माघारे देऊन त्यापेंढाऱ्यांचे मोठे मोठे सरदार धरून आणिले. त्यांपैकीं नामदारखान व खरीमखान सन अठराशें अठरां च्या फेब्रूआरींत मालकम साहेबाचे स्वाधीन झाले. तिसरा वाशिल महंमद तो शिंद्याचें स्थान ग्वाल्हेर येथें आश्रय पा वला होता, तो इंग्लिशांच्या सांगण्या वरून शिंद्यानें त्यांचे स्वाधीन केला. आणखी चितू यास बहूत संकटें प्राप्त होऊन शे वटीं अशीरगड किल्ला येथें त्याणें आश्रय धरिला, तेंही स्थान इंग्लीशा लदून घेऊं लागले असतां, तेथून तो चितू एकटा च रानांत पळाला, तो एका वाघानें त्या अरण्यांत मारिला असें निश्चित समजण्यांत आलें.

पश्चिमेकडे मुंबईच्या सरकारानें पूर्वीचि फौजा पाठवून रायगडवगैरे कोंकणचे लहान मोठे किल्ले सर्व घेतले. असें असतां बाजीरावमात्र साहेबाचे हस्तगत झावयाचा राहि ला, तेंही त्याच वर्षाच्या जुलाई महिन्यांत सिद्धीस गेलें. तोप कार लिहिल्याचे पूर्वी नागपूरकराचें कांहीं वर्तमान समज लें पाहिजे तें लिहितों.

१२ तोआपासाहेब नागपूरकर शिताबळदीचे लढाईनंतर इंग्लिशांच्या स्नेहानें पुनः आपल्या गादीवर बसल्या पा सून त्याणें अनेक प्रकारें विपरीत वर्तणुकी गुप्तपणें केल्या. त्यांत गोंडनामें कोणी रानवटलोक यांस बंडें उठवावयाची मसलत दिली, आणि आपण इंग्लिशांस किल्ले द्यावयासक बूल होऊन किल्लेदारांस आंतून मांगितलेंकीं, किल्ले न द्या वे. या शिवाय तो बाजीरावास ही म्हणत असें कीं, तुमची

कुमक असल्यास आम्ही इंग्लिशांस उलटून गोष्ट सांगूं. हें सर्व प्रकरण इंग्लिशांच्या वकीलास विदित झालें होतें. त्या वरून बाजीराव याणें गणपतराव सुभेदार याजबरोबर फौज पाठविली असतां त्यावर इंग्लिशांचीं पलटणें जाऊन त्यांची वरदानदीचे कांठीं गांठ पडून एप्रेलाचे चवथे तारिखेस त्याचा पराभव झाल्या नंतर तो आपासाहेब हीं नागपुरीं इंग्लिशांहीं कैद केला.

१३ त्या पूर्वीच्चि बाजीराव नागपूराच्या मुलखीं आश्रयार्थ वरदानदीचे पश्चिमेस जाऊन उतरला असतां त्यास इंग्लिशांच्या एका टोळीच्या भयानें तेथून ही दुसरी कडे उठून जाणें प्राप्त झालें. ते समयीं सेवनी पाशीं इंग्लिशांच्या दुसऱ्या कोणे एके टोळीची गांठ पडली तेव्हां त्याच्या लोकांचा नाश होऊन जे त्याजवळ शिपाई व जहागीरदार उरले होते ते बहुतेक आपापल्या ठिकाणास गेले.

१४ यानंतर बाजीरावानें नर्मदा पार उतरून जावयाची मसलत केली, परंतु सर्वत्र इंग्लिशांचा बंदोबस्त आहे असें पाहून मग आशीर गडाकडे जाऊन मालकम साहेब इंदुराजवळ लश्कर सुद्धां होता त्यास प्रार्थना पूर्वक पत्र लिहून पाठविलें. नंतर जुलाई महिन्याचे तिसरे तारिखेस त्यांनीं व साहेबाची भेट होऊन तो राज्याची आशा सोडून इंग्लिशांचे स्वाधीन झाला. ते समयीं ठरलें कीं, त्याणें एरवाढे क्षेत्रीं इंग्लीश देतील तो खर्च खाऊन रहावें. तेव्हां त्या मालकम साहेबानें कृपा करून त्याचा भाऊ अमृतराव यास प्रतिवर्षीं आठलक्ष रुपये कंपनी सरकारांतून पोंहचत आले तसेच यास ही द्यावे

असें केलें. ही गोष्ट कलकत्त्याचा मुख्य गवर्नर जनराल साहेब याच्या मनास येऊन त्याणें त्या बाजीरावास बंगाल्याकडे कान पुरापाशीं बिठुर नामें क्षेत्र आहे तीं जागा रहावयाची नेमिली, त्या ठिकाणास मराठे ब्रह्मावर्त म्हणतात.

त्रिंबकजी डेंगळ्या याचे पाठीस इंग्लिशांची टोळी लागून तो खान देशांमध्यें अहीर गांवा जवळ धरिला, तो नाल्काळ बंगाल्यांत चरनारगड नामें बळकट किल्ला आहे तेथें बंदीस घातला.

नागपूरकर आपासाहेब यास केद करून बंगाल्यांत पाठवितांना तो कांहीं सवड पाहून पळाला, त्याणें शीखलोकांचे मुलखीं जाऊन आश्रय धरिला. तो कपटी व अविचारी व पराक्रम हीन म्हणून साहेबलोक त्याची गणना करीत नाहींत.

१५ असें उत्तरेकडे वर्तमान असतां एप्रेलाचे अकरावे तारिखेस इंग्लिशांहीं साताऱ्याचा राजा मोठ्या समारंभानें गादीवर बसविला, त्यास मुलूख पश्चिमेस सह्याद्रीपासून वरता पंढरपुरा पलीकडे कांहींसा व दक्षिणोत्तर चारणा नदी व निरानदी यांची मर्यादा करून दिला. त्यामुलखांत बाजीरावाचे कांहीं उरलेले पायदळ लोक सुमारें साडेचार हजार व तेरा तोफा इतक्यां सहित गणपतराव सुभेदाराउपद्व करीत असे, तें समजून मद्रासेचा कोणी जनराल मनरो नामें साहेब मोठा विख्यात होता, त्याणें करनाटक सरसुभा घेतला, त्यासाहेबानें तेथून उत्तरेस जाऊन सोलापूरच्या किल्ल्यापाशीं त्याची गांठ पाडून युद्ध करून त्यागणपत

राबाचे बहुतेक लोक मारून त्यास हांकून दिले; नंतर थोड क्याच दिवसांनीं तो किल्ला ही घेतला.

याप्रमाणें संपूर्ण दक्षिण मुलूख इंग्लिशांच्या सत्तेंत आ ल्यावर मग तेथील जहागीरदार वगैरे कोणी इंग्लिशांस अनुसरून होते व कोणी तद्विपरीत होते, त्यांस कोण कोण त्या प्रकारें देण्या घेण्याच्या योगें वाढवावें किंवा बळहीन क रावें त्या योजनेचा विचार इंग्लीश करूं लागले.

प्रथम बुंडीचा राजा रजपूत याचा पहिल्या पासून इंग्लि शांशीं स्नेह होता, त्याला पूर्वी शिंद्यास खंडणी द्यावी लागत असे तें चुकलें; व शिंदे आणि होळकर यांहीं बलात्कारें जो त्याचा मुलूख घेतला होता तो त्यास पुनः प्राप्त झाला. असा च भोपाळचा रजपूत राजा ही पूर्वी इंग्लिशांच्या उपयोगीं पड लेला त्यास आष्टा व इच्छावर व सेहोर व दोवाहा व देवापा- ना असे पांच परगणे व माळव्यांतील जप्त केलेला विंचूर करांचा कांहीं मुलूख आणि सुजावलपूर परगण्यांतील कां हीं भाग, व किल्ला इसलामनगर नामें तो शिंद्यांकडे असे त्या बद्दल दुसरा कांहीं मुलूख देऊन तें स्थान त्यास दिलें.

निजाम यास बाजीरावाचें देणें सहा कोटी रुपये होतें तेंफि टावया साठीं त्याला पेशव्यास दहा लक्षांचा मुलूख द्यावा लागत होता तो न लागला; व पेशवा किंवा त्याचे लोक त्या निजा माच्या राज्यांतील बारा लक्षांचा मुलूख इंग्लिशांशीं व मरा- ठ्यांशीं युद्ध लागे तों पर्यंत वहिवाटीत होते तो त्याचा त्यास प्राप्त झाला; पारवेरीज होळकर व नागपूरकर यांच्या मुलखां तील सहा लक्षांचा सुमारें मुलूख इंग्लिशांहीं त्यास दिला.

नेझां त्या युद्धाचे पूर्वी ज्यें त्या राजास मिळत होतें त्या पेक्षां अ
ठ्ठावीस लक्ष रुपये अधिक मिळूं लागले असतील अशी अ
टकळ होते.

दक्षिणेंत जितकीं वेतनें व आग्याहारें व इनामें पुरा
तन चालत आलीं होतीं तीं इंग्लिशांहीं तशींच चालविली,
आणि जहागीरदारही बहुतेक तसेच रक्षिले. कोल्हापूरक
रास पहिल्यापेक्षां विशेष, चिकोडी व मनोळी हे दोन परगणे
मिळाले. यारेरीज जे कोणी इंग्लिशांचा पक्ष धरिलेले गृह-
स्थ लोक होते त्यांस अनेक प्रकारें संतुष्ट केलें. दुसरें, जेस
रकारचे कारभारी नेमणुके वांचून बाजीरावाजवळ उगेच
आश्रयमात्र धरून राहिलेले असत त्यांस, व नानाफडनविसा
चे वेळेपासून जे मोठे मोठे गृहस्थ दरिद्री झालेले होते त्यांस
योग्यतेनुसार कोणास कांहीं जमीनी व कोणास कांहीं वेतनें
देऊन एल्फिन्स्टन साहेबानें सुखी केलें. तसेच कितीएक
सरदारही दरिद्रानें पीडिलेले पाहून त्यांस कांहीं निर्वाहाच्या
कल्पना योजिल्या, व पुण्या मध्यें सर्व हिंदू लोकांस आप आप
ल्या रीती प्रमाणें गणितादि विद्या शिकावयाची शाळा घात-
ली.

इंग्लिशांहीं युद्ध यत्नें करून मराठी राज्य संपादिलें अ
सतां कोणाचेंही वाईट न होय अशी कल्पना योजून त्या रा-
ज्यांतील संपूर्ण प्रजेस सुख कारक अशा वर लिहिलेल्या म-
र्यादा करून ठेविल्या. यांचे मुख्य कर्ते महासमर्थ परम द
यावंत असे इंग्लिशांचे गवरनर जनराल मारक्वीस हेस्ति-
ङ्स साहेब व त्यांचे सहाय तत्समानशील मोठे नामांकित

एल्फिन्स्टन साहेब, हे पुरुष सुकीर्ति साधनाविषयीं दक्ष याणीं हिंदूच्या मुलखांतील संपूर्ण प्रजेचें हित साधिलें, त्या योगें यांचें स्मरण लोकांच्या मनांतून भ्रष्ट नङ्गावें.

समाप्त

या ग्रंथाची दुसरी आवृत्ति छापण्याचे प्रसंगीं याची प्रति मेहेरबा न मेजर क्यांडी साहेब बहादुर पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट यांचे हुकमानें पर शुराम बल्लाळ गोडबोले यांणीं नीट केली.

इंग्रेजांचा इशावीसंन निघाल्यापासून पुढें हिंदूचा शालीवा-
हनशक कोणत्या वर्षीं चालू झाला तें,व इंग्रेजी आणि हिंदवी भा-
षा भेदें करून महिन्यांचीं नावें व त्यांचा आरंभकसकसा होतो
तें प्रकरण.

जर कोणी इच्छा करील कीं, इंग्रेजांचा इशावीसंन निघाल्या
पासून पुढें किती वर्षांनीं हिंदूंचा शालीवाहन शक चालू झाला
तें वर्ष ध्यानांत यावें, तर त्याणें इशावीसनाचीं अठ्याहत्तर किं
वा एकुण ऐंशीं वर्षें वजा करावीं, म्हणजे शालीवाहन शकाचें
आरंभाचें वर्ष कलेल. यास प्रमाण हल्लीं इशावीसंन अठराशें
एकुण तिसांचा चवथा महिना एप्रेल याची तारीख चवथी, त्या
दिवशीं हिंदूच्या शालीवाहन शकाचें सत्राशें एकावन्नावें वर्ष
निघालें, यावरून अर्थात् सिद्ध झालें कीं, इशावीसनाच्या अ-
ठराशें एकुण तिसांत शालीवाहन शकाचे सत्राशें एकावन्न वजा
दिले असतां एकुण ऐंशीं शेष रहातात. त्या एकुण ऐंशाव्या वर्षीं
मार्चाची समाप्ति व एप्रेलाचा प्रारंभ अशा संधींत शाली
वाहन शक निघाला. संन अठराशें एकुण तिसांच्या एप्रेलाचे चव
थे तारिखेचे पूर्वी शकेसत्राशें पन्नास होते, त्यावरून असा अर्थ
झाला कीं, संन अठराशें एकुण तिसांत शकेसत्राशें पन्नास वजा
दिले असतां एकुण ऐंशीं शेष रहातात. त्या एकुण ऐंशाव्या वर्षीं
मार्चाची समाप्ति व एप्रेलाचा प्रारंभ अशासमयीं शालीवाहन
शकाचा प्रारंभ झाला.

यास दुसरें प्रमाण,इंग्रेजांचे इसवीसंन अठराशें एकुणति
सांत हिंदूचे शालीवाहन शकेसत्राशें पन्नासांचीसमाप्ति व सत्रा
शें एकावन्नाचा आरंभ.

इंग्रेजी आणि हिंदवी महिन्यांचीं नावें व त्यांच्या आरंभाचा प्रकार असा.

१ जानेवारींत	१० पौषमासाचीसमाप्तिव	११ माघमासाचाआरंभ.
२ फेब्रुवारींत	११ माघमासाचीसमाप्तिव	१२ फाल्गुनमासाचाआ०
३ मार्चींत	१२ फाल्गुनमासाचीसमाप्तिव	१ चैत्रमासाचाआरंभ.
४ एप्रेलांत	१ चैत्रमासाचीसमाप्तिव	२ वैशाखमासाचाआ०
५ मेंत	२ वैशाखमासाचीसमाप्तिव	३ ज्येष्ठमासाचाआरंभ.
६ जूनांत	३ ज्येष्ठमासाचीसमाप्तिव	४ आषाढमासाचाआ०
७ जुलईंत	४ आषाढामासाचीसमाप्तिव	५ श्रावणमासाचाआ०
८ आगष्टांत	५ श्रावणमासाचीसमाप्तिव	६ भाद्रपदमासाचाआ०
९ सप्तेंबरांत	६ भाद्रपदमासाचीसमाप्तिव	७ आश्विनमासाचाआ०
१० अकटोंबरांत	७ आश्विनमासाचीसमाप्तिव	८ कार्तिकमासाचाआ०
११ नवेंबरांत	८ कार्तिकमासाचीसमाप्तिव	९ मार्गशीर्षमासाचाआ०
१२ दिसेंबरांत	९ मार्गशीर्षमासाचीसमाप्तिव	१० पौषमासाचाआरंभ.